
# इ - भक्तिमार्गप्रदीप



संयोजक - अशोक बसर्गेकर

कै. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर ह्यांच्या भक्तिमार्गप्रदीप
या पुस्तकाच्या अठराव्या आवृत्ति मध्ये समावेश असलेल्या
संत वाङ्मयांत थोडी अधिक भर टाकून व अनुक्रमामध्ये बदल
करून हे इ-भक्तिमार्गप्रदीप संगणकावर वाचण्यास मोफत
उपलब्ध करण्यासाठी मी हे येथे सादर करीत आहे.
अशोक केशव बसर्गेकर
मार्च २९, २०१०.

Ashok Basargekar
1423 North Cleveland Street
Orange, California, 92867 - 3707
Tel. No. (714) 639 - 3996

# साहित्याचा कालखंड.

| | |
|---|---|
| विसोबा खेचर (नामदेवांचे गुरु) | १२ . . . ते १३०९ |
| संत नामदेव (रेळेकर) | १२७० ते १३५० |
| संत जनाबाई (नामदेवांच्या घरची सेविका) | १२ . . . ते १३५० |
| संत ज्ञानेश्वर (कुलकर्णी) | १२७५ ते १२९६ |
| संत निवृत्तिनाथ (ज्ञानेश्वरांचे थोरले बंधु व गुरु) | १२७३ ते . . . |
| संत सोपान (ज्ञानेश्वरांचे धाकटे बंधु) | १२७७ ते . . . |
| संत मुक्ताबाई (ज्ञानेश्वरांची धाकटी बहिण) | १२७९ ते . . . |
| संत चोखामेळा | १२ . . . ते १३ . . . |
| संत एकनाथ (कुलकर्णी) | १५३३ ते १५९९ |
| संत समर्थरामदास (ठोसर) | १६०६ ते १६८२ |
| संत तुकाराम (व्यवसाने वाणी) | १६०८ ते १६४९ |
| कै. ल. रा. पांगारकर | जुलै १७, १८७२ ते नोव्हेंबर १०, १९४१ |

# इ - भक्तिमार्गप्रदीप



पुंडलिकास्तव सदया। कटि कर ठेवुनि विटेवरी नटलां।
चट लाविली समस्तां, भव हटला, प्रेमळां जनां पटला॥ १॥
भक्त प्रसिद्ध झाले ज्ञानदेव नाथ नामदेव तुका।
म्हणुनी विठ्ठल नामा रूपाचा गजर जाहला इतुका॥ २॥

ल. रा. पांगारकर

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

(जुलै १७, १८७२ - नोव्हेंबर १०, १९४१)

# Contents


**1 नित्यक्रम** **1**
1.1 प्रातःस्मरण . . . 1
1.2 मङ्गलाचरण . . . 1
1.3 करदर्शन व भूमिवन्दन . . . 1
1.4 मुखमार्जनानन्तर . . . 1

**2 भूपाळ्या** **2**
2.1 भूपाळी गणपतीची . . . 2
2.2 भूपाळी रामाची १ . . . 2
2.3 भूपाळी रामाची २ . . . 3
2.4 भूपाळी आत्मारामाची . . . 3
2.5 भूपाळी मारुतीची . . . 3
2.6 भूपाळी शङ्कराची . . . 3
2.7 भूपाळी पण्ढरीची . . . 3
2.8 भूपाळी श्रीकृष्णाची १ . . . 4
2.9 भूपाळी श्रीकृष्णाची २ . . . 4
2.10 भूपाळी श्रीकृष्णाची ३ . . . 4
2.11 भूपाळी गोपाळाची . . . 4
2.12 भूपाळी घनश्यामश्रीधराची . . . 5
2.13 भूपाळी गङ्गेची . . . 5
2.14 भूपाळी सन्तांची . . . 5

**3 वेदान्तपर भूपाळीपंचक** **6**
3.1 अष्टदेहनिरसन . . . 6
3.2 सकळसच्चिदानन्द . . . 6
3.3 वर्णाश्रमधर्ममुक्ति . . . 7
3.4 सहजसमाधि . . . 7
3.5 पूर्णानन्दानुभव . . . 7

**4 कांकडाआरत्या** **7**
4.1 साधकाची कांकडारती . . . 7
4.2 पण्ढरीनाथाची कांकडारती . . . 7
4.3 रघुपतीची कांकडारती . . . 8
4.4 पाण्डुरङ्गाची कांकडारती . . . 8

**5 स्नानविधि** **8**
5.1 स्नान करताना म्हणावयाचे श्लोक . . . 8
5.2 सूर्यनमस्कार . . . 8
5.3 सूर्याची बारा नांवे . . . 9

**6 निवडक सूक्ते** **9**
6.1 श्रीगणपतिअथर्वशीर्षम् . . . 9
6.2 पुरुषसूक्तम् . . . 10
6.3 श्रीविष्णुसूक्तम् . . . 11
6.4 श्रीविष्णुसूक्तम् . . . 12
6.5 श्रीईशोपनिषद् . . . 13
6.6 श्रीसूक्त . . . 14
6.7 श्रीभूसूक्तम् . . . 16

**7 निवडक स्तोत्रे** **17**
7.1 चर्पटपञ्जरिकास्तोत्रम् . . . 17
7.2 द्वादशपञ्जरिकास्तोत्रम् . . . 17
7.3 पाण्डवगीता . . . 18
7.4 श्रीरामरक्षास्तोत्रम् . . . 21
7.5 श्रीवेङ्कटेश सुप्रभातम् . . . 23
7.6 श्रीवेङ्कटेश स्तोत्रम् . . . 24
7.7 श्रीवेङ्कटेश प्रपत्ति . . . 25
7.8 श्रीवेङ्कटेश मङ्गलाशासनम् . . . 26
7.9 श्रीव्यङ्कटेश स्तोत्र . . . 26
7.10 भीमरूपीस्तोत्र . . . 29
7.11 आदिशक्तिभवानीस्तोत्र . . . 29
7.12 श्रीशारदास्तोत्र . . . 31

**8 आरतीसंग्रह** **32**
8.1 आरती गणपतीची . . . 33
8.2 आरती शंकराची . . . 33
8.3 आरती विष्णूची १ . . . 33
8.4 आरती विष्णूची २ . . . 34
8.5 आरती भुवनसुंदराची . . . 34
8.6 आरती व्यंकटेशाची . . . 34
8.7 आरती सुर्याची . . . 34
8.8 आरती दुर्गादेवीची . . . 35
8.9 आरती श्रीरामाची . . . 35
8.10 आरती श्रीआत्मारामाची . . . 35
8.11 आरती मारुतीची . . . 35
8.12 आरती श्रीनृसिंहाची . . . 36
8.13 आरती श्रीसत्यनारायणाची . . . 36
8.14 आरती श्रीविठ्ठलाची १ . . . 36
8.15 आरती श्रीविठ्ठलाची २ . . . 37
8.16 आरती श्रीकृष्णाची १ . . . 37
8.17 आरती श्रीकृष्णाची २ . . . 37
8.18 आरती श्रीकृष्णाची ३ . . . 37
8.19 आरती कुंजबिहारीची ४ . . . 37
8.20 आरती सद्गुरूंची १ . . . 38
8.21 आरती सद्गुरूंची २ . . . 38
8.22 आरती सद्गुरूंची ३ . . . 38
8.23 आरती ज्ञानेश्वरांची . . . 38
8.24 आरती एकनाथांची . . . 38
8.25 आरती नामदेवाची . . . 38
8.26 आरती तुकारामाची . . . 39
8.27 आरती रामदासांची १ . . . 39
8.28 आरती रामदासांची २ . . . 39
8.29 आरती संतांची . . . 39
8.30 आरती तुळशीची . . . 39
8.31 आरती खंडोबाची . . . 40
8.32 आरती श्रीगुरुदत्ताची . . . 40
8.33 आरती जगदीश्वराची . . . 40

**9 प्रार्थना** **40**
9.1 मंत्रपुष्पांजलि . . . 41
9.2 प्रदक्षिणा . . . 41

**10 मुखशुद्धि** **42**
10.1 विडा श्रीरामाचा . . . 42
10.2 विडा श्रीकृष्णाचा . . . 42

**11 अभंग** **42**
11.1 धांवा . . . 42

**12 पद** **43**
12.1 . . . 43
12.2 . . . 43
12.3 मोरोपंती श्लोक . . . 43
12.4 ज्ञानेश्वरांचे पसायदान . . . 43
12.5 सार्वजनिक प्रार्थना . . . 43

**13 शेजारती** **44**
13.1 पाळणा . . . 44
13.2 कृष्णाची शेजारती . . . 44
13.3 विठोबाची शेजारती . . . 44
13.4 रामाची शेजारती . . . 44

**14 उपसंहार व वरप्रसाद** **44**

**15 धन्यता** **46**

**16 अभंग** **46**

**17 भजने** **47**

**18 पदे** **47**

**19 श्रीरामाचे ध्यान** **48**

**20 करुणाष्टके** **48**

**21 श्रीकृष्णप्रार्थना** **51**

**22 सात वारांचे भजन** **53**
22.1 सोमवार . . . 53
22.2 मंगळवार . . . 53
22.3 बुधवार . . . 54
22.4 गुरुवार . . . 54
22.5 शुक्रवार . . . 54
22.6 शनिवार . . . 55
22.7 रविवार . . . 55

**23 प्रेमळ अभंग** **56**
23.1 निवृत्तिनाथ . . . 56
23.2 श्रीज्ञानदेव . . . 56
23.3 श्रीसोपान . . . 57
23.4 मुक्ताबाई . . . 57
23.5 श्रीचांगदेव . . . 57
23.6 श्रीनामदेव . . . 57
23.7 जनाबाई . . . 58
23.8 श्रीएकनाथ . . . 59
23.9 श्रीतुकाराम . . . 60
23.10 श्रीरामदास . . . 65
23.11 शेख महंमद . . . 67
23.12 चोखामेळा . . . 67

23.13 निळोबाराय . . . 67
23.14 कृष्णदयार्णव . . . 67
23.15 वासुदेवानंदस्वामी . . . 67

**24 प्रेमळ पदे** **68**
24.1 श्रीज्ञानदेव . . . 68
24.2 श्रीएकनाथ . . . 68
24.3 श्रीनामदेव . . . 68
24.4 श्रीरामदास . . . 69
24.5 केशवचैतन्य . . . 69
24.6 आनन्दतनय . . . 69
24.7 केशवस्वामी . . . 69
24.8 रंगनाथस्वामी . . . 70
24.9 वामनपंडित . . . 70
24.10 प्रह्लादबुवा बडवे . . . 70
24.11 बोधलेबुवा . . . 70
24.12 मध्वमुनीश्वर . . . 70
24.13 कोकिळ . . . 71
24.14 अमृतराय . . . 71
24.15 सोहिरोबा . . . 71
24.16 गिरिधर . . . 71
24.17 अनामी . . . 71
24.18 अमृतराय . . . 72
24.19 देवनाथ . . . 72
24.20 महादेवसुत . . . 72
24.21 नारायणबुवा . . . 72
24.22 रामजोशी . . . 72
24.23 गोविन्दबुवा . . . 72
24.24 विठोबाअण्णा कऱ्हाडकर . . . 73
24.25 कृष्णभट बांदकर . . . 74

**25 हिंदुस्थानी पदें** **74**
25.1 कबीर . . . 74
25.2 मीराबाई . . . 74
25.3 सुंदरदास . . . 74
25.4 श्रीशंकराचार्य . . . 75

**26 श्रीसद्गुरुस्तव** **75**

**27 अभंग** **75**

**28 गुरुपादुकाष्टक** **75**

**29 सद्गुरुस्तोत्र** **76**

**30 पदे** **77**

**31 श्रीदत्तगुरुकरुणाष्टकम्** **77**

**32 श्रीगुरुचरित्रकार सरस्वती गंगाधरकृत दोन पदे** **78**

**33 संतमहात्म्य** **78**
33.1 अभंग . . . 78
33.2 पदे . . . 82

**34 नामसंकीर्तन** **82**
34.1 हरिपाठाचे अभंग . . . 82
34.2 स्फुट अभंग . . . 84

34.3 वामनी श्लोक . . . 87
34.4 दोहरे . . . 88

**35 परमार्थ विचारणा** **88**
35.1 प्रपंचातील वागणूक . . . 88
35.2 आचार्यांचा उपदेश . . . 89
35.3 सुविचारमाला . . . 89
35.4 श्रीसमर्थकृत मनाचे बोध . . . 90
35.5 श्री एकनाथकृत चिरंजीवपद . . . 99

**36 अमृतबिंदुशतक** **101**
36.1 श्रीज्ञानेश्वर . . . 101
36.2 श्रीएकनाथ . . . 102
36.3 श्रीतुकाराम . . . 102
36.4 श्रीरामदास . . . 103

**37 लोकप्रिय भारुडे** **104**
37.1 ज्ञानेश्वरांचा आंधळा . . . 104
37.2 नामदेवांचा बोबडा . . . 104
37.3 तुकोबांचा आंधळा . . . 104
37.4 रामदासांचा पांगळा . . . 105
37.5 ज्ञानोबांचा घोंगडी . . . 105
37.6 नाथांचा जोशी . . . 105
37.7 नाथांची मुरळी . . . 106
37.8 नाथांचे भूत . . . 106
37.9 नाथांचा जागल्या . . . 106

# भक्तिमार्गप्रदीप

## 1 नित्यक्रम

### 1.1 प्रातःस्मरण

सूर्योदयापूर्वी उठून, शौच- मुखमार्जन करून, शुद्ध मनाने प्रभूचे स्मरण करावे. प्रभातकाली वातावरणात एक प्रकारची प्रसन्नता असते. अशा वेळी म्हणजे ब्राह्म मुहुर्तावर उठून आपल्या दैनिक कार्यक्रमाचा आरंभ प्रभुस्मरणाने केला असतां आत्मबल वाढते, पापविचार मनात येत नाहीत, एकाग्रता उत्पन्न होते आणि मनाच्या प्रसन्नतेचा परिणाम शरिरावर होऊन आरोग्य प्राप्त होते. शिवाय देवपूजेच्या निमित्ताने सकाळीच फुले आणण्यासाठी बागेत गेले असतां थोडासा व्यायाम होऊन शुद्ध मोकळी हवाहि मिळते. आमच्या दूरदृष्टी पूर्वजानी ह्या बाबतीत जे नियम घालून ठेवले आहेत, त्यांचा उद्देश धर्माचरण आणि आरोग्य संपादन ही एकसमयावच्छेदेकरून करतां यावीत हाच आहे.

उठा सकळ जन उठिले नारायण।
आनन्दले मुनिजन तीन्ही लोक॥ १॥
करा जयजयकार वाद्यांचा गजर।
मृदंग विणे अपार टाळघोळ॥ २॥
जोडोनियां कर मुख पाहा सादर।
पायावरी शिर ठेवूनिया॥ ३॥
तुका म्हणे काय पढियंते तें मागा।
आपुलाले सांगा दुःख सकळ॥ ४॥

### 1.2 मङ्गलाचरण

श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीगुरुभ्यो नमः।
श्रीवेदपुरुषाय नमः। इष्टदेवताभ्यो नमः।
कुलदेवताभ्यो नमः। श्रीलक्ष्मीनारायणाभ्यां नमः।
श्रीउमामहेश्वराभ्यां नमः। श्रीमातापितृभ्यां नमः।

### 1.3 करदर्शन व भूमिवन्दन

कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती।
करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम्॥ १॥
समुद्रवसने देवि ! पर्वतस्तनमण्डले ! ।
विष्णुपत्नि ! नमस्तुभ्यं पादस्पर्शम् क्षमस्व मे॥ २ ॥

### 1.4 मुखमार्जनानन्तर

वक्रतुण्ड महाकाय कोटिसूर्यसमप्रभ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा॥ ३॥

गणनाथसरस्वतीरविशुक्रबृहस्पतीन्।
पञ्चैतान्संस्मरेन्नित्यं वेदवाणीप्रवृत्तये॥ ४॥
विनायकं गुरुं भानु ब्रह्मविष्नुमहेश्वरान्।
सरस्वतींप्रणौम्यादौ सर्वकार्यार्थ्सिद्धये॥ ५॥
अभीप्सितार्थसिद्ध्यर्थं पूजितो यः सुरासुरैः।
सर्वविघ्नहरस्तस्मै गणाधिपतये नमः॥ ६॥
सर्वेष्वारब्धकार्येषु त्रयस्त्रिभुवनेश्वराः।
देवा दिशन्तु नः सिद्धिं ब्रह्मेशानजनार्दनाः॥ ७॥
यो देवः सवितास्माकं धियो धर्मादिगोचरे।
प्रेरयेत्तस्यतद्भर्गस्तद्वरेण्यमुपास्महे॥ ८॥
शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं।
विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम्।
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम्॥। ९॥
मूकं करोति वाचालं पङ्गुं लङ्घयते गिरिम्।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्॥ १०॥
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥ ११॥
ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम्
द्वन्द्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम्।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि॥ १२॥
हे जिह्वे रससारज्ञे सर्वदा मधुरप्रिये।
नारायणाख्यपीयूषं पिब जिह्वे निरन्तरम्॥ १३॥
पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः।
पुण्यश्लोको विदेहश्च पुण्यश्लोको जनार्दनः॥ १४॥

कर्कोटकस्य नागस्य दमयन्त्या नलस्य च।
ऋतुपर्णस्य राजर्षेः कीर्तनं कलिनाशनम्॥ १५॥
बलिर्बिभीषणो भीष्मः प्रह्लादो नारदो ध्रुवः।
षडेते वैष्णवास्तेषां स्मरणं पापनाशनम्॥ १७॥
अहल्या द्रौपदी सीता तारा मन्दोदरी तथा।
पञ्चकं ना स्मरेन्नित्यं महापातकनाशनम्॥ १८॥
अयोध्या मथुरा माया काशी काञ्ची अवन्तिका।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः॥ १९॥

अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरिटी श्वेतवाहनः।
बीभत्सुर्विजयः कृष्णः सव्यसाची धनञ्जयः॥ २०॥
गाङ्गं वारि मनोहारि मुरारिचरणच्युतम्।
त्रिपुरारिशिरश्चारि पापहारि पुनातु माम्॥ २१॥
जिह्वे कीर्तय केशवं मुररिपुं चेतो भज श्रीधरं।
पाणिद्वन्द्व समर्चयाच्युतकथां श्रोत्रद्वयं त्वं शृणु॥
कृष्णं लोकय लोचनद्वय हरेर्गच्छाङ्घ्रियुग्मालयं।
जिघ्र घ्राण मुकुन्दपादतुलसीं मूर्धन्नमाधोक्षजम्॥ २२॥
पृथ्वी सगन्धा सरसास्तथापः
स्पर्शी च वायुर्ज्वलनः सतेजः ।
नभः सशब्दं महता सहैते
कुर्वन्तु सर्वे मम सुप्रभातम्॥ २३॥
ब्रह्मा मुरारिस्त्रिपुरान्तकारिः
भानुः शशी भूमिसुतो बुधश्च।
गुरुश्च शुक्रः शनिराहुकेतवः
कुर्वन्तु सर्वे मम सुप्रभातम्॥ २४॥
जले रक्षतु वाराहः स्थले रक्षतु वामनः।
अटव्यां नारसिंहश्च सर्वतः पातु केशवः॥ २५॥
लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजयः।
येषामिन्दीवरश्यामो हृदयस्थो जनार्दनः॥ २६॥
सर्वदा सर्व कार्येषु नास्ति तेषाममङ्गलम्।
येषां हृदिस्थो भगवान् मङ्गलायतनं हरिः॥ २७॥
न वासुदेवभक्तानाम् अशुभं विद्यते क्वचित्।
जन्ममृत्युजराव्याधिभयं नैवोपजायते॥ २८॥
आदौ रामतपोवनादिगमनं हत्वा मृगं काञ्चनम्।
वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीवसंभाषणम्॥
वालीनिर्दलनं समुद्रतरणं लङ्कापुरीदाहनम्।
पश्चाद्रावणकुम्भकर्णहननमेतद्धि रामायणम्॥ २९॥
आदौ देवकिदेविगर्भजननं गोपीगृहे वर्धनम्।
मायापूतनजीवितापहरणं गोवर्धनोद्धारणम्॥
कंसच्छेदनकौरवादिहननं कुन्तीतनूजावनम्।
एतद्भागवतं पुराणकथितं श्रीकृष्णलीलामृतम्॥ ३०॥
वाचा निर्मलया सुधामधुरया यां नाथ शिक्षामदा-
स्तां स्वप्नेऽपि न संस्मराम्यहरहः पापावृतो निस्त्रपः।
इत्यागः शतशालिनं पुनरपि स्वीयेषु मां बिभ्रत-
स्त्वत्तो नास्ति दयानिधिर्यदुपते मत्तो न मत्तोऽपरः॥ ३१॥
गोविन्दा गोपाला कृष्णा विष्णू मुकुन्द घननीळा।
धृतकौस्तुभवनमाळा पीतांबरधारि देवकीबाळा॥ ३२॥
श्रीरामा पुरुषोत्तमा नरहरे नारायणा केशवा
गोविन्दा गरुडध्वजा गुणनिधे दामोधरा माधवा।
श्रीकृष्णा कमलापते यदुपते सीतापते श्रीपते
वैकुण्ठाधिपते चराचरपते लक्ष्मीपते पाहि माम्॥ ३३॥
रामाय रामभद्राय रामचन्द्राय वेधसे।
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः॥ ३४॥
उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविन्द उत्तिष्ठ गरुडध्वज।
उत्तिष्ठ कमलाकान्त त्रैलोक्यं मङ्गलं कुरु॥ ३५॥
नमो ब्रह्मण्यदेवाय गोब्राह्मणहिताय च।
जगद्धिताय कृष्णाय गोविन्दाय नमो नमः॥ ३६॥
कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने।
प्रणतक्लेशनाशाय गोविन्दाय नमो नमः॥ ३७॥
वसुदेवसुतं देवं कंसचारुणमर्दनम्।
देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम्॥ ३८॥
मङ्गलं भगवान्विष्णुर्मङ्गलं गरुडध्वजः।
मङ्गलं पुण्डरीकाक्षो मङ्गलायतनं हरिः॥ ३९॥

# 2 भूपाळ्या

भूपाळी हा शब्द भूपावलि ह्या संस्कृत शब्दाचे अपभ्रष्ट रूप होय. भूप रागाच्या पंक्ति हा ह्याचा अर्थ. देव निजला आहे, त्याला जागृत करण्यासाठी पहाटेच्या भूप रागात गाणे गावयाचे ही कल्पना ह्यात आहे. कांही भूपाळ्यात उत्तम प्रकारचे काव्य दृष्टीस पडते.

## 2.1 भूपाळी गणपतीची

उठा उठा सकळिक। वाचे स्मरावा गजमुख।
ऋद्धि-सिद्धींचा नायक। सुखदायक भक्तांसी।
सुखदायक दासांसी ॥ धृ॥
अंगी शेंदुराची उटी। माथां शोभतसे कीरिटी।
केशरकस्तूरी लल्लाटी। हार कंठी साजिरा॥ १॥
कानी कुंडलांची प्रभा। चंद्र-सूर्य जैसे नभा।
माजी[1] नागबंदी[2] शोभा। स्मरतां उभा जवळी तो॥ २॥

कांसे पीतांबराची धटी[3]। हाती मोदकांची वाटी।

रामानंद स्मरतां कंठी। तो संकटी पावतो॥ ३॥

## 2.2 भूपाळी रामाची १

उठोनियां प्रातःकाळी। जपा रामनामावळी।
स्वये ध्यातो चंद्रमौळी[4]। शैलबाळीसमवेत[5]॥ धृ॥
राम योग्यांचे मंडण। राम भक्तांचे भूषण।
राम धर्माचे रक्षण। संरक्षण दासांचे॥ १॥

[1] कटीचे ठायी; जसे माजी वेष्ठित वल्कले आनंदतनय
[2] नागाकृति कंबरपट्टा
[3] रेशमी वस्त्र
[4] शंकर
[5] पार्वतीसह

रामे ताटका मारिली। रामे शिळा उद्धारिली।
रामे जानकी पर्णिली[6]। गणिका केली ते मुक्त॥ २॥
रामे पाषाण तारिले। रामे दैत्य संहारिले।
रामे बंदी सोडविले। मुक्त केले सुरवर॥ ३॥
रामे रक्षिले भक्तांसी। रामे सोडविले देवांसी।
राम दासाचे मानसी। रामदासी आनंद॥ ४॥

## 2.3 भूपाळी रामाची २

जागिये रघुनाथ कुंवर। पंछी बन बोले॥ टेक॥
चंद्रकिरण शीतल भई[7]। चकई[8] पियमिलन[9] गई।
त्रिविध मंद चलत पवन। पल्लव द्रुम डोले॥ १॥
प्रातभानु प्रगट भयो। रजनीको तिमिर गयो।
भृंग करत गुंज गान। कमलन दल खोले[10]॥ २॥
ब्रह्मादिक धरत ध्यान। सुरनरमुनि करत गान।
जागनकी बेर[11] भई। नयनपलक खोले॥ ३॥
तुलसिदास अतिअनंद। निरखि कैं मुखारविंद।
दीननको देत दान। भूषण अनमोले॥ ४॥

## 2.4 भूपाळी आत्मारामाची

उठा प्रातःकाल झाला। आत्माराम पाहूं चला।
हा समयो जरि टळला। तरि अंतरला श्रीराम॥ धृ॥
जीव-शिव दोघेजण। भरत आणि शत्रुघन।
आला बंधु लक्षुमण। मन उन्मन होऊनी॥ १॥
विवेक वसिष्ठ सद्गुरू। संतसज्जन मुनीश्वरू।
करिती नामाचा गजरू। हर्षनिर्भर होउनियां॥ २॥
सात्त्विक सुमंत प्रधान। नगरवासी अवघे जन।
आला वायूचा नंदन। श्री चरण पहावया॥ ३॥
माता जानकी बिघडली[12]। होती प्रारब्धें लिहिली।
तिची देहबुद्धि जाळिली। आलिंगिली श्रीरामें॥ ४॥
आजचि दिवाळी दसरा। पर्वकाळ आला घरा।
रामानंदाच्या दातारा। भेटी माहेरा मज द्यावी॥ ५॥

[6] विवाह केला
[7] झाले
[8] चक्रवाकी
[9] प्रियास भेटण्यास
[10] उघडले
[11] वेळ
[12] दूषिली. रावणगृही राहिल्यामुळे अग्नीत दिव्य झाल्यावर म्हणजे देहबुद्धि नष्ट झाल्यावर रामाने सीतेला आलिंगिले.

## 2.5 भूपाळी मारुतीची

उठा प्रातःकाळ झाला। मारुतीला पाहूं चला।
ज्याचा प्रताप आगळा। विरंचीही नेणतो॥ धृ॥
आमुचा हनुमंत साह्यकारी। तेथे विघ्न काय करी।
दृढ धरा हो अंतरी। तो पावेल त्वरित॥ १॥
आमुचा निर्वाणीचा गडी। तोचि पावेल साकडी।
त्याचे भजनाची आवडी। दृढ बुद्धि धरावी॥ २॥
थोर महिमा जयाची। कीर्ती वर्णावी तयाची।
रामी रामदासाची। निकट भक्ति करावी॥ ३॥

## 2.6 भूपाळी शङ्कराची

धवळे भोळे चक्रवर्ती। धवळे अलंकार शोभती।
धवळे धाम उमापती। सदा चित्ती चिंतावा॥ धृ॥
धवळ्या जटा गंगाजळ। धवळा मयंक निर्मळ।
धवळे कुंडलांचा लोळ। शंखमाळ लोंबती॥ १॥
धवळी स्पटिकांची माळ। धवळे गळां उलथे व्याळ।
धवळे हातीं नर-कपाळ। धवळा त्रिशूळ शोभतसे॥ २॥
धवळा सर्वांगे आपण। धवळे विभूतीचे लेपन।
धवळे गात्र धवळे वसन। धवळे वाहन नंदीचे॥ ३॥
धवळे कैलासभुवन। धवळे मध्यें सिंहासन।
धवळे शंकराचे ध्यान। दास चिंतन करीतसे॥ ४॥

## 2.7 भूपाळी पण्ढरीची

उठा उठा हो वेगेंसी। चला जाऊं पंढरिसी।
भेटों विठ्ठल-रखुमाईसी। त्रिविध ताप हरतील॥ धृ॥

चंद्रभागे करूं स्नान। घेऊं पुंडलिकाचे दर्शन।
तेथे भेटती संतजन। तेणें मन निवेल॥ १॥
गंगा यमुना सरस्वती। कृष्णा वेण्या भागिरथी।
तुंगभद्रा भोगावती। येती श्रीपतिदर्शना॥ २॥
तापी नर्मदा कावेरी। पंचगंगा गोदावरी।
स्नानें कलिया बोहरी। महादोष हरतील॥ ३॥
रामानंदाचे माहेर। क्षेत्र नाम पंढरपुर।
माता पिता विश्वंभर। पैलपार तरतील॥ ४॥

## 2.8 भूपाळी श्रीकृष्णाची १

जाग रे जाग बापा। विश्वपालका कृष्णा।
दीन आम्ही उभे द्वारी। आमुची बोळवी[13]तृष्णा॥ धृ॥
त्रासलो प्रपंची या। बहु कष्टलो भारी।
म्हणउनि शरण आलो। विभो! तुझिया द्वारी॥ १॥
सांग बा! न्यून काय? ।हरि तुझिया भांडारी।
याचक भीक मागे। प्रेम देई झडकरी[14] ॥ २॥
गुरुकृपे उदयो झाला। हरि उदया आला।
सुख तें काय सांगूं। जिवलग भेटला॥ ३॥
श्रीगुरुनाथराया। कृपासिंधु गोविंदा।
देवनाथ प्रार्थिताहे। प्रभुपदारविंदा॥ ४॥

## 2.9 भूपाळी श्रीकृष्णाची २

ऊठि गोपाळजी! जाइ धेनूंकडे।
पाहती सौंगडे वाट तूझी॥ धृ॥
लोपली हे निशी मंद झाला शशी।
मुनिजन मानसीं ध्याति तुजला॥ १॥
भानु उदयाचळीं तेज पुंजाळले।
विकसती कमळें जळामाजी॥ २॥
धेनुवत्से तुला बाहती[15] माधवा।
ऊठ गा यादवा!! उशिर झाला॥ ३॥
ऊठ पुरुषोत्तमा! वाट पाहे रमा।
दावि मुखचंद्रमा सकळिकांसी॥ ४॥
कमलपात्रांतरी दीपरत्ने बरी।
ओवाळती सुंदरी तूजलागी॥ ५॥
जन्मजन्मांतरी दास होऊं हरी।
बोलती वैखरी भक्त तूझे॥ ६॥
कृष्णकेशव करी चरणांभुज धरी।
ऊठ गा श्रीहरी मायबापा॥ ७॥

## 2.10 भूपाळी श्रीकृष्णाची ३

जागो बन्सीवारे ललना जागो मोरे प्यारे॥ धृ॥
रजनी बीती भोर भयो है। घर घर खिले किंवारे।

[13] नाश (पापांचा)
[14] प्रेमाची भिक्षा घाल.
[15] बोलावतात

गोपी दहीमथन सुनियत है। कंगनाके झनकारे॥
उठो लालजी भोर भयो है। सुरनर ठाढे द्वारे।
ग्वालबाल सब करत कुलाहल जय जय शब्द उचारे॥
माखन रोटी हाथमे लीन्ही गौवनके रखवारे।
मीराके प्रभु गिरिधर नागर शरण आयाको तारे॥

## 2.11 भूपाळी गोपाळाची

[16]

उठी रे गोपाळा[17] उघडी स्वरूपलोचना।
सरलि अविद्याराती उदयो झाला रविकिरणा॥
इंद्रियगोधने[18] नेइ निर्गुणकानना।
सुटली मानसवत्से[19] तुजविण नाकळती कोणा॥ धृ॥
प्रबोध पहाट झाली सरले तिमिर तम-रज।
गुरुकृपेचा अरुण[20] दावी सुरंगसमतेज॥
आत्मा-दिनकर पाठी प्रगटे तात्काळिक सहज।
जिवचंद्राचे मंडळ तेणें झाले निस्तेज॥ १॥
दृश्यभास चांदणिया असते ठायिच लोपलिया।
लिंगदेहकमळींचे मधुकर सुटले आपसया॥
बुद्धिबोधचक्रवाकें मिनली आपणियां।
देहबुद्धिकुमुदिनी सुकोनी गेलीसे विलया॥ २॥
योगविद्येच्या पंथे साधकवृंदे चालियली।
उपनिषद्गागार्थ शब्द केला कोकिळी॥
वाग्वादाचे उलूक[21] रिघती मौनाचे ढोली।
विकल्प अटवी साही[22] चारी सांडियली॥ ३॥
विरागरश्मी जवळी धरितां चित्तरविकांत।
आत्मवह्नि प्रगटे विषयवन हें जाळीत॥
तृष्णेच्या श्वापदांवरी प्रळय अद्भूत।
विश्व हें लटिकें मूढा मृगजळवत॥ ४॥
जारव्यसनी जिव हा झाला उदमी सुविचार।
वासना कुंटिणिचा सहजें खुंटला व्यापार॥
लीला-विश्वंभरस्वामी उठिला सत्वर।
चाले मुक्तेश्वर संगी धरूनिया कर॥ ५॥

[16] हे मुक्तेश्वरी रूपक बहारीचे आहे.
[17] इंद्रियचालका
[18] इंद्रिये ही ओढाळ गुरे.
[19] विषयेंद्रियसंयोगाने पुष्ट होणारी मानसरूपी वासरे.
[20] गुरुकृपेचा अरुणोदय झाला कीं आत्मस्वरूप सूर्याचा प्रकाश मागून आलाच; मी ब्रह्म आहे हा अनुभव होतांच जीवपण मावळते.
[21] उपनिषदांनी गायिलेल्या आत्मस्वरूपाचा बोध होतांच वाग्वादरूपी दिवाभीते (घुबडे) सहज पळून जातात. अर्थात् वाचानिवृत्ति होते.
[22] सहा शास्त्रे व चार वेद.

## 2.12 भूपाळी घनश्यामश्रीधराची

घनश्यामसुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला।
उठि लवकरि वनमाळी! उदयाचळी मित्र आला॥ धृ॥

सायंकाळी एके मेळी द्विजगण अवघे वृक्षीं।
अरुणोदय होताचि उडाले चरावया पक्षी॥
अघमर्षणादि[23] करुनि तापसी तपाचरण-दक्षी।
प्रभातकाळी उठुनी कापडी[24] तीर्थपंथ लक्षी॥
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षी।
यमुनाजळासि जाति मुकुंदा! दध्योदन[25] भक्षी॥
मुक्तता होऊं पाहे कमळीणीपासुनियां भ्रमरा।
पूर्वदिशे मुख धुतले होतसे नाश तिमिरा॥
उठि लवकरि गोविंदा सांवळ्या नंदकुमारा॥
मुखप्रक्षालन करी अंगिकारी भास्कर-काला॥ १॥

घरोघरि दीप अखंड त्याच्या सरसावुनि वाती।
गीत गाति सप्रेमें गोपी सदना येति जाती॥
प्रवर्तोनि गृहकामी रंगावळि घालूं पाहती॥
आनंदकंदा! प्रभात झाली उठि सरली राती॥
काढी धार क्षीरपात्र घेउनी धेनू हंबरती।
दारि गोपाळ उभे तुजला हांक मारुनि बाहती॥
हे सुमनहार कंठी घालि या गुंजमाळा॥
हाती वेत्रकाष्ठ बरवे कांबळा घेइ काळा॥
ममात्मजा मधुसूदना हृषीकेशि जगत्पाळा।
लक्षितातिं वासरे हरी धेनुस्तन-पानाला॥ २॥

प्रातःस्नाने करुनि गोपिका अलंकार नटती।
कुंकुमादि चर्चुनी मंथनालागी आरंभिती॥
प्रेमभरित अंतरांत वदनी नामावळि गाती।
अर्घ्यदान देउनियां द्विजजन देवार्चन करिती॥
नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णु-पूजा समर्पिती।
स्मार्त शिवार्चनसक्त शक्तितें शाक्त आराधिती॥
ऋषिगण आश्रमवासी जे कां निरंजनी धाले॥
अरुणोदय होताचि आपुले ध्यानि मग्न झाले॥
पंचपंच-उषःकाली रविचक्र निघो आले॥
एवढा वेळ निजलासि म्हणुनि हरि कळेल नंदाला॥ ३॥

विद्यार्थी विद्याभासास्तव सादर गुरुपायी।
अध्यापन गुरु करिती शिष्यही अध्ययना उदयी॥

[23] पापनाशक स्तोत्रे वगैरे म्हणणे.
[24] यात्रेकरू.
[25] दहीभात.

याज्ञिकजन यज्ञकुंडि आहुती टाकितातिं पाहीं।
रविप्रभा पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही॥
हे माझे सांवळे पाडसे उठि कृष्णाबाई।
सिद्ध सर्वे बळिराम घेउनि गोधनें वना जाई॥
मुनिजनमानसहंसा गोपीमनःकमलभृंगा॥
मुरहर पंकजपाणी पद्मनाभ श्रीरंगा॥
शकटांतक सर्वेशा हे हरि प्रतापतुंगा॥
कोटिरवींहुनि तेज आगळे तुझिया वदनाला।
होनाजी-बाळा[26] नित्य ध्यातसे हृदयि नाममाळा॥ ४॥

## 2.13 भूपाळी गङ्गेची

उठोनियां प्रातःकाळी। वदनी वदावा चंद्रमौळी[27]।
श्रीबिंदुमाधवाजवळी। स्नान करा गंगेचे।
स्नान करा गोदेचे॥ धृ॥

स्नान दान जया अंतरी। घडेल भागिरथीच्या तीरी।
हरि कृपा करिल त्यावरी। ऐसे महात्म्य गंगेचे।
ऐसे महात्म्य गोदेचे[28]॥ १॥
भागिरथीचे स्नान करा। हृदयी स्मरोनि गंगाधरा।
चुकेल चौऱ्यांशीचा फेरा। ऐसे महात्म्य गंगेचे॥ २॥
गंगा आहे स्वर्गावरती। पाताळी ते भोगावती।
मृत्युलोकी[29] हे विख्याती। ऐसे महात्म्य गंगेचे॥ ३॥
कृष्णा वेण्या तुंगभद्रा। शरयू कालिंदी नर्मदा।
भीमा भामा मुख्य गोदा। करा स्नान गंगेचे॥ ४॥
व्यास वाल्मीकि नारदमुनी। अत्रि वसिष्ठ आणि जैमिनी।
गुरुदत्त येति माध्यांन्ही। ऐसे महात्म्य[30] गंगेचे॥ ५॥
आली आषाढी एकादशी। चला जाऊं पंढरिसी।
पांडुरंगचरणांपाशी। दावी महात्म्य गंगेचे॥ ६॥

## 2.14 भूपाळी सन्तांची

उठि उठि बा पुरुषोत्तमा। भक्तकामकल्पद्रुमा।
आत्मारामा निजसुखधामा। मेघश्यामा श्रीकृष्णा॥ धृ॥
भक्तमंडळी महाद्वारी। उभी तिष्ठत श्रीहरी।
जोडोनियां दोन्ही करी। तुज मुरारी पहावया॥ १॥

[26] सदर अप्रतिम भूपाळी रचणारा एक पुरुष नसून होनाजी गवळी आणि बाळा शिंपी ह्या दोघांच्या संयुक्त नांवावर ती आहे.
[27] शंकर
[28] गोदावरी ही दक्षिणेतील गंगाच आहे.
[29] म्हणून तिला त्रिपथगा असे म्हणतात.
[30] तीर्थ व संत ऋषिमुनी ह्यांचे नित्य सहचर्य आहे.

संत सनकादिक नारद। व्यास वाल्मीकि धृव-प्रल्हाद।
पार्थ पराशर रुक्मांगद। हनुमान अंगद बळिराजा॥ २॥
झाला प्रातःकाळ पूर्ण। करी पंचांगश्रवण।
आला मुद्गलभट ब्राह्मण। आशीर्वचन घे त्याचे॥ ३॥
तुझा नामदेव शिंपी। घेउनी आला आंगी-टोपी।
आतां जाऊं नको बा झोपी। दर्शन देई निजभक्तां॥ ४॥
नानापरिचे अलंकार। घेउनि आला नरहरि सोनार।
आला रोहिदास चांभार। जोडा घेउन तुजलागी॥ ५॥
सुगंधसुमने पुष्पांजुळी। घेऊनि आला सावंता माळी।
म्हणे श्रीहरिपदकमळी। अनन्यभावे समर्पूं॥ ६॥
कान्हुपात्रा नृत्य करी। टाळछंदे साक्षात्कारी।
सेना न्हावी दर्पण करी। घेउनि उभा राहिला॥ ७॥
लिंबुर-हुरडा[31] घेउनि आला। तो हा माणकोजी बोधला।
दर्शन द्यावे बा त्याजला। भक्त भोळा म्हणऊनी॥ ८॥
मीराबाई तुझेसाठी। दूध-तुपें भरुनी वाटी।
तुझे लावावया ओठीं। लक्ष लावुनी बैसली॥ ९॥
नामदेवाची जनी दासी। घेउनि आली तेल-तुपासी।
तुज न्हाऊं घालावयासी। उभी ठेली महाद्वारी॥ १०॥
गुळ-खोबरे भरुनी गोणी। घेउनि आला तुकया वाणी।
तुवां तारिल्या पाणीं। वह्या तयाच्या भिजल्या नाहीं॥ ११॥
आला चोखामेळा महार। स्वामी करीतसे जोहार।
त्याचा करोनियां उद्धार। संतमेळी स्थापिला॥ १२॥
हरिभजनाविण वाया गेले। ते नरदेही बैल झाले।
गोऱ्याकुंभार आणिल। खेळावया तुजलागी॥ १३॥
गरुडपारी हरिरंगणी। टाळ-मृदंगाचा ध्वनी।
महाद्वारी हरिकीर्तनी। तल्लिन कान्हा हरिदास॥ १४॥
निजानंदे रंग पूर्ण। सर्वहि कर्मे कृष्णार्पण।
श्रीरंगानुजतनुज[32] शरण। चरणसेवा करीतसे॥ १५॥

# 3 वेदान्तपर भूपाळीपंचक

पुढील भूपाळीत वेदान्ताचे रहस्य उत्कृष्ट प्रकारे स्वल्पांत आणिले आहे. जीव आणि शिव हे अनुक्रमे स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण आणि विराट, हिरण्यगर्भ, महत्तत्व व मूळमाया ह्या उपाधिभूत देहांहून निराळे आहेत हे सांगून अष्टदेहांचे निरसन पहिल्या कडव्यांत केले आहे. दुसऱ्यांत देहधर्म, प्राणधर्म व मनोधर्म ह्यांहून आत्म्याचे असंगत्व दाखवून सकळ सच्चिदानंद हे अन्वय-व्यतिरेकाने सिद्ध केले आहे. तिसऱ्यांत विरक्ति, भक्ति व ज्ञान ह्यांची लक्षणे सांगून ह्या त्रिवेणीसंगमांत नित्य स्नान करणारा पुरुष वर्णाश्रमधर्मापासूनही कसा मुक्त होतो हे वर्णिले आहे. चौथ्यांत वृत्तिसाक्षित्व अनुभवून सहजसमाधि कशी साधावी तें सांगितले आहे. व पांचव्यांत विसर (अज्ञान) विसरून व आठवा (ज्ञान) ग्रासून ब्रह्मरूप होऊन गुर्वाज्ञा पालन करीत देहपात होईपर्यंत कसे रहावे तें सांगितले आहे.

[31] बाजरीच्या व जोंधळ्याचा कणसांचा हुरडा.
[32] रंगनाथस्वामींचे पुतणे काशीराजअण्णा उर्फ योगिराज ह्यांची ही भूपाळी आहे.

## 3.1 अष्टदेहनिरसन

रामकृष्ण हरि गोविंदा, राजीवनयना रे।
बापा राजारामा रे॥
अनाथबंधो पतितपावना करुणावंता रे॥ धृ॥
गुरुकरुणोदयकाळी, शिवगुरुवर गिति गावा।
स्वहिताकारणे आपुला, विचार करावा॥ १॥
इंद्रियांसकट स्थूल नव्हे मी, जाणता याचा।
याचिकारणे विराट नोहे, देखणा त्याचा[33]॥ २॥
मनबुद्ध्यादी वृत्तिसि जाणे, अंतःकरणाच्या।
कारण हिरण्यगर्भ तयाचा साक्षी मी साचा॥ ३॥
स्वरूपि[34] जे कां विस्मृती तें, मायेचे रूप जाणा।
तेचि येथे कारण मीच, जाणें आपणा॥ ४॥
तनुत्रयाचा साक्षी तो मी, महाकारण।
तेथिल चौथे महामायेसी, मीच वोळखण॥ ५॥
शबलद्वय-उपाधि निरसितां, जीव-शिव हारपले।
शुद्ध पूर्णानंदी रिघतां शिवरामचि झाले॥ ६॥

## 3.2 सकळसच्चिदानन्द

मी देह नव्हेसा झालो तेव्हां, उपजणे-निमणे।
रोड-मोठा वृद्ध-तरुण हे, कांहीच नेणे॥ १॥
यापरि विचार करितां मनुजा, सुमनें साक्षेपें।
चैतन्य आत्मा मी हें कळतां, विचारही लोपे॥ २॥
मनसह अंतःकरणाचा मी, देखणाचि वेगळा।
वर्णाश्रमसुखदुःखे येउनि, बाधिति कवणाला? ॥ ३॥

क्षुधातृषादी प्राणधर्म हे, मजला दिसताती।
मज मी फिरोनि पाहतां मग हे, कवणा बाधीती? ॥ ४॥
हे जड ऐसें जाणुनि निराळा, होउनि मग पाहतां।
व्यतिरक चिदचिद्ग्रंथी[35] , सुटे तत्त्वतां॥ ५॥
सकळहि सच्चिदानंदु हा हो, अन्वय-बोधु।
तो जाणावा शिवरामाचा परिपूर्णानंदु॥ ६॥

[33] त्या विराटाचाही मी द्रष्टा आहे.
[34] स्वरूपाची विस्मृति हीच माया.
[35] चित् म्हणजे चैतन्य व अचित् म्हणजे जड ह्यांचा ग्रंथी म्हणजे परस्पराध्यास (अहंकार).

## 3.3 वर्णाश्रमधर्ममुक्ति

विषय इंद्रिये जड ओळखणे, तेची विरक्ती।
चैतन्याकडे वृत्ति फिरवणे, याचे नांव भक्ती[36]॥ १॥
मी चिद्घन वस्तुची प्रतीती, शुद्ध तें ज्ञान।
यापरी त्रिवेणीचे नित्य, करावे स्नान॥ २॥
वर्णाश्रमसह युक्ताचार, इंद्रिया घडे।
विरक्ति-भक्ति-ज्ञान होतां, आपेंआप चढे॥ ३॥
विचार मुळिचा हरपे हर्षामर्ष मग कैंचे।
शिवराम भजे पाय संतत, पूर्णानंदाचे॥ ४॥

## 3.4 सहजसमाधि

वृत्ति जिकडे धावे तिकडे, न जावें ती पाठी।
साक्षि[37] तियेचा होउनि पाहता, स्वरूपि होय भेटी॥ १॥
वृत्तीकडे पाहतां वृत्ती, आपणांतचि विरे।
आपण चैतन्य मात्र केवळ, परिपूर्ण उरे॥ २॥
ऐके देखे स्पर्शे हुंगे, जो जो रस[38] चाखे।
बोले चाले वेव्हारीतां, आपआपणां देखे॥ ३॥
सहजसमाधी सहजचि भोगी, पूर्णानंदू रे।
शिवराम निरावरण होउनी स्वरूपि वावरे॥ ४॥

## 3.5 पूर्णानन्दानुभव

अरुणोदयकाळी म्हणतां, पदें पांच ही।
अर्थ विवरुनी पाहतां होई, देही विदेही॥ १॥
सद्गुरु-आज्ञावचन पाळणे, परमार्थ या नांवे।
वेव्हारितां आपण आपणा, विसरूं न द्यावे॥ २॥
विसरा विसरुनि आठवा ग्रासुनि आत्मा स्वये होणे।
होणे न होणे वृत्तीविणे त्या, अंगी अनुभविणे॥ ३॥
जगीं आपण भरला आपणामाजी जग पाहे।
तो जाणावा शिवरामाचा पूर्णानंदु आहे॥ ४॥

[36] वृत्ति चैतन्याकडे फिरवणे ही भक्ति व मी चिद्घन वस्तु असा अनुभव हे ज्ञान.
[37] आपण साक्षी म्हणजे द्रष्टा होऊन वृत्तीकडे पाहूं लागलो असतां स्वरूपदर्शन होते.
[38] शब्द स्पर्श रूप रस व गंध हे पंचविषय भोगीत असतां.

# 4 कांकडाआरत्या

## 4.1 साधकाची कांकडारती

उठा उठा हो साधक, साधा आपुलाले हित।
गेला गेला हा नरदेह, मग कैंचा भगवंत॥ १॥
उठा हो वेगेंसी, चला जाउं राउळासी।
झडतिल पातकाच्या राशी, कांकड आरती पाहोनी॥ धृ॥
जागे करा रुक्मिणीवरा, देव आहे निजसुरा[39]।
वेगे निंबलोण[40] करा, दृष्ट होइल म्हणउनियां॥ २॥
उठोनिया हो पहाटे, पहा विठ्ठल उभा विटे।
चरण तयाचे गोमटे, अमृतदृष्टी अवलोका॥ ३॥
पुढे वाजंत्री वाजती, ढोल दमामे[41] गर्जती।
होत कांकडआरती, माझ्या पंढरिरायाची॥ ४॥
सिंहनाद शंख-भेरी, गजर होतो महाद्वारी।
केशवराज विटेवरी, नामा चरण वंदितो॥ ५॥

## 4.2 पण्ढरीनाथाची कांकडारती

भक्तिचिये पोटी बोध-कांकडा ज्योती।
पंचप्राण जीवेंभावे ओवाळूं आरती॥ १॥
ओवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा।
दोन्ही कर जोडूनि चरणी ठेविला माथा॥ धृ॥
काय महिमा वर्णू आतां सांगणे तें किती।
कोटी ब्रह्महत्या मुख पाहता जाती॥ २॥
राई रखुमाई उभ्या दोन्ही दों बाहीं।
मयुरपुच्छचामरे धाळिती ठाईच्या ठाईं॥ ३॥
विटेसहित पाय म्हणुनी भावें ओवाळूं।
कोटी रवि-शशी दिव्य उगवले हेळूं॥ ४॥
तुका म्हणे दीप घेउनी उन्मनीत शोभा।
विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा॥ ५॥

[39] योगनिद्रेत असलेला.
[40] मीठ मोहऱ्याने ओवाळणे.
[41] मोठे नगारे.

## 4.3 रघुपतीची कांकडारती

कांकडआरती परमात्मया रघुपती।
जीवीं जीवा ओवाळिन निजीं निजात्मज्योति॥ धृ॥
त्रिगुणकांकडा द्वैतघृतें तिंबिला।
उजळली आत्मज्योति तेणें प्रकाश फांकला॥ १॥
काजळी ना दीप अवघें तेज डळमळ।
अवनी ना अंबर अवघा निगूढ निश्चळ॥ २॥
उदय ना अस्त जेथे बोध प्रातःकाळी।
रामी रामदास सहजी सहज ओवाळी॥ ३॥

## 4.4 पाण्डुरङ्गाची कांकडारती

उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळां।
झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा॥ १॥
संत साधु मुनि अवघे झालेती गोळा।
सोडा शेजसुख आतां पाहुं द्या मुखकमळा॥ २॥
रंगमंडपीं महाद्वारीं झालीसे दाटी।
मन उतावीळ रूप पहावया दृष्टीं॥ ३॥
राई रखुमाबाई तुम्हां येऊं द्या दया।
शेजें हालवुनी जागें करा देवराया॥ ४॥
गरुड हनुमंत उभे पाहती वाट।
स्वर्गींचे सुरवर घेउनी आले बोभाट॥ ५॥
झाले मुक्तद्वार लाभ झाला रोकडा।
विष्णुदास नामा उभा घेऊनि कांकडा॥ ६॥

# 5 स्नानविधि

पहाटे, मध्यान्ही आणि सायंकाळी, असे दिवसांतून त्रिकाळ स्नान करावे असे शास्त्रात सांगितले आहे. परंतु निदान एकदां सकाळी तरी प्रत्येकाने स्नान करून शुचिर्भूत झालेच पाहिजे.

## 5.1 स्नान करताना म्हणावयाचे श्लोक

गङ्गे च यमुने चैव गोदावरि सरस्वति।
नर्मदे सिन्धु कावेरि जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु॥
नमामि गङ्गे तव पादपङ्कजं सुरासुरैर्वन्दितदिव्यरूपम्।
भुक्तिं च मुक्तिं च ददासि नित्यं,
भावानुसारेण सदा नराणाम्॥
गङ्गा गङ्गेति यो ब्रूयात् योजनानां शतैरपि।
मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति॥
गङ्गाद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते।
स्नात्वा कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते॥
पापोऽहं पापकर्माऽहं पापात्मा पापसम्भवः।
त्राहि माम् कृपया गङ्गे सर्वपापहरा भव॥

## 5.2 सूर्यनमस्कार

सकाळी उठून स्नान केल्यानंतर सूर्यास नमस्कार घालण्याची चाल पूर्वी होती. परंतु तत्सम इतर इष्ट चालीबरोबर तीहि मागे पडली आहे. तथापि हल्ली सुदैवाने ह्या बाबतीत महाराष्ट्रात थोडीशी जागृति झाली असून, बलसंपादनाच्या निमित्ताने तरी कांही बाल-तरुण मंडळी सूर्यनमस्काराचा व्यायाम आतां करू लागली आहे, ही सुदैवाची गोष्ट होय. ह्या व्यायामासारखा सोपा व उपयुक्त व्यायाम दुसरा नाही असे तज्ज्ञांचे मत आहे. प्रातःकाळी शौच-मुखमार्जन व स्नान करून तदनंतर बालसूर्याच्या कोवळ्या सोनेरी सुखस्पर्शी किरणांत नमस्कारदेवता जो सूर्यनारायण, त्याला भक्तिपूर्वक वंदन करून प्रतिदिनी नियमीत साष्टांग नमस्कार घातल्याने आपादमस्तक सर्व शरीरात एकसारखी उष्णता उत्पन्न होऊन आरोग्यास आवश्यक असलेले रुधिराभिसरण जोराने सुरू होते. नाड्यां-नाड्यांतला मळ ह्या रुधिराभिसरणाने घामाच्या रूपाने बाहेर फेकला जाऊन शरीर हलके व चपळ बनते. व सर्व अवयव प्रमाणबद्ध आणि पुष्ट होतात. जठराग्नि प्रदीप्त होऊन अन्नपचन चंगले होऊ लागते. - (सामर्थ्यसोपान)
अधिकारानुरूप खालीलप्रमाणे मंत्र व श्लोक म्हणून नंतर अनुक्रमाने पुढील बारा नावांचा उच्चार करून नमस्कार घालवेत.
आचम्य प्राणायामं कृत्वा। अद्य पूर्वोच्चरितवर्तमान एवंगुणविशेषण विशिष्ठायां शुभपुण्यतिथौ मम आत्मनः श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं श्रीसवितृसूर्यनारायण- प्रीत्यर्थं नमस्काराख्यं कर्म करिष्ये॥ (अथ ध्यानम्) ध्येयः सदा सवितृमण्डलमध्यवर्ती, नारायणः सरसिजासन सन्निविष्टः। केयुरवान् मकरकुण्डलवान् किरीटी, हारी हिरण्मय वपुधृत शङ्खचक्रः॥

## 5.3 सूर्याची बारा नांवे

| | |
|---|---|
| १ ॐ मित्राय नमः। | ७ ॐ हिरण्यगर्भाय नमः। |
| २ ॐ रवये नमः। | ८ ॐ मरीचये नमः। |
| ३ ॐ सूर्याय नमः। | ९ ॐ आदित्याय नमः। |
| ४ ॐ भानवे नमः। | १० ॐ सवित्रे नमः। |
| ५ ॐ खगाय नमः। | ११ ॐ अर्काय नमः। |
| ६ ॐ पूष्णे नमः। | १२ ॐ भास्कराय नमः। |

ॐ श्री सवितृसूर्यनारायणाय नमः।
मित्ररविसूर्यभानुखगपूषहिरण्यगर्भमरीच्यादित्यसवित्रैर्क-
भास्करेभ्यो नमो नमः।

.

नमस्कार घालून झाल्यावर खालील श्लोक म्हणावे व तीर्थ घ्यावे -
आदित्यस्य नमस्कारान् ये कुर्वन्ति दिने दिने।
जन्मान्तरसहस्रेषु दारिद्र्यं नोपजायते॥ १॥
अकालमृत्युहरणं सर्वव्याधिविनाशनम्।
सूर्यपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम्॥ २॥
अनेन नमस्कारारव्येन कर्मणा श्रीसवितृसूर्यनारायणः प्रीयताम्।

# 6 निवडक सूक्ते

## 6.1 श्रीगणपतिअथर्वशीर्षम्

ॐ नमस्ते गणपतये। त्वमेव प्रत्यक्षम् तत्वमसि।
त्वमेव केवलम् कर्तासि। त्वमेव केवलम् धर्तासि।
त्वमेव केवलम् हर्तासि। त्वमेव सर्वम् खल्विदम् ब्रह्मासि।
त्वम् साक्षात् आत्मासि नित्यम्॥ १॥
ऋतम् वच्मि। सत्यम् वच्मि॥ २ ॥

अव त्वम् माम्। अव वक्तारम्। अव श्रोतारम्।
अव दातारम्। अव धातारम्।
अवानूचानम् अव शिष्यम्।
अव पश्चात्तात्। अव पुरस्तात्। अवोत्तरात्तात्।
अव दक्षिणात्तात्। अव चोर्ध्वात्तात्। अवाधरात्तात्
सर्वतो माम् पाहि पाहि समन्तात् ॥ ३॥

त्वम् वाङ्मयः त्वम् चिन्मयः।
त्वम् आनन्दमयः त्वम् ब्रह्ममयः।
त्वम् सच्चिदानन्दाद्वितीयोऽसि।
त्वम् प्रत्यक्षम् ब्रह्मासि।
त्वम् ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि॥ ४॥

सर्वम् जगदिदम् त्वत्तो जायते।
सर्वम् जगदिदम् त्वत्तस्तिष्ठति।
सर्वम् जगदिदम् त्वयि लयमेष्यति।
सर्वम् जगदिदम् त्वयि प्रत्येति।
त्वम् भूमिः आपोऽनलोऽनिलो नभः।
त्वम् चत्वारि वाक्पदानि॥ ५॥

त्वम् गुणत्रयातीतः। त्वम् देहत्रयातीतः।
त्वम् कालत्रयातीतः। त्वम् मूलाधारस्थितोऽसि नित्यम्।
त्वम् शक्तित्रयात्मकः। त्वाम् योगिनो ध्यायन्ति नित्यम्।
त्वम् ब्रह्मा त्वम् विष्णुः त्वम् रुद्रः।
त्वम् इन्द्रः त्वम् अग्निः त्वम् वायुः।
त्वम् सूर्यः त्वम् चन्द्रमा
त्वम् ब्रह्मभूर्भुवःस्वरोम्॥ ६॥

गणादिम् पूर्वमुच्चार्य वर्णादिम् तदनन्तरम्।
अनुस्वारः परतरः। अर्धेन्दुलसितम्।
तारेण ऋद्धम्। एवत्तव मनुस्वरूपम्।
गकारः पूर्वरूपम्। अकारो मध्यमरूपम्।
अनुस्वारश्चान्त्यरूपम्। बिन्दुः उत्तररूपम्।
नादः सन्धानम्। संहिता सन्धिः।
सैषा गणेशविद्या। गणक ऋषिः।
निचृद् गायत्री छन्दः। गणपतिर्देवता।
ॐ गम् गणपतये नमः॥ ७॥

एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि।
तन्नो दन्ती प्रचोदयात्। ८॥

एकदन्तम् चतुर्हस्तम् पाशम् अङ्कुश धारिणम्।
रदम् च वरदम् हस्तैर्बिभ्राणम् मूषकध्वजम्।
रक्तम् लम्बोदरम् शूर्पकर्णकम् रक्तवाससम्।
रक्तगन्धानुलिप्ताङ्गम् रक्तपुष्पैः सुपूजितम्।
भक्तानुकम्पिनम् देवम् जगत्कारणम् अच्युतम्।
आविर्भूतम् च सृष्ट्यादौ प्रकृतेः पुरुषात् परम्।
एवम् ध्यायति यो नित्यम् स योगी योगिनाम् वरः॥ ९॥

नमो व्रातपतये। नमो गणपतये। नमः प्रमथपतये।
नमस्तेऽस्तु लम्बोदराय एकदन्ताय।
विघ्ननाशिने शिवसुताय वरदमूर्तये नमः॥ १०॥

॥ फलश्रुति ॥

एतद् अथर्वशीर्षम् योऽधीते। स ब्रह्मभूयाय कल्पते।
स सर्वतः सुखमेधते। स सर्वविघ्नैर्न बाध्यते।
स पञ्चमहापापात् प्रमुच्यते।
सायमधीयानो दिवसकृतम् पापम् नाशयति।
प्रातरधीयानो रात्रिकृतम् पापम् नाशयति।
सायंप्रातः प्रयुञ्जानो अपापो भवति।
सर्वत्राधीयानो अपविघ्नो भवति।
धर्मार्थकाममोक्षम् च विन्दति।
इदम् अथर्वशीर्षम् अशिष्याय न देयम्।
यो यदि मोहात् दास्यति स पापीयान् भवति।
सहस्रावर्तनात् यम् यम् कामम् अधीते
तम् तम् अनेन साधयेत्॥ ११॥

अनेन गणपतिम् अभिषिञ्चति स वाग्मी भवति।
चतुर्थ्याम् अनश्नन् जपति स विद्यावान् भवति।
इति अथर्वण वाक्यम्।
ब्रह्माद्यावरणम् विद्यात्। न बिभेति कदाचन् इति॥ १२॥

यो दुर्वाङ्कुरैर्यजति स वैश्रवणोपमो भवति।
यो लाजैर्यजति स यशोवान् भवति। स मेधावान् भवति।
यो मोदक सहस्रेण यजति स वाञ्छित फलम् अवाप्नोति।
यः साज्यैः समिद्भिर्यजति स सर्वम् लभते।
स सर्वम् लभते।
अष्टौ ब्राह्मणान् सम्यग् ग्राहयित्वा सूर्य वर्चस्वी भवति।
सूर्यग्रहे महानद्याम् प्रतिमासन्निधौ वा जप्त्वा
सिद्धमन्त्रो भवति।
महाविघ्नात् प्रमुच्यते। महादोषात् प्रमुच्यते।
महापापात् प्रमुच्यते। स सर्वविद्भवति। स सर्वविद्भवति।
य एवम् वेद। इति उपनिषत्।

श्री गणेशाय नमः। शान्ति मंत्राः।

ॐ भद्रम् कर्णेभिः शृणुयाम देवा
भद्रम् पश्येमाक्षभिर्यजत्राः।
स्थिरैरंगैः तुष्टुवांसः
तनूभिर्व्यशेम देवहितम् यदायुः ॥ १ ॥

ॐ स्वस्ति नः इन्द्रो वृद्धश्रवाः
स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः।
स्वस्तिनस्तार्क्ष्योर अरिष्टनेमिः
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥ २॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।
ॐ सह नाववतु। सह नौ भुनक्तु।
सहवीर्यम् करवावहै। तेजस्विनावधीतमस्तु।
मा विद्विषावहै। ॐ शान्तिः ॐ शान्तिः ॐ शान्तिः ॥

## 6.2 पुरुषसूक्तम्

प्रथम अनुवाकम्।

सहस्र शीर्षा पुरुषः। सहस्राक्षः सहस्रपात्।
स भूमीम् विश्वतो वृत्वा। अत्यतिष्ठत् दशाङ्गुलम्॥ १॥

पुरुष एव इदम् सर्वम्। यद् भूतम यत् च भव्यम्।
उतामृतत्वस्य ईशानः। यद् अन्नेनातिरोहति॥ २॥

एतावान् अस्य महिमा। अतो ज्यायांश्च पूरुषः।
पादोऽस्य विश्वा भूतानि। त्रिपादस्यामृतम् दिवि॥ ३॥

त्रिपाद् ऊर्ध्व उदैत् पुरुषः। पादोऽस्येहाभवत्पुनः।
ततो विश्वङ व्यक्रामत्। साशनानशने अभि॥ ४॥

तस्मात् विराळ अजायत। विराजो अधि पूरुषः।
स जातो अत्यरिच्यत। पश्चाद् भूमिमथो पुरः॥ ५॥

यत्पुरुषेण हविषा। देवा यज्ञम् अतन्वत।
वसन्तो अस्यासी- दाज्यम्। ग्रीष्म इध्मः शरद्धविः॥ ६॥

सप्तास्या सन् परिधयः त्रिः। सप्तः समिधः कृताः।
देवा यद् यज्ञम तन्वानाः। अबध्नन् पुरुषम् पशुम्॥ ७॥

तम् यज्ञम् बर्हिषि प्रोक्षन्। पुरुषम् जातम् अग्रतः।
तेन देवा अयजन्त। साध्या ऋषयश्च ये॥ ८॥

तस्माद् यज्ञात् सर्वहुतः। सम्भृतम् पृषदाज्यम्।
पशून्तांश्चक्रे वायव्यान्। आरण्यान् ग्राम्याश्च ये॥ ९॥

तस्माद् यज्ञात् सर्वहुतः। ऋचः सामानि जज्ञिरे।
छन्दांसि जज्ञिरे तस्मात्। यजुस् तस्माद् अजायत॥ १०॥

तस्मादश्वा अजायन्त। ये के चोभयादतः।
गावोहम् जज्ञिरे तस्मात्। तस्माज्जाता अजावयः॥ ११॥

यत् पुरुषम् व्यदधुः। कतिधा व्यकल्पयन्।
मुखम् किमस्य कौ बाहू। का ऊरू पादा उच्येते॥ १२॥

ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्। बाहू राजन्यः कृतः।
ऊरू तदस्य यद् वैश्यः। पदभ्याम् शूद्रो अजायत॥ १३॥

चन्द्रमा मनसो जातः। चक्षोः सूर्यो अजायत।
मुखादिन्द्रश्च अग्निश्च। प्राणाद्वायुरजायत॥ १४॥

नाभ्या आसीदन्तरिक्षम्।
शीर्ष्णौ द्यौः समवर्तत।
पदभ्याम् भूमिर् दिशः श्रोत्रात्।
तथा लोकान् अकल्पयन्॥ १५॥

वेदाहमेतम् पुरुषम् महान्तम्।
आदित्यवर्णम् तमसस्तु पारे।
सर्वाणि रूपाणि विचित्य धीरः।
नामानि कृत्वाभिवदन् यदास्ते॥ १६॥

धाता पुरस्तात् यमुदाजहार।
शक्रः प्रविद्वान् प्रदिशश्च तस्रः।
तमेव विद्वानमृतेह भवति।
नान्यः पन्थाः अयणाय विद्यते॥ १७॥

यज्ञेन यज्ञम् अयजन्त देवाः।
तानि धर्माणि प्रथमानि आसन्॥
ते ह नाकम् महिमानः सचन्ते।
यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः॥ १८॥

द्वितीय अनुवाकम्

अद्भयस्सम्भूतः पृथिव्यै रसाच्च।
विश्वकर्मणः समवर्तताधि।
तस्य त्वष्टा विदधत् रूपमेति।
तत्पुरुषस्य विश्वमाजानमग्रे॥ १॥

वेदाहमेतम् पुरुषम् महान्तम्।
आदित्यवर्णम् तमसस् परस्तात्।
तमेव विद्वानमृतेह भवति। नान्यः
पन्थाः विद्यते अयणाय॥ २॥

प्रजापतिस्चरति गर्भे अन्तः।
अजायमानो बहुधा विजायते।
तस्य धीराः परिजानन्ति योनिम्।
मरीचीनाम् पदमिच्छन्ति वेधसः॥ ३॥

यो देवेभ्यः आतपति। यो देवानाम् पुरोहितः।
पूर्वो यो देवेभ्यो जातः। अमो रुचाय ब्रह्मये॥ ४॥

रुचम् ब्राम्हम् जनयन्तः। देव अग्रे तदब्रुवन्।
यस्त्वैवम् ब्राह्मणो विध्यात्। तस्य देव असन् वशे॥ ५॥

ह्रीश्च ते लक्ष्मीश्च पत्न्यौ। अहोरात्रे पार्श्वे।
नक्षत्राणि रूपम्। अश्विनौ व्यात्तम्।

इष्टम् मनिषाण। अमुम् मनिषाण। सर्वम् मनिषाणा॥

ॐ तच्चम्यो रावृणीमहे।
गातुम् यज्ञाय। गातुम् यज्ञपतये।
दैवीः स्वस्तिरस्तु नः। स्वस्तिर्मानुषेभ्यः।
ऊर्ध्वम् जिगातु भेषजम्।
शं नो अस्तु द्विपदे। शं चतुष्पदे।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः॥

## 6.3 श्रीविष्णुसूक्तम्

॥ नारायणानुवाकः॥

सहस्रशीर्षम् देवम् विश्वाक्षम् विश्वशम्भुवम्।
विश्वम् नारायणम् देवम् अक्षरम् परमम् प्रभुम्॥ १॥

This universe is the Eternal Being (Narayana), the imperishable, the supreme, the goal, multi-headed and multi-eyed (i.e.,omnipresent and omniscient), the resplendent, the source of delight for the whole universe.

विश्वतः परमम् नित्यम् विश्वम् नारायणम् हरिम्।
विश्वमेवेदम् पुरुषः तद् विश्वम् उपजीवति॥ २॥

This universe is the Supreme Being (Purusha) alone; hence it subsists on That, the Eternal which transcends it (in every way), -the omnipresent Absolute which destroys all sins.

पतिम् विश्वस्य आत्मा इश्वरम् शाश्वतम् शिवमुच्यतम्।
नारायणम् महाज्ञेयम् विश्वात्मानम् परायणम्॥ ३॥

The protector of the universe, the Lord of all Souls (or Lord over Self), the perpetual, the auspicious, the indestructible, the Goal of all creation, the Supreme object worthy of being known, the Soul of all beings, the Refuge unfailing (is He).

नारायणपरम् ब्रह्म तत्वम् नारायणः परः।
नारायण परो ज्योतिर् आत्मा नारायणः परः॥ ४॥

The Lord Narayana is the Supreme Absolute; Narayana is the Supreme Reality;

Narayana is the Supreme Light; Narayana is the Supreme Self; Narayana is the Supreme Meditator; Narayana is the Supreme Meditation.

यच्च किञ्चित् जगत्यस्मिन् दृश्यते श्रूयतेऽपि वा।
अन्तर्बहिश्च तत् सर्वम् व्याप्य नारायणः स्थितः॥ ५॥

Whatever all this universe is, -seen or heard of, -pervading all this from inside and outside alike, stands supreme the Eternal Divine Being (Narayana).

अनन्तम् अव्ययम् कविम् समुद्रेऽन्तम् विश्वशम्भुवम्।
पद्म कोश प्रतीकाशम् हृदयम् चाप्यधोमुखम्॥ ६॥

He is the Limitless, Imperishable, Omniscient, residing in the ocean of he heart, the Cause of the happiness of the universe, the Supreme end of all striving, (manifesting Himself) in the ether of the heart which is comparable to an inverted bud of the lotus flower.

अधो निष्ट्या वितस्त्याम् तु नाभ्यामुपरि तिष्ठति।
हृदयम् तद् विजानीयात् विश्वस्यायतनम् महत्॥ ७॥

सन्ततम् सिराभिस्तु लम्बत्या कोशसन्निभम्।
तस्यान्ते सुषिरम् सूक्ष्मम् तस्मिन् सर्वम् प्रतिष्ठितम्॥ ८॥

Surrounded on all sides by nerve-currents (or arteries), suspends the lotus-bud of the heart in an inverted position. It is in a subtle space (a narrow aperture, the Sushumna-Nadi), and therein is to be found the Substratum of all things.

तस्यमध्ये महान् अग्निः विश्वार्चिः विश्वतोमुखः।
सोऽग्र भुग् विभजन् तिष्ठन् आहारम् अजरः कविः॥ ९॥

In that space within the heart resides the Great Flaming Fire, undecaying, all-knowing, with tongues spread out in all directions, with faces turned everywhere, consuming food presented before it, and assimilating it unto itself.

सन्तापयति स्वम् देहम् आपादतलमस्तकम्।
तस्य मध्ये वह्निशिखा अणीयोर्ध्वा व्यवस्थितः॥ १०॥

His rays, spreading all around, side ways as well as above and below, warm up the whole body from head to foot. In the center of That (Flame) abides the Tongue of Fire as the topmost of all subtle things. (Note: Due to the attachments and entanglements of the Jiva in worldly enjoyment and suffering, the Consciousness is enshrouded in potential as well as expressed objectivity, and hence it appears like a tiny streak of flame within the dark clouds of ignorance. But when the Jiva rises above worldliness the Consciousness is realised as he Infinite.)

नीलतोयदमध्यस्था विद्युल्लेखेव भास्वरा।
नीवारशूकवत्तन्वी पीताभा स्यात्तनूपमा॥ ११॥

Brilliant like a streak of lightning set in the midst of the blue rain-bearing clouds, slender like the awn of a paddy grain, yellow (like gold) in colour, in subtlety comparable to the minute atom, (this Tongue of Fire) grows splendid.

तस्याः शिखाया मध्ये परमात्मा व्यवस्थितः।
स ब्रह्मा स शिवः स हरिः स इन्द्रः सोऽक्षरः परमः स्वराट्॥ १२॥

In the Middle of That Flame, the Supreme Self dwells. This (Self) is Brahma (the Creator), Siva (the Destroyer), Hari (the Protector), Indra (the Ruler), the Imperishable, the Absolute, the Autonomous Being. Prostrations again and again to the Omni-Formed Being, the Truth, the Law, the Supreme Absolute, the Purusha of blue-decked yellow hue, the Centralised-Force, Power, the All-Seeing One.

ऋतम् सत्यम् परम् ब्रह्म पुरुषम् कृष्णपिङ्गलम्।
ऊर्ध्वम् रेतम् विरूपाक्षम् विश्वरूपाय वै नमः॥ १३॥

Prostrations again and again to the Omni-Formed Being, the Truth, the Law, the Supreme Absolute, the Purusha of blue-decked yellow hue, the Centralised-Force, Power, the All-Seeing One.

ॐ नारायणाय विद्महे वासुदेवाय धीमहि।
तन्नो विष्णुः प्रचोदयात्॥ १४॥

We commune ourselves with Narayana, and meditate on Vasudeva, may that Vishnu direct us (to the Great Goal).

## 6.4 श्रीविष्णुसूक्तम्

विष्णोर्नुकम् वीर्याणि प्रवोचम् यः
पार्थिवानि विममे रजांसि यो
अस्कभायदुत्तरम् सधस्तम् विचक्रमाणस्त्रेधोरुगायो
विष्णोरराटमसि विष्णोः पृष्ठमसि विष्णोश्श्न्प्त्रेस्थो
विष्णोस्स्यूरसि विष्णोर्ध्रुवमसि वैष्णवमसि विष्णवे त्वा॥

तदस्य प्रियमभिपाथो अश्याम्।
नरो यत्र देवयवो मदन्ति॥
उरुक्रमस्य स हि बन्धुरित्था।
विष्णोः पदे परमे मध्व उथ्सः॥

प्रतद्विष्णुस्तवते वीर्याय।
मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठाः॥
यस्योरुषु त्रिषु विक्रमणेषु।
अधिक्षियन्ति भुवनानि विश्वा॥

परो मात्रया तनुवा वृधान।
न ते महित्वम् अन्वश्नुवन्ति॥
उभे ते विद्म रजसी पृथिव्याः।
विष्णो देवत्वम् परमस्य विथ्से॥

विचक्रमे पृथिवीमेष एताम्।
क्षेत्राय विष्णुर्मनुषे दशस्यन्॥

ध्रुवासो अस्य कीरयो जनासः।
उरुक्षितिम् सुजनिमाचकार॥

त्रिर्देवः पृथिवीमेष एताम्।
विचक्रमे शतर्चसम् महित्वा॥
प्रविष्णुरस्तु तवसरस्तवीयान्।
त्वेषम् ह्यस्य स्थविरस्य नाम॥

अतो देवा अवन्तु नो यतो विष्णुर्विचक्रमे।
पृथिव्या स्सप्तधामभिः॥
इदम् विष्णुर्विचक्रमे त्रेधा निदधे पदम्
समूढमस्य पाँसुरे॥

त्रीणि पदा विचक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः।
ततो धर्माणि धारयन्॥
विष्णोः कर्माणि पश्यत यतो व्रतानि पस्पशे।
इन्द्रस्य युज्यस्सखा॥

तद्विष्णोः परमम् पदँसदा पश्यन्ति सूरयः।
दिवीव चक्षुराततम्॥

तद्विप्रासो विपन्यवो जागृवाँसस् समिन्धते।
विष्णोर्यत्परमम् पदम्॥

पर्याप्त्या अनन्तरायाय सर्वस्तोमोति रात्र उत्तम महद्भवति।
सर्वस्याप्तै सर्वस्य जित्यै सर्वमेव तेनाप्तोति सर्वम् जयति॥

## 6.5 श्रीईशोपनिषद्

ॐ पूर्णमदः पूर्णमिदम् पूर्णात् पूर्णमुदच्यते।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते॥

ॐ अदः (ईश्वरनिर्मितम्) पूर्णम् (अस्ति) इदम् पूर्णम् (जगत्) पूर्णात् पूर्णम् उदच्यते।
पूर्णस्य (ईश्वरस्य) पूर्णम् आदाय पूर्णम् एव अवशिष्यते।
परमेश्वर स्वयंपूर्ण आहे. स्वयंपूर्ण परमेश्वर निर्मित विश्व संपूर्णच आहे। अनेक पूर्ण अवशेषानंतरहि तो पूर्णच आहे.

ईशावास्यमिदम् सर्वम् यत्किञ्च जगत्याम् जगत्।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्य स्विद्धनम्॥ १॥

यत् किञ्च जगत्याम् जगत् इदम् सर्वम् ईश आवास्यम्।
तेन त्यक्तेन भुञ्जीथः। कस्य स्वित् धनम् मा गृधः।
विश्वातील सर्वावर परमेश्वराची सत्ता आहे. दुसऱ्या कोणाच्या वाट्याची अपेक्षा न करता त्याने दिले तेवढेच स्वीकारावे.

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतम् समाः।
एवम् त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे॥ २॥

एवम् इह कर्माणि कुर्वत् शतम् समाः जिजीवेषत्।
एवम् अन्यथा इतः त्वयि न अस्ति। नरे (अदः) कर्म न लिप्यते।
शंभर वर्षे कर्म उपभोगत जगण्याखेरीज कोणाला इतर पर्याय नाही. अशा कर्मांचा माणसाला दोष लागत नाही.

असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसाऽऽवृताः।
ताँस्ते प्रेत्याभिगच्छन्ति ये के चात्महनो जनाः॥ ३॥

ये के च आत्महनाः जनाः ते अन्धेन तमसा आवृताः तान् असुर्या नाम ते लोकाः प्रेत्या अभिगच्छन्ति।
जी कोणी (हयात आहेत) व (हयातीत) स्वतःचा अधःपात करणारी माणसे मृत्यूनंतर अज्ञानाच्या काळोखाने झाकलेल्या असुरलोकात (नरकात) जातात.

अनेजदेकम् मनसो जवीयो नैनत्
देवाः आप्नुवन् पूर्वमर्षत्।
तद्धावतोऽन्यानत्येति तिष्ठत्तस्मिन्
नपो मातरिश्वा दधाति॥ ४॥

तत् एकम् तिष्ठत् (परमात्मन्) पूर्वम् अर्षत् मनसः जवीयः प्रत्येति।
अपः मातरिश्वः दधाति अन्यान् देवाः एनत् न आप्नुवन्।
मनापेक्षा वेगाने धावणारा परमेश्वर एकाच जागी स्थिर असूनहि तो (शर्यतीत) सर्वांत पुढेच आहे. पाऊस, वारा आणि पाणी देणारे इतर देव त्याला धावताना गाठू शकत नाहीत.

तदेजति तन्नैजति तद् दूरे तद्वन्तिके।
तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः॥ ५॥

तत् (परमात्मन्) इजति। तत् न इजति। तत् दूरे (अस्ति)। तत् उ अन्तिके (अस्ति)।
तत् अस्य सर्वस्य अन्तः (अस्ति)। तत् उ अस्य सर्वस्य बाह्यतः (अस्ति)।
परमेश्वराचे स्वरूप चल तसेच अचल, दूर तसेच जवळ (साध्य तसेच असाध्य), अन्तर्यामी तसेच बहिर्गामीपण आहे.

यस्तु सर्वाणि भूतानि आत्मन्येवानुपश्यति।
सर्वभूतेषु चात्मानम् ततो न विजुगुप्सते॥ ६॥

यः तु सर्वाणि भूतानि आत्मनि एव (पश्यति) सर्व भूतेषु आत्मानम् च अनुपश्यति (सः) ततः न विजुगुप्सते।
जो स्वतःमध्ये सर्व प्राणिमात्राना व सर्व प्राणिमात्रामध्ये स्वतःला पाहतो तो कोणाचाहि तिरस्कार करत नाही.

यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मैवाभूद् विजानतः।
तत्र को मोहः कः शोक एकत्वम् अनुपश्यतः॥ ७॥

यस्मिन् सर्वाणि भूतानि आत्मा एव अभूत् विजानतः एकत्वम् अनुपश्यतः तत्र कः मोहः कः शोकः।
जो सर्व प्राणिमात्रांमध्ये फक्त आत्माच आहे हे जाणतो व जो सर्वत्र एकात्मता पाहतो त्याला मोह अगर शोक कोठला?

स पर्यगात् शुक्रमकायम् आव्रणमस्नाविरँ
शुद्धम् अपापविद्धम् कविर् मनीषी।
परिभूः स्वयम्भूर् याथातथ्यतोऽर्थान्
व्यदधात् शाश्वतीभ्यः समाभ्यः॥ ८॥

शाश्वतीभ्यः समाभ्यः शुक्रम् अकायम् आव्रणम् अस्नाविरम् शुद्धम् अपापविद्धम् कविः परिभूः स्वयम्भूः मनीषी यातातथ्यतः अर्थान् व्यदधात् (इति) सः पर्यगात्।
अनंत कालापासून सर्वज्ञ निर्गुणी निष्पापी निराकारी शुद्ध पवित्र सर्वश्रेष्ठ कवि स्वयंपूर्ण तत्त्वज्ञानी (असा परमेश्वर) इच्छुतांचे मनोरथ पूर्ण करीत आहे हे त्याला (भक्ताला) कळले पाहिजे.

अन्धम् तमः प्रविशन्ति येऽविद्याम्मुपासिते।
ततो भूय इव ते तमो य उ विद्यायाँरताः॥ ९॥
ये अविद्याम् उपासिते ते अन्धम् तमः प्रविशन्ति ये उ विद्यायाम् रतः ते ततः भूयः इव तमः (प्रविशन्ति)।
जे वेदांची उपासना करीत नाहीत ते अज्ञानाच्या अंधारात जातात. जे वेदांचा अर्थ आपल्या सोयीप्रमाणे लावतात ते त्याहून खोल अज्ञानाच्या अंधारात जातात.
अन्यदेवाहुर्विद्यया अन्यदाहुरविद्यया।
इति शुश्रुम धीराणाम् ये नस्तद् विचचक्षिरे॥ १०॥
विद्यया अन्यत् एव आहुः। अविद्यया अन्यत् आहुः। धीराणाम् ये नः तत् विचचक्षिरे। इति शुश्रुम।
ज्ञानापासून आणि अज्ञानापासून वेगळे वेगळे अर्थ लागतात हे ज्ञानी लोकांनी स्पष्ट केले आहे हे लक्षात घ्यावे.
विद्याम् चाविद्याम् च यस्तद् वेदोभयँ सह।
अविद्यया मृत्युम् तीर्त्वा विद्ययामृतमश्नुते॥ ११॥
यः विद्याम् अविद्याम् च उभयम् सह वेद तत् अविद्यया मृत्युम् विद्यया तीत्वा अमृतम् च अश्नुते (इति शुश्रुम)।
ज्ञान आणि अज्ञान (चुकीचे ज्ञान) याचा बरोबरीने अभ्यास केला म्हणजे अज्ञानाने जीवन मरणाचा फेरा व ज्ञानाने मोक्ष लाभतो हे लक्षात येते.
अन्धम् तमः प्रविशन्ति येऽसम्भूतिमुपासते।
ततो भूय इव ते तमो य उ सम्भूत्याँरताः॥ १२॥
ये असम्भूतिम् उपासते ते अन्धम् तमः प्रविशन्ति। ये उ सम्भूत्याँ रतः भूयः इव तमः (प्रविशन्ति)।
जे नश्वराची उपासना करतात ते अज्ञानाच्या अंधारात जातात. जे फळाच्या हेतूने ईश्वरपूजा करतात ते त्याहूनहि खोल अज्ञानाच्या अंधारात जातात.
अन्यदेवाहुः सम्भवात् अन्यदाहुरसम्भवात्
इति शुश्रुम धीराणाम् ये नस्तद् विचचक्षिरे॥ १३॥
सम्भवात् अन्यत् एव आहुः। असम्भवात् अन्यत् आहुः। धीराणाम् ये नः तत् विचचक्षिरे। इति शुश्रुम।
ईश्वराच्या व नश्वराच्या पूजेपासून वेगळी वेगळी फळे मिळतात हे ज्ञानी लोकानी स्पष्ट केले आहे. हे लक्षात घ्यावे.
सम्भूतिम् च विनाशम् च यस्तद् वेदोभयँ सह।
विनाशेन मृत्युम् तीर्त्वा सम्भूत्यामृतमश्नुते॥ १४॥
यः सम्भूतिम् विनाशम् च उभयम् सह वेद तत् विनाशेन मृत्युम् सम्भूत्या तीर्त्वा अमृतम् च अश्नुते (इति शुश्रुम)।
ईश्वरपूजा आणि नाशवंताची पूजा याचा बरोबरीने अभ्यास केला म्हणजे नाशवंताच्या पूजेने जीवन मरणाचा फेरा व ईश्वरपूजेने मोक्ष लाभतो हे लक्षात येते.
हिरण्मयेन पात्रेण सत्यस्थापिहितम् मुखम्
तत् त्वम् पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्ट्ये॥ १५॥
हे पूषन्। तत् हिरण्मयेन पात्रेण सत्यस्थ अपिहितम् मुखम् त्वम् सत्यधर्माय दृष्ट्ये अपावृणु।
हे विश्वसंस्थापका. तुझे ते सोनेरी तेजाने झाकलेले सत्यस्वरूप उघड कर. आणि सत्यधर्माच्या दृष्टीसाठी प्रगट कर.
पूषन्नेकर्षे यम सूर्य प्राजापत्य व्यूह
रश्मीन् समूह तेजो यत् ते रूपम्।
कल्याणतमम् तत् ते पश्यामि।
योऽसावसौ पुरुषः सोऽहम् अस्मि॥ १६॥
यम सूर्य प्राजापत्य एकर्षे हे पूषन्। रश्मीन् व्यूह। तेजः समूह। यत् ते कल्याणतमम् रूपम् तत् ते पश्यामि। यः असौ असौ पुरुषः सः अहम् अस्मि।
हे विश्व संस्थापक (कृष्णा) तूं विश्व नियंत्रक आहेस. तूं खऱ्या भक्तांचे अंतिम स्थान आहेस. तूं सर्व प्रजेच पिता आहेस. तूं सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञानी आहेस. तुझी तेजोमय किरणे दूर कर. म्हणजे तुझे ते कल्याणकारी सत्यस्वरूप मी पाहेन. तूं पुरुषोत्तम जसा सूर्यात आहेस तसा माझ्यातहि आहेस. वायुरनिलम्
अमृतमथेदम् भस्मान्तम् शरीरम्।
ॐ क्रतो स्मर कृतम् स्मर क्रतो स्मर कृतम् स्मर॥ १७॥
अथ इदम् भस्मान्तम् शरीरम् वायुः अनिलम् अमृतम् (कुरु) । (त्वम्) ॐ क्रतः स्मर। (मया) कृतम् स्मर क्रतः स्मर। (मया) कृतम् स्मर।
आतां हे बेचिराख झालेले शरीर हवा आणि वाऱ्यात मिसळून अमर होऊ दे. हे विश्वेश्वरा, आठव. या देहाची कृत्ये आठव. हे विश्वकर्त्या, आठव. आठव ह्या देहाची कृत्ये.
अग्ने नय सुपथा राये अस्मान्
विश्वानि देव वयुनानि विद्वान्
युयोध्यस्मज् जुहुराणमेनो
भूयिष्ठाम् ते नमउक्तिम् विधेम॥ १८॥
हे अग्ने। राये सुपथा नय। अस्मान् विश्वानि वयुनानि विद्वान् हे देव। अस्मत् एनः भूयिष्ठाम् जुहुराणम् युयोधि ङक्तिम् विधेम। ते नमः।
हे अग्निदेव. तुझ्याप्रत पोहोचण्यासाठी सुमार्गाने ने. आमच्या सर्व कृत्यांचा तूं जाणता आहेस. आमची सर्व मोठी संकटे दूर कर. तुझ्या पायाशी मी प्रार्थना करतो.

## 6.6 श्रीसूक्त

ॐ हिरण्यवर्णाम् हरिणीम् सुवर्णरजतस्रजाम्।
चन्द्राम् हिरण्मयीम् लक्ष्मीम् जातवेदो म आवह॥ १॥
स्वाहा।
सर्व जाणणाऱ्या (जातवेद) अग्ने, सुवर्ण कांतीच्या, हरिणीप्रमाणे चंचल असलेल्या, सोने आणि रुप्याच्या माळा घातलेल्या, चंद्राप्रमाणे निर्मळ प्रकाश देणाऱ्या, चकमकणाऱ्या सुवर्णालंकारानी नटलेल्या लक्ष्मीला माझ्याकडे पाठव. ॥१॥

ॐ ताम् म आवह जातवेदो लक्ष्मीम् अनपगामिनीम्।
यस्याम् हिरण्यम् विन्देयम् गामश्वम् पुरुषानहम्॥ २॥
स्वाहा।
हे सर्वज्ञ अग्ने, मला सोडून इतरत्र न जाणाऱ्या (अनपगामिनीला) लक्ष्मीस माझ्यासाठी बोलाव. तिच्या आगमनाने मी सोने, गायी, घोडे, नोकरचाकर ह्यानी संपन्न होईन. ॥२॥

ॐ अश्वपूर्वाम् रथमध्याम् हस्तिनादप्रबोधिनीम्।
श्रियम् देवीम् उपह्वये श्रीर्मा देवी जुषताम्॥ ३॥
स्वाहा।

हत्तींच्या चित्काराने जिच्या आगमनाची चाहूल लागते अशा घोड्यामागील रथामध्ये बसलेल्या श्री देवीला मी बोलावतो आहे. तिने माझ्यावर कृपाकरून आश्रयास यावे. ॥ ३॥

ॐ काम् सोस्मिताम् हिरण्यप्राकाराम्
आर्द्राम् ज्वलन्तीम् तृप्ताम् तर्पयन्तीम्।
पद्मे स्थिताम् पद्मवर्णाम् तामिहोपह्वये श्रियम्॥ ४॥
स्वाहा।

चेहऱ्यावर नेहमी स्मित हास्य असलेल्या, सुवर्ण रंगाच्या शरीराच्या, मायाळू, तेजस्वी, तृप्त तसेच भक्तांना तृप्त करणाऱ्या, कमळात राहणाऱ्या व कमळाप्रमाणेच असलेल्या वर्णाच्या भरभराट करून देणाऱ्या लक्ष्मीस मी बोलावतो आहे. ॥ ४॥

ॐ चन्द्राम् प्रभासाम् यशसा ज्वलन्तीम्
श्रियम् लोके देवजुष्टाम् उदाराम्।
ताम् पद्मिनीमीम् शरणमहम् प्रपद्ये
अलक्ष्मीः मे नश्यताम् त्वाम् वृणे॥ ५॥
स्वाहा।

चंद्रप्रकाशाप्रमाणे आल्हाद देणाऱ्या, यशकीर्तीने तळपणाऱ्या, जगी भरभराट करून देणाऱ्या,

इन्द्रादि देवांना संतुष्ट करणाऱ्या, उदारहृदयाच्या लक्ष्मीस मी शरण आलो आहे. त्यायोगे माझे दारिद्र्य नष्ट होवो

अशी प्रार्थना तुला करतो. ॥ ५॥

ॐ आदित्यवर्णे तपसोऽधिजातो
वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्वः।
तस्य फलानि तपसा नुदन्तु
मायान्तरायाश्च बाह्या अलक्ष्मीः॥ ६॥
स्वाहा।

हे सूर्यतेजस्विनी लक्ष्मी, तुझ्या तपश्चर्येपासून सर्व वनस्पतीत श्रेष्ठ असे हे बेलाचे झाड जन्माला आले आहे.

ह्या तुझ्या प्रिय वृक्षाची फळे त्यांच्या सेवनाने माझे अज्ञान व अंतर्बाह्य दुःखदारिद्र्य नष्ट करोत. ॥ ६॥

ॐ उपैतु माम् देवसखः कीर्तिश्च मणिना सह।
प्रादुर्भूतोऽस्मि राष्ट्रेऽस्मिन् कीर्तिम् ऋद्धिम् ददातु मे॥ ७॥
स्वाहा।

हे लक्ष्मी, चिन्तामणि, महादेव व त्यांचा मित्र कुबेर ह्यांच्यासह मला कीर्तीचा लाभ होऊ दे.

ही कीर्ति व समृद्धि मला ज्या श्रेष्ठ राष्ट्रात जन्माला आलो तेथेच लाभू दे. ॥ ७॥

ॐ क्षुत्पिपासामलाम् ज्येष्ठाम् अलक्ष्मीम् नाशयाम्यहम्।
अभूतिम् असमृद्धिम् च सर्वाम् निर्णुद मे गृहात्॥ ८॥
स्वाहा।

तहान भूक आणि घाणेरडेपणात वरचढ असलेल्या दारिद्र्याला मी नष्ट करू इच्छितो.

हे लक्ष्मी, तूं पण माझ्या घरातील सारे दारिद्र्य व दुर्भिक्ष नष्ट कर.॥ ८॥

ॐ गन्धद्वाराम् दुराधर्षाम् नित्यपुष्टाम् करीषिणीम्।
ईश्वरीम् सर्वभूतानाम् तामिहोपह्वये श्रियम्॥ ९॥
स्वाहा।

ज्या लक्ष्मीदेवीचे अस्तित्व मातीच्या सुगंधाद्वारे लक्षात येते, अतीशय कष्टाने जिची प्राप्ती होते, जी सर्व प्राणिमात्राना समृद्ध करते, अश्या भरभराट करण्याऱ्या देवीला मी येण्यासाठी आवाहन करीत आहे.॥ ९॥

ॐ मनसः काममाकूतिम् वाचः सत्यम् अशीमहि।
पशूनाम् रूपम् अन्नस्य मयि श्रीः श्रयताम् यशः॥ १०॥
स्वाहा।

मनातील सर्व इच्छा साकार करणाऱ्या हे लक्ष्मीदेवी, माझ्या बोलण्यात नेहमी सत्यच असावे.

जनावरांपासून प्राप्त होणारे खाद्यपदार्थ, यश, कीर्ति आणि समृद्धता मला प्राप्त होऊ दे.॥ १०॥

ॐ कर्दमेन प्रजाभूता मयि सम्भव कर्दम।
श्रियम् वासय मे कुले मातरम् पद्ममालिनीम्॥ ११॥
स्वाहा।

कर्दमऋषींच्या आशीर्वादाने लक्ष्मीपोटी जन्माला आलेल्या कर्दमलक्ष्मीपुत्रा कर्दमा,

माझा घरी तुझ्या कमळांची माळा घातलेल्या मातेसह वास्तव्य कर.॥ ११॥

ॐ आपः स्रजन्तु स्निग्धानि चिल्कीत वस मे गृहे।
नि च देवीम् मातरम् श्रियम् वासय मे कुले॥ १२॥
स्वाहा।

हे चिल्कीता (लक्ष्मीपुत्रा), माझ्या घरी तूं रहा व तुझ्या मातेला राहण्याचा आग्रह कर. तिच्यामुळे माझ्यावर स्नेहाचा वर्षाव होऊ दे. ॥१२॥

ॐ आर्द्राम् पुष्करिणिम् पुष्टिम् पिङ्गलाम् पद्ममालिनीम्।
चन्द्राम् हिरण्मयीम् लक्ष्मीम् जातवेदो म आवह॥ १३॥
स्वाहा।

हे अग्निदेवा, प्रेमळ, कमळांमध्ये वास्तव्य करणाऱ्या पिवळ्या रंगाच्या, कमळमाला धारण केलेल्या, चंद्रासारखा आल्हाद देणाऱ्या, सोनेरी कांतीच्या लक्ष्मीस माझासाठी बोलाव.॥ १३॥

ॐ आर्द्राम् यष्करिणीम् यष्टिम् सुवर्णाम् हेममालिनिम्
सूर्याम् हिरण्मयीम् लक्ष्मीम् जातवेदो म आवह॥ १४॥
स्वाहा।

हे अग्निदेवा, तेजस्वी, रक्षणकर्त्या, दण्डधारी, सुवर्णकान्तीच्या, सोन्याची माळ घातलेल्या, सूर्यासारखे तेज असलेल्या, सोन्याने मढलेल्या लक्ष्मीस माझ्यासाठी आवाहन कर.॥१४॥

ॐ ताम् म आवह जातवेदो लक्ष्मीम् अनपगामिनीम्।
यस्याम् हिरण्यम् प्रभूतम्
गावोदास्योश्वान् विन्देयम् पुरुषानहम्॥ १५॥
स्वाहा।

हे जातवेद अग्ने योग्यमार्ग दाखवणाऱ्या लक्ष्मीदेवीला माझ्यासाठी आवाहन कर.

त्यामुळे मी सोने गायीघोडे नोकर चाकर प्राप्त करू शकेन.॥१५॥

यः शुचिः प्रयतो भूत्वा जुहुयात् आज्यमन्वहम्।
श्रियः पञ्चदशर्चञ्च श्री कामः सततम् जपेत्॥ १६॥
स्वाहा।

जो कोणी शुचिर्भूत होऊन शुद्ध मनाने संयमी व व्रतस्त राहून ही पंधरा

सूक्ते नेहमी जपतो त्याला समृद्धि सम्पत्तीचा लाभ व सर्व मनोकामना पूर्ण होतात.॥ १६॥

इति श्रीसूक्तमूलपाठः॥

## श्रीसूक्त फलश्रुति

पद्मानने पद्मऊरु पद्माक्षी पद्मसम्भवे।
तन्मे भजसि पद्माक्षि येन सौख्यम् लभाम्यहम्॥ १७॥

हे कमलवदने, कमलहृदयी, कमलनयने, कमलजे लक्ष्मीदेवी ज्यामुळे मला सौख्य लाभेल असे वरदान मला कर.॥ १७॥

पद्मानने पद्मिनि पद्मपत्रे पद्मप्रिये पद्मदलायताक्षि।
विश्वप्रिये विश्वमनोनुकूले त्वत्पादपद्मम् मयि सन्निधस्त्वम्॥ १८॥

हे कमलवदने, पद्मिनी, कमलवासिनी, कमलप्रिये, कमलदलनेत्रा,
जगद्प्रिये, विश्वमनोनुकुले, तुझ्या चरणकमलाजवळ मला राहू दे.॥ १८॥

अश्वदायै गोदायै धनदायै महाधने।
धनम् मे जुषताम् देवि सर्वकामाश्च देहि मे॥ १९॥

घोडे, गायी, धन आणि ऐश्वर्यदायी देवी हे सर्व धन व माझे सर्व मनोरथ पूर्ण होऊ दे.॥ १९॥

पुत्रपौत्र धनम् धान्यम् हस्त्यश्वांश्वतरी रथम्।
प्रजानाम् भवसि माता आयुष्मन्तम् करोतु मे॥ २०॥

हत्तीघोडे जोडलेल्या रथातून अवतरून हे माते तूं सर्व प्रजेची माता असल्याने मला मुले, नातवंडे धनधान्य दे. ते उपभोगण्यासाठी मला दीर्घायु कर.॥ २०॥

धनम् अग्निः धनम् वायुः धनम् सूर्यो धनम् वसु।
धनम् इन्द्रो बृहस्पतिः वरुणो धनमश्विना॥ २१॥

अग्नि, वायु, सूर्य, पृथ्वी, इन्द्र, बृहस्पति, वरुण व अश्विनी ही सर्व तुझीच धनरूपे आहेत.॥ २१॥

वैनतेय सोमम् पिब सोमम् पिबतु वृत्रहा।
सोमम् धनस्य सोमिनो मह्यम् ददातु सोमिनः॥ २२॥

हे गरुडा तूं ह्या यज्ञातला सोमरस पी. वृत्रराक्षसाचा संहार करणारा इन्द्र हा सोमरस पिऊ दे.

(वर वर्णन केलेले) धनरूपी सोमरस पिणारे देव हा सोमरस पिऊ देत. ते मला आशीर्वाद देऊ देत॥ २२॥

न क्रोधो न च मात्सर्यम् न लोभो नाशुभा मतिः।
भवन्ति कृतपुण्यानाम् भक्त्या श्रीसूक्तजापिनाम्॥ २३॥

भक्तिभावाने श्रीसूक्ताचा जप करणारा पुण्यात्मा क्रोध, मत्सर, लोभ ह्यासारख्या दुर्बुद्धीपासून मुक्त होतो.॥ २३॥

सरसिजनिलये सरोजहस्ते
धवलतरान्शुकगन्धमाल्यशोभे।
भगवति हरिवल्लभे मनोज्ञे
त्रिभुवनभूतिकरि प्रसीद मह्यम्॥ २४॥

हे कमलवासिनी, कमलहस्तधारिणी, शुभ्रवस्त्रधारिणी, गंधपुष्पमाल्यशोभिनी हरिप्रिये भगवति, तूं सर्व मनोकामना पूर्ण करणारी व सर्व त्रिभुवनाला समृद्ध करणारी आहेस. माझ्यावर प्रसन्न हो.॥ २४॥

श्रीवर्चस्वम् आयुष्यमारोग्यम् आविधात् शोभमानम् महीयते।
धनम् धान्यम् पशुम् बहुपुत्रलाभम् शतसंवत्सरम् दीर्घमायुः॥ २५॥

या पृथ्वीवरील तुझ्या सर्व भक्तांना सर्वत्र शोभणारा विजय, वर्चस्व, आरोग्य आणि दीर्घायुष्य प्राप्त होऊ दे.

विपुल धनधान्य, जनावरे, पुष्कळ मुले, नातवंडे व शंभर वर्षाचे दीर्घ आयुष्य मिळू दे.॥ २५॥

विष्णुपत्नीम् क्षमाम् देवीम् माधवीम् माधवप्रियाम्।
लक्ष्मीम् प्रियसखीम् देवीम् नमामि अच्युतवल्लभाम्॥ २६॥

क्षमाशील विष्णुपत्नि माधवाची प्रिय माधवी,
प्रियसखी लक्ष्मी देवी अच्युतप्रिया लक्ष्मीस मी वन्दन करतो.। २६॥

आनन्दः कर्दमः श्रीदः चिल्लीत इति विश्रुताः।
ऋषयः श्रियपुत्राश्च मयि श्रीर्देविदेवता॥ २७॥

आनन्द, कर्दम, श्रीद वगैरे ऋषि व लक्ष्मीपुत्रांनी
गौरवलेली श्रीदेवी माझ्यावर कृपादृष्टी ठेवो. ॥ २७॥

ॐ महालक्ष्मी च विद्महे विष्णुपत्नी च धीमहि।
तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात्॥ २८॥

श्रीमहालक्ष्मीला आम्ही जाणतो. तसेच विष्णुपत्नीचे ध्यान करतो.
ती महालक्ष्मी आम्हाला सद्बुद्धीची व सत्कर्माची प्रेरणा देवो.॥ २८॥

ॐ महालक्ष्म्यै च विद्महे महाश्रियै च धीमहि।
तन्नः श्रीः प्रचोदयात्॥ २९॥

आम्ही महालक्ष्मीला जाणतो. भरभराट देणाऱ्या श्रीदेवीचे ध्यान करतो.
ती श्रीदेवी आम्हाला कार्यरत राहण्याची प्रेरणा देवो.॥ २९॥

ॐ महादेव्यै च विद्महे विष्णुपत्न्यै च धीमहि।
तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात् ॥ ३०॥

आम्ही महादेवीला जाणतो. विष्णुपत्नीची पूजा करतो.
ती लक्ष्मी आम्हाला उस्फूर्त करो. ॥ ३०॥

## 6.7 श्रीभूसूक्तम्

भूमिर्भूम्ना द्यौः वरिणा अन्तरिक्षम् महित्वा।
उपस्थ्येते देवि अदिते अग्निम्
अन्नादम् अन्नाद्यायादधे॥ १॥

आऽयम् गौः पृश्निः अक्रमीदसन् मातरम् पुनः।
पितरम् च प्रयनः सुवः॥ २॥

त्रिंशद् धाम विराजति वाक् पतङ्गाय शिश्रिये।
प्रत्यस्य वहद्युभिः॥ ३॥

अस्य प्राणात् अपानात् य अन्तश्चरति रोचना।
व्यख्यन् महिषः सुवः॥ ४॥

यत्वा कृद्धः परो वप मन्युना यदवर्त्या।
सुकल्पम् अग्ने तत्तव पुनस्त उद्दीपयामसि॥ ५॥

यत्ते मन्युपरोत्पस्य पृथिवीमनु दध्वसे।
आदित्या विश्वे तद् देवा वसवश्च समाभरन्॥ ६॥

मेदिनी देवी वसुन्धरा स्यात् वसुधा देवी वासवी।
ब्रह्मवर्चसः पितृणाम् श्रोतम् चक्षुर्मनः॥ ७

देवी हिरण्यगर्भिणी देवी प्रसोदरी।
रसने सत्यायने सीद॥ ८॥

समुद्रवती सावित्री हनो देवी मह्यङ्गी महोधरणी।
महो ध्यतिष्ठाः शृङ्गे शृङ्गे यज्ञे यज्ञे विभीषिणी॥ ९॥

इन्द्रपत्नी व्यापिनी सरसिज इह वायुमती जलशयनी।
सो परिधत्तम् गाय स्वयन्धा
राजा सत्यन्धो परिमेदिनी ॥ १०॥

विष्णुपत्नीम् महीम् देवीम् माधवीम् माधवप्रियाम्॥
लक्ष्मीप्रियसखीम् देवीम् नमामि अच्युतवल्लभाम्॥ ११॥

ॐ धनुर्धरायै विद्महे सर्वसिद्धयै च धीमहि।
तन्नो धरा प्रचोदयात्॥ १२॥

महीम् देवीम् विष्णुपत्नीम् अजूर्याम्।
प्रतीचीम् एनाम् हविषा यजामः॥ १३॥

त्रेधा विष्णुः उरुगायो विचक्रमे।
महीम् दिवम् पृथिवीम् अन्तरिक्षम्॥ १४॥

तत् च शृणैति श्रव इच्छमाना।
पुण्यम् श्लोकम् यजमानाय कृण्वती॥ १५॥

# 7 निवडक स्तोत्रे

## 7.1 चर्पटपञ्जरिकास्तोत्रम्

दिनमपि रजनी सायं प्रातः, शिशिरवसन्तौ पुनरायातः।
कालः क्रीडति गच्छति आयुः। तदपि न मुञ्चत्याशावायुः॥ १॥
भज गोविन्दं, भज गोविन्दं भज गोविन्दं मूढमते।
प्राप्ते सन्निहिते मरणे , नहि नहि रक्षति डुकृञ्करणे॥ धृ॥
अग्रे वह्निः पृष्ठे भानू, रात्रौ चुबुकसमर्पितजानुः।
करतलभिक्षा तरुतलवासः तदपि न मुञ्चत्याशापाशः॥ २॥
यावद्वित्तोपार्जनसक्तः तावन्निजपरिवारो रक्तः।
पश्चाद्धावति जर्जरदेहे, वार्तां पृच्छति कोऽपि न गेहे॥ ३॥
जटिलो मुण्डी लुञ्चितकेशः, काषायाम्बरबहुकृतवेषः।
पश्यन्नपि च न पश्यति मूढ, उदरनिमित्तं बहुकृतवेषः॥ ४॥
भगवद्गीता किंचिदधीता, गङ्गाजललवकणिका पीता।
सकृदपि यस्य मुरारिसमर्चा तस्य यमः किं कुरुते चर्चाम्॥ ५॥
अङ्गं गलितं पलितं मुण्डं दशनविहीनं जातं तुण्डम्।
वृद्धो याति गृहीत्वा दण्डम् तदपि न मुञ्चत्याशापिण्डम्॥ ६॥
बालस्तावत्क्रीडासक्तः तरुणस्तावत्तरुणीरक्तः।
वृद्धस्तावच्चिन्तामग्नः परे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः॥ ७॥
पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननीजठरे शयनम्।
इह संसारे खलु दुस्तारे कृपयाऽपारे पाहि मुरारे॥ ८॥
पुनरपि रजनी पुनरपि दिवसः पुनरपि पक्षः पुनरपि मासः।
पुनरपि अयनं पुनरपि वर्षम् तदपि न मुञ्च्त्याशामर्षम्॥ ९॥
वयसि गते कः कामविकारः शुष्के नीरे कः कासारः।
नष्टे द्रव्ये कः परिवारो ज्ञाते तत्त्व कः संसारः॥ १०॥
नारीस्तनभरनाभिनिवेशम् मिथ्यामायामोहावेशम्।
एतन्मासवसादिविकारम् मनसि विचारय वारंवारम्॥ ११॥
कस्त्वं कोऽहं कुत आयातः का मे जननी को मे तातः।
इति परिभावय सर्वमसारम् विश्वं त्यक्त्वा स्वप्नविचारम्॥ १२॥
गेयं गीतानामसहस्रम् ध्येयं श्रीपतिरूपमजस्रम्।
नेयं सज्जनसंगे चित्तम् देयं दीनजनाय च वित्तम्॥ १४॥
सुखतः क्रियते रामाभोगः। पश्चाद्धन्ते शरीरे रोगः।
यद्यपि लोके मरणं शरणम्। तदपि न मुञ्चति पापाचरणम्॥ १५॥
रथ्याचर्पटविरचित कन्थः पुण्यापुण्यविवर्जितपन्थः।
नाहं ना त्वं नायं लोकः। तदपि किमर्थं क्रियते शोकः॥ १६॥
कुरुते गङ्गासागरगमनं व्रतपरिपालनमथवा दानम्।
ज्ञानविहीने सर्वमनेन मुक्तिर्न भवति जन्मशतेन॥ १७॥
इति श्रीशङ्कराचार्यविरचितं चर्पटपञ्जरिकास्तोत्रं सम्पूर्णम्॥

## 7.2 द्वादशपञ्जरिकास्तोत्रम्

मूढ जहीहि धनागमतृष्णाम् कुरु सद्बुद्धिं मनसि वितृष्णाम्
यल्लभसे निजकर्मोपात्तम् वित्तं तेन विनोदय चित्तम्॥ १॥
अर्थमनर्थं भावय नित्यम् नास्ति ततः सुखलेशः सत्यम्।
पुत्रादपि धनभाजां भीतिः सर्वत्रैषा विहिता नीतिः॥ २॥
का ते कान्ता कस्ते पुत्रः संसारोऽयमतीव विचित्रः।
कस्य त्वं कः कुत आयातः तत्त्वं चिन्तय यदिदं भ्रातः॥ ३॥
मा कुरु जनधनयौवनगौरम् हरति निमेषात्कालः सर्वम्।
मायामयमिदमखिलं हित्वा ब्रह्मपदं त्वं प्रविश विदित्वा॥ ४॥
कामं क्रोधं मोहं लाभं त्यक्त्वात्मानं भावय कोऽहम्।
आत्मज्ञानविहीना मूढास् ते पच्यन्ते नरकनिगूढाः॥ ५॥
सुरमन्दिरतरुमूलनिवासः शय्या भूतलमजिनं वासः।
सर्वपरिग्रहभोगत्यागः कस्य सुखं न करोति विरागः॥ ६॥

शत्रौ मित्रे पुत्रे बन्धौ मा कुरु यत्नं विग्रहसन्धौ।
भव समचित्तः सर्वत्र त्वम् वाञ्छस्यचिराद्यदि विष्णुत्तत्वम्॥ ७॥
त्वयि मयि चान्यत्रैको विष्णुर् व्यर्थं कुप्यसि सर्वसहिष्णुः।
सर्वस्मिन्नपि पश्यात्मानम् सर्वत्रोत्सृज भेदाज्ञानम्॥ ८॥
प्राणायामं प्रत्याहारम् नित्यानित्यविवेकविचारम्।
जाप्यसमेतसमाधिविधानम् कुर्ववधानं महदवधानम्॥ ९॥
नलिनीदलगत सलिलं तरलम् तद्वज्जीवितमतिशय चपलम्।
विद्धि व्याधभिमानग्रस्तम् लोकं लोकहतं च समस्तम्॥ १०॥
का तेऽष्टादशदेशे चिन्ता वातुल तव किं नास्ति नियन्ता।
यस्त्वां हस्ते सुदृढनिद्धम् बोधयति प्रभवादिविरुद्धम्॥ ११॥
गुरुचरणाम्बुज निर्भरभक्तः संसारादचिराद्भवमुक्तः।
सेन्द्रियमानसनियमादेवम् द्रक्ष्यसि निजहृदयस्थं देवम्॥ १२॥
द्वादशपञ्जरिकामय एषः शिष्याणां कथितो ह्युपदेशः।
येषां चित्ते नैव विवेकस् ते पच्यन्ते नरकमेनकम्॥ १३॥
इति श्रीशङ्कराचार्यविरचितं[42]
द्वादशपञ्जरिकास्तोत्रं सम्पूर्णम्॥

## 7.3 पाण्डवगीता

प्रह्लादनारदपराशरपुण्डरीक-
व्यासाम्बरीषशुकशौनकभीष्मकाव्याः।
रुक्माङ्गदार्जुनवसिष्ठविभीषणाद्या
एतानहं परमभागवतान् नमामि॥ १॥

लोमहर्षण उवाच।
धर्मो विवर्धति युधिष्ठिरकीर्तनेन
पापं प्रणश्यति वृकोदरकीर्तनेन ।
शत्रुर्विनश्यति धनञ्जयकीर्तनेन
माद्रीसुतौ कथयतां न भवन्ति रोगाः॥ २॥

ब्रह्मोवाच।
ये मानवा विगतरागपराऽपरज्ञा
नारायणं सुरगुरुं सततं स्मरन्ति ।
ध्यानेन तेन हतकिल्बिष चेतनास्ते
मातुः पयोधररसं न पुनः पिबन्ति॥ ३॥

इन्द्र उवाच।
नारायणो नाम नरो नराणां
प्रसिद्धचौरः कथितः पृथिव्याम्॥
अनेकजन्मार्जितपासञ्चयं
हरत्यशेषं स्मृतमात्र एव यः॥ ४॥

युधिष्ठिर उवाच।
मेघश्यामं पीतकौशेयवासं
श्रीवत्साङ्कं कौस्तुभोद्भासिताङ्गम् ।
पुण्योपेतं पुण्डरीकायताक्षं
विष्णुं वन्दे सर्वलोकैकनाथम्॥ ५॥

भीम उवाच।
जलौघमग्ना सचराऽचरा धरा
विषाणकोट्याऽखिलविश्वमूर्तिना॥
समुद्धृता येन वराहरूपिणा
स मे स्वयम्भूर्भगवान् प्रसीदरु॥ ६॥

अर्जुन उवाच।
अचिन्त्यमव्यक्तमनन्तमव्ययं
विभुं प्रभुं भावितविश्वभावनम्॥
त्रैलोक्यविस्तारविचारकारकं
हरिं प्रपन्नोऽस्मि गतिं महात्मनाम्॥ ७॥

नकुल उवाच।
यदि गमनमधस्तात् कालपाशानुबन्धाद्
यदि च कुलविहीने जायते पक्षिकीटे॥
कृमिशतमपि गत्वा ध्यायते चान्तरात्मा
मम भवतु हृदिस्था केशवे भक्तिरेका॥ ८॥

सहदेव उवाच।
तस्य यज्ञवराहस्य विष्णोरतुलतेजसः॥
प्रणामं ये प्रकुर्वन्ति तेषामपि नमो नमः॥ ९॥

कुन्ती उवाच।
स्वकर्मफलनिर्दिष्टां यां यां योनिं व्रजाम्यहम् ।
तस्यां तस्यां हृषीकेश त्वयि भक्तिर्दृढाऽस्तु मे॥ १०॥

माद्री उवाच।
कृष्णे रताः कृष्णमनुस्मरन्ति
रात्रौ च कृष्णं पुनरुत्थिता ये ।
ते भिन्नदेहाः प्रविशन्ति कृष्णे
हविर्यथा मन्त्रहुतं हुताशे॥ ११॥

द्रौपदी उवाच।
कीटेषु पक्षिषु मृगेषु सरीसृपेषु
रक्षःपिशाचमनुजेष्वपि यत्र यत्र ।
जातस्य मे भवतु केशव त्वत्प्रसादात्
त्वय्येव भक्तिरचलाऽव्यभिचारिणी च॥ १२॥

सुभद्रा उवाच।
एकोऽपि कृष्णस्य कृतः प्रणामो
दशाश्वमेधावभृथेन तुल्यः ।
दशाश्वमेधी पुनरेति जन्म
कृष्णप्रणामी न पुनर्भवाय॥ १३॥

अभिमन्युरुवाच।
गोविन्द गोविन्द हरे मुरारे
गोविन्द गोविन्द मुकुन्द कृष्ण
गोविन्द गोविन्द रथाङ्गपाणे ।
गोविन्द गोविन्द नमामि नित्यम्॥ १४॥

धृष्टद्युम्न उवाच।
श्रीराम नारायण वासुदेव
गोविन्द वैकुण्ठ मुकुन्द कृष्ण॥

[42] आद्य श्रीशंकराचार्य ह्यांची वरील दोन्ही स्तोत्रे बहुतेकांच्या पाठात असतातच. भाषा संस्कृत असूनहि सहज समजण्याजोगी सोपी आहे.

श्रीकेशवानन्त नृसिंह विष्णो
मां त्राहि संसारभुजङ्गदष्टम्॥ १५॥

सात्यकिरुवाच।

अप्रमेय हरे विष्णो कृष्ण दामोदराऽच्युत॥
गोविन्दानन्त सर्वेश वासुदेव नमोऽस्तु ते॥ १६॥

उद्धव उवाच।

वासुदेवं परित्यज्य योऽन्यं देवमुपासते ।
तृषितो जाह्नवीतीरे कूपं खनति दुर्मतिः॥ १७॥

धौम्य उवाच।

अपां समीपे शयनासनस्थिते
दिवा च रात्रौ च यथाधिगच्छता॥
यद्यस्ति किञ्चित् सुकृतं कृतं मया
जनार्दनस्तेन कृतेन तुष्यतु॥ १८॥

सञ्जय उवाच।

आर्ता विषण्णाः शिथिलाश्च भीता
घोरेषु व्याघ्रादिषु वर्तमानाः॥
संकीर्त्य नारायणशब्दमात्रं
विमुक्तदुःखाः सुखिनो भवन्ति॥ १९॥

अक्रूर उवाच।

अहं तु नारायणदासदास-
दासस्य दासस्य च दासदासः॥
अन्यो न ह्मीशो जगतो नराणां
तस्मादहं धन्यतरोऽस्मि लोके॥ २०॥

विराट उवाच।

वासुदेवस्य ये भक्ताः शान्तास्तद्गतचेतसः॥
तेषां दासस्य दासोऽहं भवेयं जन्मजन्मनि॥ २१॥

भीष्म उवाच।

विपरीतेषु कालेषु परिक्षीणेषु बन्धुषु ।
त्राहि मां कृपया कृष्ण शरणागतवत्सल॥ २२॥

द्रोण उवाच।

ये ये हताश्चक्रधरेण दैत्यां-
स्त्रैलोक्यनाथेन जनार्दनेन ।
ते ते गता विष्णुपुरीं प्रयाताः
क्रोधोऽपि देवस्य वरेण तुल्यः॥ २३॥

कृपाचार्य उवाच।

मज्जन्मनः फलमिदं मधुकैटभारे
मत्प्रार्थनीय मदनुग्रह एष एव॥
त्वद्भृत्यभृत्यपरिचारकभृत्यभृत्य-
भृत्यस्य भृत्य इति मां स्मर लोकनाथ॥ २४॥

अश्वत्थाम उवाच।

गोविन्द केशव जनार्दन वासुदेव
विश्वेश विश्व मधुसूदन विश्वरूप॥
श्रीपद्मनाभ पुरुषोत्तम देहि दास्यं
नारायणाच्युत नृसिंह नमो नमस्ते॥ २५॥

कर्ण उवाच।

नान्यं वदामि न शृणोमि न चिन्तयामि
नान्यं स्मरामि न भजामि न चाश्रयामि॥
भक्त्या त्वदीयचरणाम्बुजमादरेण
श्रीश्रीनिवास पुरुषोत्तम देहि दास्यम्॥ २६॥

धृतराष्ट्र उवाच।

नमो नमः कारणवामनाय
नारायणायामितविक्रमाय॥
श्रीशार्ङ्गचक्रासिगदाधराय
नमोऽस्तु तस्मै पुरुषोत्तमाय॥ २७॥

गान्धारी उवाच।

त्वमेव माता च पिता त्वमेव
त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव
त्वमेव सर्वं मम देव देव॥ २८॥

द्रुपद उवाच।

यज्ञेशाच्युत गोविन्द माधवानन्त केशव॥
कृष्ण विष्णो हृषीकेश वासुदेव नमोऽस्तु ते॥ २९॥

जयद्रथ उवाच।

नमः कृष्णाय देवाय ब्रह्मणेऽनन्तशक्तये॥
योगेश्वराय योगाय त्वामहं शरणं गतः॥ ३०॥

विकर्ण उवाच।

कृष्णाय वासुदेवाय देवकीनन्दनाय च॥
नन्दगोपकुमाराय गोविन्दाय नमो नमः॥ ३१॥

विराट उवाच।

नमो ब्रह्मण्यदेवाय गोब्राह्मणहिताय च॥
जगद्धिताय कृष्णाय गोविन्दाय नमो नमः॥ ३२॥

शल्य उवाच।

अतसीपुष्पसङ्काशं पीतवाससमच्युतम्॥
ये नमस्यन्ति गोविन्दं तेषां न विद्यते भयम्॥ ३३॥

बलभद्र उवाच।

कृष्ण कृष्ण कृपालो त्वमगतीनां गतिर्भव॥
संसारार्णवमग्नानां प्रसीद पुरुषोत्तम॥ ३४॥

श्रीकृष्ण उवाच।

कृष्ण कृष्णेति कृष्णेति यो मां स्मरति नित्यशः॥
जलं भित्वा यथा पद्मं नरकादुद्धराम्यहम्॥ ३५॥

श्रीकृष्ण उवाच।

नित्यं वदामि मनुजाः स्वयमूर्ध्वबाहु-
र्यो मां मुकुन्द नरसिंह जनार्दनेति॥
जीवो जपत्यनुदिनं मरणे रणे वा
पाषाणकाष्ठसदृशाय ददाम्यभीष्टम्॥ ३६॥

ईश्वर उवाच।

सकृन्नारायणेत्युक्त्वा पुमान् कल्पशतत्रयम्॥
गङ्गादिसर्वतीर्थेषु स्नातो भवति पुत्रक॥ ३७॥

सूत उवाच।
तत्रैव गङ्गा यमुना च तत्र
गोदावरी सिन्धु सरस्वती च॥
सर्वाणि तीर्थानि वसन्ति तत्र
यत्राच्युतोदार कथाप्रसङ्गः॥ ३८॥
यम उवाच।
नरके पच्यमानं तु यमेनं परिभाषितम्॥
किं त्वया नार्चितो देवः केश्वः क्लेशनाशनः॥ ३९॥
नारद उवाच।
जन्मान्तरसहस्रेण तपोध्यानसमाधिना॥
नराणां क्षीणपापानां कृष्णे भक्तिः प्रजायते॥ ४०॥
प्रह्लाद उवाच।
नाथ योनिसहस्रेषु येषु येषु व्रजाम्यहम् ।
तेषु तेष्वचला भक्तिरच्युताऽस्तु सदा त्वयि॥ ४१॥
या प्रीतिरविवेकनां विषयेष्वनपायिनि ।
त्वामनुस्मरतः सा मे हृदयान्माऽपसर्पतु॥ ४२॥
विश्वामित्र उवाच।
किं तस्य दानैः किं तीर्थैः किं तपोभिः किमध्वरैः॥
यो नित्यं ध्यायते देवं नारायणमनन्यधीः॥ ४३॥

जमदग्निरुवाच।
नित्योत्सवो भवेत्तेषां नित्यं नित्यं च मङ्गलम्॥
येषां हृदिस्थो भगवान्मङ्गलायतनं हरिः॥ ४४॥
भरद्वाज उवाच।
लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजयः ।
येषामिन्दीश्वरश्यामो हृदयस्थो जनार्दनः॥ ४५॥
गौतम उवाच।
गोकोटिदानं ग्रहणेषु काशी-
प्रयागगङ्गायुतकल्पवासः ।
यज्ञायुतं मेरुसुवर्णदानं
गोविन्दनामस्मरणेन तुल्यम्॥ ४६॥
अग्निरुवाच।
गोविन्देति सदा स्नानं गोविन्देति सदा जपः॥
गोविन्देति सदा ध्यानं सदा गोविन्दकीर्तनम्॥ ४७॥
त्र्यक्षरं परमं ब्रह्म गोविन्द त्र्यक्षरं परम्॥
तस्मादुच्चारितं येन ब्रह्मभूयाय कल्पते॥ ४८॥
वेदव्यास उवाच।
अच्युतः कल्पवृक्षोऽसावनन्तः कामधेनु वै॥
चिन्तामणिस्तु गोविन्दो हरेर्नाम विचिन्तयेत्॥ ४९॥
इन्द्र उवाच।
जयतु जयतु देवो देवकीनन्दनोऽयं
जयतु जयतु कृष्णो वृष्णिवंशप्रदीपः ।
जयतु जयतु मेघश्यामलः कोमलाङ्गो
जयतु जयतु पृथ्वीभारनाशो मुकुन्दः॥ ५०॥

पिप्पलायन उवाच।
श्रीमन्नृसिंहविभवे गरुडध्वजाय
तापत्रयोपशमनाय भवौषधाय॥
कृष्णाय वृश्चिकजलाग्निभुजङ्गरोग-
क्लेशव्ययाय हरये गुरवे नमस्ते॥ ५१॥
आविर्होत्र उवाच।
कृष्ण त्वदीयपदपङ्कजपञ्जरान्ते
अद्यैव मे विशतु मानसराजहंसः ।
प्राणप्रयाणसमये कफवातपित्तैः
कण्ठावरोधनविधौ स्मरणं कुतस्ते॥ ५२॥
विदुर उवाच।
हरेर्नामैव नामैव नामैव मम जीवनम् ।
कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा॥ ५३॥
वसिष्ठ उवाच।
कृष्णेति मङ्गलं नाम यस्य वाचि प्रवर्तते ।
भस्मीभवन्ति तस्याशु महापातककोटयः॥ ५४॥
अरुन्धत्युवाच।
कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने॥
प्रणतक्लेशनाशाय गोविन्दाय नमो नमः॥ ५५॥
कश्यप उवाच।
कृष्णानुस्मरणादेव पापसंघट्टपञ्जरम्॥
शतधा भेदमाप्नोति गिरिर्वज्रहतो यथा॥ ५६॥
दुर्योधन उवाच।
जानामि धर्मं न च मे प्रवृत्ति-
र्जानामि पापं न च मे निवृत्तिः ।
केनापि देवेन हृदि स्थितेन
यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि॥ ५७॥
यन्त्रस्य मम दोषेण क्षम्यतां मधुसूदन॥
अहं यन्त्रं भवान् यन्त्री मम दोषो न दीयताम्॥ ५८॥
भृगुरुवाच।
नामैव तव गोविन्द नाम त्वत्तः शताधिकम्॥
ददात्त्युच्चारणान्मुक्तिः भवानष्टाङ्गयोगतः॥ ५९॥
लोमश उवाच।
नमामि नारायण पादपङ्कजं
करोमि नारायणपूजनं सदा॥
वदामि नारायणनाम निर्मलं
स्मरामि नारायणतत्त्वमव्ययम्॥ ६०॥
शौनक उवाच।
स्मृतेः सकलकल्याणं भजनं यस्य जायते॥
पुरुषं तमजं नित्यं व्रजामि शरणं हरिम्॥ ६१॥
गर्ग उवाच।
नारायणेति मन्त्रोऽस्ति वागस्ति वशवर्तिनी॥
तथापि नरके घोरे पतन्तीत्यद्भुतं महत्॥ ६२॥
दाल्भ्य उवाच।
किं तस्य बहुभिर्मन्त्रैर्भक्तिर्यस्य जनार्दने॥
नमो नारायणायेति मन्त्रः सर्वार्थसाधाके॥ ६३॥

वैशम्पायन उवाच।

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः॥
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम॥ ६४॥

अग्निरुवाच।

हरिर्हरति पापानि दुष्टचित्तैरपि स्मृतः॥
अनिच्छयापि संस्पृष्टो दहत्येव हि पावकः॥ ६५॥

परमेश्वर उवाच।

सकृदुच्चरितं येन हरिरित्यक्षरद्वयम् ।
लब्धः परिकरस्तेन मोक्षाय गमनं प्रति॥ ६६॥

पुलस्त्य उवाच।

हे जिह्वे रससारज्ञे सर्वदा मधुरप्रिये॥
नारायणाख्यपीयूषं पिब जिह्वे निरन्तरम्॥ ६७॥

व्यास उवाच।

सत्यं सत्यं पुनः सत्यं सत्यं सत्यं वदाम्यहम्॥
नास्ति वेदात्परं शास्त्रं न देवः केशवात्परः॥ ६८॥

धन्वन्तरिरुवाच।

अच्युतानन्त गोविन्द नामोच्चारणभेषजात् ।
नश्यन्ति सकला रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम्॥ ६९॥

मार्कण्डेय उवाच।

स्वर्गदं मोक्षदं देवं सुखदं जगतो गुरुम्॥
कथं मुहुर्तमपि तं वासुदेवं न चिन्तयेत्॥ ७०॥

अगस्त्य उवाच।

निमिषं निमिषार्धं वा प्राणिनां विष्णुचिन्तनम्॥
तत्र तत्र कुरुक्षेत्रं प्रयागो नैमिषं वरम्॥ ७१॥

वामदेव उवाच।

निमिषं निमिषार्धं वा प्राणिनां विष्णुचिन्तनम्॥
कल्पकोटिसहस्राणि लभते वाञ्छितं फलम्॥ ७२॥

शुक उवाच।

आलोड्य सर्वशास्त्राणि विचार्य च पुनः पुनः ।
इदमेकं सुनिष्पन्नं ध्येयो नारायणः सदा॥ ७३॥

श्रीमहादेव उवाच।

शरीरे जर्जरीभूते व्याधिग्रस्ते कलेवरे॥
औषधं जाह्नवीतोयं वैद्यो नारायणो हरिः॥ ७४॥

शौनक उवाच।

भोजनाच्छादने चिन्तां वृथा कुर्वन्ति वैष्णवाः ।
योऽसौ विश्वम्भरो देवः स किं भक्तानुपेक्षते॥ ७५॥

सनत्कुमार उवाच।

यस्य हस्ते गदा चक्रं गरुडो यस्य वाहनम्॥
शङ्खचक्रगदापद्मी स मे विष्णुः प्रसीदतु॥ ७६॥
एवं ब्रह्मादयो देवा ऋषयश्च तपोधनाः॥
कीर्तयन्ति सुरश्रेष्ठमेवं नारायणं विभुम्॥ ७७॥
इदं पवित्रमायुष्यं पुण्यं पापप्रणाशनम्॥
दुःस्वप्ननाशनं स्तोत्रं पाण्डवैः परिकीर्तितम्॥ ७८॥
यः पठेत्प्रातरुत्थाय शुचिस्तद्गतमानसः॥
गवां शतसहस्रस्य सम्यग्दत्तस्य यत्फलम्॥ ७९॥
तत्फलं समवाप्नोति यः पठेदिति संस्तवम्॥
सर्वपापविनिर्मुक्तो विष्णुलोकं स गच्छति॥ ८०॥
गङ्गा गीता च गायत्री गोविन्दो गरुडध्वजः॥
गकारैः पञ्चभिर्युक्तः पुनर्जन्म न विद्यते॥ ८१॥
गीतां यः पठते नित्यं श्लोकार्धं श्लोकमेव वा॥
मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं स गच्छति॥ ८२॥
ॐ तत्सत्॥

## 7.4 श्रीरामरक्षास्तोत्रम्

॥ ॐ श्रीगणेशाय नमः ॥

अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमंत्रस्य । बुधकौशिक ऋषिः ।
श्रीसीतारामचंद्रो देवता । अनुष्टुप् छंदः ।
सीता शक्तिः । श्रीमद् हनुमान कीलकम् ।
श्रीरामचंद्रप्रीत्यर्थे रामरक्षास्तोत्रजपे विनियोगः ॥

॥ अथ ध्यानम् ॥

ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुषं बद्धपद्मासनस्थम् ।
पीतं वासो वसानं नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नम् ।
वामांकारूढ सीतामुखकमलमिलल्लोचनं नीरदाभम् ।
नानालंकारदीप्तं दधतमुरुजटामंडनं रामचंद्रम् ॥

॥ इति ध्यानम् ॥

चरितं रघुनाथस्य शतकोटि प्रविस्तरम् ।
एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम् ॥ १॥

ध्यात्वा नीलोत्पलश्यामं रामं राजीवलोचनम् ।
जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमंडितम् ॥ २॥

सासितूणधनुर्बाणपाणिं नक्तंचरान्तकम् ।
स्वलीलया जगत्रातुं आविर्भूतं अजं विभुम् ॥ ३॥

रामरक्षां पठेत्प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम् ।
शिरोमे राघवः पातु भालं दशरथात्मजः ॥ ४॥

कौसल्येयो दृशौ पातु विश्वामित्रप्रियश्रुती ।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ॥ ५॥

जिव्हां विद्यानिधिः पातु कंठं भरतवंदितः ।
स्कंधौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ॥ ६॥

करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजित ।
मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रयः ॥७॥

सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः ।
ऊरू रघूत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ॥८॥

जानुनी सेतुकृत्पातु जंघे दशमुखान्तकः ।
पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोखिलं वपुः ॥९॥

एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत् ।
स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत् ॥१०॥

पातालभूतलव्योमचारिणश्छद्मचारिणः ।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ॥११॥

रामेति रामभद्रेति रामचंद्रेति वा स्मरन् ।
नरो न लिप्यते पापैः भुक्तिं मुक्तिं च विन्दति ॥१२॥

जगजैत्रैकमंत्रेण रामनाम्नाभिरक्षितम् ।
यः कंठे धारयेत्तस्य करस्थाः सर्वसिद्धयः ॥१३॥

वज्रपंजरनामेदं यो रामकवचं स्मरेत ।
अव्याहताज्ञः सर्वत्र लभते जयमंगलम् ॥१४॥

आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षांमिमां हरः ।
तथा लिखितवान् प्रातः प्रभुद्धो बुधकौशिकः ॥१५॥

आरामः कल्पवृक्षाणां विरामः सकलापदाम् ।
अभिरामस्त्रिलोकानां रामः श्रीमान् स नः प्रभुः ॥१६॥

तरुणौ रूपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ ।
पुंडरीकविशालाक्षौ चीरकृष्णाजिनाम्बरौ ॥१७॥

फलमूलाशिनौ दान्तौ तापसौ ब्रह्मचारिणौ ।
पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥१८॥

शरण्यौ सर्वसत्त्वानां श्रेष्ठौ सर्वधनुष्मताम् ।
रक्षः कुलनिहंतारौ त्रायेतां नो रघूत्तमौ ॥१९॥

आत्तसज्जधनुषाविषुस्पृशावक्षयाशुगनिषंगसंगिनौ ।
रक्षणाय मम रामलक्ष्मणावग्रतः पथि सदैव गच्छताम् ॥२०॥

सन्नद्धः कवची खड्गी चापबाणधरो युवा ।
गच्छन्मनोरथोस्माकं रामः पातु सलक्ष्मणः ॥२१॥

रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली ।
काकुत्स्थः पुरुषः पूर्णः कौसल्येयो रघुत्तमः ॥२२॥

वेदान्तवेद्यो यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः ।
जानकीवल्लभः श्रीमान अप्रमेय पराक्रमः ॥२३॥

इत्येतानि जपन्नित्यं मद्भक्तः श्रद्धयान्वितः ।
अश्वमेधाधिकं पुण्यं संप्राप्नोति न संशयः ॥२४॥

रामं दुर्वादलश्यामं पद्माक्षं पीतवाससम् ।
स्तुवंति नामभिर्दिव्यैः न ते संसारिणो नरः ॥२५॥

रामं लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुंदरम् ।
काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ।
राजेंद्रं सत्यसंधं दशरथतनयं श्यामलं शांतमूर्तिम् ।
वंदे लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं रावणारिम् ॥२६॥

रामाय रामभद्राय रामचंद्राय वेधसे ।
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः ॥२७॥

श्रीराम राम रघुनंदन राम राम ।
श्रीराम राम भरताग्रज राम राम ।
श्रीराम राम रणकर्कश राम राम ।
श्रीराम राम शरणं भव राम राम ॥२८॥

श्रीरामचंद्रचरणौ मनसा स्मरामि ।
श्रीरामचंद्रचरणौ वचसा गृणामि ।
श्रीरामचंद्रचरणौ शिरसा नमामि ।
श्रीरामचंद्रचरणौ शरणं प्रपद्ये ॥२९॥

माता रामो मत्पिता रामचंद्रः ।
स्वामी रामो मत्सखा रामचंद्रः ।
सर्वस्वं मे रामचंद्रो दयालुः ।
नान्यं जाने नैव जाने न जाने ॥३०॥

दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे तु जनकात्मजा ।
पुरतो मारुतिर्यस्य तं वंदे रघुनंदनम् ॥३१॥

लोकाभिरामं रणरंगधीरम् ।
राजीवनेत्रं रघुवंशनाथम् ।
कारुण्यरूपं करुणाकरं तम् ।
श्रीरामचंद्रम् शरणं प्रपद्ये ॥३२॥

मनोजवं मारुततुल्यवेगम् ।
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यम् ।
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥३३॥

कूजंतं राम रामेति मधुरं मधुराक्षरम् ।
आरुह्य कविताशाखां वंदे वाल्मीकिकोकिलम् ॥ ३४ ॥

आपदां अपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥ ३५ ॥

भर्जनं भवबीजानां अर्जनं सुखसम्पदाम् ।
तर्जनं यमदूतानां राम रामेति गर्जनम् ॥ ३६ ॥

रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे ।
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः ।
रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोस्म्यहम् ।
रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर ॥ ३७ ॥

राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे ।
सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ॥ ३८ ॥

इति श्रीबुधकौशिकविरचितं श्रीरामरक्षास्तोत्रं संपूर्णम् ॥
॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

## 7.5 श्रीवेङ्कटेश सुप्रभातम्

कौसल्या सुप्रजा राम पूर्वा सन्ध्या प्रवर्तते
उत्तिष्ठ नरशार्दूल कर्तव्यं दैवमाह्निकम्॥ १॥

उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविन्द उत्तिष्ठ गरुडध्वज
उत्तिष्ठ कमलाकान्त त्रैलोक्यं मङ्गलं कुरु॥ २॥

मातस्समस्तजगतां मधुकैटभारेः
वक्षोविहारिणि मनोहरदिव्यमूर्ते ।
श्रीस्वामिनि श्रितजनप्रियदानशीले
श्रीवेङ्कटेशदयिते तव सुप्रभातम्॥ ३॥

तव सुप्रभातमरविन्दलोचने
भवतु प्रसन्नमुखचन्द्रमण्डले।
विधिशङ्करेन्द्रवनिताभिरर्चिते
वृषशैलनाथदयिते दयानिधे॥ ४॥

अत्र्यादिसप्तऋषयस्समुपास्य सन्ध्यां
आकाशसिन्धुकमलानि मनोहराणि।
आदाय पादयुगमर्चयितुं प्रपन्नाः
शेषाद्रिशेखरविभो तव सुप्रभातम्॥ ५॥

पञ्चाननाब्जभवषण्मुखवासवाद्याः
त्रैविक्रमादिचरितं विबुधाः स्तुवन्ति।
भाषापतिः पठति वासर शुद्धिमारात्
शेषाद्रिशेखरविभो तव सुप्रभातम्॥ ६॥

ईषत्प्रफुल्लसरसीरुहनारिकेल
पूगद्रुमादिसुमनोहरपालिकानां।
आवाति मन्दमनिलस्सह दिव्यगन्धैः
शेषाद्रिशेखरविभो तव सुप्रभातम्॥ ७॥

उन्मील्य नेत्रयुगमुत्तम पंजरस्थाः
पात्रावशिष्टकदलीफलपायसानि।
भुक्त्वा सलीलमथ केलिशुकाः पठन्ति
शेषाद्रिशेखरविभो तव सुप्रभातम्॥ ८॥

तन्त्रीप्रकर्षमधुरस्वनया विपञ्च्या
गायत्यनन्तिचरितं तव नारदोऽपि।
भाषासमग्रमसकृत्करचाररम्यं
शेषाद्रिशेखरविभो तव सुप्रभातम्॥ ९॥

भृङ्गावली च मकरन्दरसानुविद्ध
झङ्कारगीत निनदैःसह सेवनाय।
निर्यात्युपान्तसरसीकमलोदरेभ्यः
शेषाद्रिशेखरविभो तव सुप्रभातम्॥ १०॥

योषागणेन वरदध्निविमथ्यमाने
घोषालयेषु दधिमन्थनतीव्रघोषाः।
रोषात्कलिं विदधतेककुभश्च कुम्भाः
शेषाद्रिशेखरविभो तव सुप्रभातम्॥ ११॥

पद्मेशमित्रशतपत्रगतालिवर्गाः
हर्तुं श्रियं कुवलयस्य निजाङ्गलक्ष्म्या।
भेरीनिनादमिव बिभ्रति तीव्रनादं
शेषाद्रिशेखरविभो तव सुप्रभातम्॥ १२॥

श्रीमन्नभीष्ट वरदाखिललोकबन्धो
श्रीश्रीनिवास जगदेकदयैकसिन्धो।
श्रीदेवतागृहभुजान्तर दिव्य मूर्ते
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ १३॥

श्रीस्वामिपुष्करिणिकाऽऽप्लवनिर्मलाङ्गाः
श्रेयोऽर्थिनो हरविरिंचसनन्दनाद्याः।
द्वारे वसन्ति वरवेत्रहतोत्तमाङ्गाः
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ १४॥

श्री शेषशैल गरुडाचल वेङ्कटाद्रि
नारायणाद्रि वृषभाद्रि वृषाद्रि मुख्याम्।
आख्याम् त्वदीय वसतेरनिशं वदन्ति
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ १५॥

सेवापराः शिवसुरेशकृशानुधर्म
रक्षोऽम्बुनाथ पवमान धनाधिनाथाः।
बद्धांजलि प्रविलसन्निजशीर्ष देशाः
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ १६॥

घाटीषु ते विहगराज मृगाधिराज-
नागाधिराज गजराज हयाधिराजाः।
स्वस्वाधिकार महिमाधिकमर्थयन्ते
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ १७॥

सूर्येन्दु भौम बुध वाक्पति काव्य सौरि
स्वर्भानु केतु दिविषत्परिषत्प्रधानाः।
त्वद्दास दास चरमावधि दासदासाः
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ १८॥

त्वत्पादधूलि भरितस्फुरितोत्तमाङ्गाः
स्वर्गापवर्ग निरपेक्ष निजान्तरङ्गाः।
कल्पागमाऽऽकलनयाऽऽकुलतां लभन्ते
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ १९॥

त्वद्गोपुराग्रशिखराणि निरीक्षमाणाः
स्वर्गापवर्गपदवीं परमां श्रयन्तः।
मर्त्या मनुष्यभुवने मतिमाश्रयन्ते
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ २०॥

श्रीभूमिनायक दयादिगुणामृताब्धे
देवाधिदेव जगदेकशरण्यमूर्ते।
श्रीमन्ननन्त गरुडादिभिरर्चिताङ्घ्रे
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ २१॥

श्रीपद्मनाभ पुरुषोत्तम वासुदेव
वैकुण्ठ माधव जनार्दन चक्रपाणे।
श्रीवत्सचिन्ह शरणागतपारिजात
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ २२॥

कन्दर्पदर्प हरसुन्दर दिव्यमूर्ते
कान्ताकुचाम्बुरुह कुट्मल लोलदृष्टे।
कल्याणनिर्मलगुणाकर दिव्यकीर्ते
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ २३॥

मीनाकृते कमठ कोल नृसिंह वर्णिन्
स्वामिन् परश्वथतपोधन रामचन्द्र।
शेषांशराम यदुनन्दन कल्किरूप
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ २४॥

एला लवङ्ग घनसार सुगन्धि तीर्थं
दिव्यं वियत्सरिति हेमघटेषु पूर्णम्।
धृत्वाऽऽद्य वैदिक शिखामणयः प्रहृष्टाः
तिष्ठन्ति वेङ्कटपते तव सुप्रभातम्॥ २५॥

भास्वानुदेति विकचानि सरोरुहाणि
संपूरयन्ति निनदैः ककुभो विहङ्गाः।
श्रीवैष्णवास्सततमर्थित मङ्गलास्ते
धामाऽऽश्रयन्ति तव वेङ्कट सुप्रभातम्॥ २६॥

ब्रह्मादयः सुरवरास्समहर्षयस्ते
सन्तस्सनन्दन मुखास्त्वथ योगिवर्याः।
धामान्तिके तव हि मङ्गलवस्तु हस्ताः
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ २७॥

लक्ष्मीनिवास निरवद्यगुणैकसिन्धो
संसार सागर समुत्तरणैकसेतो।
वेदान्तवेद्यनिजवैभव भक्तभोग्य
श्रीवेङ्कटाचलपते तव सुप्रभातम्॥ २८॥

इत्थं वृषाचलपतेरिह सुप्रभातम्
ये मानवाः प्रतिदिनं पठितुं प्रवृत्ताः।
तेषां प्रभातसमये स्मृतिरङ्गभाजां
प्रज्ञां परार्थसुलभां परमां प्रसूते॥ २९॥

॥ इति वेङ्कटेश सुप्रभातम्॥

## 7.6 श्रीवेङ्कटेश स्तोत्रम्

कमला कुच चूचुक कुङ्कुमतो नियतारुणितातुल नीलतनो।
कमलायतलोचन लोकपते विजयी भव वेङ्कटशैलपते॥ १॥

सचतुर्मुखषण्मुखपञ्चमुख प्रमुखाखिलदैवतमौलिमणे।
शरणागतवत्सल सारनिधे परिपालय मां वृषशैलपते॥ २॥

अतिवेलतया तव दुर्विषहैः अनुवेलकृतैरपराधशतैः।
भरितं त्वरितं वृषशैलपते परया कृपया परिपाहि हरे॥ ३॥

अधिवेङ्कटशैलमुदारमते जनताभिमताधिकदानरतात्।
परदेवतया गदितान्निगमैः कमलादयितान्न परं कलये॥ ४॥

कलवेणुरवावशगोपवधू शतकोटिवृतात्स्मरकोटिसमात् ।
प्रतिवल्लविकाभिमतात्सुखदात् वसुदेवसुतान्न परं कलये ॥ ५ ॥

अभिरामगुणाकर दाशरथे जगदेकधनुर्धर धीरमते ।
रघुनायक राम रमेश विभो वरदोभव देव दयाजलधे ॥ ६ ॥
अवनीतनयाकमनीयकरं रजनीकरचारुमुखाम्बुरुहं ।
रजनीचरराजतमोमिहिरं महनीयमहं रघुराम मये ॥ ७ ॥

सुमुखं सुहृदं सुलभं सुखदं स्वनुजं च सुखायममोघशरं ।
अपहाय रघूद्वहमन्यमहं न कथञ्चन कञ्चन जातु भजे ॥ ८ ॥

विना वेङ्कटेशं न नाथो नाथः सदा वेङ्कटेशं स्मरामि स्मरामि ।
हरे वेङ्कटेश प्रसीद प्रसीद प्रियं वेङ्कटेश प्रयच्छ प्रयच्छ ॥ ९ ॥

अहं दूरतस्ते पदाम्भोजयुग्म प्रणामेच्छयाऽऽगत्य सेवां करोमि ।
सकृत्सेवया नित्यसेवाफलं त्वं प्रयच्छ प्रयच्छ प्रभो वेङ्कटेश ॥ १० ॥

अज्ञानिना मया दोषान् अशेषान्विहितान् हरे ।
क्षमस्व त्वं क्षमस्व त्वं शेषशैल शिखामणे ॥ ११ ॥

॥ इति वेङ्कटेश स्तोत्रम् ॥

## 7.7 श्रीवेङ्कटेश प्रपत्ति

ईशानां जगतोऽस्य वेङ्कटपतेः विष्णोः परां प्रेयसीं
तद्वक्षस्स्थल नित्य वासरसिकां तत्क्षान्ति संवर्धिनीं ।
पद्मालङ्कृतपाणिपल्लवयुगां पद्मासनस्थां श्रियं
वात्सल्यादिगुणोज्ज्वलां भगवतीं वंदे जगन्मातरं ॥ १ ॥

श्रीमन् कृपाजलनिधे कृतसर्वलोक
सर्वज्ञ शक्त नतवत्सल सर्वशेषिन् ।
स्वामिन् सुशीलसुलभाश्रितपारिजात
श्रीवेङ्कटेशचरणौ शरणं प्रपद्ये ॥ २ ॥

आनूपुरार्पितसुजातसुगन्धिपुष्प
सौरभ्यसौरभकरौ समसन्निवेशौ ।
सौम्यौ सदाऽनुभवनेऽपि नवानुभाव्यौ
श्रीवेङ्कटेशचरणौ शरणं प्रपद्ये ॥ ३ ॥

सद्योविकासिसमुदित्वरसान्द्रराग
सौरभ्यनिर्भरसरोरुहसाम्यवार्तां ।
सम्यक्षु साहसपदेषु विलेखयन्तौ
श्रीवेङ्कटेशचरणौ शरणं प्रपद्ये ॥ ४ ॥

रेखामयध्वजसुधाकलशातपत्र
वज्राङ्कुशाम्बुरुहकल्पकशङ्खचक्रैः ।
भव्यैरलङ्कृततलौ परतत्व चिन्हैः
श्रीवेङ्कटेशचरणौ शरणं प्रपद्ये ॥ ५ ॥

ताम्रोदरद्युतिपराजितपद्मरागौ
बाह्यैर्महोभिरभिभूतमहेन्द्रनीलौ ।
उध्यन्नखांशुभिरुदस्तशशाङ्कभासौ
श्रीवेङ्कटेशचरणौ शरणं प्रपद्ये ॥ ६ ॥

सप्रेमभीति कमलाकरपल्लवाभ्यां
संवाहनेऽपि सपदि क्लममादधानौ ।
कान्ताववाङ्मनसगोचरसौकुमार्यौ
श्रीवेङ्कटेशचरणौ शरणं प्रपद्ये ॥ ७ ॥

लक्ष्मीमहीतदनुरूपनिजानुभाव
नीलादिदिव्यमहिषीकरपल्लवानां ।
आरुण्यसङ्क्रमणतः किल सान्द्ररागौ
श्रीवेङ्कटेशचरणौ शरणं प्रपद्ये ॥ ८ ॥

नित्यान्नमद्विधिशिवादिकिरीटकोटि
प्रत्युप्त दीप्त नवरत्न महःप्ररोहैः ।
नीराजना विधिमुदारमुपादधानौ
श्रीवेङ्कटेश चरणौ शरणं प्रपद्ये ॥ ९ ॥

विष्णोः पदे परम इत्युतिदप्रशंसौ
यौ मध्व उत्स इति भोग्यतयाऽप्युपात्तौ ।
भूयस्तथेति तव पाणितलप्रदिष्टौ
श्रीवेङ्कटेश चरणौ शरणं प्रपद्ये ॥ १० ॥

पार्थाय तत्सदृश सारथिना त्वयैव
यौ दर्शितौ स्वचरणौ शरणं व्रजेति ।
भूयोऽपि मह्यमिहतौ करदर्शितौ ते
श्री वेङ्कटेश चरणौ शरणं प्रपद्ये ॥ ११ ॥

मन्मूर्ध्नि कालियफणे विकटाटवीषु
श्री वेङ्कटाद्रिशिखरे शिरसि श्रुतीनां ॥
चित्तेऽप्यनन्यमनसां सममाहितौते
श्रीवेङ्कटेश चरणौ शरणं प्रपद्ये ॥ १२ ॥
अम्लानहृष्यदवनीतलकीर्णपुष्पौ
श्रीवेङ्कटाद्रि शिखराभरणायमानौ ।
आनन्दिताखिल मनो नयनौ तवैतौ
श्रीवेङ्कटेश चरणौ शरणं प्रपद्ये ॥ १३ ॥

प्रायः प्रपन्न जनता प्रथमावगाह्यौ
मातुस्स्तनाविव शिशोरमृतायमानौ ।

प्राप्तौपरस्परतुलामतुलान्तरौ ते
श्रीवेङ्कटेश चरणौ शरणं प्रपद्ये॥ १४॥

सत्वोत्तरैस्सतत सेव्यपदाम्बुजेन
संसारतारकदयार्द्र दृगंचलेन।
सौम्योपयन्तृमुनिना मम दर्शितौ ते
श्रीवेङ्कटेश चरणौ शरणं प्रपद्ये॥ १५॥

श्रीश श्रिया घटिकया त्वदुपायभावे
प्राप्ये त्वयि स्वयमुपेयतयास्फुरन्त्या।
नित्याश्रिताय निरवद्यगुणाय तुभ्यं
स्यां किङ्करो वृषगिरीश न जातु मह्यम्॥ १६॥

॥ इति वेङ्कटेश प्रपत्ति॥

## 7.8 श्रीवेङ्कटेश मङ्गलाशासनम्

श्रियः कान्ताय कल्याण निधये निधयेऽर्थिनां
श्रीवेङ्कटनिवासाय श्रीनिवासाय मङ्गलम्॥ १॥

लक्ष्मी सविभ्रमालोक सुभ्रू विभ्रमचक्षुषे
चक्षुषे सर्वलोकानां वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ २॥

श्री वेङ्कटाद्रि शृङ्गाङ्ग्र मङ्गलाभरणाङ्घ्रये
मङ्गलानां निवासाय वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ ३॥

सर्वावयवसौन्दर्य संपदा सर्वचेतसां
सदा सम्मोहनायास्तु वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ ४॥

नित्याय निरवद्याय सत्यानन्दचिदात्मने
सर्वान्तरात्मने श्रीमद् वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ ५॥

स्वतस्सर्वविदे सर्व शक्तये सर्वशेषिणे
सुलभाय सुशीलाया वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ ६॥

परस्मै ब्रह्मणे पूर्णकामाय परमात्मने
प्रयुंजे परतत्त्वाय वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ ७॥

आकाल तत्त्वमश्रान्तं आत्मनां अनुपश्यतां
अतृप्त्यमृतरूपाय वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ ८॥

प्रायस्स्वचरणौ पुंसां शरण्यत्वेन पाणिना
कृपयाऽऽदिशते श्रीमद् वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ ९॥

दयामृत तरङ्गिण्यास्तरङ्गैरिव शीतलैः
अपांगैः सिंचते विश्वं वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ १०॥

स्रग्भूषाम्बरहेतीनां सुषमावह मूर्तये
सर्वार्ति शमनायास्तु वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ ११॥

श्रीवैकुण्ठविरक्ताय स्वामिपुष्करिणीतटे
रमया रममाणाय वेङ्कटेशाय मङ्गलम्॥ १२॥

श्रीमद्सुन्दरजामातृमुनि मानसवासिने
सर्वलोक निवासाय श्रीनिवासाय मङ्गलम्॥ १३॥

मङ्गलाशासनपरैर्मदाचार्य पुरोगमैः
सर्वैश्च पूर्वैराचार्यैः सत्कृतायास्तु मङ्गलम्॥ १४॥

॥ इति वेङ्कटेश मङ्गलाशासनम्॥

॥ ॐ तत् सत्॥

## 7.9 श्रीव्यङ्कटेश स्तोत्र

श्रीगणेशाय नमः। श्रीव्यंकटेशाय नमः।
ॐ नमो जी हेरंबा। सकळादि तूं प्रारंभा।
आठवूनि तुझी स्वरूपशोभा। वंदन भावें करीतसें॥ १॥
नमन माझे हंसवाहिनी। वाग्वरदे विलासिनी।
ग्रंथ वदावया निरूपणी। भावार्थखाणी जयामाजी॥ २॥
नमन माझे गुरुवर्या। प्रकाशरूपा तूं स्वामिया।
स्फूर्ति द्यावी ग्रंथ वदावया। जेणे श्रोतया सुख वाटे॥ ३॥
नमन माझे संतसज्जनां। आणि योगियां मुनिजनां।
सकळ श्रोतयां साधुजनां। नमन माझे साष्टांगी॥ ४॥
ग्रंथ ऐका प्रार्थना शतक। महादोषांसी दाहक।
तोषूनिया वैकुंठनायक। मनोरथ पूर्ण करील॥ ५॥
जयजयाजी व्यंकटरमणा। दयासागरा परिपूर्णा।
परंज्योति प्रकाशगहना। करितो प्रार्थना श्रवण कीजे॥ ६॥
जननीपरी त्वां पाळिले। पितयापरी त्वां सांभाळिले।
सकळ संकटापासुनी रक्षिले। पूर्ण दिधले प्रेमसुख॥ ७॥
हें अलौकिक जरी मानावें। तरी जग हें सृजिलें आघवे।
जनकजननीपण स्वभावे। सहज आले अंगासी॥ ८॥
दीनानाथा प्रेमासाठी। भक्त रक्षिले संकटी।
प्रेम दिधले अपूर्व गोष्टी। भजनासाठी भक्तांच्या॥ ९॥
आतां परिसावी विज्ञापना। कृपाळुबा लक्ष्मीरमणा।
मज घालोनि गर्भाधाना। अलोकिक रचना दाखविली॥ १०॥
तुज न जाणता झालो कष्टी।
आतां दृढ तुझे पायीं घातली मिठी।
कृपाळुबा जगजेठी। अपराध पोटी घाली माझे॥ ११॥

माझिया अपराधांच्या राशी। भेदोनि गेल्या गगनासी।
दयावंता हृषीकेशी। आपुल्या ब्रीदासी सत्य करी॥ १२॥
पुत्राचे सहस्र अपराध। माता काय मानी तयांचा खेद।
तेवीं तूं कृपाळू गोविंद। माय-बाप मजलागी॥ १३॥
उडदांमाजी काळे गोरे। काय निवडावे निवडणारे।
कुचलिया वृक्षाची फळे। मधुर कोठोनि असतील॥ १४॥
अराटीलागी मृदुता। कोठोनि असेल कृपावंता।
पाषाणासी गुल्मलता। कैशियापरी फुटतील॥ १५॥
आपाद मस्तकावरी अन्यायी। परी तुझे पदरी पडलो पाही।
आतां रक्षण नाना उपायीं। करणे तुज उचित॥ १६॥
समर्थाचिये घरींचे श्वान। त्यासी सर्वहि देती मान।
तैसा तुझा म्हणवितो दीन। हा अपमान कवणाचा॥ १७॥
लक्ष्मी तुझे पायांतळी। आम्ही भिक्षेसी घालोनि झोळी।
येणें तुझे ब्रीदावळी। कैशी राहील गोविंदा॥ १८॥
कुबेर तुझा भांडारी। आम्हां फिरविसी दारोदारीं।
यांत पुरुषार्थ मुरारी। काय तुजला पैं आला॥ १९॥
द्रौपदीसी वस्त्रें अनंता। देत होतासी भाग्यवंता।
आम्हालागी कृपणता। कोठोनि आणिली गोविंदा॥ २०॥
मावेची करूनि द्रौपदी सती। अन्नें पुरविली मध्यरातीं।
ऋषीश्वरांच्या बैसल्या पंक्ती। तृप्त केल्या क्षणमात्रें॥ २१॥
अन्नासाठी दाही दिशा। आम्हां फिरविसी जगदीशा।
कृपाळुबा परमपुरुषा। करुणा कैशी तुज न ये॥ २२॥
अंगीकारीया शिरोमणी। तुज प्रार्थितो मधुर वचनीं।
अंगीकार केलिया झणीं। मज हातींच न सोडावें॥ २३॥
समुद्रें अंगीकारिला वडवानळ। तेणें अंतरी होतसे विव्हळ।
ऐसे असोनि सर्वकाळ। अंतरी साठविला तयानें॥ २४॥
कूर्में पृथ्वीचा घेतला भार। तेणें सोडिला नाही बडिवार।
एवढा ब्रह्मांडगोळ थोर। त्याचा अंगीकार पैं केला॥ २५॥
शंकरें धरिले हाळाहळा। तेणें नीळवर्ण झाला गळा।
परी त्यागिले नाहीं गोपाळा। भक्तवत्सला गोविंदा॥ २६॥
माझ्या अपराधांच्या परी। वर्णितां शिणली वैखरी।
दुष्ट पतित दुराचारी। अधमाहूनि अधम॥ २७॥
विषयासक्त मंदमति आळशी। कृपण कुव्यसनी मलिन मानसीं।
सदा सर्वकाळ सज्जनासीं। द्रोह करी सर्वदा॥ २७॥
वचनोक्ति नाहीं मधुर। अत्यंत जनांसी निष्ठुर।
सकळ पामरांमाजी पामर। व्यर्थ बडिवार जगीं वाचे॥ २९॥
काम क्रोध मद मत्सर। हें शरीर त्यांचे बिढार।
कामकल्पनेसी थार। दृढ येथे केला असे॥ ३०॥

अठरा भार वनस्पतींची लेखणी। समुद्र भरला मषीकरूनी।
माझे अवगुण लिहितां धरणी। तरी लिहिले न जाती॥ ३१॥
ऐसा पतित मी खरा। परी तूं पतितपावन शार्ङ्गधरा।
तुवां अंगिकार केलिया गदाधरा। कोण दोषगुण गणील॥ ३२॥
नीच रतली रायासीं। तिसी कोण म्हणेल दासी।
लोह लागतां परिसासी। पूर्वस्थिती मग कैंची॥ ३३॥
गांवीचे होते लेंडवोहळ। गंगेसीं मिळतां गंगाजळ।
कागविष्ठेचे झाले पिंपळ। तयांसी निंद्य कोण म्हणे॥ ३४॥
तैसा कुजाति मी अमंगळ। परी तुझा म्हणवितो केवळ।
कन्या देऊनियां कुळ। मग काय विचारावे॥ ३५॥
म्हणत असतां अपराधी नर। तरी कां केला अंगीकार।
स्वीकारावरी अव्हेर। समर्थें केला न पाहिजे॥ ३६॥
धाव पाव रे गोविंदा। हातीं घेवोनिया गदा।
करी माझ्या कर्माचा चेंदा। सच्चिदानंदा श्रीहरी॥ ३७॥
तुझिया नामाची अपरिमित शक्ति। तेथें माझी पापें किती।
कृपाळुबा श्रीपती। बरवें चित्तीं विचारी॥ ३८॥
तुझें नाम पतितपावन। तुझें नाम कलिमलदहन।
तुझें नाम भवतारण। संकटनाशन नाम तुझें॥ ३९॥
आतां प्रार्थना ऐक कमळापती। तुझें नामीं राहो माझी मती।
हेंचि मागतो पुढतपुढतीं। परंज्योति व्यंकटेशा॥ ४०॥
तूं अनंत तुझी अनंत नामें। तयांमाजी अति सुगमें।
ती मी अल्पमति प्रेमें। स्मरूनि प्रार्थना करीतसे॥ ४१॥
श्रीव्यंकटेशा वासुदेवा। प्रद्युम्ना अनंता केशवा।
संकर्षणा श्रीधरा माधवा। नारायणा आदिमूर्ती॥ ४२॥
पद्मनाभा दामोदरा। प्रकाशगहना परात्परा।
आदि अनादि विश्वंभरा। जगदुद्धारा जगदीशा॥ ४३॥
कृष्णा विष्णो हृषीकेशा। अनिरुद्धा पुरुषोत्तमा परेशा।
नृसिंह वामन भार्गवेशा। बौद्ध कलंकी निजमूर्ती॥ ४४॥
अनाथरक्षका आदिपुरुषा। पूर्णब्रह्म सनातन निर्दोषा।
सकळमंगळ मंगळाधीशा। सज्जनजीवना सुखमूर्ती॥ ४५॥
गुणातीता गुणज्ञा। निजबोधरूपा निमग्ना।
शुद्ध सात्त्विका सुज्ञा। गुणप्राज्ञा परमेश्वरा॥ ४६॥
श्रीनिधि श्रीवत्सलांछनधरा। भयकृद्भयनाशना गिरिधरा।
दुष्टदैत्यसंहारकरा। वीरा सुखकरा तूं एक॥ ४७॥
निखिल निरंजन निर्विकारा। विवेकखाणीवैरागरा।
मधुमुरदैत्यसंहारकरा। असुरमर्दना उग्रमूर्ती॥ ४८॥
शंखचक्रगदाधरा। गरुडवाहना भक्तप्रियकरा।
गोपीमनरंजना सुखकरा। अखंडित स्वभावे॥ ४९॥
नानानाटकसूत्रधारिया। जगद्व्यापका जगवर्या।
कृपासमुद्रा करुणालया। मुनिजनध्येया मूळमूर्ती॥ ५०॥
शेषशयना सार्वभौमा। वैकुंठवासिया निरुपमा।
भक्तकैवारिया गुणधामा। पाव आम्हां ये समयीं॥ ५१॥
ऐसी प्रार्थना करूनि देवीदास। अंतरी आठवला श्रीव्यंकटेश।
स्मरतां हृदयीं प्रगटला ईश। त्या सुखासी पार नाहीं॥ ५२॥
हृदयीं आविर्भवली मूर्ती। त्या सुखाची अलौकिक स्थिती।
आपुले आपण श्रीपती। वाचेहातीं बोलवीतसे॥ ५३॥
तें स्वरूप अत्यंत सुंदर। श्रोतीं श्रवण कीजे सादर।
सांवळी तनु सुकुमार। कुंकुमाकार पादपद्में॥ ५४॥
सुरेख सरळ अंगोळिका। नखें जैसी चन्द्ररेखा।
घोटीव सुनीळ अपूर्व देखा। इंद्रनीळाचियेपरी॥ ५५॥
चरणीं वाळे घागरिया। वांकी वरत्या गुजरिया।
सरळ सुंदर पोटरिया। कर्दळीस्तंभाचियेपरी॥ ५६॥

गुडघे मांडिया जानुस्थळ। कटितटीं किंकिणीं विशाळ।
खालतें विश्वउत्पत्तिस्थळ। वरी झळाळी सोनसळा॥ ५७॥
कटीवरतें नाभिस्थान। जेथोनि ब्रह्मा झाला उत्पन्न।
उदरीं त्रिवळी शोभे गहन। त्रैलोक्य संपूर्ण जयामाजी॥ ५८॥
वक्षस्थळीं शोभे पदक। पाहोनि चंद्रमा अधोमुख।
वैजयंती करी लखलख। विद्युल्लतेचियेपरी॥ ५९॥
हृदयीं श्रीवत्सलांछन। भूषण मिरवी श्रीभगवान।
तयावरतें कंठस्थान। जयासीं मुनिजन अवलोकिती॥ ६०॥
उभय बाहुदंड सरळ। नखें चंद्रापरी तेजाळ।
शोभती दोन्ही करकमळ। रातोत्पलाचियेपरी॥ ६१॥
मनगटीं विराजती कंकणें। बाहुवटीं बाहुभूषणें।
कंठी लेईली आभरणे। सूर्यकिरणें उगवली॥ ६२॥
कंठावरुतें मुखकमळ। हनुवटी अत्यंत सुनीळ।
मुखचंद्रमा अति निर्मळ। भक्त स्नेहाळ गोविंदा॥ ६३॥
दोन्हीं अधरांमाजी दंतपंक्ती। जिव्हा जैसी लावण्यज्योती।
अधरामृत प्राप्तीची गती। तें सुख जाणे लक्ष्मी॥ ६४॥
सरळ सुंदर नासिक। जेथें पवनासी झाले सुख।
गंडस्थळीचे तेज अधिक। लखलखीत दोही भागीं॥ ६५॥
त्रिभुवनीचे तेज एकवटले। बरवेंपणे सिगेसि आलें।
दोही पातयांनी धरिले। तेच नेत्र श्रीहरीचे॥ ६६॥
व्यंकटा भृकुटिया सुनीळा। कर्णद्वयाची अभिनव लीळा।
कुंडलांच्या फांकती कळा। तो सुखसोहळा अलौकिक॥ ६७॥
भाळ विशाल सुरेख। वरतीं शोभे कस्तूरीटिळक।
केश कुरळ अलोलिक। मस्तकावरी शोभती॥ ६८॥
मस्तकी मुगुट आणि किरीटी। सभोवती झिळमिळ्यांची दाटी।
त्यावरी मयूर पिच्छांची वेटी। ऐसा जगजेटी देखिला॥ ६९॥
ऐसा तूं देवाधिदेव। गुणातीत वासुदेव।
माझिया भक्तीस्तव। सगुणरूप झालासी॥ ७०॥
आतां करूं तुझी पूजा। जगज्जीवना अधोक्षजा।
आर्ष भावार्थ हा माझा। तुज अर्पण केला असे॥ ७१॥
करूनि पंचामृत स्नान। शुद्धामृत वरी घालून।
तुज करूं मंगलस्नान। पुरुषसूक्तें करूनियां॥ ७२॥
वस्त्रें आणि यज्ञोपवीत। तुजलागीं करूं प्रीत्यर्थ।
गंधाक्षता पुष्पें बहुत। तुजलागीं समर्पूं॥ ७३॥
धूप दीप नैवेद्य। फल तांबूल दक्षिणा शुद्ध।
वस्त्रें भूषणें गोमेद। पद्मरागादि करूनि॥ ७४॥
भक्तवत्सला गोविंदा। ही पूजा अंगिकारावी परमानंदा।
नमस्कारुनि पादारविंदा। मग प्रदक्षिणा आरंभिली॥ ७५॥
ऐसा षोडशोपचारें भगवंत। यथाविधी पूजिला हृदयांत।
मग प्रार्थना आरंभिली बहुत। वरप्रसाद मागावया॥ ७६॥
जयजयाजी श्रुतिशास्त्रआगमा। जयजयाजी गुणातीत परब्रह्मा।
जयजयाजी हृदयवासिया रामा। जगदुद्धारा जगद्गुरू॥ ७७॥
जयजयाजी पंकजाक्षा। जयजयाजी कमळाधीशा।
जयजयाजी पूर्णपरेशा। अव्यक्तव्यक्ता सुखमूर्ती॥ ७८॥
जयजयाजी भक्तरक्षका। जयजयाजी वैकुंठनायका।
जयजयाजी जगपालका। भक्तांसी सखा तूं एक॥ ७९॥
जयजयाजी निरंजना। जयजयाजी परात्परगहना।
जयजयाजी शून्यातीत निर्गुणा। परिसावी विज्ञापना एक माझी॥ ८०॥
मजलागीं देई ऐसा वर। जेणें घडेल परोपकार।
हेंचि मागणे साचार। वारंवार प्रार्थीतसे॥ ८१॥
हा ग्रंथ जो पठण करी। त्यासीं दुःख नसावें संसारीं।
पठणमात्रें चराचरी। विजय करी जगातें॥ ८२॥
लग्नार्थियांचे व्हावे लग्न। धनार्थियासी व्हावे धन।
पुत्रार्थियाचे मनोरथ पूर्ण। पुत्र देऊनि करावे॥ ८३॥
पुत्र विजयी आणि पंडित। शतायुषी भाग्यवंत।
पितृसेवेसी अत्यंत रत। जयाचे चित्त सर्वकाळ॥ ८४॥
उदार आणि सर्वज्ञ। पुत्र देई भक्तालागून।
व्याधिष्ठांची पीडा हरण। तत्काळ कीजे गोविंदा॥ ८५॥
क्षय अपस्मार कुष्ठादि रोग। ग्रंथपठणें सरावा भोग।
योगाभ्यासियांसी योग। पठणमात्रें साधावा॥ ८६॥
दरिद्री व्हावा भाग्यवंत। शत्रूचा व्हावा निःपात।
सभा व्हावी वश समस्त। ग्रंथपठणे करूनिया॥ ८७॥
विद्यार्थियांसी विद्या व्हावी। युद्धीं शस्त्रे न लागावी।
पठण जगांत कीर्ति व्हावी। साधु साधु म्हणोनियां॥ ८८॥
अंतीव्हावें मोक्षसाधन। ऐसें प्रार्थनेसी दीजे मन।
एवढे मागतो वरदान। कृपानिधे गोविंदा॥ ८९॥
प्रसन्न झाला व्यंकटरमण। देवीदासासी दिधले वरदान।
ग्रंथाक्षरीं माझे वचन। यथार्थ जाण निश्चयेसीं॥ ९०॥
ग्रंथी धरोनि विश्वास। पठण करील रात्रंदिवस।
त्यालागी मी जगदीश। क्षण एक न विसंबे॥ ९१॥
इच्छा धरूनि करील पठण। त्याचें सांगतो मी प्रमाण।
सर्व कामनेसी साधन। पठण एक मंडळ॥ ९२॥
पुत्रार्थियाने तीन मास। धनार्थियाने एकवीस दिवस।
कन्यार्थियाने षण्मास। ग्रंथ आदरें वाचावा॥ ९३॥
क्षय अपस्मार कुष्ठादि रोग। इत्यादि साधने प्रयोग।
त्यासी एक मंडळ सांग। पठणें करूनि कार्यसिद्धी॥ ९४॥
हें वाक्य माझे नेमस्त।
ऐसे बोलला श्रीभगवंत।
साच न माने जयाचे चित्त।
त्यासी अधःपात सत्य होय॥ ९५॥
विश्वास धरील ग्रंथपठणीं। त्यासी कृपा करील चक्रपाणी।
वर दिधला कृपा करूनी। अनुभवें कळों येईल॥ ९६॥
गजेंद्राचिया आकांतासी। कैसा पावला हृषीकेशी।
प्रल्हादाचिया भावार्थासी। स्तंभांतूनि प्रगटला॥ ९७॥
व्रजासाठी गोविंदा। गोवर्धन परमानंदा।
उचलोनियां स्वानंदकंदा। सुखी केले तये वेळी॥ ९८॥
वत्साचेपरी भक्तांसी। मोहें पान्हावें धेनु जैसी।
मातेच्या स्नेहतुलनेसी। त्याचपरी घडलेसे॥ ९९॥
ऐसा तूं माझा दातार। भक्तांसी घालिसी कृपेची पांखर।
हा तयाचा निर्धार। अनाथनाथ नाम तुझे॥ १००॥
श्रीचैतन्यकृपा अलोलिक। संतोषोनि वैकुंठनायक।
वर दिधला अलौकिक। जेणें सुख सकळांसी॥ ०१॥

हा ग्रंथ लिहितां गोविंद। या वचनी न धरावा भेद।
हृदयी वसे परमानंद। अनुभवसिद्ध सकळांसी॥ ०२॥
या ग्रंथीचा इतिहास। भावें बोलिला विष्णुदास।
आणिक न लागती सायास। पठणमात्रें कार्यसिद्धी॥ ०३॥
पार्वतीस उपदेशी कैलासनायक। पूर्णानंद प्रेमसुख।
त्याचा पार न जाणती ब्रह्मादिक। मुनि सुरवर विस्मित॥ ०४॥
प्रत्यक्ष प्रगटेल वनमाळी। त्रैलोक्य भजत त्रिकाळी।
ध्याती योगी आणि चंद्रमौळी। शेषाद्रिपर्वती उभा असे॥ ०५॥
देवीदास विनवी श्रोतयां चतुरां। प्रार्थनाशतक पठण करा।
जावया मोक्षाचिया मंदिरा। कांही न लागती सायास॥ ०६॥
एकाग्रचित्तें एकांती। अनुष्टान कीजे मध्यराती।
बैसोनिया स्वस्थ चित्ती। प्रत्यक्ष मूर्ति प्रगटेल॥ ०७॥
तेथें देहभावासी नुरे ठाव। अवघा चतुर्भुज देव।
त्याचे चरणीं ठेवोनि भाव। वरप्रसाद मागावा॥ ०८॥
इति श्रीदेवीदासविरचितं श्रीव्यंकटेशस्तोत्रं संपूर्णम्॥

## 7.10 भीमरूपीस्तोत्र

भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती।
वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना॥ १॥
महाबळी प्राणदाता सकळां उठवी बळे।
सौख्यकारी शोकहर्ता धूर्त वैष्णव गायका॥ २॥
दीननाथा हरीरूपा सुंदरा जगदंतरा।
पातालदेवताहंता भव्यसिंदूरलेपना॥ ३॥
लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा पुरातना।
पुण्यवंता पुण्यशीळा पावना परितोषका[43]॥ ४॥
ध्वजांगे उचली बाहो आवेशे लोटला पुढे।
काळाग्नि काळरुद्राग्नि देखतां कापती भये॥ ५॥
ब्रह्मांडे माइली नेणो आवाळे[44] दंतपंगती।
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा भ्रुकुटी ताठिल्या बळे॥ ६॥
पुच्छ ते मुर्डिले माथा किरीटी कुंडले बरी।
सुवर्ण कटि कांसोटी घंटा किंकिणि नागरा[45]॥ ७॥
ठकारे[46] पर्वता ऐसा नेटका सडपातळू।
चपळांग पाहतां मोठे महाविद्युल्लतेपरी॥ ८॥
कोटिच्या कोटि उड्डाणे झेपावे उत्तरेकडे।
मंदाद्रीसारखा[47] द्रोणू क्रोधे उत्पाटिला बळे॥ ९॥
आणिला मागुती नेला आला गेला मनोगती।
मनासी टाकिले मागे गतीसी तुळणा नसे॥ १०॥
अणूपासोनि ब्रह्मांडाएवढा होत जातसे।
तयासी तुळणा कोठे मेरु-मंदार धाकुटे॥ ११॥

[43] आनंददायका (परितोष म्हणजे आनंद)
[44] जबड्यात
[45] सुंदर
[46] उभा राहतो
[47] मंदरपर्वतासारखा द्रोणागिरी

ब्रह्मांडाभोवते वेढे वज्रपुच्छे करू शके।
तयासी तुळणा कैंची ब्रह्मांडी पाहतां नसे॥ १२॥
आरक्त देखिले डोळा ग्रासिले सूर्यमंडळा।
वाढतां वाढतां वाढे भेदिले शून्यमंडळा[48]॥ १३॥
धनधान्य पशुवृद्धि पुत्र पौत्र समस्तही।
पावती रूप विद्यादि स्तोत्र पाठे करूनिया॥ १४॥
भूतप्रेतसमंधादि रोगव्याधि समस्तही।
नासती तुटती चिंता आनंद भीमदर्शने॥ १५॥
हे धरा पंधराश्लोकी लाभली शोभली बरी।
दृढदेहो निसंदेहो संख्या चंद्रकळा गुणे॥ १६॥
रामदासी अग्रगण्यू कपिकुळासि मंडणू।
रामरूपी अंतरात्मा दर्शने दोष नासती॥ १७॥
इति श्रीरामदासकृतसंकटनिरसन मारुतीस्तोत्रं संपूर्णम्।

## 7.11 आदिशक्तिभवानीस्तोत्र

(महाराष्ट्राचे राष्ट्रगीत)

शक्ति, युक्ति आणि भक्ति ह्या तीन शक्तींचे एकीकरण म्हणजेच मुक्ति. शक्तीनें मिळती राज्ये, युक्तीनें येत्न होतसे। शक्ति युक्ति जये ठायीं, तेथें श्रीमंत धांवती॥ असे समर्थांनी म्हटले आहे. योगेश्वर श्रीकृष्ण आणि धनुर्धर पार्थ, अगर समर्थ आणि शिवराय ह्यांची जोडगोळी असली, तरच अभ्युदय व निःश्रेयसरूप धर्माची संस्थापना होते. नाथ-समर्थांच्या काळी अशी धर्मसंस्थापना झाली व महाराष्ट्राचा महोदय झाला. त्या महोदयपर्वाच्या सुप्रभाती एकनाथमहाराजी महाराष्ट्र सर्वशक्तिसंपन्न व्हावा म्हणून त्याला एक अत्युज्वल राष्ट्रगीत दिले. तिकडे आपण आजपर्यंत दुर्लक्ष केले. हे गीत भाविकांच्या मेळ्यात, देशभक्तांच्या समाजात किंवा वीरांच्या रणांगणावर सर्वांना दिव्यस्फूर्ति देणारे आहे. ही नाथांची वाणी अचेतनालाहि सचेतन करील व दुर्बळास शक्तिसंपन्न करील. दार उघड बया दार उघड अशी आदिशक्तीची येथे ओजस्वी वाणीने प्रार्थना केली आहे. समष्टि-व्यष्टीतल्या ईश्वरी शक्तीला खडबडून जागे करणारी ही प्रार्थना आहे. नाथ म्हणतात कीं ह्या आदिमाता भवानीनेच मत्स्य-कूर्मादि दशावतार घेतले. रामरूपाने प्रगट होऊन हिनेच रावण-कुंभकर्णास मारले. कृष्णरूपाने प्रगट होऊन हिनेच कंस-शिशुपालादिकांचा फडशा केला. बिभीषण, मारुति, अर्जुन इत्यादि वीरभक्तांच्या अंगात हिनेच संचार केला. देहात्मवादी म्हणजे नास्तिक हिरण्यकश्यपूचे पोट हिनेच स्तंभातून प्रगट होऊन फाडले व भक्त प्रल्हादाचे संरक्षण केले. व्यक्तीत किंवा समाजांत दुर्गुण व दुर्व्यसने संचरली, कामक्रोधदंभादिकांचे बंड माजले, म्हणजे संतसज्जन हिचीच उपासना करतात. ही अव्यक्तातून प्रगट होऊन दुष्टदमन व सुष्टसंरक्षण करते. ही परमेश्वराची शक्तीच विश्वाचा उद्धार करते. विठोबा, दत्त, रामकृष्ण ही हिचीच रूपे आहेत. ही मातापुर ऊर्फ माहूर, सप्तशृंगी, तुळजापुर, औंध, कोल्हापूर, प्रतापगड येथे प्रगट

[48] आकाश

झाली असून ही महाराष्ट्राची कुलदेवता आहे. महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वती ही हिचीच रूपे आहेत. हिला आपण हृदयात शोधून प्रसन्न करू व राष्ट्राचे मंगल साधू.

नमो आदिमाया भगवती। अनादिसिद्ध मूळप्रकृती॥
महालक्ष्मी त्रिजगतीं। बया दार उघड, बया दार उघड॥ १॥
हरिहर तुझे ध्यान करिती। चंद्र-सूर्य कानी तळपती।
गगनी ते तारांगणे रुळती। तेवीं भांगी भरिले मोती॥
बया दार उघड, बया दार उघड॥ २॥
नवखंड पृथ्वी तुझी चोळी। सप्त पाताळी पाउले गेली।
एकवीस स्वर्ग मुगुटी झळाळी। बया दार उघड॥ ३॥
अलक्ष्यपुर भवानी। बया दार उघड, बया दार उघड॥
माहुर-लक्ष्मी। बया दार उघड, बया दार उघड॥
कोल्हापुर-लक्ष्मी। बया दार उघड, बया दार उघड॥
तैलंगण-लक्ष्मी। बया दार उघड, बया दार उघड॥
तुळजापुर-लक्ष्मी। बया दार उघड, बया दार उघड॥
पाताळ-लक्ष्मी। बया दार उघड, बया दार उघड॥
कानाड-लक्ष्मी। बया दार उघड, बया दार उघड॥
अष्टभुजा-लक्ष्मी। बया दार उघड, बया दार उघड॥
पंढरपुरनिवासिनी। बया दार उघड, बया दार उघड॥
उदो उदो उदो उदो॥ ४॥
चारी पुरुषार्थ गोंधळी[49]। सनकादिक तेथे संबळी[50]।
तेहतीसकोटी भूतावळी। अठ्ठ्यांयशीं सहस्र ऋषिमंडळी।
दिवट्या पाजळोनी तिष्ठती।
बया दार उघड, बया दार उघड॥ ५॥
वेताळ फेताळ खंकाळ। मारको मेसको मैराळ।
जागाई जोखाई क्षेत्रपाळ। म्हैषासुर दैत्य मातला सबळ।
अबबब पीडा केली अंबे। बया दार उघड (दोनदा)॥ ६॥
मच्छाई! बया दार उघड। कच्छाई! बया दार उघड।
वऱ्हाई! बया दार उघड। नरसाई! बया दार उघड।
वामनाई! बया दार उघड। परसाई! बया दार उघड।
रामाई! बया दार उघड। कृष्णाई! बया दार उघड।
बोढाई! बया दार उघड। कलंकाई! बया दार उघड।
महालक्ष्मी! बया दार उघड।
उदो उदो ऐसा शब्द गाजतो।
कामक्रोध दैत्यांवर कोरडा कडकडा वाजतो।
ज्ञानपीत पाजळतो। बोधपरडी हातीं घेतो।
प्रेमाचा पाऊल पुढे ठेवितो। अहंशंकासुर दैत्य बळी देतो॥
बया दार उघड, बया दार उघड॥ ७॥
हिरण्याक्ष हिरण्यकशिपु कोंबडे पिळी।
बळिसी घालूनि पाताळी।
सहस्रार्जुनासि हातोफळी। हनुमंत दिवटा महाबळी।
अठरापद्म येऊनि रणकल्लोळी। सागर बांधोनिया शिळी।
करी लंकेची होळी। रावण कुंभकर्ण घेसी बळी।
खेळसी शिरांची चेंडूफळी। बया दार उघड (दोनदा)॥ ८॥

[49] गोंधळी लोक
[50] संबळ नांवाचे चर्मवाद्य वाजविणारे

शरण आला तुज बिभीषण। तयासी राज्यीं अक्षयी स्थापून।
प्रल्हाद उपमन्यु ध्रुवासि भातुके देऊन। बुझविसी कौतुकें॥
बया दार उघड, बया दार उघड॥ ९॥
आणिक एक अंबे नवलपरी।
तुझी यात्रा द्वापारयुगामाझारी।
परोपरी निंब नारळ घेऊनि करी। हळदी कुंकुमें अर्पिती॥
बया दार उघड, बया दार उघड॥ १०॥
वाहन तुझे सिंह केसरी। मोकळे केश त्रिशूळ शंख करी।
शिशुपाळ वक्रदंत दोन्ही बकरी। आहुती घेसी जगदंबे॥
बया दार उघड, बया दार उघड॥ ११॥
तेथून पुढे दसरा आला। अठरा दिवस घट मांडिला।
कौरवपांडवसैन्यमेळ मिळाला।
तेथे शोभसी विराजमान हो दुर्गे।
बया दार उघड, बया दार उघड॥ १२॥
जयजयाजी मूळपीठेंद्रभवानी। पांडवकुळींची कुळस्वामिनी।
अर्जुनरथी स्वार होउनी। वाग्दोर हातीं धरूनि।
रथ फिरविसी कौतुके॥ बया दार उघड॥ १३॥
द्रौपदी बहिणीचेनि कवारेंसी। होम करुनि कुरुक्षेत्रासी।
तुझे साहित्य पूर्णाहुतीसी। तें तुजप्रती अर्पिले हो जगदंबे॥
बया दार उघड, बया दार उघड॥ १४॥
रणवाद्य भम्भम् दण्दण् कड्कड् वाजती।
तोचि गोंधळ अंबे तुजप्रती।
रणस्वाद घट स्थापिला मध्यवर्ती।
प्रथम धूप घटाप्रती। भीमसुत बभ्रु अर्पिला॥
बया दार उघड, बया दार उघड॥ १५॥
ऐसा रण-उत्सव मांडिला। उदो उदो ऐसा शब्द झाला।
तेव्हां अर्जुन भक्त झडपिला। संशयभूतें ते काळी॥
महाशक्ति कृष्णाबाई॥ बया दार उघड॥ १६॥
तें संशयभूत असे कठिण। हरिहरब्रह्मयांसी नाटोपे जाण।
चारी वेद सहा शास्त्रें अठरा पुराण।
अठ्ठ्यांशी सहस्र ऋषि शिणले दारुण।
मग त्वां बोधखंडा[51] हाती घेऊन।
शिर छेदिले भूतांचे॥ बया दार उघड॥ १७॥
बया त्वां रणकुंड जबडा पसरिला।
आहुती घेसी दोनी[52] दळा।
रथ घोडे कुंजर तुला। नारळें बया अर्पिली॥
बया दार उघड, बया दार उघड॥ १८॥
भीष्म द्रोण कहुळे। तीळ तांदूळ पायदळें।
आणीकही वीर भले भले। निंबें कापुनी टाकिली॥
बया दार उघड, बया दार उघड॥ १९॥
रक्त वाहे भडभडां। तेंचि तेल घृत जळे धडधडां।
कौरवपतंग पडती दाढां। दुर्योधन हा लक्ष्मी तुझा रेडा॥
शेवटी आहुती घेसी तयाची। बया दार उघड॥ २०॥

[51] बोधरूपी दुधारी तलवार
[52] (कौरवपांडवांच्या) दोन्ही सैन्यांची

शिलंगण[53] खेळसी नानापरी। कौरवकुळाची करुनी बोहरी।
द्वारका लपवोनि समुद्री। यादवकुळ पाठविसी माहेरी॥
निजधामाकारणे। बया दार उघड॥ २१॥
पुढे जंबुद्वीपाभीतरी[54]। अंबे तुझी न वर्णवे थोरी।
खेळ खेळसी वैष्णवांमाझारी। पुंडलीक दिवटा महाभारी।
ओवाळिसी महामाया[55]। बया दार उघड॥ २२॥
जगदंबा प्रसन्न झाली। भक्तिकवाडे उघडिली।
शंखचक्रांकित शोभली। रूप सुंदर सावळी।
कोटिचंद्रसूर्यप्रभा वेल्हाळी। एका जनार्दनी माउली।
करी कृपेची सांउली। भक्तजयाकारणे संपूर्ण जाली।
बया दार उघड, बया दार उघड॥ २३॥

## 7.12 श्रीशारदास्तोत्र

(चाल - भला जन्म हा तुला लाभला)

पाव शारदे! मला दयाळे! स्थिर राहें अंतरी।
स्वरूपीं[56] ठाव मला दे तरी॥ धृ॥
त्वत्पदपंकजभृंग जाहलो, गुंजारव करित मी।
भ्रमलो श्रमलो मायातमी॥
सेवेसी सप्रेम लाविली, तन धन वाचा मती।
तुजविण नेणे अन्या गती॥
संतमुखे गुणकीर्ति ऐकुनी, दर्शनास घाबरा।
झालो न दिसे मुळिचा झरा॥
दर्शन नाही प्रसादचिन्ह, स्पष्ट दिसेना कुठे।
तरी मग सेवकजनमन तुटे॥
नानामत पाखंड बंड, ऊदंड माजले जनी।
पडेना ज्ञानांजन लोचनी॥
त्रिखंड धुंडित मने हिंडलो, बहु ब्रह्मांडो दरी।
स्वरूपी[57] ठाव मला दे तरी॥ १॥
सत्संगे मज माये! पडली, तुझी ओळख नवी।
क्षणक्षण चित्ती तुज आठवी॥
चार सहा आठराहि लागती, माये! तुझिया पदा।
भोगिती अखंड सुखसंपदा॥
संत कवीश्वर शास्त्रकारहि, प्रेमे वाखाणिती।
गाती उल्हासे गुणतती[58]॥
सर्वज्ञ श्रुति-शास्त्र-पुराणे, काव्य नाटके कथा।
गर्जती वाग्ब्रह्मेति प्रथा॥
रूप तुझे हरिहरा न वदवे, बाळक मी तो किती।
शब्दी वर्णू कैशा रिती? ॥

स्फूर्तिरूप तूं स्फुरसि भगवति! प्रेमें मम अंतरीं।
स्वरूपीं ठाव मला दे तरी॥ २॥
निर्गुण निश्चळ परब्रह्म त्या, बहु व्हावे म्यां अशी।
स्फुरली मति त्या नेणो कशी! ॥
ब्रह्मी आदिस्फूर्ति जाहली, तेंचि तुज निश्चिती।
चंचळे! रूप विमळ तें अती॥
जाणिव वायुस्वरूप ऐसी, सूक्ष्मस्फूर्ती नवी।
पुरुष-प्रकृति वदती सत्कवी॥
गणाधीश-शारदादि नांवें, दिधली तुजला भली।
नांदसी एकचि तूं एकली॥
शिवशक्तिहि तूं, मूळपुरुष तूं, एकत्व न मोडतां।
दाविसी दोन्ही रूपें स्वतः॥
तुजपासुन ही सृष्टि चराचर, झाली जगदीश्वरी।
स्वरूपीं ठाव मला दे तरी॥ ३॥
जगदीश्वर जगदात्मा ईश्वर, जगज्ज्योति तूं भली।
प्रवाहरूपें सृष्टि चालली॥
गुणक्षोभिणी गुणमाया तूं, होसी त्रिगुणात्मिका
प्रसविसी हरि-हर-ब्रह्मादिकां॥
भूतभौतिक सृष्टी सारी, उभविसि लीलालसे।
अन्वयें रूप तुझे तें दिसे॥
पिंडी जीव ब्रह्मांडी शिव, दोनी बाळे तुला।
सारखी सकललोकहेतुला॥
त्रिगुण पंचभूतांचा कर्दम, त्यांमध्यें राहुनी।
असशी अलिप्त सर्वांहुनी॥
देहेंद्रियमनबुद्धिप्राणाहंकृतिपर ईश्वरी।
स्वरूपी ठाव मला दे तरी॥ ४॥
सधन सच्चिदानंद परात्मा, भवसागरपारदा।
प्रज्ञानब्रह्म शारदा॥
यापरि आळवित श्रुति उठली ठेली, मी तो किती? ।
करितो विनम्र शरणागती॥
ज्ञानकला सर्वान्तर्यामी, जाणुनी भजती तुला।
ज्ञानी भक्त सत्यसेतुला॥
आकाशी तो शब्द स्फुरला, प्रसिद्ध ॐकार हा।
तेथुनी शब्दसृष्टि ही महा॥
परादि वाचा प्रेरसि तेणें लोकव्यापर हा।
चालतो अखंड कसा पहा॥
परादिवाचापर निःशब्दीं, राहसि सर्वेश्वरी।
स्वरूपी ठाव मला दे तरी॥ ५॥
वाचातीत स्वये राहुनी, वाङ्मय करिसी उभे।
नर हे तरती तेणें शुभे! ॥
परब्रह्मपद पाववि तीतें, विद्या म्हणती परा।
भवार्णविं जी कां तारत नरा॥
क्षराक्षरांसी अतीत निर्गुणपद देत्ये ती परा।
ग्रंथ तो उगमीं घाली नरा॥
आत्मज्ञानपरा सद्विद्या निर्विकल्पसुखकारी।
पाववि मोक्षातें लवकरी॥

[53] दुसऱ्याचे सीमोल्लंघन
[54] भरतखंडात
[55] महामाये
[56] तुझ्या निजरूपात (आत्मरूपात)
[57] तुझ्या निजरूपात (आत्मरूपात)
[58] गुणसमुदाय

दृश्यप्रपंच सत्यार्थाने दावित जी का दुजी।
अपरा विद्या ती तो खुजी॥
परापर विद्यांची मूलस्फूर्ती जगदीश्वरी।
स्वरूपी ठाव मला दे तरी॥ ६॥
अपरा केवळ लौकिक विद्या, परा अलौकिक खरी।
वितरी अमृतसौख्य साजिरी॥
अपरेमाजी सात्त्विक, राजस, तामस दिसती परी
पूर्वापूर श्रेयस्करी॥
परतत्वस्पर्शाने सात्त्विक, नेत्ये उगमाकडे।
विलंबे मोक्षनिधी सांपडे॥
राजस अपरा केवळ लोकव्यवहारी वावरे।
प्रपंचहि सारा दृष्टीं भरे॥
शोक मोह तो न उडे तेणें जन्म-मृत्यु ना टळे।
तामसे अधोगतीला मिळे॥
गढूळ खाली, मध्यम वरती स्वच्छ मूळ निर्झरी।
स्वरूपी ठाव मला दे तरी॥ ७॥
ऋग्वेदादि श्रुति-स्मृतिहि त्या उपनिषिदांसह भल्या।
भाग्यें भव्य जनां लाभल्या॥
षट्शास्त्रें तशिं दर्शनेंहि ती, सूक्ष्मदर्शि सज्जन।
करिती त्यांचे मतिरंजन॥
श्रीरामायणभागवतादि ग्रंथ उपासनपरा।
गमती श्रुतिसम भाविक नरां॥
कथा-पुराणें, काव्य-नाटकें, भारत-इतिहासही।
यांही मोहिलि अखिला मही॥
कालिदास-भवभूत्यादिक कवि बाण जगन्नाथ ते।
रसिकां बोधामृत तर्पिते॥
वाङ्मय सारे जगदाधारे। स्फुरतें तव अंतरी।
स्वरूपी ठाव मला दे तरी॥ ८॥
श्रीज्ञानेश्वर, नाथ, तुकोबा, समर्थ मुक्तेश्वर।
मयूर वामन आणि श्रीधर॥
कबीर तुलसी सूरदास हे, भूखन नरसी मिरा।
घालती कळिकाळाला चिरा॥
नाना भाषा ग्रंथहि नाना शास्त्रे नानापरी।
स्रवते सतत शब्द वैखरी॥
ओंकाराच्या भुवनी चक्की मनपवनाची फिरे।
तेणें स्वरूपभानहि नुरे॥
शब्दसृष्टिची टांकसाळ ही झडते रात्रंदिनी।
नाणी अमित पडति त्यांतुनी॥
शब्दब्रह्मीं खेळुनि राहसि, निःशब्दाच्या घरी।
स्वरूपी ठाव मला दे तरी॥ ९॥
प्रपंच-परमार्थी या जे जे विचार स्फुरती अये।
निर्मळ सर्व तुझ्या आश्रये॥
प्राणिमात्र वश होय शारदे। आम्हां तुझ्या बळे।
मनासी मन हे सहजी मिळे॥
भेदपिशाच्चे पळती टळती विघ्ने तम वोसरे।
ज्योतिष्मति तूं अससी खरे॥
प्रसाद होतां उचंबळे हे हृदय प्रेमामृते।
लोचनी न धरत तें लोटते॥
प्रेमे प्रतिभाझरा पाझरे, स्वात्मसुखी मन निवे।
निरंतर कृपा असू दे शिवे। ॥
प्रेमप्रसाद भिक्षा घाली माता विश्वंभरी॥
स्वरूपी ठाव मला दे तरी॥ १०॥
संत-सद्गुरुप्रसाद होतां, रूप तुझे आकळे।
शारदे। शोक मोह तै गळे॥
विश्वप्रपंच आटे, दाटे ब्रह्म सदन केवळ।
संपले जड चंचळ निश्चळ॥
रूपीं तुझिया अरूपरूपे। थारा मिळतां क्षणी।
झाली जीवत्वा आटणी॥
परब्रह्मभांडार खुले हे झाले परमामृतीं।
सुखाची लूट लागली हाती।
देहस्मृति ही असो नसो, तूं राहें मत्संगती।
आहे अनन्य शरणागती॥
माय शारदे। पाय लक्ष्मणें दृढ धरिले अंतरी॥
स्वरूपी ठाव मला दे तरी॥ ११।

... लक्ष्मण रामचंद्र पांगारकर।

## 8 आरतीसंग्रह

मराठी भाषेतील आरत्या हे भक्तिरसप्रधान काव्यमंदिरातील एक स्वतंत्र असे देवघर आहे. ह्या देवघरात परमेश्वराचे सुरम्य सगुण स्वरूप आणि भक्त ह्याशिवाय इतर कांही दिसावयाचे नाही. देव आणि भक्त ह्यांच्यामधील पूज्य-पूजक संबंधाचे साक्षात् दर्शन घडविणारे आरसे म्हणजेच ह्या आरत्या होत. ह्या आरत्यातील कोणतीहि एक ओळ वाचली तरी ह्याची प्रचीति आल्यावांचून राहाणार नाही. टाळ-मृदुंगांच्या गंभीर आणि स्फूर्तिदायक साथीवर ज्या वेळी उपास्यमूर्तिसमोर ह्या आरत्यांचे गायन भक्तजन प्रेमभराने करू लागतात, तेव्हां सगुण भक्तीच्या साक्षात्काराने ज्यांची शरीरें पुलकित झाली नाहीत असे मनुष्य विरळा। मराठी भाषेतील ह्या आरत्या केवळ मराठी भाषा बोलणाऱ्यांचीच हृदये भक्तिवश करतात असे नाही. तर इतर अनेक मातृभाषा असलेल्या लोकांची हृदयेही ह्या मराठी भाषेतील आरत्यांच्या गायनाने भक्तिवश होत असलेली आढळून येतात. ह्यांतील गणपतीच्या आरत्यांतील सहजोक्तीची वर्णने, विष्णूच्या आरत्यांतील साहित्यप्रचुर वर्णने, मारुतीच्या आरतीतील भयजनक वर्णने, अशा अनेक प्रकारच्या वर्णनचमत्कृतींची माला एकाच भक्तिसूत्रामध्ये गुंफून ती ईश्वरार्पण केलेली आहे.

## 8.1 आरती गणपतीची

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची॥
सर्वाङ्गी सुन्दर उटि शेन्दूराची।
कण्ठी झळके माळ मुक्ताफळांची॥ १॥

जयदेव जयदेव जय मङ्गलमूर्ती।
दर्शनमात्रे मनःकामना पुरती॥ धृ॥

रत्नखचित फरा[59]तुज गौरीकुमरा।
चन्दनाची ओटी कुङ्कुमकेशरा॥
हिरेजडित मुगुट शोभतो बरा।
रुणझुणती नूपूरे चरणी घागरिया॥ २॥

जयदेव जयदेव जय मङ्गलमूर्ती।
दर्शनमात्रे मनःकामना पुरती॥

लम्बोदर पीताम्बर फणिवरबन्धना[60]।
सरळ सोण्ड वक्रतुण्ड त्रिनयना॥
दास रामाचा वाट पाहे सदना।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवन्दना॥ ३॥

जयदेव जयदेव जय मङ्गलमूर्ती।
दर्शनमात्रे मनःकामना पुरती॥

## 8.2 आरती शंकराची

लवथवती विक्राळा ब्रह्माण्डी माळा।
वीषे कण्ठ काळा त्रिनेत्री ज्वाळा॥
लावण्य सुन्दर मस्तकी बाळा।
तेथुनिया जळ वाहे निर्मळ झुळझुळा॥ १॥

जयदेव जयदेव जय श्रीशङ्करा।
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा॥ धृ॥

कर्पुर्गौरा भोळा नयनी विशाळा।
अर्धाङ्गी पार्वती सुमनांच्या माळा॥
विभुतीचे उधळण[61] शितिकण्ठ नीळा।
ऐसा शङ्कर शोभे उमावेल्हाळा॥ २॥

[59] पिंपळवण अथवा मुलांच्या कपाळवर लटकविण्याचे रत्नखचित पदक
[60] ज्याच्या कमरेला सर्प कंबरपट्ट्यासारखा बांधला आहे तो
[61] भस्मचर्चन

जयदेव जयदेव जय श्रीशङ्करा।
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा॥

देवी दैत्यी सागरमन्थन पै केले।
त्यामाजी अवचित हळहळ जे उठले॥
ते त्वां असुरपणे प्राशन केले।
नीलकण्ठ नाम प्रसिद्ध झाले॥ ३॥

जयदेव जयदेव जय श्रीशङ्करा।
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा॥

व्याघ्राम्बर फणिवरधर सुन्दर मदनारी।
पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी॥
शतकोटीचे बीज[62] वाचे उच्चारी।
रघुकुळटिळक रामदासा अन्तरी॥ ४॥

जयदेव जयदेव जय श्रीशङ्करा।
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा॥

## 8.3 आरती विष्णूची १

ओवाळूं आरती मदनगोपाळा।
श्यामसुन्दर गळां वैजयन्तीमाळा॥ धृ॥

चरणकमळ ज्याचे अतिसुकुमार।
ध्वजवज्राङ्कुश ब्रीदाचा तोडर॥ १॥

नाभिकमळ ज्याचे ब्रह्मयाचे स्थान।
हृदयी पदक शोभे श्रीवत्सलाञ्छन॥ २॥

मुखकमळ पाहतां सुखाचिया कोटी।
वेधियेले मानस हारपली दृष्टी॥ ३॥

जडित मुकुट ज्याचा दैदिप्यमान।
तेणें तेजें कोन्दलें अवघे त्रिभुवन॥ ४॥

एका जनार्दनीं देखियलें रूप।
रूप पाहतां जाहले अवघे तद्रूप॥ ५॥

[62] शतकोटी रामायणाचे सारसर्वस्व असलेले रामनाम

## 8.4 आरती विष्णूची २

सन्तसनकादिक भक्त मिळाले अनेक।
स्वानन्दे गर्जती पाहूं आले कौतुक॥ १॥

नवल होताहे आरती देवाधिदेवा।
स्वर्गींहुनी सुरवर पाहूं येती केशवा॥ धृ॥

नर-नारी तटस्थ टक पडिले नयना।
ओवाळीतां श्रीमुख धणी न पुरे मना॥ २॥

एका जनार्दनी मङ्गल आरत्या गाती।
मङ्गल कौतुकें गाती। मिळाले वैष्णव जयजयकारें गर्जती॥ ३॥

## 8.5 आरती भुवनसुंदराची

आरती भुवनसुन्दराची। इन्दिरावरा मुकुन्दाची॥ धृ॥

पद्मसम पादयुग्मरंगा। ओवाळणी होति भृंगा॥
नखमणि स्रवताहे गंगा। जे कां त्रिविधतापभंगा॥
(चाल) वर्तुल गुल्फ[63] भ्राजमाने॥
किंकिणि[64]-क्वणित, नाद घणघणित, वांकिवर झुणित
नूपुरें झनन मंजिराची॥ झननन ध्वनी मंजिराची॥ १॥

पीतपट[65] हाटकतप्तवर्णी[66]। कांची[67] नितंब[68]सुस्थानी॥
नाभिची अगाध हो करणी। विश्वजनकाची जे जननी॥
(चाल) त्रिवलीललित उदरशोभा॥
कंबुगळा[69] माळ विलंबित,
झळाळ कौस्तुभ, सरळ बाहु श्रीवत्स
तरमणि मरळ कंकणाची॥ प्रीति बहु जडित कंकणाची॥ २॥

इंदुसम आस्य कुंदरदना। अधरारुणार्कबिंबवदना॥
पाहतां भ्रांति पडे मदना। सजलमेघाब्धि दैत्यदमना॥
(चाल) झळकत मकरकुंडलाभा॥
कुटिल कुंतली, मयुरपत्रावली,
यानी वेष्ठिले, तिलक भालि केशरी
झळाळित कृष्णकस्तुरीची। अक्षता कालि कस्तुरीची॥ ३॥

कल्पद्रुमातळी मूर्ती। सौदामिनी[70] कोटी दीप्ती॥
गोपी-गोपवलय भंवती। त्रिविष्टप[71] पुष्पवृष्टि करिती॥
(चाल) मंजुळ मधुर मुरलिनादे।
चकित गंधर्व, चकित अप्सरा,
सुरगिरिवरा धरा कर्पुर-रतीने
प्रेमयुक्त साची॥ आरती ओवाळित साची॥ ४॥

वृंदावनीचे विहरणी। सखे गे कृष्ण माय-बहिणी॥
श्रमलो भवाब्धिचे फिरणी। अतां मज ठाव देइ चरणी॥
(चाल) अहा हे पूर्णपुण्यश्लोका॥
नमितो चरण, शरण मी,
करुणा येउ दे, विषाणपाणी[72] कृष्ण नेणते बाळ आपले,
राखि लाज याची॥ दयानिधे राखि लाज याची॥ ५॥

## 8.6 आरती व्यंकटेशाची

शेषाचल[73] अवतार[74] तारक तूं देवा।
सुरवरमुनिजन भावे करिती तव सेवा॥
कमळारमणा अससी अगणित गुणठेवा।
कमळाक्षा मज रक्षुनि सत्वर वर द्यावा॥ १॥

जयदेव जयदेव जय व्यंकटेशा।
केवळ करुणासिंधो पुरवीसी आशा॥ धृ॥

हें निजवैकुंठ म्हणुनी ध्यातो मी तूंतें।
दाखविसी गुण कैसे सकळिक लोकांतें॥
देखुन स्वरूप तूझें सुख अद्भुत होतें।
ध्यातां तुजला श्रीपति दृढ मानस होतें॥ २॥

## 8.7 आरती सुर्याची

जय जय जगतमहरणा दिनकर सुखकिरणा।
उदयाचल जगभासक दिनमणि शुभस्मरणा॥
पद्मासन सुखमूर्ती सुहास्यवरवदना।
पद्मकरा वरदप्रभ भास्वत सुखसदना॥ १॥
जय देव जय देव जय भास्कर सूर्या।
विधिहरिशंकररूपा जय सुरवरवर्या॥ धृ॥

कनकाकृतिरथ एकचक्रांकित तरणी।
सप्तननाश्व-भूषित[75] रथि त्या बैसोनी॥

63 पायांचे घोटे
64 पैंजणांची
65 पीतांबर
66 तप्तसुवर्णासारख्या रंगाचे
67 कमरपट्टा
68 कंबर
69 शंखासारख्या गळ्यात

70 वीज
71 देव
72 हातांमध्ये वाजवण्याचे शिंग धरलेला
73 शेषाद्रिपर्वत (वेंकटगिरी)
74 श्रीविष्णूंचा अवतार
75 सात तोंडाच्या उच्चैःश्रवा ह्या घोड्याने सुशोभित

योजन सहस्र द्वे द्वे शतयोजन दोनी।
निमिषार्धे जग क्रमिसी अद्भुत तव करणी॥ २॥

जगदुद्भवस्थिति प्रलयकरणाद्यरूपा।
ब्रह्म परात्पर पूर्ण तूं अद्वय तद्रूपा॥
तत्त्वंपदव्यतिरिक्ता अखंडसुखरूपा।
अनन्य पद मौनी वंदित चिद्रूपा॥ ३॥

## 8.8 आरती दुर्गादेवीची

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी।
अनाथ नाथे अम्बे करुणा विस्तारी॥
वारी वारी जन्म मरणांते वारी।
हारी पडलो आतां सण्कट नीवारी॥ १॥

जयदेवी जयदेवी जय महिषासुरमथनी।
सुरवर ईश्वरवरदे तारक संजिवनी॥ धृ॥

त्रिभुवनभुवनी पाहतां तुज ऐशी नाही।
चारी[76] श्रमले परंतु न बोलवे कांही॥
साही[77] विवाद करतां पडले प्रवाही।
ते तूं भक्तालागी पावसि लवलाही[78]॥ २॥

जयदेवी जयदेवी जय महिषासुरमथनी।
सुरवर ईश्वरवरदे तारक संजिवनी॥

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासां।
क्लेशांपासुनि सोडवि तोडी भवपाशां॥
अम्बे तुजवांचून कोण पुरविल आशा।
नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा॥ ३॥

## 8.9 आरती श्रीरामाची

उत्कट साधुनि शिळा[79] सेतू बांधोनी।
लिंगदेहलंकाबुर विध्वंसूनी॥
कामक्रोधादिक राक्षस मर्दूनी।
देह-अहंभाव रावण निवटोनी॥ १॥

जयदेव जयदेव निजबोधा रामा।
परमार्थे आरती, सद्भावे आरती परिपूर्ण कामा॥ धृ॥

[76] चार वेद
[77] सहा शास्त्रे
[78] तात्काळ
[79] मोठे पत्थर गोळा करून

प्रथम सीताशुद्धी हनुमंत गेला।
लंका दहन करुनी अखया[80] मारिला॥
मारीला जंबूमाळी[81] भुवनि त्राहाटिला[82]।
आनंदाची गूढी घेउनिया आला॥ २॥

निजबळें निजशक्ती सोडविली सीता।
म्हणुनी येणे झाले अयोध्ये रघुनाथा।
आनंदे वोसंडे वैराग्य भरता।
आरती घेउनि आली कौसल्या माता॥ ३॥

अनुहतध्वनि गर्जती अपार।
अठरा पद्मे वानर करिती भुभुःकार।
अयोध्येसी आले दशरथकुमर।
नगरी होत आहे आनंद थोर॥ ४॥

सहजसिंहासनी राजा रघुवीर।
सोहंभावे तया पूजा उपचार।
सहजांची आरती वाद्यांचा गजर।
माधवदासस्वामी आठव ना विसर॥ ५॥

## 8.10 आरती श्रीआत्मारामाची

नानादेहीं देव एक विराजे।
नाना नाटकलीला सुंदररूप साजे॥
नाना तीर्थी क्षेत्रीं अभिनव गति माजे।
अगाध महिमा पिंड-ब्रह्मांडी गाजे॥ १॥

जयदेव जयदेव जय आत्मारामा।
निगमागम शोधिता न कळे गुणसीमा॥ धृ॥

बहुरूपी बहुगुणी बहुतां काळाचा।
हरिहर-ब्रह्मादिक देव सकळांचा।
युगांनुयुगीं आत्माराम आमुचा।
दास म्हणे महिमा न बोलवे वाचा॥ २॥

## 8.11 आरती मारुतीची

सत्राणें[83] उड्डाणें हुंकार वदनी।
करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनी॥
कडाडिले ब्रह्मांड धोका त्रिभुवनी।
सुरवर नर निशाचर त्यां झाल्या पळणी॥

[80] रावणाच मुलगा
[81] रावणमंत्री प्रहस्त ह्याचा पुत्र
[82] पिटून काढला
[83] जोराने निष्प्रतिबंध अकुंठ

जयदेव जयदेव जय श्रीहनुमंता।
तुमचेनि प्रसादे न भियें कृतांता॥ धृ॥

दुमदुमिले पाताळ उठिला पडशब्द[84]।
धगधगिला धरणीधर मानिला खेद॥
कडाडिले पर्वत उडुगण उच्छेद।
रामीरामदासा शक्तीचा शोध॥ २॥

## 8.12 आरती श्रीनृसिंहाची

कडकडला स्तम्भ गडगडले गगन।
अवनी होते आहे कम्पायमान॥
तडतडती नक्षत्रे तुटताती जाण।
ऊग्ररूपे प्रगटे तो सिंहवदन॥ १॥

जयदेव जयदेव जय नरहरि राया।
आरती ओवाळू महाराजवर्या॥ धृ॥

एकवीस स्वर्ग माया डळमळली कैसी।
ब्रह्मयाच्या वाटे अभिनव चित्तासी॥
चन्द्रसूर्य दोन्ही लोपति प्रकाशी।
कैलासी शिवशङ्कर दचके मानसी॥ २॥

थरथरती त्या जटा जिव्हा लळलळीत।
तीक्ष्ण मुखाने तो दैत्य विदारीत॥
अर्धाङ्गी कमलजा शिरि छाया धरित।
माधवदासा स्वामी नरहरि शोभत॥ ३॥

## 8.13 आरती श्रीसत्यनारायणाची

मस्तकाची सीमा अन्तरिक्षासी
चरणांची युगुले पृथ्वीपाठीसी।
शय्येसाठी शेष नाभी आकाशी
ऐसा तुमचा महिमा नारद मुखासी॥ १॥

जय देव जय देव जय नारायणा
सत्यस्वरूप दावा तव भक्तगणा॥ धृ॥

ब्राह्मणमुख झळके चेहरा ज्ञानाचा
वैश्यांचा विसावा विशाल छातीचा
कोट्यावधि क्षत्रिय जणु आकार बाहूंचा
श्रमिकांचे चरण तुझे मेळा शूद्रांचा॥ २॥ जयदेव जयदेव...

निर्मल मन जैसे शीतल चांदणे
सूर्याचे तेज दावी नयन कोंदणे
अग्निदेव मुखी इन्द्र हासणे
चैतन्य श्वासातुन नित्य वाहणे॥ ३॥ जयदेव जयदेव...

मन मागे राही वेग उमगेना
दगडाहुन स्थिरता तरी का न भेटेना
पिनाकपाणि शोधे तुज राना वना
जवळ सखा तूं रे अन्तरि असताना॥ ४॥ जयदेव जयदेव...

## 8.14 आरती श्रीविठ्ठलाची १

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा।
वामाङ्गी रखुमाई दिसे दिव्य शोभा॥
पुण्डलिकाचे भेटी परब्रह्म आले गा।
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १॥

जयदेव जयदेव जय पाण्डुरंगा।
रखुमाईवल्लभा राहीच्या वल्लभा पावे जिवलगा॥
जयदेव जयदेव ॥ धृ॥

तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटी।
कांसे पीताम्बर कस्तुरि लल्लाटी॥
देव सुरवर नित्य येती भेटी।
गरुड हनुमन्त पुढे उभे राहती॥ २॥ जयदेव जयदेव...

धन्य वेणुनाद अनुक्षेत्र पाळा।
सुवर्णाची कमळे वनमाळा गळां॥
राही रखुमाबाई राणीया सकळा।
ओवाळिती राजा विठोबा सांवळा॥ ३॥ जयदेव जयदेव...

ओवाळू आरत्या कुर्वण्ड्या येती।
चन्द्रभागेमाजी सोडुनिया देती॥
दिंड्या पताका वैष्णव नाचती॥
पंढरीचा महिमा वर्णावा किती॥ ४॥ जयदेव जयदेव...

आषाढी कार्तिकी भक्तजन येती।
चन्द्रभागेमाजी स्नान जे करिती॥
दर्शनहेळामात्रे तया होय मुक्ती।
केशवासी नामदेव भावे ओवाळिती॥ ५॥ जयदेव जयदेव...

[84] प्रतिध्वनि

## 8.15 आरती श्रीविठ्ठलाची २

आरती अनंतभुजा। विठो पंढरीराजा॥
न चलती उपचार। मनें सारिली पूजा॥ धृ॥

परेस पार नाहीं। न पडे निगमा ठायीं॥
भुलला भक्तिभावें। लाहो घेतला देहीं॥ १॥ आरती...

अनिर्वाच्य शुद्ध बुद्ध। उभा राहिला नीट॥
रामाजनार्दनीं। पायी जोडिली वीट॥ २॥ आरती...

## 8.16 आरती श्रीकृष्णाची १

[85]

सहस्रदीप दीप, कैसी प्रकाशली प्रभा।
उजळल्या दशदिशा, गगना आलीसे शोभा॥ १॥

कांकड आरति माझ्या कृष्ण सभागिया।
चराचर मोहरले, तुझी मूर्ति पहाया॥ धृ॥

कोंदलेसे तेज, प्रभा झालीसे एक।
नित्य नवा आनंद, ओवाळितां श्रीमुख॥ २॥

आरति करितां तेज, प्रकाशले नयनीं।
तेणें तेजें मीनला एका एकिं जनार्दनीं॥ ३॥

## 8.17 आरती श्रीकृष्णाची २

ऐकोनि कृष्णकीर्ती, मन तेथे वेधले।
सगुण रूप माये, माझ्या जीवीं बैसले।
तें मज आवडते, अनुमान न बोले।
पहावया रूप याचे, उतावीळ हो झाले॥ १॥

यालागीं आरती हो, कृष्णा पाहि वो सखी।
आणिक नावडे हो, दुजे तिही हो लोकीं॥ धृ॥

पाऊल कृष्णाजीचे, माझ्या जीवीं बैसले।
सनकादिक पहा, महा आसक्त झाले।
मुक्त जो शुकमुनी, तेणें मनीं धरिले।
तें मी केंवीं सोडूं, मज बहु रुचले॥ २॥

निर्गुण गोष्टि माये, मज नावडे साचे।
सगुण बोल कांही, केव्हा आठवी वाचे।
पायां लागेन तूझ्या, हेंचि आर्त मनीचे।
तेणें घडेल दास्य, रमावल्लभाचे॥ ३॥

## 8.18 आरती श्रीकृष्णाची ३

अवतार गोकुळीं हो, जन तारावयासी।
लावण्य रूपडे हें, तेजःपुंजाळराशी।
उगवतां कोटिबिंबे, रवि लोपले शशी।
उत्साह सुरवरां, महाथोर मानसीं॥ १॥

जयदेवा कृष्णनाथा, जय रखुमाईकांता।
आरती ओवाळीन, तुम्हां देवकीसुता॥ धृ॥

कौतुक पहावया, माव ब्रह्मयाने केली।
वत्सें हीं चोरुनिया, सत्यलोकासि नेली।
गोपाळ गायी-वत्सें, दोंही ठायीं रक्षिली।
सुखाचा प्रेमसिंधू, अनाथांची माउली॥ २॥ जयदेवा...

राखतां गोधनें हो, इंद्र कोपला भारी।
मेघ जो कडाडीला, शिळा वर्षितां धारीं।
राखिले गोकुळ हे, नखीं धरिला गिरी।
निर्भय लोकपाळ, अवतरले हरी॥ ३॥ जयदेवा...

वसुदेव-देवकीची, फोडिली बंदीशाळ।
होउनी विश्वजनिता, तयां पोटींचा बाळ।
दैत्य हे त्रासियेले, समूळ कंसासी काळ।
राजया उग्रसेना, केला मथुरापाळ॥ ४॥ जयदेवा...

तारिले भक्तजनां, दैत्य निर्दाळूनी।
पांडवां साह्यकारी, अडलिया निर्वाणी।
गुण मी काय वर्णूं, मति केवढी वाणी।
विनवितो दास, तुका ठाव मागे चरणी॥ ५॥ जयदेवा...

## 8.19 आरती कुंजबिहारीची ४

आरती कुंजबिहारीकी। गिरिधर कृष्ण मुरारीकी॥ धृ॥

गलेमे बैजयंति माला। बजावे मुरलि मुरलिवाला॥

श्रवणमे कुण्डल जगपाला। नन्दके नन्दही नन्दलाला॥

[85] ह्या आरतीत साधकांचा व सिद्धांचा अनुभव वर्णिलेला आहे.

## 8.20 आरती सद्गुरूंची १

सुखसरिता दुःखरहिता निर्मळ एकांता।
कलिमलदहना गहना स्वामी समर्था॥
न कळे ब्रह्मादिकां अंत अनंता।
तो तूं आम्हां सुलभ जय कृपावंता॥ १॥

जय देव जय देव जय करुणाकरा।
आरती ओवाळूं सद्गुरु माहेरा ॥ धृ॥

मायेविण माहेर विश्रांती ठाव।
शब्दीं अर्थलाभ बोलणीं वाव॥
सद्गुरुप्रसादे सुलभ उपाव।
रामीरामदासा फळला सद्भाव॥ २॥ जय देव जय देव...

## 8.21 आरती सद्गुरूंची २

फळले भाग्य माझे, धन्य झालो संसारी।
सद्गुरु भेटला हो, तेणें धरियेले करीं॥
पश्चिमेसी चालविले, आत्मस्थिति निर्धारी।
त्रिकूटावरि नांदे, देखियेली पंढरी॥ १॥

तें सुख काय सांगो, वाचे बोलतां नये।
आरतीचे गुणें, गेले मीपण माये॥ धृ॥

राउळामाजी जातां, राहे देहअवस्था।
मन हें उन्मन झाले, नसे बद्धतेची वार्ता॥
हेतु हा मावळला, शब्दा आली निःशब्दता।
तटस्थ होउनि ठेलो, निजरूप पाहतां॥ २॥ तें सुख...

त्रिगुण गुण बाई, पूर्ण जळाल्या वाती।
नवलाव अविनाश, न समाये स्वयंज्योति॥
पाहतां लक्ष तेथे, हालवूं विसरल्या पातीं।
नातुडे माझे मज, नाही दिवस ना राती॥ ३॥ तें सुख...

आनंदसागरांत, प्रेमें बुडी दीधली।
लाभले सौख्य मोठे, न ये बोलतां बोली॥
सद्गुरूचेनि संगे, ऐसी आरती केली।
निवृत्ति आनंदाने, तेथे प्रवृत्ति निमाली॥ ४॥ तें सुख...

## 8.22 आरती सद्गुरूंची ३

सगुण आरती आतां निर्गुण ओवाळूं।
कल्पनेचे घृत घालुनि दीप पाजळूं॥ १॥

ओवाळूं आरती माझ्या सद्गुरुनाथा।
भावें चरणकमळावरी ठेविला माथा॥ धृ॥

अविद्येचे मूळ परतें उपडोनी सांडूं।
आशा मनशा तृष्णा काम क्रोध कुर्वंडूं॥ २॥ ओवाळूं...

सद्गुरुचे पूजन केले षोडशोपचारी।
रामानन्द जीवन्मुक्त झाला संसारी॥ ३॥ ओवाळूं...

## 8.23 आरती ज्ञानेश्वरांची

आरती ज्ञानराजा। महाकैवल्यतेजा॥
सेविती साधुसन्त। मनु[86] वेधला माझा॥ धृ॥

लोपले ज्ञान जगीं। हित नेणती कोणी॥
अवतार पाण्डुरंग। नाम ठेविले ज्ञानी॥ २॥ आरती...

प्रगट गुह्य बोले। विश्व ब्रह्मचि केले॥
रामाजनार्दनीं। पायीं टकचि[87] ठेले॥ ३॥ आरती...

## 8.24 आरती एकनाथांची

आरती एकनाथा। महाराजा समर्था॥
त्रिभुवनीं तूंचि थोर। जगद्गुरु जगन्नाथा॥ धृ॥

एकनाथ नाम सार। वेद-शास्त्राचे गूज॥
संसारदुःख नासे। महामंत्राचे बीज॥ १॥ आरती...

एकनाथ नाम घेतां। सुख वाटले चित्ता॥
अनंत गोपाळदासा। धणी[88] न पुरे गातां॥। २॥ आरती...

## 8.25 आरती नामदेवाची

जन्मतां पाण्डुरंगे। जिव्हेवरी लिहिले॥
अभंग शतकोटी। प्रमाण कवित्व रचिले॥ १॥

जयजया जी भक्तराया। जिवलगा नामया॥
आरती ओवाळितां। चित्त पालटे काया॥ धृ॥

[86] मन (चित्त)
[87] एकाग्रचित्त
[88] तृप्ति

घ्यावया भक्तिसुख। पाण्डुरंगे अवतार॥
धरूनिया तीर्थमिषे। केला जगाचा उद्धार॥ २॥ जयजया...

प्रत्यक्ष प्रचीती हे। वाळवंट परीस केली॥
हारपली विषमता। द्वैतबुद्धि निरसली॥ ३॥ जयजया...

समाधि महाद्वारी। श्रीविठ्ठलचरणी॥
आरती ओवाळितो। परिसा कर जोडुनी॥ ४॥ जयजया...

## 8.26 आरती तुकारामाची

आरती तुकारामा। स्वामी सद्गुरुधामा॥
सच्चिदानन्दमूर्ति। पाय दाखवी आम्हां॥ धृ॥

राघवें सागरांत। पाषाण तारिले॥
तैसे हे तुकोबाचे। अभंग उदकीं रक्षीले॥ १॥ आरती...

तुकितां तुळणेसी। ब्रह्म तुकासि[89] आले॥
म्हणुनी रामेश्वरें। चरणी मस्तक ठेविले॥ २॥ आरती...

## 8.27 आरती रामदासांची १

आरती रामदासा। भक्त विरक्त ईशा॥
उगवला ज्ञानसूर्य। उजळोनि प्रकाशा॥ धृ॥

साक्षात् शंकराचा। अवतार मारुति॥
कलिमाजी तेचि झाली। रामदासाची मूर्ति॥ १॥ आरती...

वीसही दशकांचा। दासबोध ग्रंथ केला॥
जडजीवां उद्धरीले। नृप शिवासि तारिले॥ २॥ आरती...

ब्रह्मचर्य व्रत ज्याचे। रामरूप सृष्टि पाहे॥
कल्याण तिहीं लोकीं। समर्थ सद्गुरुपाय॥ ३॥ आरती...

## 8.28 आरती रामदासांची २

ओवाळूं ओवाळूं सद्गुरु रामदासराणा।
पंचही प्राणांचा दीप लावला जाणा॥ धृ॥

अज्ञानतिमिरज्योति सद्गुरु उजळल्या वाती।
ज्ञानबोध प्रगटला तेणें प्रकाशली दीप्ती॥ १॥ ओवाळूं...

[89] इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः। ह्या गीतावचनाप्रमाणे.

निर्गुण निरंजन ज्योति सद्गुरु रामदास।
दर्शन मंगळप्रद कल्याणाचा कळस॥ २॥ ओवाळूं...

## 8.29 आरती संतांची

आरती सन्तमंडळी। हातीं घेऊनि पुष्पांजळी॥
ओवाळीन पंचप्राणे। त्यांचे चरण न्याहाळी॥ धृ॥

मत्स्येंद्र गोरक्षनाथ। गैनी निवृत्तिनाथ॥
ज्ञानदेव नामदेव। खेचर विसोबा सन्त॥
सोपान चांगदेव। गोरा जगन्मित्र भक्त॥
कबीर आणि पाठक नामा। चोखा परिसा भागवत॥ १॥ आरती...

भनुदास कृष्णदास। वडवळ सिद्ध नागनाथ॥
बहिरा पिसा मुकुन्दराज। केशवस्वामी सूरदास॥
रंगनाथ वामनस्वामी। जनजसवंतदास॥ २॥ आरती...

एकनाथ रामदास। यांचा हरिपदीं वास॥
गुरुकृपा संपादिली। स्वामी जनार्दन त्यास॥
मिराबाई मुक्ताबाई। बहिणाबाई उदास॥
सोनार नरहरि हा। माळी सावंता दास॥ ३॥ आरती...

रोहिदास संताबाई। जनी राजाई गोणाई॥
जोगा परमानंदा साळ्या। शेख महंमद भाई॥
निंबराज बोधराज। माथा तयाचे पायीं॥
कूर्मदास शिवदास। मलुकदास कर्माबाई॥ ४॥ आरती...

नारा म्हादा गोंदा विठा। प्रेमळ दामाजीपंत॥
तुकोबा गणेशनाथ। सेना नरसी महंत॥
तुळसीदास कसंबया। पवार संतोबा भक्त॥
महीपति तुम्हांपाशी। चरणसेवा मागत॥ ५॥ आरती...

## 8.30 आरती तुळशीची

जय देवी जय देवी जय माये तुळसी।
निजपत्राहुनि लघुतर त्रिभुवन हे तुळिसी॥ धृ॥

ब्रह्मा केवळ मूळी मध्ये तो शौरी।
अग्री शंकर तीर्थें शाखापरिवारी॥
सेवा करिती भावे सकळहि नर-नारी।
दर्शनमात्रे पापे हरती निर्धारी॥ १॥ जय देवी...

शीतळ छाया भूतळव्यापक तूं कैसी।
मंजिची बहु आवड कमळारमणासी॥
तव दलविरहित विष्णू राहे उपवासी।
विशेष महिमा तूझा शुभ कार्तिकमासी॥ २॥ जय देवी...

अचुत माधव केशव पीतांबरधारी।
तूझे पूजनकाळी जो हे उच्चारी॥
त्यासी देसी संतति संपति सुखकारी।
गोसावीसुत विनवी मजला तूं तारी॥ ३॥ जय देवी...

## 8.31 आरती खंडोबाची

पंचानन हयवाहन सुरभूषितलीळा।
खंडामंडित दंडित दानव अवलीळा॥
मणिमल्ला मर्दुनिया जो धूसर पिवळा।
करि कंकण बाशिंगे सुमनांच्या माळा॥ १॥

जय देव जय देव जय शिव-मल्हारी।
वारी दुर्जन वारी, तारी सज्जन तारी, निंदक अपहारी॥ धृ॥

सुरवर संवर वर दे मज लागी देवा।
नाना नामे गाइन ही तुमची सेवा॥
अघटित गुण गावया वाटतसे हेवा।
फणिवर शिणला ते किति नरपामर केवा॥ २॥ जय देव...

रघुवर स्मरणी शंकर हृदयी नीवाला।
तो हा मल्लांतक अवतार झाला।
यालागी आवडी भावे वर्णीला।
रामीरामदासा जिवलग भेटला॥ ३॥ जय देव...

## 8.32 आरती श्रीगुरुदत्ताची

त्रिगुण त्रयमूर्ती दत्त हा जाणा।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा॥
नेति नेति शब्द न ये अनुमाना।
अखंड समाधी ध्यान मुनिजना॥ १॥

जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता।
आरती ओवाळितां हरली भवचिंता॥ धृ॥

सबाह्य अभ्यंतरी तूं एक दत्त।
अभाग्यासी कैंची कळेल ही मात।
पराही परतली येथे कैंचा हेत।
जन्ममरणाचाही पुरलासे अंत॥ २॥ जय देव...

दत्त येऊनिया उभा ठाकला।
साष्टांग नमन प्रणिपात केला।
प्रसन्न होउन आशीर्वाद दिधला।
जन्म मरणाचा फेरा चुकवीला॥ ३॥ जय देव...

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान।
हारपले मन झाले उन्मन।
मीतूंपणाची झाली बोळवण।
एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान॥ ४॥ जय देव...

## 8.33 आरती जगदीश्वराची

ॐ जय जगदीश हरे। स्वामी जय जगदीश हरे।
भक्त जनोंके संकट दासजनोंके संकट क्षणमे दूर करे।
स्वामी जय जगदीश हरे॥ धृ॥
जो ध्यावे फल पावे। दुःख विनसे मनका।
सुख संपति घर आवे। कष्ट मिटे तनका॥ १॥

मात पिता तुम मेरे। शरण गहूं मै किसकी।
तुमबिन और न दूजा। आंस करू जिसकी॥ २॥

तुम पूरण परमातम। तुम अन्तर्यामी।
पारब्रह्म परमेश्वर। तुम सबके स्वामी॥ ३॥

तुम करुणाके सागर। तुम पालनकर्ता।
मै सेवक तुम स्वामी। कृपा करो भर्ता॥ ४॥

तुम हो एक अगोचर। सबके प्राणपति।
किस विधि मिलू दयामय। तुमको मै कुमति॥ ५॥

दीनबन्धु दुःखहर्ता। तुम रक्षक मेरे।
करुणा हस्त बढाओ। द्वार पडा तेरे॥ ६॥

विषय विकार मिटाओ। पाप हरो देवा।
श्रद्धा भक्ति बढाओ। सन्तनकी सेवा॥ ७॥

# 9 प्रार्थना

करोनि आरती। चक्रपाणी ओवाळिती॥ १॥
आजी पुरले नवस। धन्य काळ हा दिवस॥ धृ॥
पाहा पाहा वो सकळा। पुण्यवंता तुम्ही बाळा॥ २॥
तुका वाये टाळी। उभा सन्निध जवळी॥ ३॥

घालिन लोटांगण वन्दीन चरण।
डोळ्यानी पाहिन रूप तुझे॥
प्रेमे आलिंगिन आनन्दे पूजिन।
भावे ओवाळिन म्हणे नामा॥ १॥

त्वमेव माता च पिता त्वमेव।
त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव॥
त्वमेव विद्या च द्रविणम् त्वमेव।
त्वमेव सर्वम् मम देवदेव॥ २॥

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा।
बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात्॥
करोमि यद्यत् सकलम् परस्मै।
नारायणायेति समर्पयामि॥ ३॥

अच्युतम् केशवम् राम नारायणम्।
कृष्णदामोदरम् वासुदेवम् हरिम्॥
श्रीधरम् माधवम् गोपिकावल्लभम्॥
जानकीनायकम् रामचन्द्रम् भजे॥ ४॥

अच्युतं केशवं सत्यभामाधवम्
माधवं श्रीधरं राधिकाऽऽराधितम्॥
इंदिरामंदिरं चेतसा सुंदरम्।
देवकीनंदनं नंदजं संदधे॥ ५॥

विष्णवे जिष्णवे शंखिणे चक्रिणे
रुक्मिणीरागिणे जानकीजानये॥

वल्लवीवल्ल्भायार्चितायात्मने
कंसविध्वंसिने वंशिने ते नमः॥ ६॥

नमस्ते पुरुषाध्यक्ष नमस्ते भक्तवत्सल॥
नमस्तेऽस्तु हृषीकेश नारायण नमोस्तु ते॥ ७॥

नमोस्त्वनन्ताय सहस्रमूर्तये सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे॥
सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्रकोटीयुगधारिणे नमः॥ ८॥

हरे राम हरे राम। राम राम हरे हरे।
हरे कृष्ण हरे कृष्ण। कृष्ण कृष्ण हरे हरे॥ ९॥

## 9.1 मंत्रपुष्पांजलि

ॐ
यज्ञेन यज्ञमजयन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्।
ते ह नाकम् महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः॥
ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने। नमो वयम् वैश्रवणाय कुर्महे॥
स मे कामान् कामकामाय मह्यम् कामेश्वरो वैश्रवणो ददातु।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः।
ॐ स्वस्ति साम्राज्यम् भौज्यम् स्वाराज्यम् वैराज्यम्
पारमेष्ठ्यम् राज्यम् महाराज्यमाधिपत्यमयम्
समन्तपर्यायी स्यात् सार्वभौमः सार्वायुष आन्तादापरार्धात्।
पृथिवै समुद्रपर्यन्ताया एकराळिति॥
तदप्येषश्लोकोऽभिगितो मरुतः परिवैष्टारो मरुत्तस्या वसन् गृहे।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः॥

## 9.2 प्रदक्षिणा

यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च।
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणपदेपदे॥

धन्य धन्य हे प्रदक्षिणा सद्गुरुरायाची।
झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची॥ धृ॥

पदोपदीं अपारझाल्या पुण्याच्या राशी।
सर्वहि तीर्थे घडली आम्हां आदिकरुनि काशी॥ १॥

मृदंग टाळ घोळ भक्त भावार्थे गाती।
नामसंकीर्तने ब्रह्मानंदे नाचती॥ २॥

कोटि ब्रह्महत्या हरती करितां दंडवत।
लोटांगण घालितां मोक्ष लोळे पायांत॥ ३॥

गुरुभक्ताचा महिमा न कळे आगमा-निगमांसी।
अनुभव ते जाणती जे गुरुपादिंचे रहिवासी॥ ४॥

प्रदक्षिणा करूनि देह भावे वाहिला।
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला॥ ५॥

# 10 मुखशुद्धि

## 10.1 विडा श्रीरामाचा

विडा घ्या हो रामराया। महाराजराजया ॥ धृ॥

रत्नजडित पानदान। आली जानकी घेवोन॥
विडा देत करूनीयां। दीनबंधो रामराया॥ १॥ विडा...

सुगंध गंगेरी पानें। मुक्त मोतियांचा चुना॥
सुपारी कातगोळ्या। भक्तिभावे मेळविल्या॥ २॥ विडा...

जायपत्री जायफळ। विडा जाहला सुफळ॥
सीता रामालागीं देत। केशर कस्तुरीयुक्त॥ ३॥ विडा...

सीताराम विडा घेतां। ऐक्यभावे एकात्मता॥
रंगली ऐक्यरंगीं। रामदास पायां लागीं॥ ४॥ विडा...

## 10.2 विडा श्रीकृष्णाचा

विडा घ्या हो नारायणा। कृष्णा जगत्रजीवना।
विनविते रखुमाबाई। दासी होईन मी कान्हा॥ धृ॥ विडा...

शांती हे नागवेली। पान घेऊनिया करीं।
मीपण जाळुनिया। चुना लावियेला वरी॥ १॥ विडा...

वासना फोडुनीयां। चूर्ण केली सुपारी।
भावार्थ कापुरानें। घोळियेली निर्धारीं॥ २॥ विडा...

विवेक कातरंग। रंगीं रंगला सुरंग।
वैराग्य जायफळ। मेळविलें अभंग॥ ३॥ विडा...

दया हे जायपत्री। क्षमा लवंगा आणिल्या।
सुबुद्धि वेलदोडे। शिवरामें अर्पियेले॥ ४॥ विडा...

# 11 अभंग

आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा।
माझिया सकळा हरिच्या दासा॥ १॥
कल्पनेची बाधा न हो कोणे काळी।
ही संतमंडळी सुखी असो॥ धृ॥
अहंकाराचा वारा न लागो राजसां।
माझ्या विष्णुदासां भाविकांसी॥ २॥
नामा म्हणे तया असावे कल्याण।
ज्या मुखीं निधान पांडुरंग॥ ३॥

वचन ऐका कमळापति। माझी रंकाची विनंती॥ १॥
कर जोडितो कथेकाळी। आपण असावे जवळी॥ २॥
घ्यावी घ्यावी माझी भाक। जरि कां मागणे आणिक॥ ३॥
तुकयाबंधु म्हणे देवा। शब्द इतुकाचि राखावा॥ ४॥

मागणे तें एक तुजप्रती आहे।
देशी तरी पाहें पांडुरंगा॥ १॥
या संतांसी निरवी हेंचि मज देई।
आणिक तुज कांही न मागो देवा॥ २॥
तुका म्हणे आतां उदार तूं होई।
मज ठेवी पायीं संतांचिया॥ ३॥

ज्ञानदेव तुकाराम। ज्ञानोबा तुकाराम॥
निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई।
एकनाथ नामदेव तुकाराम॥

तुकाराम तुकाराम तुकाराम तुकाराम।
पुंडलीक वरदा हरि विठ्ठल॥ श्री ज्ञानदेव तुकाराम॥
सीताकांत स्मरण जय जय राम॥
पार्वतीपते हर हर महादेव॥
श्रीगुरुदेव दत्त॥ हरये नमः। हरये नमः। हरये नमः॥

## 11.1 धांवा

धांव रे रामराया। किती अंत पाहसी॥ धृ॥

प्राणांत मांडिलासे। न ये करुणा कैसी॥
पाहीन धणिभरी। चरण झाडीन केशीं॥
नयन शिणले बा। आतां केधवा येसी॥ १॥ धांव रे...

मीपण अहंकारें। अंगीं भरला ताठा॥
विषयकर्दमांत। लाज नाही लोळतां॥
चिळस नुपजेना। ऐसें झाले आतां॥ २॥ धांव रे...

मारुतिस्कंधभागीं। शीघ्र बैसोनि यावे।
राघवें वैद्यराजें। कृपा-औषध द्यावे।
दयेचे पद्महस्त। माझे शिरी ठेवावे॥ ३॥ धांव रे...

या भवीं रामदास। थोर पावतो व्यथा॥
कौतुक पाहतोसी। काय जानकीच्या कांता॥
दयाळा दीनबंधो। भक्तवत्सला ताता॥ ४॥ धांव रे...

# 12 पद

### 12.1

ऐक बा रामराया। तुझ्या वंदितो पायां॥
आवरी आपुली हे। विश्वमोहिनी माया॥ धृ॥

मी मूढ हीन दीन। सर्व सत्क्रिया हीन।
तूं क्षमाशील देवा। शुद्धचरितनिधान॥ १॥

घडो सदा साधुसंग। नसो विषयप्रसंग॥
सप्रेम भक्ति द्यावी। सत्त्व वैराग्य अभंग॥ २॥

वाटते नित्य भावे। तुझे साधुगुण गावे॥
मन हें आवरेना। सांग काय म्यां करावे॥ ३॥

करितां संसारकाम। मुखीं असो तुझे नाम॥
दयाघना भक्त मोर। याचा पुरविसी काम॥ ४॥

### 12.2

इतके दे मजला दे मजला। मागतसे हरि तुजला॥ १॥
संत समागम अर्चा। सारासारज्ञानचर्चा॥ धृ॥
भगवद्भजनी जागो। मन हे तुझिया स्वरूपीं लागो॥ २॥
असेंचि वैभव देई। शिवदिन केसरिगुरुचे पायीं॥ ३॥

## 12.3 मोरोपंती श्लोक

सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो,
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो,।
संदघ्रिकमळी दडो, मुरडितां हटाने अडो,
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्री जडो॥ १॥

न निश्चय कधी ढळो, कुजनविघ्नबाधा टळो,
न चित्त भजनी चळो, मति सदुक्तमार्गी वळो।
स्वतत्त्व हृदयी कळो, दुरभिमान सारा गळो,
पुन्हां न मन हें मळो, दुरित आत्मबोधे जळो॥ २॥

## 12.4 ज्ञानेश्वरांचे पसायदान

आतां विश्वात्मकें देवें। येणे वाग्यज्ञें[90] तोषावें।
तोषोनि मज द्यावें। पसायदान हें[91]॥ १॥

जें खळांची व्यंकटी[92] सांडो। तया सत्कर्मी रती वाढो।
भूतां परस्परें जडो। मैत्र जीवाचें॥ २॥

दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो[93]।
जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात॥ ३॥

वर्षत सकळमंगळी। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी[94] ।
अनवरत[95] भूमंडळी। भेटो तयां भूतां॥ ४॥

चलां[96] कल्पतरूंचे अरव[97]। चेतनाचिंतामणींचे गांव।
बोलते जे अर्णव[98]। पीयूषाचे[99]॥ ५॥

चंद्रमे जे अलोछन[100]। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयिरे होतु॥ ६॥

किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होऊनि तिहीं लोकी।
भजिजो आदिपुरुषीं। अखंडित॥ ७॥

## 12.5 सार्वजनिक प्रार्थना

स्वस्ति प्रजाभ्यः परिपालयन्ताम्।
न्याय्येन मार्गेण महीं महीशाः।
गोब्राह्मणेभ्यः शुभमस्तु नित्यम्।
लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु॥ १॥

काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी।
देशोऽयं क्षोभरहितो ब्राह्मणाः सन्तु निर्भयाः॥ २॥

अपुत्राः पुत्रिणः सन्तु, पुत्रिणः सन्तु पौत्रिणः।
अधनाः सधनाः सन्तु, जीवन्तु शरदां शतम्॥ ३॥

---
[90] वाणीरूप यज्ञाने
[91] प्रसाद
[92] वाकडेपणा (व्यंकटेश म्हणजे वक्र किंवा दुष्टांचा शास्ता)
[93] प्रकाशो
[94] समुदाय
[95] निरंतर
[96] बोलत्या
[97] अंकुर
[98] समुद्र
[99] अमृताचे
[100] कलंकरहित

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चित् दुःखमाप्नुयात्॥ ४॥

# 13 शेजारती

## 13.1 पाळणा

जो जो जो जो रे श्रीरामा। निजसुखगुणविश्रामा॥ धृ॥ जो जो...
ध्याती मुनियोगी तुजलागीं। कौसल्यावोसंगी॥ १॥ जो जो...
वेदशास्त्रांची मति जाण। स्वरूपीं झाली लीन॥ २॥ जो जो...
चारी मुक्तींचा विचार। चरणीं पाहती थोर॥ ३॥ जो जो...
भोळा शंकर निशीदिनीं। तुजला जपतो मनीं॥ ४॥ जो जो...
दास गातसे पाळणा। राम लक्ष्मणा॥ ५॥ जो जो...

## 13.2 कृष्णाची शेजारती

हरि चला मंदिरा ऐशा म्हणती गोपिका।
भावें (भक्ती) ओवाळिती यादवकुळटिळका॥ १॥
एकीकडे राही एकीकडे रखुमाई।
भावें ओवाळितां हरि जाला दों ठायीं॥ २॥
अष्टाधिक सोळा सहस्र ज्याच्या सुंदरा।
ज्या-ज्यांनी प्रार्थिला गेला तयांचिया घरा॥ ३॥
एका जनार्दनी हरि तूं लाघवी होसी।
इतुक्याही भोगुनी ब्रह्मचारी म्हणविसी॥ ४॥

## 13.3 विठोबाची शेजारती

पावला प्रसाद आतां विठो निजावें।
आपला तो श्रम कळो येतसे भावें॥ १॥

आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा।
पुरले मनोरथ जातो आपुलिया स्थळा॥ २॥

तुम्हांसी आम्ही जागविले आपुलिया चाडा।
शुभाशुभकर्म दोष हरावया पीडा॥ ३॥

तुका म्हणे दिधले उच्छिष्टाचे भोजन।
नाही निवडिले आम्हां आपुलिया भिन्न॥ ४॥

## 13.4 रामाची शेजारती

आरती आरत ऐक्यभावें ओवाळूं।
प्रकाश स्वयंज्योती निज तेज बंबाळू॥ धृ॥

परमात्मा श्रीराम, महामाया जानकी।
विश्रांती पावली गजर न कीजे सेवकी॥ १॥ आरती...

स्नेह ना भाजन, नाही वाती पावक।
सबाह्याभ्यंतरी अवघा निघोट दीपक॥ २॥ आरती...

ऐक्याचे सुमनशेजे, आत्मा रघुपती।
वाचा पारुषली, शब्द न बोलवे पुढती॥ ३॥ आरती...

राम आणि दास चैतन्य, पहूडले रामीं।
तेही बोलावया, दुजा नुरेचि धामीं॥ ४॥ आरती...
जय जय रघुवीर समर्थ॥

# 14 उपसंहार व वरप्रसाद

- १४.१ -

शेवटची विनवणी। संतजनीं परिसावी॥ १॥
विसर तो न पडावा। माझा देवा तुम्हांसी॥ धृ॥
आतां फार बोलूं काय। अवघे पायीं विदित॥ २॥
तुका म्हणे पडलो पायां। करा छाया कृपेची॥ ३॥

- १४.२ -

बोलली लेंकुरें। वेडी-वांकुडी उत्तरें॥ १॥
करा क्षमा अपराध। महाराज तुम्ही सिद्ध॥ धृ॥
नाही विचारिला। अधिकार म्यां आपुला॥ २॥
तुका म्हणे ज्ञानेश्वरा। राखा पायापें किंकरा॥ ३॥

- १४.३ -

लेकुरांचे हित। जाणे माउलीचे चित्त॥ १॥
ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभाविण प्रीती॥ धृ॥
पोटी भार वाहे। त्याचें सर्वस्वही साहे॥ २॥
तुका म्हणे माझें। तुम्हां संतांवरी ओझे॥ ३॥

- १४.४ -

या रे नाचूं प्रेमानंदे। रामनामाचिये छंदे॥ १॥
कैसी नामाची आवडी। पाप फळे देशधडी॥ धृ॥
आवडीने नाम घोका। शरण जनार्दन एका॥ २॥

- १४.५ -

अवघेचि त्रैलोक्य आनंदाचे आतां।
चरणी जगन्नाथा चित्त ठेले॥ १॥
माय जगन्नाथ बाप जगन्नाथ।
अनाथाचा नाथ जनार्दन॥ २॥
एका जनार्दनी एकपणे उभा।
चैतन्याचा गाभा शोभतसे॥ ३॥

- १४.६ -

आतां द्यावें अभयदान। जीवन ये कृपेचे॥ १॥
उभारोनी बाहो देवा। हात ठेवा मस्तकीं॥ धृ॥

नाभी-नाभी[101] या उत्तरें। करुणाकरें सातविजे[102]॥ २॥
तुका म्हणे केली आस। तो हा दिस फळाचा॥ ३॥

- १४.७ -

मज दास करी त्यांचा। संतदासांच्या दासांचा॥ १॥
मग होत कल्पवरी। सुखें गर्भवास हरी॥ धृ॥
नीचवृत्ति काम। परी मुखीं तुझे नाम॥ २॥
तुका म्हणे सेवे। माझे संकल्प वेंचावे॥ ३॥

- १४.८ -

नीचपण बरवें देवा। न चले कोणाचाही हेवा॥ १॥
महापुरें झाडे जाती। तेथें लव्हाळे वाचती॥ धृ॥
येतां सिंधूच्या लहरी। नम्र होतां जाती दुरी॥ २॥
तुका म्हणे कळ[103]। पाय धरिल्या न चळे बळ॥ ३॥

- १४.९ -

सद्गदित कंठ दाटो। येणें फुटो हृदय॥ १॥
चिंतनाचा एक लाहो[104]। तुमच्या अहो विठ्ठला॥ धृ॥
नेत्रीं जळ वाहो सदा। आनंदाचे रोमांच॥ २॥
तुका म्हणे कृपादान। इच्छी मन हे जोडी॥ ३॥

[101] भिऊ नकोस, भिऊ नकोस
[102] सांत्वन करावे, धीर द्यावा.
[103] कळा, युक्ति, गुरुकिल्ली.
[104] छंद, लाभ

- १४.१० -

राहो आतां हेचि ध्यान। डोळां मन लंपटो॥ १॥
कोंड-कोंडुनि धरीन जीवें। देहभाव पूजीन॥ २॥
होईल येणे कळसा आले। स्थिरावले अंतरीं॥ ३॥
तुका म्हणे गोजरिया। विठोबा पायां पडो द्या॥ ४॥

- १४.११ -

देवा, आतां ऐसा करीं उपकार।
देहाचा विसर पाडी मज॥ १॥
तरीच हा जीव सुख पावे माझा।
बरें केशीराजा कळों आले॥ धृ॥
ठाव देई चित्ता राखें पायांपाशी।
सकळ वृत्तींशीं अखंडित॥ २॥
आस, भय, चिंता, लाज, काम, क्रोध।
तोडावा संबंध याचा माझा॥ ३॥
मागणे तें एक हेंचि आहे आतां।
नाम मुखीं संतसंग देई॥ ४॥
तुका म्हणे नको वरपंग देवा।
घेई माझी सेवा भावशुद्ध॥ ५॥

- १४.१२ -

हेंचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥ १॥
गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी॥ २॥
नलगे मुक्ती धनसंपदा। संतसंग देई सदा॥ ३॥
तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी॥ ४॥

- १४.१३ -

देवा ऐकें हे विनंती। मज नको तुझी मुक्ती।
संतांचीया संगती। हेंचि सुख आगळे॥ १॥
या या वैष्णवांच्या घरी। प्रेमसुख इच्छा करी।
ऋद्धि सिद्धि द्वारीं। कर जोडुनी तिष्ठती॥ धृ॥
नको वैकुंठीचा वास। तया सुखा असे नाश।
अद्भुत हा रस। कथाकाळी नामाचा॥ २॥
तुझ्या नामाचा महिमा। तुज न कळे पुरुषोत्तमा।
तुका म्हणे आम्हां। जन्म गोड यासाठी॥ ३॥

- १४.१४ -

हरिसी रिघतां शरण। आमुचे गेले आम्हीपण॥ १॥
आतां बोले चाले हरी। ज्याची कथा तोचि करी॥ २॥
होऊनिया श्रोता वक्ता। करी आपुली आपण कथा॥ ३॥
विश्वव्यापक परिपूर्ण। अवघा एकचि नारायण॥ ४॥
तोचि झाला जन वन। तोचि मनाचा पैं मन॥ ५॥

तोचि बुद्धीचा निश्चय। चित्ता चिंतन उदय॥ ६॥
तोचि अहं सोऽहं झाला। अहं सोऽहं गिळोनि ठेला॥ ७॥
सकळिक हरि आहे। भक्त तेही आपण होये॥ ८॥
कैंचा रमावल्लभदास। अवघा हरीचा उल्लास॥ ९॥

## 15 धन्यता

(पद)[105]

आनंदरस हा प्याला। भवताप शांतचि झाला॥ धृ॥
अनंतकोटि कल्मषपाश। पावें एका समयि विनाश।
दृढ धरिता सद्गुरुची कांस। निजगुज सांगुनि गेला॥ १॥
आतां मज हो कैंचे ध्यान। विसरुनि गेले समुळी भान।
श्रवण कराया नाही मज कान। संकल्पचि निमाला॥ २॥
मेली यद्यपि मोह-माय। केला जीणें दृढ व्यवसाय।
रामसखा तो शोकेल काय? । चिन्मय होऊनि ठेला॥ ३॥

## 16 अभंग

- १६.१ -

आपुले मरण पाहिले म्या डोळा[106]।
तो जाहला सोहळा अनुपम्य॥ १॥
आनंदे दाटली तिन्ही त्रिभुवने।
सर्वात्मकपणे भोग झाला॥ धृ॥
एकदेशी होतो अहंकारे आथिला[107]।
त्याच्या त्यागे झाला सुकाळ हा॥ २॥
फिटले सुतक जन्म-मरणांचे।
मी माझ्या संकोचे दुरी झालो॥ ३॥
नारायणे दिला वसतीस ठाव।
ठेवूनिया भाव ठेलो पायी॥ ४॥
तुका म्हणे दिले उमटूनी जगी।
घेतले तें अंगी लावुनिया॥ ५॥

- १६.२ -

प्रेमाच्या अमृतें रसना ओलावली।
मनाची राहिली वृत्ति पायीं॥ १॥
सकळही तेथें वोळली मंगळें।
वृष्टि केली जळें आनंदाच्या॥ धृ॥
सकळ इंद्रियें जाली ब्रह्मरूप।
ओतले स्वरूप तयामाजी॥ २॥
तुका म्हणे जेथें वसे भक्तराज।
तेथें नांदे देव संदेह नाही॥ ३॥

- १६.३ -

याचसाठी केला होता अट्टाहास।
शेवटचा दीस गोड व्हावा॥ १॥
आतां निश्चितीनें पावलो विसांवा।
खुंटलीया धांवा तृष्णेचिया॥ धृ॥
कवतुक वाटे जालिया वेचाचे।
नांव मंगळाचे तेणें गुणें॥ २॥
तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी।
आतां दिवस चारी खेळी-मेळी॥ ३॥

- १६.४ -

गोविंदा रामा। जय जय गोपाळा रामा॥ १॥
यादवा रामा। जय जय माधवा रामा॥ २॥
सुल्लभा रामा। जय जय दुल्लभा रामा॥ ३॥
एक तूं रामा। जय जय अनेक तूं रामा॥ ४॥
एकाजनार्दनी रामा। जय जय निष्कामा रामा॥ ५॥

- १६.५ -

हेचि व्हावी माझी आस। जन्मोजन्मीं तुझा दास॥ १॥
पंढरीचा वारकरी। वारी चुको नेदीं हरी॥ २॥
संतसंग सर्वकाळ। अखंड प्रेमाचा सुकाळ॥ ३॥
चंद्रभागे स्नान। तुका मागे हेंचि दान॥ ४॥

- १६.६ -

पायांच्या प्रसादें। कांही बोलिलो विनोदे॥ १॥
मज क्षमा करणे संतीं। नव्हे अंगभूत युक्ती॥ धृ॥
नव्हे हा उपदेश। तुमचे बडबडिलो शेष॥ २॥
तुमचे कृपेचे पोसणे। जन्मोजन्मीं तुका म्हणे॥ ३॥

- १६.७ -

श्रवण-कीर्तनें जाले ते पावन। सनकादिक जाण परमभक्त॥ १॥
जाली ते विश्रांती याचकां सकळां। जीवीं जीवनकळा श्रीमूर्ति रया॥ २॥
पादसेवनें अक्रूर जाला ब्रह्मरूप। प्रत्यक्ष स्वरूप गोविंदाचे॥ ३॥
सख्यपणें अर्जुन नरनारायणीं। सृष्टिजनार्दनीं एकरूप॥ ४॥

दास्यत्व निकट हनूमंतें केले। म्हणोनी देखिले रामचरण॥ ५॥
बळी आणि भीष्म प्रल्हाद नारद। बिभीषण वरद आचंद्रार्क॥ ६॥
व्यास आणि वसिष्ठ मुनि वाल्मिकादिक। आणि पुंडलीक शिरोमणी॥ ७॥
उद्धव यादव आणि ते गोपाळ। गोपिकांचा मेळ ब्रह्मरूप॥ ८॥

[105] हे पद सखारामबोवा कवाडकर ह्यांचे आहे.
[106] मरणाहि आधी राहिले तुकाराम.
[107] युक्त, व्यापलेला.

अनंत भक्तराशी तरले ते वानर। ज्ञानदेवा घर चिदानंदीं॥ ९॥

- १६.८ -

तुज वर्णितो भाट मी देवराया।
सदा सर्वदा गाय ब्रीदें सवाया॥
महाराज दे अंगिचे वस्त्र आतां।
बहू जीर्ण जाली देहेबुद्धिकंथा॥ १॥

पूजेनंतर तीर्थोदक घेतांना श्रद्धेनें म्हणावयाचा मंत्र

अकालमृत्युहरणं सर्वव्याधिविनाशनम्।
विष्णुपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम्॥ १॥
शरीरे जर्जरीभूते व्याधिग्रस्ते कलेवरे।
औषधं जाह्नवीतोयं वैद्यो नारायणो हरिः॥ २॥

## 17 भजने

(०१) रामकृष्ण हरी। जय जय रामकृष्ण हरी॥
(०२) विठोबा रखुमाई। जय जय विठोबा रखुमाई॥
(०३) रघुपति राघव राजाराम। पतितपावन सीताराम॥
(०४) राम लक्ष्मण जानकी। जय बोलो हनुमानकी॥
(०५) राम राम राम जय सीताभिराम।सीताभिराम॥ राम...
(०६) मारुतिराया बलभीमा। शरण आलो मज द्या प्रेमा॥
(०७) दत्तात्रय अवधूता। जनार्दनस्वामी एकनाथा॥ गुरु...
(०८) रामदास गुरु माझे आई। मजला ठाव द्यावा पायीं॥
(०९) जय जय राम कृष्ण हरी। सांवळ्या रामकृष्ण हरी॥
(१०) शिव हर रे शिव हर रे। सांब सदाशिव शिव हर रे॥
शिव हर शंकर गौरीशं। वंदे गंगाधरमीशम्॥
(११) ज्ञानोबा माउली तुकाराम। ज्ञानराज माउली तुकाराम॥
(१२) जीवाचे जिवलगे। मनाचे मोहने। येई पांडुरंगे॥
(१३) राम हरे गोविंद। शिव शिव कृष्ण हरे गोविंद॥
(१४) नारायण नारायण जय गोविंद हरे॥
नारायण नारायण जय गोपाल हरे॥
(१५) गुरु महाराज गुरु। जय जय परब्रह्म सद्गुरु॥
(१६) नारायण विधि अत्रिनाथ। दत्त जनार्दन एकनाथ॥
(१७) कृष्ण गोविंद गोविंद। गोपाळ राधेकृष्ण॥
गोविंद गोविंद। गोपाळ राधेकृष्ण॥
(१८) सच्चित्प्रेमानंदू। भज रे गोविंदू गोविंदू॥
(१९) राधाकृष्ण जय कुंजविहारी। मुरलीधर गोवर्धनधारी॥
(२०) निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई।
एकनाथ नामदेव तुकाराम॥
आवडिने ही नामें गाती। ते नर पावति मंगलधाम॥
(२१) नारायण विधि वसिष्ठ राम। रामदास कल्याणधाम॥
(२२) रामसीता कृष्णराधा। विठ्ठले रखुमाई॥
(२३) पावना दत्ता। दयाळा पावना दत्ता॥
(२४) जय विठ्ठल। जय जय विठ्ठल॥

## 18 पदे

- १८.१ -

देव पावला रे। देव पावला रे॥ धृ॥
धांवा केला भक्तजनीं। आली देवाची धांवणी॥ १॥
देव घातले बांदोडी। तेथें राम घाली उडी॥ २॥
रामीं रामदासीं भेटी। झाली संसाराची तुटी॥ ३॥

- १८.२ -

आनंद केला बा। केला बा॥ आनंद केला बा।
आनंद केला बा। आनंद केला बा॥ धृ॥
आनंद केला बा गुरुराया। हरली सकळहि माया॥ १॥
माया ममता मी मुळि नेणें। सर्वहि सद्गुरु जाणे॥ २॥
त्रिपुटी ग्रासुनिया सुख देशी। प्राणविसांवा होसी॥ ३॥
केशवस्वामीच्या दातारा। स्वरूपीं दिधला थारा॥ ४॥

# भोजनसमयीं ठेवण्याची भावना

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना॥ १॥
हरिर्दाता हरिर्भोक्ता हरिरन्नं प्रजापतिः।
हरिर्विप्रशरीरस्तु भुंक्ते भोजयते हरिः॥ २॥
एकोविष्णुर्महद्भूतं पृथग्भूतान्यनेकशः।
त्रीन् लोकान् व्याप्य भूतात्मा भुंक्ते विश्वभुगव्ययः॥ ३॥
अहं वैश्वानरोभूत्वा प्राणिनाम् देहमाश्रितः।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नम् चतुर्विधम्॥ ४॥
जनीं भोजनी नाम वाचे वदावें।
अती आदरें गद्यघोषें म्हणावे।
हरिचिंतनें अन्न सेवीत जावे।
तरी श्रीहरी पावितोजे स्वभावे॥ ५॥
वदनि कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचे।
सहज हवन होते नाम घेतां फुकाचे।
जिवन करि जिवित्वा अन्न हें पूर्णब्रह्म।
उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म॥ ६॥

# दीपवन्दन

शुभं कुरु त्वं कल्याणमारोग्यं धनसम्पदः।
शत्रुबुद्धिविनाशाय दीपज्योतिर्नमोऽस्तुते॥

# ॥ श्री ॥
# भक्तिमार्गप्रदीप
# प्रासंगिक व नैमित्तिक
# ईश्वरप्रार्थना

## 19 श्रीरामाचे ध्यान

रत्नजडित सिंहासन। वरी शोभे रघुनंदन॥ १॥
वामांगी ते सीताबाई। जगज्जननी माझी आई॥ २॥
पश्चाद्भागी लक्ष्मुमण। पुढे अंजनी नंदन॥ ३॥
भरत शत्रुघ्न ते भाई। चौऱ्या ढाळिती दोहीं बाही॥ ४॥
नळ नीळ जांबुवंत। अंगद सुग्रीव बिभीषण भक्त॥ ५॥
देहबुद्धी नेणों कांही। दास अंकित रामापायीं॥ ६॥

## 20 करुणाष्टके

२०.१

अनुदिन अनुतापें तापलो रामराया।
परम दिनदयाळा! नीरसीं मोहमाया॥
अचपळ[108] मन माझे नावरे आवरीतां।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां॥ १॥

भजनरहित रामा सर्वही जन्म गेला।
स्वजनजनधनाचा वेर्थ म्यां स्वार्थ केला॥
रघुपति! मति माझी आपुलीशी करावी।
सकळ त्यजुनि भावें कांस तूझी धरावी॥ २॥

तनुमन माझे राघवा! रूप तूझे।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी।
अचळ भजनलीळा लागली आस तूझी॥ ३॥

चपळपण मनाचे मोडितां मोडवेना।
सकळ स्वजन माया तोडितां तोडवेना॥
घडिघडि बिघडे हा निश्चयो अंतरीचा।
म्हणउनि करुणा हे बोलतो दीन वाचा॥ ४॥

जळत हृदय माझे जन्म कोट्यानुकोटी।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटी॥
तळमळ निववी रे राम कारुण्यसिंधू।
षडरिपुकुळ माझे तोडि याचा समंधू॥ ५॥

तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी।
सिणत सिणत पोटी पाहिली वास तूझी॥
झडकरि झड घाली धांव पंचानना रे।
तुजविण मज नेती जंबुकी वासना रे॥ ६॥

स्वजन जनधनाचा कोण संतोष आहे।
रघुपतिविण आतां चित्त कोठे न राहे॥
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि जाती।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती॥ ७॥

सकळ जन भवाचे आथिले[109] वैभवाचे।
जिवलग मज कैंचे चालते हेचि साचे॥
विलग-विषमकाळीं[110] सांडिती सर्व माळी।
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळी॥ ८॥

उपरति मज रामीं जाहली पूर्ण कामी।
सकळजनविरामी[111] रामविश्रामधामी॥
घडि घडि मन आतां रामरूपीं भरावे।
रविकुळटिळका! रे आपुलेसे करावे॥ ९॥

२०.२

उदासीन हा काळ जातो कळेना।
सदा-सर्वदा थोर चिंता शमेना॥
उठे मानसी सर्व सांडूनि जावे।
रघूनायका काय कैसे करावे? ॥ १॥

जनीं बोलतां चालतां वीट वाटे।
नसे अंतरी स्वस्थ कोठे न कंठे॥
घडीनें घडी चित्त कीती धरावें।
रघूनायका काय कैसे करावे? ॥ २॥

अवस्था मनीं होय नानापरीची।
किती काय सांगो गती अंतरीची॥
विवेकेंचि या मानसा आवरावें।
रघूनायका काय कैसे करावे? ॥ ३॥

म्हणे दास ऊदास जालो दयाळा।
जनी वेर्थ संसार हा वायचाळा॥

[108] अतिचपळ, चंचल. (अनुत्तम ह्या शब्दाप्रमाणे अचपळ ह्या शब्दाची योजना समर्थांनी केली आहे)

[109] नामांकित

[110] विलग (पटकी वगैरेचा उपद्रव), विषम ( दारिद्र्य, परचक्र वगैरेचा उपद्रव) विलगकाळी व विषमकाळी माळावर कोठेतरी टाकतात.

[111] जन्म अपमृत्यूपासून मुक्त करणारा किंवा दुष्ट जनांचा विनाश करणारा श्रीराम

तुझा मी तुला पूसतों सर्व भावें।
रघूनायका काय कैसे करावे? ॥ ४ ॥

२०.३

समाधान साधूजनाचेनि योगें।
परी मागुतें दुःख होते वियोगे॥
घडीने घडी शीण अत्यंत वाटे।
उदासीन हा काळ कोठे न कंठे॥ १ ॥
घरें सुंदर सौख्य नानापरीचे।
परी कोण जाणेल हें अंतरीचे॥
मनीं आठवीतांचि तो कंठ दाटे।
उदासीन हा काळ कोठे न कंठे॥ २ ॥
बळें लावितां चित्त कोठे जडेना।
समाधान तें कांहि केल्या घडेना॥
नव्हे धीर नैनी[112] सदा नीर लोटे।
उदासीन हा काळ कोठे न कंठे॥ ३ ॥
अवस्था मनीं लागली काय सांगो।
गुणी गुंतला हेत कोणासि मागो॥
बहूसाल भेटावया प्राण फूटे[113]।
उदासीन हा काळ कोठे न कंठे॥ ४ ॥
कृपाळूपणे भेट दे रामराया।
वियोगे तुझ्या सर्व व्याकूळ काया॥
जनामाजि लौकीक हाही न सूटे।
उदासीन हा काळ कोठे न कंठे॥ ५ ॥
अहा रे विधी! त्वां असे काय केले।
पराधीनता पाप माझे उदेले॥
बहूतांमधे चूकतां तूक[114] तूटे।
उदासीन हा काळ कोठे न कंठे॥ ६ ॥
समर्था! मनीं सांडि माझी नसावी।
सदा-सर्वदा भक्तचिंता असावी॥
घडेना तुझा योग हा! प्राप्त खोटे।
उदासीन हा काळ कोठे न कंठे॥ ७ ॥
म्हणे दास मी वास पाहें दयाळा।
रघूनायका भक्तपाळा भुपाळा॥
पहावे तुला हें जिवीं आर्त मोठे।
उदासीन हा काळ कोठे न कंठे॥ ८ ॥

२०.४

तुझिया वियोगे जीवित्व आले। शरीरपांगे बहु दुःख जाले॥
अज्ञान दारिद्र्य माझे सरेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ १ ॥
जडली उपाधी अभिमान साधी। विवेक नाहीं बहुसाल बाधी॥
स्वामीवियोगें पळही गमेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ २ ॥

[112] नयनी
[113] दर्शनाची उत्कंठा लागली
[114] वजन, महत्त्व

विश्रांति देहीं अणुमात्र नाही। कुळाभिमानें पडिलो प्रवाही॥
स्वहीत माझें होतां दिसेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ ३ ॥
विषयीं जनानें मज लाजवीले। प्रपंच संगे आयुष्य नेले॥
समयीं बहु क्रोध शांती घडेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ ४ ॥
संसारसंगे बहु पीडलो रे। कारुण्यसिंधू मज सोडवीं रे॥
कृपाकटाक्षें सांभाळि दीना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ ५ ॥

२०.५

दुःखानळें मी संतप्त देहीं। तुजवीण रामा विश्रांति नाही॥
आधार तूझा मज मी विदेसी। सर्वोत्तमा! कैं मज भेट देसी? ॥ १ ॥
प्रारब्ध खोटें अभिमान आला। स्वामी समर्थास वियोग जाला॥
तेणें बहु क्षीति वाटे मनासी। सर्वोत्तमा! कैं मज भेट देसी? ॥ २ ॥
संसार चिंता मज वाटते रे। रामा प्रपंची मन जातसे रे॥
संसर्ग आहे इतरां जनासी। सर्वोत्तमा! कैं मज भेट देसी? ॥ ३ ॥

२०.६

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांही।
नसे प्रेम हें राम विश्राम नाहीं॥
असा दीन अज्ञान मी दास तूझा।
समर्था जनी घेतला भार माझा॥ १ ॥
रघूनायका! जन्मजन्मांतरीचा।
अहंभाव छेदूनि टाकीं दिनाचा॥
जनीं बोलती दास या राघवाचा।
परी अंतरीं लेश नाहीं तयाचा॥ २ ॥
रघूनायका! दीन हातीं धरावें।
अहंभाव छेदूनियां उद्धरावें॥
अगूणी तयालागि गूणी करावें।
समर्थें भवसागरीं ऊतरावें॥ ३ ॥
किती भार घालूं रघूनायकाला।
मजकारणें शीण होईल त्याला॥
दिनानाथ हा संकटीं धांव घाली।
तयाचेनि हे सर्व काया निवाली॥ ४ ॥
मज कोवसा[115] राम कैवल्यदाता[116]।
तयाचेनि हे फीटली सर्व चिंता॥
समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें।
सदा सर्वदा नाम वाचे वदावें॥ ५ ॥
दिनाचे उणें दीसतां लाज कोणा।
जनीं दास तूझा दिसे दैन्यवाणा॥
शिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी।
तुझा दास पाहें सदा शीघ्रकोपी॥ ६ ॥

[115] आधार
[116] मोक्ष, ज्ञान देणारा

२०.७

युक्ति नाहीं बुद्धि नाहीं विद्या नाहीं विवंचिता[117]।
नेणता भक्त मी तूझा बुद्धि दे रघुनायका॥ १॥
मन हें आवरेना कीं वासना वावरे सदा।
कल्पना धांवते सैरा बुद्धि दे रघुनायका॥ २॥

अन्न नाहीं वस्त्र नाहीं सौख्य नाहीं जनांमध्यें।
आश्रयो पाहतां नाहीं बुद्धि दे रघुनायका॥ ३॥
बोलतां चालतां ये ना कार्यभाग कळेचिना।
बहु मी पीडिलो लोकीं बुद्धि दे रघुनायका॥ ४॥
तुझा मी टोणपा जालो कष्टलो बहुतांपरी।
सौख्यतें पाहतां नाहीं बुद्धि दे रघुनायका॥ ५॥
नेटकें लिहितां ये ना वाचितां चुकतो सदा।
अर्थ तो सांगतां ये ना बुद्धि दे रघुनायका॥ ६॥
प्रसंग वेळ तर्केना सुचेना दीर्घसूचना।
मैत्रिकी राखितां ये ना बुद्धि दे रघुनायका॥ ७॥
कळेना स्फूर्ति होईना आपदा लागली बहू।
प्रत्यहीं पोट सोडीना बुद्धि दे रघुनायका॥ ८॥
संसार नेटका नाहीं उद्वेगू वाटतो जिवी।
परमार्थू कळेना कीं बुद्धि दे रघुनायका॥ ९॥
देईना पुर्विना कोणी उगेचि जन हांसती।
विसरू पडतो पोटीं बुद्धि दे रघुनायका॥ १०॥
पिशुनें वाटती सर्वै कोणीही मजला नसे।
समर्था! तूं दयासिंधू बुद्धि दे रघुनायका॥ ११॥
उदास वाटतें जीवीं आतां जावें कुणीकडे।
तूं भक्तवत्सला रामा बुद्धि दे रघुनायका॥ १२॥
कायावाचामनोभावें तुझा मी म्हणवीतसें।
हे लाज तुजला माझी बुद्धि दे रघुनायका॥ १३॥
सोडवील्या देवकोटी भूभार फेडिला बळें।
भक्तांसी आश्रयो मोठा बुद्धि दे रघुनायका॥ १४॥
उदंड भक्त तुम्हांला आम्हांला कोण पुसतें।
ब्रीद हें राखणें आधीं बुद्धि दे रघुनायका॥ १५॥
उदंड ऐकिली कीर्ति पतितपावना प्रभो।
मी एक रंक दुर्बुद्धि बुद्धि दे रघुनायका॥ १६॥
आशा हे लागली मोठी दयाळू बा दया करी।
आणिक नलगे कांही बुद्धि दे रघुनायका॥ १७॥
रामदास म्हणे माझा संसार तुज लागला।
संशयो वाटतो पोटीं बुद्धि दे रघुनायका॥ १८॥

२०.८

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी।
अती आदरें सर्व सेवा करावी॥
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां।
रघूनायका मागणें हेंचि आतां॥ १॥

तुझें रूपडें लोचनी मी पहावें।
तुझे गूण गातां मनासी रहावें॥
उठो आवडी भक्तिपंथेचि जातां।
रघूनायका मागणें हेंचि आतां॥ २॥

मनीं वासना भक्ति तूझी करावी।
कृपाळूपणें राघवें पूरवावी॥
वसावें मज अंतरीं नाम घेतां।
रघूनायका मागणें हेंचि आतां॥ ३॥

सदासर्वदा योग तूझा घडावा।
तुझे कारणीं देह माझा पडावा॥
नुपेक्षीं मज गूणवंता अनंता।
रघूनायका मागणें हेंचि आतां॥ ४॥

नको द्रव्य-दारा नको येर-झारा।
नको मानसीं ज्ञानगर्वें फुगारा।
सगूणीं मला लावि रे भक्तिपंथा।
रघूनायका मागणें हेंचि आतां॥ ५॥

भवें तापलो प्रीतिछाया करावी।
कृपासागरें सर्व चिंता हरावी॥
मज संकटीं सोडवावें समर्था।
रघूनायका मागणें हेंचि आतां॥ ६॥

मनी कामना कल्पना तें नसावी।
कुबुद्धि कुडी वासना नीरसावी॥
नको संशयो तोडिं संसारवेथा।
रघूनायका मागणें हेंचि आतां॥ ७॥

समर्थापुढें काय मागूं कळेना।
दुराशा मनीं बैसली हे ढळेना॥
पुढें संशयो नीरसीं सर्व चिंता।
रघूनायका मागणें हेंचि आतां॥ ८॥

ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें।
म्हणे दास भक्तासि रे उद्धरावें॥
सुटे ब्रीद आम्हांस सांडुनि जातां।
रघूनायका मागणें हेंचि आतां॥ ९॥

[117] सारासारविचार

२०.९

आदि तुमही हुते। और नहि होई जी।
अकह अति अगह गति। वरण नहि होई जी॥
रूप नहि रेष नहि। श्वेत नहि श्याम जी।
तूं सदा एकरस। रामजी रामजी॥ १॥

प्रथमही आपतें। मूल माया करी।
बहुरि सो त्रिविध व्है। त्रिगुणमय निस्तरी॥
पंचहू तत्त्व ते। रूप अरु नाम जी।
तूं सदा एकरस। रामजी रामजी॥ २॥

विधि रजोगुणलिये। जगत उत्पन्न करै॥
विष्णु सतगुण लिये। पालना उर धरै॥
रुद्र तमगुण लिये। संहरै धाम जी॥
तूं सदा एकरस। रामजी रामजी॥ ३॥

इंद्र आज्ञा लिये। करतु नहि और जी।
मेघ वर्षा करै। सर्वही ठौर जी॥
सूर सासि फिरत है। आठहू जाम जी॥
तूं सदा एकरस। रामजी रामजी॥ ४॥

देव अरु दानवा। जक्ष ऋषि सर्व जी।
साधु अरु सिद्ध मुनि। होत निर्गर्व जी॥
शेषहू सहस्रमुख। भजत निष्काम जी।
तूं सदा एकरस। रामजी रामजी॥ ५॥

जलचरा थलचरा। नभचरा जंत जी।
चारिहूं खानिके। जीव अगनंत जी॥
सर्व उपजै खपै। पुरुष अरु वाम जी।
तूं सदा एकरस। रामजी रामजी॥ ६॥

भ्रमत संसार सब। कितहु नहि दोर जी।
तीनहू लोकमें। कालको सोर जी॥
मनुष्यतन यह बडे। भागते पाम जी।
तूं सदा एकरस। रामजी रामजी॥ ७॥

पूर्व दशहू दिशा। सर्वमें आप जी।
स्तुति को कर सके। पुण्य नहि पाप जी॥
दास सुंदर कहै। देहु विश्राम जी।
तूं सदा एकरस। रामजी रामजी॥ ८॥

... सुंदरदास

२०.१०

विश्वाद्या! करुणाकरा! बहुत मी योनी पहा हिंडलो।
कोठेंही सुख पाहिलें न नयनीं नानापरी दंडलो॥
कांही पुण्य उभारितां अवचटें आलो नृदेहाप्रती।
आतां जन्म पुन्हा नको रघुपते। दे मुक्ति कीं शीघ्र ती॥ १॥

रामा! मी तव दासदास म्हणवीं, मातें कशाचे भय? ।
रामा! जाइन जे स्थळीं सुखघना! होईल तेथें जय॥
रामा! या भुवनत्रयीं तुजविणे नाही दुजा तारक।
रामा! तूं सकळार्थ पूर्ण करिसी तूं तात मी बाळक॥ २॥

न जाणें मी पूजा, न मज समजे ध्यान धरणें।
न जाणें, रूपातें न कळत कशी प्रीति करणें॥
न जाणें पायांतें, न मज तरि सत्संग घडला।
तुझे नामीं रामा! दिन-निशिं मम प्राण जडला॥ ३॥

तूं सेव्य मी सेवक योग्य नातें।
तूं गेय मी गायक, तारिं मातें॥
तूं जाप्य मी जापक पूर्ण कामा।
सायुज्य दाता तरि तूंचि रामा॥ ४॥

स्तंभावाचुनि हें उभे नभ असे पृथ्वी जळीं कीं तरे।
देहो हा बहुछिद्रमग्न असतां त्यामाजि वायू ठरे॥
ऐसे खेळ अचाट दावुनि पहा तूं भिन्न सर्वाहुनी।
तूतें स्वानुभवें विलोकिति जगीं नैराश्यवेत्ते मुनी॥ ५॥

कोठे माहिष अंतरांत शिरुनी वेदांतही बोलसी।
स्कंधी कावड वाहसी, निजमुखें कोणापुढे जेविसी॥
कोठे कागद तारिसी, दळिसि तूं, कोठे पशू ओढिसी! ।
कोणाचे रिण वारिसी परि मला, कां हातिचा सोडिसी? ॥ ६॥

... पांडुरंग

## 21 श्रीकृष्णप्रार्थना

२१.१ अर्जुन...

त्वमादिदेवः पुरुषः पुराणः
त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम
त्वया ततं विश्वमनन्तरूप ॥ ११.३८॥

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः
प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।

नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः
पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥ ११.३९॥

नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते
नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।
अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं
सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥ ११.४०॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं
हे कृष्ण हे यादव हे सखेति ।
अजानता महिमानं तवेदं
मया प्रमादात्प्रणयेन वाऽपि ॥ ११.४१॥

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि
विहारशय्यासनभोजनेषु ।
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं
तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ११.४२॥

पितासि लोकस्य चराचरस्य
त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो
लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव ॥ ११.४३॥

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं
प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः
प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥ ११.४४॥

किरीटिनं गदिनं चक्रहस्तं
इच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।
तेनैव रूपेण चतुर्भुजेन
सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ११.४६॥

... भगवद्गीता अध्याय ११

२१.२ वल्लभाचार्य...

अधरं मधुरं वदनं मधुरं। नयनं मधुरं हसितं मधुरम्
हृदयं मधुरं गमनं मधुरं। मधुराधिपतेरखिलं मधुरम्॥ १॥
वचनं मधुरं वसनं मधुरं। चलितं मधुरं वलितं मधुरम्।
चरितं मधुरं भ्रमितं मधुरं। मधुराधिपतेरखिलं मधुरम्॥ २॥
वेणुर्मधुरो रेणुर्मधुरः। पाणिर्मधुरः पादौ मधुरौ।
नृत्यं मधुरं सख्यं मधुरं। मधुराधिपतेरखिलं मधुरम्॥ ३॥
गीतं मधुरं पीतं मधुरं। युक्तं मधुरं सुप्तं मधुरम्।
दृष्टं मधुरं सृष्टं मधुरं। मधुराधिपतेरखिलं मधुरम्॥ ४॥
रूपं मधुरं तिलकं मधुरं। सलिलं मधुरं कमलं मधुरम्।
गोपी मधुरा लीला मधुरा। मधुराधिपतेरखिलं मधुरम्॥ ५॥

२१.३ श्रीगौरंगप्रभु...

अयि! नन्दतनूज! किंकरं पतितं मां विषमे भवाम्बुधौ।
कृपया निजपादपंकजस्थितधूलीसदृशं विभावय॥ १॥

न धनं न जनं न सुन्दरीं कवितां वा जगदीश! कामये।
मम जन्मनि जन्मनीश्वरे भवताद्भक्तिरहैतुकी त्वयि॥ २॥

नयनं गलदश्रुधारया वदनं गद्गदरुद्धया गिरा।
पुलकैर्निचितं कदा वपुस्तव नामग्रहणे भविष्यति॥ ३॥

२१.४ श्रीराघवचैतन्य...

पुंजीभूत प्रेम गोपांगनानां। एकीभूतं भागधेयं यदूनाम्।
सांद्रीभूतं गुप्तवित्तं श्रुतीनां। श्यामीभूतं ब्रह्म मे सन्निधत्ताम्॥

२१.५ श्रीशंकराचार्य...

श्रियाश्लिष्टो विष्णुः स्थिरचरगुरुर्वेदविषयो
धिया साक्षी शुद्धो हरिरसुरहन्ताब्जनयनः।
गदी शंखी चक्री विमलवनमाली स्थिररुचिः
शरण्यो लोकेशो मम भवतु कृष्णोऽक्षिविषयः॥

२१.६ राजा कुलशेखर...

जयति जयति देवो देवकीनन्दनोऽयं
जयति जयति कृष्णो वृष्णिवंशप्रदीपः।
जयति जयति मेघश्यामलः कोमलांगो
जयति जयति पृथ्वीभारनाशो मुकुन्दः॥ १॥

भवजलधिगतानां द्वंद्ववाताहतानां
सुतसुहृदकलत्रत्राणभारावृतानाम्।
विषमविषयतोये मज्जतामप्लवानां
भवति शरणमेको विष्णुपोतो नराणाम्॥ २॥

बद्धेनांजलिना नतेन शिरसा गात्रै सरोमोद्गमैः
कण्ठेन स्वरगद्गदेन नयनेनोग्दीर्णबाष्पाम्बुना।
नित्यं त्वच्चरणारविन्दयुगलध्यानामृतास्वादिना-
मस्माकं सरसीरुहाक्ष! सततं सम्पद्यतां जीवितम्॥ ३॥

कृष्णो रक्षतु नो जगत्त्रयगुरुः कृष्णं नमस्याम्यहं
कृष्णेनामरशत्रवो विनिहताः कृष्णाय तस्मै नमः।
कृष्णादेव समुत्थितं जगदिदं कृष्णस्य दासोऽस्म्यहं
कृष्णे तिष्ठति सर्वमेतदखिलं हे कृष्ण रक्षस्व माम्॥ ४॥

नमामि नारायणपादपङ्कजं करोमि नारायणपूजनं सदा।
वदामि नारायणनामनिर्मलं स्मरामि नारायणतत्त्वमव्ययम्॥ ५॥

# 22 सात वारांचे भजन

## 22.1 सोमवार

- १ -

पवित्र शीतळ जळ माथां मन्दाकिनी।
कण्ठी धरियला वन्हि नवल काय ॥ धृ॥

गरुडारूढ मधुसूदन हृदयीं वसिजे पूर्ण।
कण्ठी सर्पाभरण नवल काय ॥ १॥

सिंहावरी ओळंगत अंकी गिरिजा स्वस्थ।
मारिला कुंजर दैत्य नवल काय॥ २॥

अहो लीला-विश्वम्भरा कृपामूर्ती जगदोद्धारा।
तारिसी मुक्तेश्वरा नवल काय॥ ३॥

- २ -

दण्ड-डमरूमंडित पिनाकपाणी॥ धृ॥
पांच मुखे पंधरा डोळे। गळां साजूक सीसाळे॥ १॥
हिमालयाचा जामात। हातीं शोभे सरळ गात॥ २॥
मस्तकीं वाहे गंगाजळ। कंठी शोभे हळाहळ॥ ३॥
माथां मोठा जटाभार। अंगीं फुंफती विखार॥ ४॥
रामीरामदास स्वामी। चिंतीतसे अंतर्यामी॥ ५॥

- ३ -

पाहा पाहा तुम्ही डोळां। माझा भोळा शंकर॥ १॥
ज्याचें देणें अवघ्यां सम। नाही विषम कोणासी॥ २॥
भावें तोषे कर्पूरगौर। हर हर वदतां॥ ३॥
ध्यान धरूनि स्मशानी। जपे रामनाम मनीं॥ ४॥
शंभूचे चरणावरी। लोळे सोनार नरहरी॥ ५॥

- ४ -

शिव आणि विष्णु एकची प्रतिमा।
ऐसा ज्यांचा प्रेमा सदोदित॥ १॥

धन्य ते संसारी नर आणि नारी।
वाचे हर हरी उच्चारीत॥ २॥

नाही पैं भेद अवघा मनीं अभेद।
द्वेषाद्वेषसंबंध उरीं नुरे॥ ३॥

सोनार नरहरि न देखे द्वैत।
अवघा मूर्तिमंत एकरूप॥ ४॥

- ५ -

माझे प्रेम तुझे पायीं। राहो ऐसे करी कांही॥ १॥
मागणे तें हेंचि मागो। आणिका न लागो छंदासी॥ २॥
काया वाचा आणि मन। केले समर्पण तव चरणीं॥ ३॥
हाचि माझा निर्धार। म्हणे नरहरि सोनार॥ ४॥

## 22.2 मंगळवार

- ६ -

सदा आनंदभरित। रंग साहित्य संगीत॥ १॥
जगन्माता जगदीश्वरी। जगज्जननी जगदुद्धारी॥ २॥
त्रिभुवनींच्या वनिता। बाळ तारुण्य समस्तां॥ ३॥
वसे आकाशीं पाताळीं। सर्व काळ तीन्ही काळीं॥ ४॥
जिच्या वैभवाचे लोक। हरिहर ब्रह्मादिक॥ ५॥
सर्व देहा हालविते। चालविते बोलविते॥ ६॥
मूळ माया विस्तारली। सिद्ध-साधकाची बोली॥ ७॥
भक्ति मुक्ति योगस्थिति। आदिमुक्ति सहजस्थिति॥ ८॥
मुळीं रामवरदायिनी। रामदास ध्यातो मनीं॥ ९॥

- ७ -

अनाथाचा नाथ दीनाचा दयाळ।
म्हणवोनी सांभाळ करी माझा॥ १॥
तुज ऐसा देव नाही त्रिभुवनीं।
म्हणवोनी चरणीं विनटले॥ २॥
बापा विठ्ठलराया करी कृपादान।
सांभाळी वचन आपुले तें॥ ३॥
लाडाई म्हणे देवा भेट देई वेगीं।
ब्रीद तुझे जगीं दीनानाथ॥ ४॥

- ८ -

राम गावा राम ध्यावा। राम जीवींचा विसांवा॥ १॥
कल्याणाचे जे कल्याण। रघुरायाचे गुणगान॥ २॥
मंगळाचे जे मंगळ। राम कौसल्येचा बाळ॥ ३॥
राम कैवल्याचा दानी। रामदास अभिमानी॥ ४॥

- ९ -

आकाश तुटोनी पडो नाना संकटे घडो।
परि माझे मन तुजसी जडो रे विठोबा॥ १॥
सुधारस रस प्यालो स्वर्गी इंद्रचि जालो।
न पवेचि विश्रांति येथेचि आलो रे विठोबा॥ २॥
जन निंदो वंदो परी मालो तुझा तुझे घरी।
आतां तुझे उचित तूं करी रे विठोबा॥ ३॥

## 22.3 बुधवार

- १० -

रामनाम कथा गंगा। श्रवणें पावन करी जगा॥ १॥
तिसी प्रेमपूर आला। शंकरहृदयी सामावला॥ २॥
रामदासांची माउली। आळशावरी गंगा आली॥ ३॥
झाले कीर्तन या भावें। संत-सज्जनीं मानावे॥ ४॥
आम्ही रामाचे पाईक। आमुचा श्रीराम नाईक॥ ५॥
आमुचा भाव रामापायीं। आम्ही रामावांचुनि नाही॥ ६॥
म्हणे उद्धव चिद्घन। आम्ही झालो रामार्पण॥ ७॥

- ११ -

देहुडा चरणीं वाजवितो वेणू।
गोपिकारमणू स्वामी माझा॥ १॥
देखिला गे माये येमुनेच्या तीरीं।
हात खांद्यावरी राधिकेच्या॥ २॥
गुंजावर्ण डोळे माथां बाबरझोटी।
मयूरपिच्छ वेष्टी शोभतसे॥ ३॥
सगुण मेघश्याम लावण्यसुंदर।
नामया दातार केशीराज॥ ४॥

- १२ -

भावें पाचारितां। विठ्ठलना। न्वें आळवितां॥ १॥
येसी धांवत धांवत। माउली तूं कृपावंत॥ २॥
देसी प्रेमपान्हा। मुखीं घालूनियां स्तना॥ ३॥
निळा म्हणे घेसी। तया अंकी खेळविसी॥ ४॥

- १३ -

रामनाम वेदोवाणी। मना झाली समाधानी॥ १॥
म्हणतां राम वेळोवेळां। जळती पापें अग्निज्वाळा॥ २॥
रामनामाचा प्रताप। काय पुढे येइल पाप॥ ३॥
शिवदास म्हणे नाम। आम्ही हेंचि केले काम॥ ४॥

## 22.4 गुरुवार

- १४ -

तीन शिरें सहा हात। तया माझे दंडवत॥ १॥
कांखे झोळी पुढे श्वान। नित्य जान्हवीचे स्नान॥ २॥
माथां शोभे जटाभार। अंगीं विभूति सुंदर॥ ३॥
शंख चक्र गदा हातीं। पायीं खडावा गर्जती॥ ४॥
तुका म्हणे दिगंबर। तया माझा नमस्कार॥ ५॥

- १५ -

नमन माझे गुरुराया। महाराजा दत्तात्रेया॥ १॥
तुझी अवधूत मूर्ति। माझ्या जीवाची विश्रांति॥ २॥
जीवींचे सांकडें। कोण उगवील कोडें॥ ३॥
अनसूयासुता। तुका म्हणे पाव आतां॥ ४॥

- १६ -

दत्त दत्त म्हणतां नित्य। नामें करी गुणातीत॥ १॥
दत्त नामाचा सोहळा। धाक पडे कळिकाळा॥ २॥
दत्त दत्त वाणी। दत्तरूप होय प्राणी॥ ३॥
दत्त नामाचा छंद। नामें प्रगटे परमानंद॥ ४॥
एका जनार्दनीं दत्त। अवघा स्वानंदभरित॥ ५॥

- १७ -

माझी देवपुजा देवपुजा। पाय तुझे गुरुराजा॥ धृ॥
गुरुचरणाची माती। तेच माझी भागीरथी॥ १॥
गुरुचरणाचा बिंदु। तोचि माझा क्षीरसिंधु॥ २॥
गुरुचरणाचे ध्यान। तेंचि माझे संध्या-स्नान॥ ३॥
शिवदिन केसरीपायीं। सद्गुरुवांचुनि दैवत नाही॥ ४॥

## 22.5 शुक्रवार

- १८ -

आजि सोनियाचा दिवस। दृष्टी देखिलें संतांस॥ १॥
जीवा सुख थोर जाले। माझे माहेर भेटले॥ २॥
अवघा निरसला सीण। संतचरण देखतां॥ ३॥
आजी दिवाळी दसरा। सेना म्हणे आले घरा॥ ४॥

- १९ -

देहीं देखिली पंढरी। आत्मा अविनाश विटेवरी॥ १॥

तो हा पांडुरंग जाणा। शांति रुक्मिणी निजांगना॥ २॥
आकारले तितुकें नासे। आत्मा अविनाश विठ्ठल असे॥ ३॥
ऐसा विठ्ठल हृदयीं ध्यायीं। चोखामेळा जडला पायीं॥ ४॥

- २० -

नामाचिया बळें न भिऊं सर्वथा।
कळिकाळाच्या माथां सोटे मारूं॥ १॥
वैकुंठीचा देव आणूं या कीर्तनीं।
विठ्ठल गाऊनी नाचूं रंगीं॥ २॥
सुखाचा सोहळा नित्य ही दिवाळी।
प्रेमें वनमाळीं चित्तीं धरूं॥ ३॥
सांवता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा।
तेणें मुक्ति द्वारा ओळंगती॥ ४॥

- २१ -

पतितपावना जानकीजीवना।
वेगें माझ्या मना पालटावें॥ १॥
वैराग्याचा लेश नाही माझे अंगी।
बोलतसे जगीं शब्दज्ञान॥ २॥

देहे हें कारणीं लावावे नावडे।
आळस आवडे सर्व काळ॥ ३॥
रामदास म्हणे लाज तुझी तुज।
कोण पुसे मज अनाथासी॥ ४॥

## 22.6 शनिवार

- २२ -

शरण शरण जी हनुमन्ता। तुज आलो रामदूता॥ १॥
काय भक्तीच्या त्या वाटा। मज दावाव्या सुभटा॥ २॥
शूर आणि धीर। स्वामिकाजी तूं सादर॥ ३॥
तुका म्हणे रुद्रा। अंजनीचिया कुमरा॥ ४॥

- २३ -

केली सीताशुद्धी। मूळ रामायणाआधीं॥ १॥
ऐसा प्रतापीं गहन। सकळ भक्तांचे भूषण॥ २॥
जाऊनी पाताळा। केली देवीची अवकळा॥ ३॥
राम लक्षुमण। नेले आणिले चोरून॥ ४॥
जोडुनियां कर। उभा सन्मुख समोर॥ ५॥
तुका म्हणे जपें। वायुसुता जाती पापें॥ ६॥

- २४ -

काम घातला बादोडी। काळ केला देशधडी॥ १॥
तया माझे दंडवत। कपिकुळीं हनुमंत॥ २॥
श्रीर वज्राऐसें। कवळी ब्रह्मांड जो पुच्छें॥ ३॥
रामरायाच्या सेवका। शरण आलो म्हणे तुका॥ ४॥

- २५ -

हनुमंत महाबळी। रावणाची दाढी जाळी॥ १॥
तया माझा नमस्कार। वारंवार निरंतर॥ २॥
करोनी उड्डाण। केले लंकेचे शोधन॥ ३॥
जाळियेली लंका। धन्य धन्य म्हणे तुका॥ ४॥

- २६ -

बाप माझा ब्रह्मचारी। मातेसरी अवघ्या नारी॥ १॥
उपजतां बालपणीं। गिळूं पाहे वासरमणी॥ २॥
अंगीं सिंदुराची उटी। जया सोन्याची कांसोटी॥ ३॥
रामकृपेची साउली। रामदासाची माउली॥ ४॥

## 22.7 रविवार

- २७ -

कां रे अनाथबंधु येवढें कां केले निर्वाण।
किती अंत पाहशील माझा कंठि राहिला प्राण॥ धृ॥
ब्रह्मादि वंदिती पाय तूं त्रैलोक्याचा धणी।
तुझा मी म्हणवितो मजसी चिंतेची कांचणी॥ १॥
सुवर्णाची लंका नेउनि दिधली शरणांगता।
जगदीश जगन्नायका तुझी कळिकाळावर सत्ता॥ २॥
कामधेनु कल्पतरु क्षीरसागर तुजपाशी।
वितभर पोटासाठीं तोंड वासूं कवणासी॥ ३॥
मुक्तीच्या माहेरा ऋद्धि सिद्धि तुझ्यापाशीं।
क्षीरार्णवा रंक मालो मरतो उपवासी॥ ४॥

- २८ -

तुजविण कोण दया करणार॥ धृ॥
श्रीजगदीश हरे सुखसिंधो। म्हणतां अघ हरणार॥ १॥
चिंताडोहीं बुडतां तेथें। येउनि कर धरणार॥ २॥
टाकुं नको मज निज यश राखीं। विश्वातें भरणार॥ ३॥
राजारामीं लीन प्रसादिक। वचना अनुसरणार॥ ४॥

- २९ -

सांडियेली काया। वरी ओवाळूनी पायां॥ १॥
शरण शरण नारायणा। मज अंगीकारा दीना॥ २॥
आलो लोटांगणी। रुळें तुमचे चरणीं॥ ३॥
तुका म्हणे कई। डोई ठेवीन हे पायीं॥ ४॥

- ३० -

राघवा तुझा, तुझा लागो छंद।
न जडो दुर्मतिचा गंध॥ धृ॥

न रुचो विषय, विषय विषावाणी।
आवडो संतांची वाणी॥ १॥

अंगीं रोमांच, रोमांच नयनपाणी।
झिरपो तुझी गातां गाणीं॥ २॥

विठ्ठलपंतासीं, पंतासि हेंचि काम।
आवडो सदा तुझे नाम॥ ३॥

# 23 प्रेमळ अभंग

## 23.1 निवृत्तिनाथ

- १ -

अनंतरूप देव अनंत आपण।
अंतर्बाह्य खूण योगियासी॥ १॥

तो हा हरि माये गोकुळीं अवतार।
गोपींसंगें श्रीधर खेळतुसे॥ २॥

शास्त्रांसी नाकळे श्रुतीही बरळे।
तो गोपवेषें खेळे गोपाळांमाजी॥ ३॥

निवृत्तीचे सार गयनी विचार।
ब्रह्म चराचर माजी वसे॥ ४॥

## 23.2 श्रीज्ञानदेव

- १ -

रूप पाहतां लोचनीं। सुख झाले वो साजणी॥ १॥
तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा॥ धृ॥

बहुता सुकृताची जोडी। म्हणुनि विठ्ठलीं आवडी॥ २॥
सर्व सुखाचे आगर। बाप रखुमादेवीवर॥ ३॥

- २ -

अवघाचि संसार सुखाचा करीन।
आनंदे भरीन तिन्ही लोक॥ १॥

जाईन गे माये तया पंढरपुरा।
भेटेन माहेरा जीवींचिया॥ धृ॥
सर्व सुकृताचे फळ मी लाहीन।
क्षेम मी देईन पांडुरंगीं॥ २॥

बापरखुमादेवीवरु विठ्ठलेसी भेटी।
आपुले संवसाटी करुनि ठेला॥ ३॥

- ३ -

योगियां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी।
पाहतां पाहतां मना न पुरे धणी॥ १॥

देखिला देखिला गे माये देवाचा देव।
फिटला संदेहो निमाले दुजेपण॥ २॥

अनंतरूपें अनंतवेषें देखिले म्यां त्यासी।
बापरखुमादेवीवरु खूण बाणली कैसी॥ ३॥

- ४ -

सत्य ज्ञानानंत गगनाचे प्रावर्ण।
नाही रूप वर्ण गुण जेथे॥ १॥

तो हा रे श्रीहरी पाहिला डोळेभरी।
पाहतें पाहणें दूरी सारोनियां॥ २॥

ज्ञानदेव म्हणे ज्योतीची निज ज्योती।
ते हे मूर्ती उभी विटेवरी॥ ३॥

## 23.3 श्रीसोपान

- १ -

राम सर्वोत्तम या नामें निखळ।
जन हें सफळ दिसताहे॥ १॥

भिन्न नाही दुजें सर्व आत्मराज।
नाचताती भोज योगिराज॥ २॥

माता पिता देव गृह दारा जन।
सर्व जनार्दन सर्वा रूपीं॥ ३॥

सोपान खेचर ब्रह्म माजिवडें।
ब्रह्मांडायेवढे आत्माराम॥ ४॥

## 23.4 मुक्ताबाई

- १ -

शांति क्षमा वसे देहीं देव पैसे।
चित्त समरसें मुक्तमेळू॥ १॥

निर्गुणें उपरमु देव पुरुषोत्तमु।
प्रकृति संगमु चेतनेचा॥ २॥

सज्ञानी दिवटा अज्ञानी तो पैठा।
निवृत्तीच्या तटा नेतु भक्ता॥ ३॥

मुक्ताबाई दिवस अवघा हृषीकेश।
केशवेंविण वास शून्य पैंसे॥ ४॥

## 23.5 श्रीचांगदेव

- १ -

आकार पूजितां निराकार जालें।
शून्यीं बुडाले बाईयांनो॥ १॥

शून्याचा अंकूर शून्य फळले।
व्योमाकार जाले मन तेथे॥ २॥

तेथे फळ ना डाळ जाती ना कुळ।
वटेश्वर चांगा जाला निर्मूळ॥ ३॥

## 23.6 श्रीनामदेव

- १ -

बोलूं ऐसे बोल। जेणें बोलें विठ्ठल डोले॥ १॥
प्रेम सर्वांगाचे ठायीं। वाचे विठ्ठल, रखुमाई॥ २॥
नाचूं कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावूं जगीं॥ ३॥
परेहूनि परतें घर। तेथें राहूं निरंतर॥ ४॥
सर्व सत्ता आली हाता। नामयाचा खेचर दाता॥ ५॥

- २ -

तुझिये सत्तेनें वेदासी बोलणे।
सूर्यासी चालणे तुझिया बळे॥ १॥
ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी।
वर्म हें जाणुनी शरण आलो॥ २॥
मेघानी वर्षावे पर्वती बैसावे।
वायूने विचरावे सत्ते तुझे॥ ३॥
नामा म्हणे कांही न हाले साचार।
प्रभू तूं निर्धार पांडुरंगा॥ ४॥

- ३ -

देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो॥ १॥
चरण मी न सोडी सर्वथा। आण तुझी पंढरीनाथा॥ २॥
वदनी तुझे मंगळ नाम। हृदयी अखंडित प्रेम॥ ३॥
नामा म्हणे केशवराजा। केला पण चालवी माझा॥ ४॥

- ४ -

अमृताहुनी गोड नाम तुझे देवा।
मन माझे केशवा कां पां नेघे? ॥ १॥
सांग पंढरीराया काय करूं यासी? ।
कां रूप ध्यानासी न ये तुझे? ॥ २॥
कीर्तनी बैसतां निद्रे नागविले।
मन माझे गुंतले विषयसुखा॥ ३॥
हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्ती।
न ये माझ्या चित्तीं नामा म्हणे॥ ४॥

- ५ -

पंढरीचा वास चंद्रभागे स्नान। आणीक दर्शन विठोबाचे॥ १॥
हेंचि मज घडो जन्मजन्मांतरी। मागणे श्रीहरी नाही दुजे॥ २॥
मुखी सदा नाम संतांचे दर्शन। जनीं जनार्दन ऐसा भाव॥ ३॥
नामा म्हणे नित्य तुझे महाद्वारीं। कीर्तन गजरीं सप्रेमाचे॥ ४॥

- ६ -

तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा।
पाजीं प्रेमपान्हा पांडुरंगे॥ १॥
तूं माझी गाउली मी तुझे वासरूं।
नको पान्हा चोरूं पांडुरंगे॥ २॥
तूं माझी हरिणी मी तुझे पाडस।
तोडी भवपाश पांडुरंगे॥ ३॥
तूं माझी पक्षिणी मी तुझे अंडज।
चारा घाली मज पांडुरंगे॥ ४॥
नामा म्हणे होसी भक्तीचा वालभा।
मागे पुढे उभा सांभाळिशी॥ ५॥

- ७ -

तुझे प्रेम माझ्या हृदया आवडी।
चरण मी न सोडी पांडुरंगा॥ १॥
इंद्रियांचे व्यापार अवघेचि तोडीं।
प्रेमरसगोडी देई मातें॥ २॥
चंद्र चकोराचा पुरवी सोहळा।
काय त्याच्या कळा न्यून होती? ॥ ३॥
नामा म्हणे मज अनाथा सांभाळी।
हृदयकमळी स्थिर राहें॥ ४॥

- ८ -

काय गुण-दोष माझे विचारिसी? ।
आहे मी तो राशी अपराधांची॥ १॥

अंगुष्ठापासोनी मस्तकापर्यंत।
अखंड दुश्चित आचरलो॥ २॥
स्वप्नी देवा तुझी नाही घडली भक्ती।
पुससी विरक्ती कोठोनियां॥ ३॥
तूंचि माझा गुरु तूंचि माझा स्वामी।
सकळ अंतर्यामीं गाऊं तुज॥ ४॥
नामा म्हणे माझे चुकवी जन्म-मरण।
नको करूं शीण पांडुरंगा॥ ५॥

- ९ -

ममता तुटेना मज केशिराजा।
अंगी भाव दुजा लागे पाठी॥ १॥
शरीरीं तितिक्षा नाही क्षमा-शांती।
यालागीं श्रीपती वायां गेलो॥ २॥
नामा म्हणे देवा तारिसी पतिता।
म्हणोनियां सत्ता केली आम्ही॥ ३॥

- १० -

हरि रे वाढवेळ झाला। कोण्या भक्तानें गोंविला॥ १॥
झडकरि येई गा विठ्ठला। कंठ आळवितां शोषिला॥ २॥
प्राण केंव्हां येईल माझा। आलिंगील चहूं भुजा॥ ३॥
नामा गहिंवरें दाटला। पूर धरणीये लोटला॥ ४॥

- ११ -

पाहतां तुझे चरण हरली भवव्यथा।
पुढती एक चिंता वाटतसे॥ १॥
झणीं मुक्तपद देसी पांडुरंगा।
मग या संतसंगा कोठे पाहूं? ॥ धृ॥
मग हे पंढरी आनंदसोहळा।
कवणाचे डोळां पाहूं देवा? ॥ २॥
मग हे हरिकथा अमृतसंजीवनी।
कवणाचे श्रवणीं ऐको देवा? ॥ ३॥
नामा म्हणे मज पंढरीची सोय।
अनंत जन्म होय याचिलागी॥ ४॥

## 23.7 जनाबाई

- १ -

ये ग ये ग विठाबाई। माझे पंढरीचे आई॥ १॥
भीमा आणि चंद्रभागा। तुझ्या चरणींच्या गंगा॥ २॥
इतुक्यासहित त्वां बा यावें। माझ्या अंगणीं नाचावे॥ ३॥
माझा रंग तुझे गुणीं। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

- २ -

ज्याचा सखा हरी। त्यावरि विश्व कृपा करी॥ १॥
उणें पडो नेदी त्याचे। वारें सोसी आघाताचे॥ २॥
तयावीण क्षणभरी। कदा आपण नव्हे दुरी॥ ३॥
अंग आपुले बोडोनी। त्याला राखे जो निर्वाणी॥ ४॥
ऐसा अंकित भक्तांसी। म्हणे नामयाची दासी॥ ५॥

- ३ -

कां गा न येसी विठ्ठला। ऐसा कोण दोष मला॥ १॥
माय बाप तूंचि धणी। मला सांभाळीं निर्वाणी॥ २॥
त्वां बा उद्धरिले थोर। तेथें कोण मी पामर॥ ३॥
दीननाथा दीनबंधु। जनी म्हणे कृपासिंधु॥ ४॥

- ४ -

गंगा गेली सिंधूपाशीं। तेणें अव्हेरिले तिसी॥ १॥
तिणे सांगावें कवणाला? ऐसे बोलें गा विठ्ठला॥ धृ॥
जळ कोपले जळाचरा। माता अव्हेरी कुमरा॥ २॥
जनी म्हणे शरण आले। पाहिजे ते उद्धरिले॥ ३॥

- ५ -

चिंतन चित्ताला। लावीं मनाच्या मनाला॥ १॥
उन्मनीच्या[118] सुखाआंत। पांडुरंग भेटी देत॥ २॥
कवटाळुनि पोटीं-पाठीं। जनी म्हणे सांगूं गोष्टी॥ ३॥

- ६ -

आम्ही पातकांची राशी। आलो तुझ्या पायांपाशी॥ १॥
मना येईल तें तूं करी। आता तारीं अथवा मारीं॥ २॥
जनी म्हणे सृष्टीवरी। एक अससी तूं बा हरी॥ ३॥

- ७ -

रुक्मिणीच्या कुंका। सुरां असुरां प्रिय लोकां॥ १॥
धांव धांव माझे आई। सखे साजणी विठाबाई॥ २॥
शिवाचिया जपा। मदनताता बा निष्पापा॥ ३॥
दयेच्या सागरा। जनी म्हणे अमरेश्वरा॥ ४॥

## 23.8 श्रीएकनाथ

- १ -

समचरणी उभा चैतन्याचा गाभा।
त्रैलोक्याची शोभा पांडुरंग॥ १॥
भक्तांचे जीवन साधकांचे साधन।
सुखाचे निधान पांडुरंग॥ २॥
मुक्तिकल्पद्रुम-महाफळ उत्तम।
गोपिकांचा काम पांडुरंग॥ ३॥
एका एकीं विनटला तो सदा संचला।
एका जनार्दनीं भेटला पांडुरंग॥ ४॥

[118] जेथे मन लीन होते अशी तुर्येच्या पलीकडली पांचवी अवस्था

- २ -

जन्मोजन्मीं आम्ही बहु पुण्य केले।
मग या विठ्ठलें कृपा केली॥ १॥
जन्मोनी संसारीं झालो त्याचा दास।
माझा तो विश्वास पांडुरंगीं॥ २॥
भ्रमर सुवासीं मधावरी मासी।
तैसें या देवासीं मन माझे॥ ३॥
आणिका देवांसी नेघे माझे चित्त।
गोड गातां गीत विठोबाचे॥ ४॥
एका जनार्दनीं मज तेथें न्यावे।
हाडसोनी द्यावें संतांपाशी॥ ५॥

- ३ -

अणुरेणुपासुनी ब्रह्मांडी भरला।
तो म्यां देखिला विटेवरी॥ १॥
स्थावर जंगम भरूनी उरला।
तो म्यां देखिला पंढरीये॥ २॥
वेदशास्त्र पुराणें गाती जयासाठी।
तो पुंडलिकापाठीं उभा दिसे॥ ३॥
वेडावल्या श्रुती न कळे म्हणती।
तो उभा श्रीपती वाळुवंटी॥ ४॥
संतांचा समागम गाती आनंदानें।
तो हरिकीर्तनीं नाचतसे॥ ५॥
एका जनार्दनीं सुखाचा सागरू।
विठ्ठल कल्पतरू वोळला आम्हां॥ ६॥

- ४ -

तुमचे नामसंकीर्तन। हेंचि माझे संध्यास्नान॥ १॥
तुमचे पायांचा साक्षेप। हाचि माझा कालक्षेप॥ धृ॥
तुमचे पायांचे वंदन। हेंचि माझे अनुष्ठान॥ २॥
तुमचे पायांपाशी निद्रा। हेचि माझी प्रेममुद्रा[119]॥ ३॥
एका जनार्दनाकार। ब्रह्मरूप हा संसार॥ ४॥

- ५ -

अनंताचे गुण अनंत अपार।
न कळेचि पार श्रुतिशास्त्रां॥ १॥
तो हा महाराज विटेवरी उभा।
लावण्याचा गाभा शोभतसे॥ धृ॥
कटीवर कर ठेवी जगजेटी[120]।
पाहे कृपादृष्टी भक्तांकडे॥ २॥
पुंडलिकाचे तेजें जोडलासे ठेवा। एका जनार्दनी सेवा देई देवा॥ ३॥

[119] प्रेमसमाधि
[120] जगन्नाथ, जगांत श्रेष्ठ, परमपुरुष

- ६ -[121]

काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल। नांदतो केवळ पांडुरंग॥१॥
भावभक्ति भीमाउदक तें वाहे। बरवा शोभतसे पांडुरंग॥ धृ॥
दया क्षमा शांति हेंचि वाळुवंट। मिळालासे थाट वैष्णवांचा॥२॥
ज्ञान ध्यान पूजा विवेक आनंद। हाचि वेणुनाद शोभतसे॥ ३॥
दश इंद्रियांचा एक मेळा केला। ऐसा गोपाळकाला होत असे॥ ४॥
देहीं देखिली पंढरी जनीं वनीं। एका जनार्दनीं वारी करी॥ ५॥

- ७ -

देवा माझे मन लागो तुझे चरणी। संसारव्यसनीं पडों नेदीं॥१॥
नामस्मरण घडो संतसमागम। वाउगाचि भ्रम नको देवा॥ धृ॥
पायीं तीर्थयात्रा मुखीं रामनाम। हाचि माझा नेम सिद्धी नेई॥२॥
आणीक मागणें नाहीं नाहीं देवा। एका जनार्दनीं सेवा दृढ देई॥३॥

- ८ -

एकपणे पाहतां सृष्टी। भरला दृष्टी विठ्ठल॥ १॥
नाहीं द्वैताची भावना। बैसला ध्यानीं विठ्ठल॥ धृ॥
मी-तूंपणा वोस ठाव। भरला सर्व विठ्ठल॥ २॥
ध्यानीं विठ्ठल मनीं विठ्ठल।
एका जनार्दनीं अवघा विठ्ठल॥ ३॥

- ९ -

भाव तोचि देव, भाव तोचि देव।
ये अर्थी संदेह धरूं नका॥ १॥
भावें भक्ति फळे, भावें देव मिळे।
निजभावें सोहळे स्वानंदाचे॥ धृ॥
भावचि कारण, भावचि कारण।
यापरतें साधन नाहीं नाहीं॥ २॥
एका जनार्दनीं भावाच्या आवडी।
मनोरथकोडीं पुरती तेणें॥ ३॥

- १० -

येथुनी पाहें तेथवरी। तंव तंव अवघा दिसे हरी॥ १॥
आतां जाउनि कोठें पाहूं। जेथें पाहूं तेथें देवू॥ धृ॥
गिरिकपाटी कंदरीं। जिकडे पाहें तिकडे हरी॥ २॥
एका बैसला निरंजनीं। जनार्दन जनीं वनीं॥ ३॥

[121] ह्या उत्कृष्ट अभंगाचे निरंतर मनन करावे. ह्याच अर्थाचे चोखामेळा व तुकोबाराय ह्यांचेहि अभंग आहेत.

- ११ -

भक्तिप्रेमेंवीण ज्ञान[122] नको देवा।
अभिमान नित्य नवा तयामाजी॥ १॥
प्रेमसुख देई प्रेमसुख देई।
प्रेमेंवीण नाही समाधान॥ धृ॥
रांडवेनें जेविं शृंगारूं पैं केला।
प्रेमेंवीण झाला ज्ञानी तैसा॥ २॥
एका जनार्दनीं प्रेम अति गोड।
अनुभवी सुरवाड[123] जाणतील॥ ३॥

- १२ -

गातो एका ध्यातो एका। अंतर-बाहिर पाहतो एका॥ १॥
अगुणीं एका सगुणीं एका। गुणातीत देखों एका॥ धृ॥
जनीं एका वनीं एका। निरंजनी देखो एका॥ २॥
संतजनां पढिये एका। जनार्दन कडिये एका॥ ३॥

- १३ -

सकळ देवांचा जनिता। त्रिगुणसत्ता चालविता[124]॥ १॥
शरण जातां त्याच्या पायां। सर्व हारपली माया॥ धृ॥
भेदाभेद निवारले। सर्व स्वरूप कोंदले॥ २॥
एका जनार्दनीं शिवें। जीवपणा मुकलो जीवें॥ ३॥

## 23.9 श्रीतुकाराम

- १ -

सुंदर तें ध्यान उभे विटेवरी।
कर कटावरी ठेवूनीयां॥ १॥
गळां तुळसीहार कांसे पितांबर।
आवडे निरंतर हेंचि ध्यान॥ धृ॥
मकर कुंडले तळपती[125] श्रवणीं।
कंठी कौस्तुभमणी विराजित॥ २॥
तुका म्हणे माझे हेंचि सर्व सुख।
पाहीन श्रीमुख आवडीने॥ ३॥

- २ -

सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ति।
रखुमाईच्या पती सोयरिया॥ १॥

[122] शब्दशास्त्राच्या ज्ञानाबरोबर अहंकार वाढत मात्र असतो.
[123] प्रेमसुख
[124] गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति (गीता अ. १४)
[125] शोभतात

गोड तुझे रूप गोड तुझे नाम।
देई मज प्रेम सर्व काळ॥ धृ॥
विठो माउलिये हाचि वर देई।
संचरोनि राही हृदयामाजी॥ २॥
तुका म्हणे कांही न मागो आणीक।
तुझे पायीं सुख सर्व आहे॥ ३॥

- ३ -

कन्या सासुऱ्यासी जाये। मागें परतोनी पाहे॥ १॥
तैसें झाले माझ्या जीवा। कधीं भेटसी केशवा॥ धृ॥
चुकलिया माये। बाळ हुरूहुरू पाहे॥ २॥
जीवनावेगळी मासोळी। तैसा तुका तळमळी॥ ३॥

- ४ -

शास्त्रांचे जे सार वेदांची जो मूर्ति।
जो माझा सांगाती प्राणसखा॥ १॥
म्हणवूनि नाही आणिकांचा पांग।
सर्व झाले सांग नामें एका॥ २॥
सगुण निर्गुण जयाची ही अंगे।
तोचि आम्हासंगे क्रीडा करी॥ ३॥
तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते।
स्वयंभु आइते केले नव्हो॥ ४॥ [126]

- ५ -

न लागे हें मज तुझें ब्रह्मज्ञान[127]।
गोजिरें सगुण रूप पुरे॥ १॥
लागला उशीर पतितपावना।
विसरोनि वचना गेलासी या॥ धृ॥
जाळोनि संसार बैसलो अंगणी।
तुझें नाही मनीं मानसींहि॥ २॥
तुका म्हणे नको रागेजों विठ्ठला।
उठीं देई मला भेटी आतां॥ ३॥

- ६ -

देखोनियां तुझ्या रूपाचा आकार।
उभा कटीं कर ठेवूनियां॥ १॥
तेणें माझ्या चित्ता होते समाधान।
वाटतें चरण न सोडावे॥ धृ॥
मुखें[128] गातो गीत वाजवितो टाळी।
नाचतो राऊळीं प्रेमसुखें॥ २॥

[126] आम्ही ब्रह्मदेवाचेहि अनादि बाप, निर्मिलेले किंवा घडलेले नसून स्वयंभू आहोत.
[127] नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव। मी भक्त तूं देव ऐसें करी।
[128] वर्णन करी, वर्णी.

तुका म्हणे मज तुझ्या नामापुढे।
तुच्छ हें बापुडें सकळही॥ ३॥

- ७ -

न मिळो खावया न वाढो संतान।
परि हा नारायण कृपा करो॥ १॥
ऐसी माझी वाचा मज उपदेशी।
आणिक लोकांसी हेंचि सांगे॥ धृ॥

विटंबो शरीर होत कां विपत्ती।
परी राहो चित्तीं नारायण॥ २॥
तुका म्हणे नाशिवंत हें सकळ।
आठवे गोपाळ तेंचि हित॥ ३॥

- ८ -

तुजविण वाणी आणिकांची थोरी।
तरी माझा हरी जिव्हा झडो॥ १॥
तुजविण चित्ता आवडे आणिक।
तरी हा मस्तक भंगो माझा॥ धृ॥
नेत्रीं आणिकांसी पाहीन आवडी।
जातु तेचि घडी चांडाळ हे॥ २॥
कथामृतपान न करिती श्रवण।
काय प्रयोजन मग यांचे॥ ३॥
तुका म्हणे काय वांचूनि कारण।
तुज एक क्षण विसंबतां॥ ४॥

- ९ -

घेई घेई माझे वाचे। गोड नाम विठोबाचे॥ १॥
डोळे तुम्ही घ्या रे सुख। पाहा विठोबाचें मुख॥ धृ॥
तुम्ही आईका रे कान। माझ्या विठोबाचे गुण॥ २॥
मना तेथें धांव घेई। राहीं विठोबाचे पायीं॥ ३॥
तुका म्हणे जीवा। नको सोडूं या केशवा॥ ४॥

- १० -

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण।
आम्हां नारायण तैशापरी॥ १॥
सर्वभावें लोभ्या आवडे हें धन।
आम्हां नारायण तैशापरी॥ धृ॥
तुका म्हणे एकविध झाले मन।
विठ्ठलावांचून नेणें दुजें॥ २॥

- ११ -

विठ्ठल आमुचे जीवन। आगम निगमांचें स्थान।
विठ्ठल सिद्धींचें साधन। विठ्ठल ध्यान विसांवा॥ १॥
विठ्ठल कुळींचे दैवत। विठ्ठल वित्त गोत चित्त।
विठ्ठल पुण्य पुरुषार्थ। आवडे मात विठ्ठलाची॥ २॥
विठ्ठल विस्तारला जनीं। सप्तहि पाताळें भरूनी।
विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं। विठ्ठल मुनिमानसीं॥ ३॥
विठ्ठल जिवाचा जिव्हाळा।
विठ्ठल कृपेचा कोंवळा।
विठ्ठल प्रेमाचा पुतळा।
लावियेला चाळा विश्व विठ्ठले॥ ४॥
विठ्ठल बाप माय चुलता।
विठ्ठल भगिनी आणि भ्राता।
विठ्ठलेंवीण चाड नाहीं गोता।
तुका म्हणे आतां नाहीं दुसरें॥ ५॥

- १२ -

मी अवगुणी अन्यायी। किती म्हणोनि सांगो काई।
आतां मज पायीं। ठाव देई विठ्ठले॥ १॥
पुरे पुरे हा संसार। कर्म बळिवंत दुस्तर।
राहों नेदी स्थिर। एकें ठायीं निश्चळ॥ २॥
अनेक बुद्धीचे तरंग। क्षणाक्षणा पालटती रंग।
धरूं जाता संग। तंव तो होतो बाधक॥ ३॥
तुका म्हणे आतां। अवघी तोडी माझी चिंता।
येउनि पंढरीनाथा। वास करी हृदयीं॥ ४॥

- १३ -

आगी लागो तया सुखा। जेणें हरि न ये मुखा॥ १॥
मज होत कां विपत्ती। पांडुरंग राहो चित्तीं॥ धृ॥
जळो तें समूळ। धन संपत्ति उत्तम कुळ॥ २॥
तुका म्हणे देवा। जेणें न घडे तुझी सेवा॥ ३॥

- १४ -

धांव घालीं आई। आतां पाहतसी काई॥ १॥
धीर नाहीं पोटीं। झालो वियोगें हिंपुटी॥ धृ॥
करावें शीतळ। बहु जाली हळहळ॥ २॥
तुका म्हणे डोई। कधी ठेवीन हे पाई॥ ३॥

- १५ -

कां रे नाठविसी कृपाळू देवासी।
पोसितो जगासी एकलाचि॥ १॥
बाळा दुग्ध कोण करितें उत्पत्ती।
वाढवी श्रीपती सवें दोन्ही[129]॥ धृ॥
फुटती तरुवर उष्णकाळमासीं।
जीवन तयांसी कोण घाली॥ २॥
तेणें तुझी काय नाहीं केली चिंता।
राहें त्या अनंता आठवूनि॥ ३॥
तुका म्हणे ज्याचें नांव विश्वंभर[130]।
त्याचें निरंतर ध्यान करीं॥ ४॥

- १६ -

ज्याचें जया ध्यान। तेंचि होय त्याचें मन॥ १॥
म्हणउनि अवघें सारा। पांडुरंग दृढ धरा॥ धृ॥
समखूण ज्याचे पाय। उभा व्यापक विटे ठाय॥ २॥
तुका[131] म्हणे नभा। परता अणूचाही गाभा॥ ३॥

- १७ -

गोविंद गोविंद। मना लागलिया छंद॥ १॥
मग गोविंद तें काया। भेद नाहीं देवा तया॥ धृ॥
आनंदले मन। प्रेमें पाझरती लोचन॥ २॥
तुका म्हणे आळी[132]। जेवीं नुरेचि वेगळी॥ ३॥

- १८ -

तुज पाहतां सामोरी। दृष्टि न फिरे माघारी॥ १॥
माझें चित्त तुझ्या पायां। मिठी पडली पंढरीराया॥ धृ॥
नव्हे सारिता निराळें। लवण मेळवितां जळें॥ २॥
तुका म्हणे बळी। जीव दिला पायतळीं॥ ३॥

- १९ -

पडतां जडभारी। दासें आठवावा हरी॥ १॥
मग तो होऊं नेदी शीण। आड घाली सुदर्शन॥ धृ॥
नामाच्या चिंतनें। बारा वाटा पळती विघ्नें॥ २॥
तुका म्हणे प्राण। करा देवासी अर्पण॥ ३॥

- २० -

आडलिया जना होसी साहकारी।
आंधळिया करीं काठी तूंचि॥ १॥
आडले गांजले पीडिले संसारीं।
त्यांचा तूं कैवारी नारायणा॥ धृ॥
प्रल्हाद महासंकटी रक्षिला।
तुम्हीं आपंगिला[133] नानापरी॥ २॥

[129] बाळाच्या वाढीबरोबर दुधाची वाढ होत असते.
[130] विश्वाचा पोषणकर्ता.
[131] तुका म्हणे व्यापक नभा। होई अणूचाही गाभा।
[132] तुका म्हणे व्यापक नभा। होई अणूचाही गाभा।
[133] रक्षिला

आपुलेंचि अंग तुम्हीं वोडविलें।
त्याचें निवारिलें महादुःख॥ ३॥
तुका म्हणे तुझे कृपे पार नाहीं।
माझे विठाबाई जननीये॥ ४॥

- २१ -

बोलणेंचि नाहीं। आतां देवाविणें कांहीं॥ १॥
एकसरें केला नेम। देवा दिले क्रोध काम॥ धृ॥
पाहेन ते पाय। जोवरी हे दृष्टि धाय॥ २॥
तुका म्हणे मनें। हेचि संकल्प वाहणें॥ ३॥

- २२ -

वर्णावी ते थोरी एका विठ्ठलाची।
कीर्ति मानवाची सांगों नये॥ १॥
उदंडचि झाले जन्मोनियां मेले।
होवोनियां गेले राव-रंक॥ धृ॥
त्यांचे नाम कोणी नेघे चराचरीं।
साही वेद चारी वर्णिताती॥ २॥
अक्षय अढळ चळेना ढळेना।
तया नारायणा ध्यात जावें॥ ३॥
तुका म्हणे तुम्हीं विठ्ठल चित्तीं ध्यातां।
जन्म मरणव्यथा दूर होती॥ ४॥

- २३ -

तूं माझी माउली तूं माझी साउली।
पाहतो वाटुली[134] पांडुरंगे॥ १॥
तूं मज एकुला वडील धाकुला।
तूं मज आपुला सोयरा जीव॥ धृ॥
तुका म्हणे जीव तुजपाशीं असे।
तुजवीण ओस सर्व दिशा॥ २॥

- २४ -

एक धरिला चित्तीं। आम्हीं रखुमाईचा पती॥ १॥
तेणें झाले अवघे काम। निवारिला भवभ्रम॥ धृ॥
परद्रव्य परनारी। जालीं विषाचिये परी॥ २॥
तुका म्हणे फार। नाहीं लागला व्यवहार[135]॥ ३॥

- २५ -

माझे मज कळों येती अवगुण।
काय करूं मन अनावर॥ १॥
आतां आड उभा राहें नारायणा।
दयासिंधुपणा साच[136] करीं॥ २॥

[134] वाट पाहतो.
[135] श्रम, खटाटोप.
[136] खरा

वाचा वादे परी करणे कठीण। इंद्रियांआधीन झालो देवा॥ ३॥
तुका म्हणे जैसा-तैसा[137] तुझा दास।
न धरीं उदास माय-बापा॥ ४॥

- २६ -

धर्माचा तूं मूर्ति। पाप पुण्य तुझें हातीं॥ १॥
मज सोडवीं दातारा। कर्मापासूनि दुस्तरा॥ धृ॥
करिसी अंगीकार। तरी काय माझा भार॥ २॥
जीवींच्या जीवना। तुका म्हणे नारायणा॥ ३॥

- २७ -

पावलें पावलें तुझें आम्हां सर्व।
दुजा नको भाव होऊं देऊं॥ १॥
जेथें तेथें देखें तुझीच पाउलें।
त्रिभुवन संचलें विठ्ठला गा॥ धृ॥
भेदाभेदमतें भ्रमाचे संवाद।
आम्हां नको वाद त्यांशीं देऊं॥ २॥
तुका म्हणे अणुं[138] तुजविण नाहीं।
नभाहुनी पाही वाड[139] आहे॥ ३॥

- २८ -

कई ऐसी दशा येईल माझ्या अंगा।
चित्त पांडुरंगा झुरतसे॥ १॥
नाठवूनि देह पायांचे चिंतन।
अवसान तें क्षण नाहीं मध्यें॥ धृ॥
कई ऐसा पात्र होईन लाभासी।
नेणों हृषीकेशी तुष्टईल॥ २॥
तुका म्हणे धन्य मानीन संचित।
घेईन तें नित्य प्रेमसुख॥ ३॥

- २९ -

अगा ये उदारा अगा विश्वंभरा।
रखुमाईच्या वरा पांडुरंगा॥ १॥
अगा सर्वोत्तमा अगा कृष्णा रामा।
अगा मेघश्यामा विश्वजनित्या॥ धृ॥
अगा कृपावंता जीवन तूं दाता।
अगा सर्व सत्ता धरितया॥ २॥
अगा सर्वजाणा अगा नारायणा।
करुणावचना चित्त द्यावे॥ ३॥
तुका म्हणे नाहीं अधिकार तैसी।
सरती पायांपाशीं केली मागे॥ ४॥

[137] कसाहि असलो तरी, जसा आहे तसा तुझा दास आहे.
[138] अणोरणीयान्महतो महीयान् (श्रुति व स्मृति)
[139] मोठा

- ३० -

संसारतापें तापलो मी देवा।
करितां या सेवा कुटुंबाची॥ १॥
म्हणवूनि तुझे आठविले पाये।
ये वो माझे माये पांडुरंगे॥ धृ॥
बहुता जन्मीचा झाला भारवाही।
सुटिजे हें नाहीं वर्म ठावें॥ २॥
वेढियेलो चोरीं अंतर्बाह्याकारीं।
कणव[140] न करी कोणीमाझी॥ ३॥
बहू पांगविलो[141] बहू नागविलो।
बहू दिवस झालो कासावीस॥ ४॥
तुका म्हणे आतां धाव घाली वेगीं।
ब्रीद तुझे जगीं दिनानाथ॥ ५॥

- ३१ -

त्रैलोक्या पाळितां उबगला[142] नाहीं।
आमुचे त्या काई असे ओझे॥ १॥
पाषाणाचे पोटीं बैसला दर्दुर।
तया मुखीं चार कोण घाली? ॥ धृ॥
पक्षी अजगर न करिती संचित।
तयांसी अनंत प्रतिपाळी॥ २॥
तुका म्हणे तया भार घातलिया।
उपेक्षिना दयासिंधु माझा॥ ३॥

- ३२ -

नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिति भाव। मी भक्त तूं देव ऐसें करीं॥ १॥
दावीं रूप मज गोपिकारमणा। ठेवूं दे चरणांवरी माथा॥ धृ॥
पाहीन श्रीमुख देईन आलिंगन। जीवें निंबलोण उतरीन॥ २॥
पुसतां सांगेन हितगुजमात। बैसोनि एकांत सुखगोष्टी॥ ३॥
तुका म्हणे यासी न लावी उशीर। माझे अभ्यंतर जाणोनियां॥ ४॥

- ३३ -

मोक्षपदे तुच्छ केली याकारणें। आम्हां जन्म घेणें युगायुगीं॥ १॥
विटे ऐसें सुख नव्हे भक्तिरस। पुढती पुढती आंस सेवावें हें॥ धृ॥
देवाहातीं रूप धरवूं आकार। नेदूं निराकार होऊं त्यासी॥ २॥
तुका म्हणे चित्त निवांत राहिले। ध्याई तीं पाउलें विटेवरी॥ ३॥

- ३४ -

मागणें तें मागो देवा। करूं भक्ति त्याची सेवा॥ १॥
काय उणें तयापाशीं। ऋद्धि सिद्धि ज्याच्या दासी॥ धृ॥
काया वाचा मन। करूं देवा हें अर्पण॥ २॥
तुका म्हणे विश्वंभर। ज्याच्यानें हें चराचर॥ ३॥

- ३५ -

चाले हें शरीर कोणाचिये सत्ते।
कोण बोलवितें हरीवीण॥ १॥
देखवी ऐकवी एक नारायण।
तयाचे भजन चुकों नका॥ धृ॥
मानसाची देवा चालवी अहंता।
मीचि एक कर्ता म्हणोनियां॥ २॥
वृक्षांचेहि पान हाले त्याची सत्ता।
राहिली अहंता मग कोठे॥ ३॥
तुका म्हणे विठो भरला सबाह्य। तया उणे काय चराचरी॥ ४॥

- ३६ -

प्रेमसूत्रदोरी। नेतो तिकडे जातो हरी॥ १॥
मनेंसहित वाचा काया। अवघें दिले पंढरिराया॥ धृ॥
सकळ सत्ता तया हातीं। माझी कींव काकुळती॥ २॥
तुका म्हणे ठेवी तैसें। आम्ही राहों त्याचे इच्छे॥ ३॥

- ३७ -

दुर्बुद्धि ते मना। कदा नुपजो नारायणा॥ १॥
आतां मज ऐसें करीं। तुजे पाय चित्तीं धरी॥ धृ॥
उपजला भावो। तुझे कृपे सिद्धी जावो॥ २॥
तुका म्हणे आतां। लाभ नाहीं यापरता॥ ३॥

- ३८ -

हांकेसरसी उडी। घालूनियां स्तंभ फोडी॥ १॥
ऐसी कृपावंत कोण। माझे विठाईवांचून॥ धृ॥
करितां आठव। धांवोनियां घाली कव॥ २॥
तुका म्हणे गीतीं गातां। नामें द्यावी सायुज्यता॥ ३॥

- ३९ -

मतीवीण काय वर्णूं तुझे ध्यान।
जेथें पडिले मौन वेद-श्रुती॥ १॥
करूनि गोजिरा आपुलिये मतीं।
धरियेले चित्तीं चरणकमळ॥ धृ॥
सुखाचें ओतिलें पाहो तें श्रीमुख।
तेणें हरे भूक-तान माझी॥ २॥
रसना गोडावली ओव्यां गातां गीत।
पावलेसे चित्त समाधान॥ ३॥
तुका म्हणे माझी दृष्टि चरणांवरी।
पाउलें गोजिरीं कुंकुमाची॥ ४॥

140 कींव, दया.
141 पराधीन झालो.
142 कंटाळला.

- ४० -

आनंदाच्या कोटी। सांठविल्या आम्हांपोटी॥ १॥
प्रेम चालिला प्रवाहो। नामओघ लवलाहो॥ धृ॥
अखंड खंडेना जीवन। राम कृष्ण नारायण॥ २॥
थडी आहिक्य परत्र। तुका म्हणे समतीर॥ ३॥

- ४१ -

देऊनि आलिंगन प्रीतीच्या पडिभरें। अंगें ही दातारें निववावी॥ १॥
अमृताची दृष्टि घालुनियां वरी। शीतळ हा करी जीव माझा॥ धृ॥
घेई उचलोनी पुसें तहानभूक। पुसीं माझे मुख पीतांबरें॥ २॥
बुझावोनि माझी धरी हनवटी। ओवाळूनि दिठी करूनि सांडी॥ ३॥
तुका म्हणे बापा अहो विश्वंभरा। आतां कृपा करा ऐसी कांही॥ ४॥

- ४२ -

भावबळें कैसा झालासी लहान। मागें संतीं ध्यान वर्णियेले॥ १॥
तें मज उचित करूनियां देवा। दाखवीं केशवा मायबापा॥ धृ॥
पाहोनियां डोळा बोलेन मी गोठी। आलिंगूनि मिठी देईन पायीं॥ २॥
चरणीं दृष्टि उभा राहेन समोर। जोडोनिया कर पुढें दोन्ही॥ ३॥
तुका म्हणे उत्कंठित हे वासना। पुरवीं नारायणा आर्त माझें॥ ४॥

- ४३ -

काय तुझे वेंचे मज भेटी देतां। वचन बोलता एक दोन॥ १॥
काय तुझे रूप घेतो मी चोरोनी। त्या भेणें लपोनी राहिलासी॥ धृ॥
काय तुझे आम्हां करावें वैकुंठा। भेवों नका भेट आतां मज॥ २॥
तुका म्हणे तुझी नलगे दसोडी। परी आहे आवडी दर्शनाची॥ ३॥

- ४४ -

आंत हरि बाहेर हरि। हरीनें घरीं कोंडिले॥ १॥
हरीनें कामा घातला चिरा। हरीनें वित्तवरा मुकविले॥ धृ॥
हरीनें जीवें केली साटी। पाडिली तुटी सकळांसी॥ २॥
तुका म्हणे वेगळा नव्हे। हरी भोंवे भोंवताला॥ ३॥

- ४५ -

तूं माउलीहूनि मवाळ। चंद्राहूनि शीतळ।
पाणियाहूनि पातळ। कल्लोळ प्रेमाचा॥ १॥
देऊं कशाची ऊपमा। दुजी तुज पुरुषोत्तमा।
ओवाळूनि नामा। तुझ्यावरूनि टाकिलो॥ धृ॥
तुवां केले रे अमृता। गोड त्याहि तूं परता।
पांचा तत्त्वांचा जनिता। सकळ सत्ता नायक॥ २॥
कां न बोलोनि आतां। उगाच चरणीं ठेवितो माथा।
तुका म्हणे पंढरीनाथा। क्षमा करी अपराध॥ ३॥

- ४६ -

आणिक दुसरें मज नाहीं आतां।
नेमिले या चित्तापासूनियां॥ १॥
पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं।
जागृती स्वप्नीं पांडुरंग॥ धृ॥
पडिले वळण इंद्रिया सकळां।
भाव तो निराळा नाहीं दुजा॥ २॥
तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण।
तटस्थ तें ध्यान विटेवरी॥ ३॥

- ४७ -

अंतरीची घेतो गोडी। पाहे जोडी भावाची॥ १॥
देव सोयरा देव सोयरा। देव सोयरा दीनाचा॥ धृ॥
आपुलिया वैभवें। शृंगारावें निर्मळ॥ २॥
तुका म्हणे जेवी सवें। प्रेम द्यावे प्रीतीचे॥ ३॥

- ४८ -

मोक्ष तुमचा देवा। तुम्ही दुर्लभ तो ठेवा॥ १॥
मज भक्तीची आवडी। नाहीं अंतरी ते गोडी॥ धृ॥
आपुल्या प्रकारा। करा जतन दातारा॥ २॥
तुका म्हणे भेटी। पुरे एकचि शेवटी॥ ३॥

- ४९ -

निर्वाहापुरतें अन्न अच्छादन।
आश्रमासी स्थान कोपी गुहा॥ १॥
कोठेंही चित्तासी नसावें बंधन।
हृदयीं नारायण सांठवावा॥ धृ॥
नये बोलो फार बैसो जनामधीं।
सावधान बुद्धी इंद्रियें दमी॥ २॥
तुका म्हणे घडी घडीनें साधावी।
त्रिगुणांची गोवी उगवूनी॥ ३॥

## 23.10 श्रीरामदास

- १ -

राम आकाशीं पाताळीं। राम नांदे भूमंडळीं॥
राम योगियांचे मेळीं। सर्वकाळीं तिष्ठत॥ १॥
राम नित्यनिरंतरीं। राम सबाह्य अंतरीं।
राम विवेकांचे घरीं। भक्तीवरी सांपडे॥ २॥
राम भावें ठायीं पडे। राम भक्तीसी आतुडे।
राम ऐक्यरूपीं जोडे। मौन पडे श्रुतीसी॥ ३॥

राम योग्यांचे मंडण। राम भक्तांचें भूषण।
राम आनंदाचा घन। करी रक्षण दासाचें॥ ४॥

- २ -

राम गावा राम ध्यावा। राम जीवींचा विसावा॥ १॥
कल्याणाचें जें कल्याण। रघुरायाचें गुणगान॥ २॥
मंगळाचें जें मंगळ। राम कौसल्येचा बाळ॥ ३॥
राम कैवल्याचा दानी। रामदास अभिमानी॥ ४॥

- ३ -

दासाची संपत्ति राम सीतापती। जीवाचा सांगाती राम एक॥ १॥
राम एक माता राम एक पिता। राम एक भ्राता सहोदर॥ २॥
सहोदर विद्या वैभव कांचन। सर्व हा स्वजन राम एक॥ ३॥
राम एक ज्ञान राम एक ध्यान। राम समाधान रामदासीं॥ ४॥

- ४ -

कां वो राममाये दुरी धरियेलें। कठिण कैसें जालें चित्त तुझें॥ १॥
देउनी आलिंगन प्रीतिपडिभरें। कैं मुख पितांबरें पुसशील? ॥ २॥
घेउनी कडिये धरुनी हनुवटी। कैं गुजगोष्टी सांगशील? ॥ ३॥
रामदास म्हणे केव्हां संबोधिशी। प्रेमपान्हा देशी जननीये॥ ४॥

- ५ -

अपराधी अपराधी। आम्हां नाहीं दृढबुद्धी॥ १॥
माझे अन्याय अगणित। कोण करील गणित॥ धृ॥
मज सर्वस्वें पाळावें। प्रतीतीनें सांभाळावें॥ २॥
माझी वाईट करणी। रामदास लोटांगणीं॥ ३॥

- ६ -

शिरीं आहे रामराज। औषधाचें कोण काज॥ १॥
जो जो प्रयत्न रामाविण। तो तो दुःखासी कारण॥ धृ॥
शंकराचें हळाहळ। जेणें केले सुशीतळ॥ २॥
आम्हां तोचि तो रक्षिता। रामदासीं नाहीं चिंता॥ ३॥

- ७ -

सोडी संसाराची आंस। धरी भक्तीचा हव्यास॥ १॥
दुःखमूळ हा संसार। तयामध्यें भक्ति सार॥ धृ॥
ग्रंथ पाहतां लक्षकोटी। जेथे तेथे भक्ति मोठी॥ २॥
जन्मा आलियाचें फळ। दास म्हणे तें केवळ॥ ३॥

- ८ -

बाळक जाणेना मातेसी। तिचे मन तयापाशीं॥ १॥
तैसा देव हा दयाळ। करी भक्ताचा सांभाळ॥ धृ॥
धेनु वत्साचेनी लागें। धांवे त्याच्या मागें मागें॥ २॥
पक्षी घेतसे गगन। पिल्यांपाशीं त्याचे मन॥ ३॥
मत्स्य आठवितां पाळी। कूर्म दृष्टीनें सांभाळी[143]॥ ४॥
रामीं रामदास म्हणे। मायाजाळाची लक्षणें॥ ५॥

- ९ -

हरिभक्ति करी धन्य तो संसारी।
जयाचा कैवारी देवराणा॥ १॥
देवराणा सदा सर्वदा मस्तकीं।
तयासी ह्या लोकीं चाड[144] नाहीं॥ धृ॥
चाड नाहीं जनीं राघवाचा दास।
सार्थक वयस रामदासीं॥ २॥

- १० -

देव जवळी अंतरी। भेटी नाहीं जन्मवरी॥ १॥
मूर्ति त्रैलोक्यीं संचली। दृष्टि विश्वाची चुकली॥ २॥
भाग्यें आले संतजन। झाले देवाचे दर्शन॥ ३॥
रामदासीं योग झाला। देहीं देव प्रगटला॥ ४॥

- ११ -

पतितपावना जानकीजीवना। वेगीं माझ्या मना पालटावें॥ धृ॥
मन हें चंचळ न राहे निश्चळ। निरूपणीं पळ स्थिरावेना॥ १॥
सांडुनियां ध्यान विषयचिंतन। करीतसे मन आवरेना॥ २॥
रामदास म्हणे कथानिरूपणें। मनाची लक्षणें जैसीं तैसीं॥ ३॥

- १२ -

पतितपावना जानकीजीवना। वेगीं माझ्या मना पालटावें॥ धृ॥
वैराग्याचा लेश नाहीं माझे अंगीं। बोलतसे जगीं शब्दज्ञान॥ १॥
देह हें कारणीं लावावें नावडे। आळस आवडे सर्वकाळ॥ २॥
रामदास म्हणे लाज तुझी तुज। कोण पुसे मज अनाथासी॥ ३॥

- १३ -

पतितपावना जानकीजीवना। वेगीं माझ्या मना पालटावें॥ धृ॥
मिथ्या शब्दज्ञानें तुज अंतरलो। संदेहीं पडलो मीपणाचे॥ १॥
सदा खळबळ निर्गुणाची घडे। सगुण नावडे ज्ञानगर्वें॥ २॥
रामदास म्हणे ऐसा हा पतित। मीपणे अनंत पाहों जातां॥ ३॥

[143] मत्स्यी स्मरणाने व कांसवी दृष्टीने आपल्या पोरांना पोसतात.
[144] आवड, पर्वा

- १४ -

मी खरा पतित तूं खरा पावन। आतां अनुमान करूं नको॥ धृ॥
आतां मज कांहीं माझी चिंता नसे। तुझें नाम कैसें वांचईल॥ १॥
समर्थे घेतला नांवालागीं भार। मज उपकार कासयाचा॥ २॥
रामदास म्हणे तुझें तुज उणें। सोयरीं पिसुणें हांसतील॥ ३॥

## 23.11 शेख महंमद

- १ -

ऐसें केले या गोपाळें। नाहीं सोवळें ओवळें॥ १॥
काटे केतकीच्या झाडा। आंत जन्मला केवडा॥ २॥
फाणसाअंगीं कांटे। आंत अमृताचे साठे॥ ३॥
नारळ वरुता कठिण। परी अंतरीं जीवन॥ ४॥
शेख महंमद अविंध। त्याचे हृदय गोविंद॥ ५॥

## 23.12 चोखामेळा

- १ -

ऊस डोंगा[145] परी रस नोहे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा॥ १॥
कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा॥ २॥
नदी डोंगी परी जल नोहे डोंगे।
काय भुललासी वरलिया रंगा॥ ३॥
चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा।
काय भुललासी वरलिया रंगा॥ ४॥

- २ -

टाळी वाजवावी गुढी उभारावी।
वाट हे चालावी पंढरीची॥ १॥
पताकांचे भार मिळाले अपार।
होतो जयजयकार भीमातीरीं॥ २॥
हरिनाम गर्जतां नाहीं भय चिंता।
ऐसें बोले गीता भागवत॥ ३॥
खटनट यावे शुद्ध होउन जावे।
दवंडी पिटी भावें चोखामेळा॥ ४॥

[145] वाईट, हीन, वाकडा

## 23.13 निळोबाराय

- १ -

पाचारितां यावें बोलवितां जावें।
हें तो न संभवे तुम्हापाशीं॥ १॥
जेथील तेथींचे प्रगटले रूपडे।
आपुल्या सुरवाडे भक्तांचिया॥ २॥
जाणे येणे नाहीं तुम्हां कदाकाळीं।
असा भूमंडळीं व्यापूनियां॥ ३॥
निळा म्हणे ऐसें जाणोनियां मनीं।
करितो अनुदिनीं स्तवन तुमचे॥ ४॥

## 23.14 कृष्णदयार्णव

- १ -

गोविंदा तूं जळ मी तेथें कल्लोळ।
असों सर्वकाळ ऐक्यसुखें॥ १॥
तूं बिंब मी तेज तूं हेतु मी काज।
व्यापक तूं पूज्य पूजक मी॥ २॥
अणूचा वियोग नसे तुम्हां आम्हां।
आजी मेघश्यामा सांडू नको॥ ३॥
तूं रस मी गोडी तूं वृक्ष मी वाढी।
तूं शक्ति मी प्रौढी सामर्थ्याची॥ ४॥
दयार्णवस्वावामी मी तुझा सेवक।
वियोगाचे दुःख साहो नेणें॥ ५॥

## 23.15 वासुदेवानंदस्वामी

- १ -

भावभक्ती अंगीं उठे। प्रेमभरे कंठ दाटे॥ १॥
दाटे प्रेमाश्रु लोचनीं। रोम राहे उभारूनी॥ २॥
उठोनियां आलिंगाया। आतां जातां न ये पायां॥ ३॥
पायां पडुनी स्तवूं जरी। तरी शब्द नुमटे हरी॥ ४॥
हरिले त्वां देहभान। आतां कोणा करूं नमन॥ ५॥
जन दत्तरूप होतां। वासुदेवा ये धन्यता॥ ६॥

# 24 प्रेमळ पदे

## 24.1 श्रीज्ञानदेव

अनुमानेना अनुमानेना।
श्रुति नेति नेति म्हणती गोविंदु रे॥ धृ॥
तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे।
सगुण निर्गुण एक गोविंदु रे॥ १॥
तुज स्थूळ म्हणो कीं सूक्ष्म रे।
स्थूळ सूक्ष्म एक गोविंदु रे॥ २॥
तुज साकार म्हणों कीं निराकार रे।
साकार निराकार एक गोविंदु रे॥ ३॥
तुज दृष्य म्हणों कीं अदृश्य रे।
दृश्यादृश्य एक गोविंदु रे॥ ४॥
निवृत्तिप्रसादें ज्ञानदेव बोले।
बापरखुमादेवीवरु विठ्ठलु रे॥ ५॥

## 24.2 श्रीएकनाथ

- १ -

तें मन निष्ठुर कां केले। जे पूर्ण दयेनें भरले॥ धृ॥
गजेंद्राचे हांकेसरिसें। कळकळुनी गेले॥ १॥
प्रल्हादाच्या भावार्थासी। स्तंभीं गुरगुरले॥ २॥
पांचाळीच्या करुणावचनें। धांवुनियां आले॥ ३॥
एकाजनार्दन पूर्णकृपेनें। निशिदिनिं पदिं रमले॥ ४॥

- २ -

सगुणचरित्रें परमपवित्रें हरिची वर्णावी।
सज्जनवृंदे मनोभावे आधी वंदावी॥ धृ॥
संतसंगे अंतरंगे नाम बोलावे।
कीर्तनरंगीं देवासंनिध सुखेंचि डोलावे॥ १॥
भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतर न कराव्या।
संतासंगे वैराग्याच्या युक्ती विवराव्या॥ २॥
जेणेंकरुनी मूर्ति ठसावे अंतरि श्रीहरिची।
ऐसी कीर्तनमर्यादा हे संतांचे घरची॥ ३॥
अद्वयभजने अखंडस्मरणे वाजवि करताळी।
एकाजनार्दनीं मुक्ति होय तत्काळी॥ ४॥

- ३ -

असा कसा देवाचा देव बाई ठकडा।
देव एका पायानें लंगडा। ग बाई॥ असा...॥ धृ॥
गवळ्याघरी जातो। दही-दूध खातो।
करि दह्यादुधाचा रबडा। ग बाई॥ असा...॥ १॥
शिंकेचि तोडितो। मडकेंचि फोडितो।
पाडि नवनीताचा तो सडा। ग बाई॥ असा...॥ २॥
वाळवंटी जातो। कीर्तन करितो।
घेतो साधुसंतांसि झगडा। ग बाई॥ असा...॥ ३॥
एकाजनार्दनिं। भिक्षा वाढा बाई।
देव एकनाथाचा बचडा। ग बाई॥ असा...॥ ४॥

- ४ -

मन रामीं रंगले[146]। अवघें मनचि राम झाले हो।
सबाह्य अभ्यंतरीं अवघे रामरूप कोंदले हो॥ धृ॥
आत्मारामाचे ध्यान लागले मज कैसे हो।
क्रिया कर्म धर्म अवघे येणेचि प्रकाशे हो।
सत्य-मिथ्याप्रकृतिपर अवघा रामचि भासे हो॥ १॥
चित्तचि हारपले अवघे चैतन्य जाहले हो।
देखतां देखतां अवघे विश्व मावळले हो।
पाहतां पाहणे अवघे द्वैतभाव निमाले हो॥ २॥
भक्ति ज्ञान वैराग्य लाभे सहज आत्मस्थिति हो।
निर्धारितां रामरूपी जडलीसे प्रीती हो।
एकाजनार्दनी अवघा रामचि आदि-अंती हो॥ ३॥

## 24.3 श्रीनामदेव

पतितपावन नाम ऐकुनि आलो मी द्वारा।
पतितपावन न होसि म्हणुनी जातो माघारा॥ धृ॥
सोडी देवा ब्रीद आतां न होसि अभिमानी।
पतितपावन नाम तुजला ठेवियले कोणी॥ १॥
घेसी तेव्हां देशी ऐसा अससी उदार[147]।
काय देवा, रोधूं तुमचे कृपणाचे द्वार॥ २॥
उच्छिष्टाचे शीत न देवा टाकिसी बाहेरी।
कोणी दिधली भगवंत तुला भूषणाची[148] थोरी॥ ३॥
हातीं घेउनि झांगड-झेंडा फिरेन त्रैलोक्यीं।
पतितपावन न होसि हरि तूं मोठा घातकी॥ ४॥
नामा म्हणे देवा तुमचे नलगे मज कांहीं।
प्रेम असो द्या हृदयी तुमचे आठवीन पाय॥ ५॥

---

146 चित्त भगवद्भक्तीने रंगवून
147 सर्व जीवभाव हरण करतोस तेव्हां स्वस्वरूप देतोस
148 ऐश्वर्यवंत अशी

## 24.4 श्रीरामदास

[149]

आम्ही काय कुणाचे खातो रे। तो राम आम्हाला देतो रे॥ धृ॥
बांधिले घुमट किल्ल्याचे तट। तयाला फुटती पिंपळ वट।
तेथे कोण लावितो मोट। बुडाला पाणी घालितो? ॥ १॥
खडक फोडितां सजिव रोडकी। पाहिली सर्वांनी बेडकी।
सिंधु नसतां तियेचे मुखीं। पाणी कोण घालितो? ॥ २॥
पहा रे पहा मातेचीये स्तनी। चिंतितां[150] रक्त मांस मलखाणी।
तिथे विमल दुग्ध घालोनी। कोण पोसीतो? ॥ ३॥
नसतां पाण्याचे बुडबुडे। सदासर्वदा गगन कोरडे।
दास म्हणे जीवन चहुंकडे। पाडुनि सडे पीक उगवितो? ॥ ४॥

## 24.5 केशवचैतन्य

दीनानाथ दीनबंधु शरण तुला रे॥ धृ॥
विषयाचे लागे मन भ्रमलेसे भारी।
धन पुत्र कलत्र ही झाली सुखकारी।
आतां याचे दुःख मज सोसवेना हरी।
म्हणोनियां विनवितो करुणाकरा रे॥ १॥
भवाब्धीचा तरणोपावो न कळेचि कांहीं।
साधुसंगसेवा मज घडलीच नाही।
शिस्नोदरव्यापाराच्या पडलो प्रवाही।
यांतुनियां त्वरें आतां काढी मजला रे॥ २॥
चित्तशुद्धीचीही आतां मज वाट दावी।
वेदशास्त्रपुराणांची गति सुचवावी।
नवविधाभक्ति निरंतर करवावी।
केशवचैतन्य म्हणे भूषण तुला रे॥ ३॥

## 24.6 आनन्दतनय

कां रे नाठविसी कमलनयन वासुदेव॥ धृ॥
जपति जया संतसनक।
सकळजना जननि-जनक॥ १॥
कलुषहरण विमलचरित।
करुनि निजानंदभरित॥ २॥
विचरे आनंदतनय।
हृदयि धरुनि नंदतनय॥ ३॥

[149] मी समर्थांच्या मठातले त्यांचे शिष्य पोसतो असा सुप्त गर्व शिवरायाला झाला होता त्यावेळी तो घालवण्या करता समर्थांनी त्याना रानात नेऊन खडक फोडून एक सजीव बेडकी त्यातून दाखवली त्यावेळी हे सुंदर पद समर्थांनी रचिले आहे. चारही दृष्टांत सृष्टीतले समर्पक असल्यामुळे ह्या पदाला अपूर्व गोडी आली आहे.
[150] विचार करितां

## 24.7 केशवस्वामी

- १ -

धांव विभो करुणाकर माधव।
देव दयानिधे देवकिनंदन॥ धृ॥
हे करुणाकर दीनजनोद्धर।
हा भव दुस्तर यांतुन उद्धर॥ १॥
काम-मदादिक गांजिति हे अति।
धांव रमापति सेवकहितकर॥ २॥
जनन मरणभय हरण करि त्वरे।
चरणि शरण दृढ केशव किंकर॥ ३॥

- २ -

तोंवरि निजसुख नाहीं रे।
ऐसें कळले पाहीं रे॥ धृ॥
संतसमागम जोडेना।
संशय मंडप मोडेना॥ १॥
गुणमय[151] रजनी नासेना।
बोधतमारि प्रकाशेना॥ २॥
केशवस्वामी भेटेना।
सबाह्यांतरीं दाटेना॥ ३॥

- ३ -

घडि घडि घडि चरण तुझे आठवती रामा।
हीन हीन, आस तुझी पूर्णकाम! आम्हा॥ धृ॥
मात तात भ्रात नाथ तूंचि एक पाही।
केशव म्हणे करी दया ठेवि तुझे पायी॥ १॥

- ३ -
(राग - झिंझोटी)

निरंजनीं अक्षयी निद्रा केली हो।
तेणें माझी सर्वही चिंता गेली हो॥ धृ॥
सुखशयनी सर्वही निरालंबी हो।
माझे मीपण बुडाले आत्मबिंबी हो॥ १॥
जागृति स्वप्न सुषुप्ति नाही जेथे हो।
योगनिद्रा बाणली आम्हां ते हो॥ २॥
गुरुकृपें केशव आकळिला हो।
समाधिसेजेलागीं पूर्ण ठेला हो॥ ३॥

[151] सत्त्व, रज, तम, ह्या त्रिगुणांच्या कर्दमापासून सारे जग झाले आहे. ह्या तीनहि गुणांना मागे टाकून श्रीकृष्णाने अर्जुनास बोधल्याप्रमाणे निस्त्रैगुण्य झाल्याविना अहमात्मा ह्या बोधसूर्याचा उदय होणार नाही. व असे झाल्याविना आत्मसुख नाही.

## 24.8 रंगनाथस्वामी

- १ -

कळो आली माव[152] रे। भक्तीपाशी देव रे।
न पाहेचि याती, कूळ, कर्म मूळ भाव रे॥ धृ॥
कोण पुण्य श्लोक रे। गोकुळींचे लोक[153] रे।
गोपवेषें जया घरी ब्रह्मांडनायक रे॥ १॥
दुर्लभ ब्रह्मादिकां। त्यासी गोपी बायका।
हर्षें नाचविती वाजवूनी करताळिका॥ २॥
प्राणाच्या विरोधनें[154]। नव्हे साध्य साधने।
लीलारूपविग्रही तो चारिताहे गोधनें॥ ३॥
भाविकांचा बंध[155] रे। तोडी जगद्वंद रे।
यशोदेनें उखळीं तो बांधिला गोविंद रे॥ ४॥
जया जैसा हेत रे। तया तैसा होत रे।
निजानंदीं पूर्णरंगीं रंगला अनंत रे॥ ५॥

- २ -

अवघा तूंचि हरी। तूं जीवन मी लहरी॥ धृ॥
जननी जनक तूं बंधू। सखा जिवलग करुणासिंधू॥ १॥
सद्विद्या निजधन तूं। देउनि तोडिसि भवबंध तूं॥ २॥
निजरंगा तूं पाहीं। अवघा तूंचि मी तूं नाहीं॥ ३॥

- ३ -

मुळींच तें नाहीं तें नाहीं। अनादिसिद्ध मी पाहीं॥ धृ॥
माया साच असावी। तरि म्यां विवेकें उगवावी॥ १॥
भवरोगीच असावे। तरी म्यां रामरसायन घ्यावें॥ २॥
निजरंगीं रंगला। अपुले उगमीं संगम झाला॥ ३॥

## 24.9 वामनपंडित

[156]

अर्जुना तूं जाण रे। होसी बा सुजाण रे।
विश्व नाहीं मीच आहे, सखया, तुझी आण रे॥ धृ॥
मातीमाजीं घट रे। तंतूमाजी पट रे।
माती तंतू विचारितां कैंचा घट पट रे॥ १॥
मिथ्या सोन्यामाजी रे। अलंकार साजिरे।
तैसें विश्व मजमाजीं सांगतो हें आजि रे॥ २॥
रज्जू सर्पाकार रे। सर्प ना तो दोर रे।
दोरामाजी सर्प भासे वांझेचें तें पोर रे॥ ३॥
हेमीं अलंकार रे। पाण्याची ते गार रे।
हेम पाणी पाहूं जातां कैंचा तो आकार रे॥ ४॥
तैसें जग हें पाही रे। जंव रामीं दृष्टी नाहीं रे।
रामीं राम झाल्या मग जग कैंचें काय रे॥ ५॥
अंडे कोटी खर्व रे। मजमाजी सर्व रे।
न मी त्यांत न तीं मजमध्यें हें अपूर्व रे॥ ६॥
राजविद्या गूज रे। सांगतसे तूज रे।
कलीमाजी वामनासी हेंचि देणें मज रे॥ ७॥

## 24.10 प्रह्लादबुवा बडवे

देवा न लगे तुमचे कांहीं हो।
चंचल हें मन निश्चळ होऊनि विनटो तुमचे पायीं हो॥ धृ॥
न लगे गृहधनसुतदारा मज इंद्रपदादि कदाही हो।
तव पदपंकजभजनेंविण मज सर्वहि ते आपदाही[157] हो॥ १॥
देशी वर जरि तरि तूं आतां याचि स्वरूपें राही हो।
यावच्चंद्रदिवाकर येथुनि कोठेंही नवजाई हो॥ २॥
दर्शनमात्रें जड मुढ पापी निजपदवी त्यां देई हो।
शिवतनय तव दीन तयाचे हृदयमंदिरा येई हो॥ ३॥

## 24.11 बोधलेबुवा

सांगड बांधा रे। भक्तीची। रघुनाथनामाची॥ धृ॥
संसार सागर। सागर। भरला जातो पूर॥ १॥
प्रपंच भोंवरा। भोंवरा। फिरतसे गरगरां॥ २॥
लाता उसळती। विषयांच्या। बहुत प्रपंचाच्या॥ ३॥
नरहरी बोधला। बोधिला। हरिनामीं रंगला॥ ४॥

## 24.12 मध्वमुनीश्वर

- १ -

तूं माझा यजमान। रामा॥ धृ॥
जननी जठरी रक्षियले मज पोसुनि पंचहि प्राण॥ १॥
जन्मा येतां मातेचे स्तनि। पय केले निर्माण॥ २॥
ऐसे असतां या पोटाची। कां करु चिंता जाण॥ ३॥
मध्वमुनीश्वर स्वामि रमापति। धरि माझा अभिमान॥ ४॥

---

[152] माया
[153] पुण्यवंत गवळी
[154] योगाभ्यासाने जो साध्य नाही तो लीलाधारी परमात्मा गुरे राखतो.
[155] भवबंध तोडितो.
[156] हे सुंदर पद मया ततमिदं सर्वं (गीता अ. ९) ह्या श्लोकाधारे केले आहे.
[157] आपत्ति. हरीवांचून सर्व आनुकुल्य असूनहि ते आपत्तिरूपच.

- २ -

माझं अचडं बचडं छगडं ग। माझं॥ धृ॥
विकसितपंकजलोचन ज्याचे।
जननि म्हणे हें चिपडं ग॥ १॥ माझं...
त्रिभुवनपालक बालक त्याला।
पांघरविते घोंगडं ग॥ २॥ माझं...
अंगणि रांगत मंजुळ बोलत।
माझं सोन्याचं ठिगडं ग॥ ३॥ माझं...
मध्वमुनीश्वर खेळवि अंकीं।
ब्रह्मसनातन उघडं ग॥ ४॥ माझं...

## 24.13 कोकिळ

केला राम धणी राम धणी। अघटित ज्याची करणी॥ धृ॥
रामीं रतली वाणी। आतां सुखासि नाही वाणी॥ १॥
रामावांचुनि कांहीं। आणिक साधन उरले नाही॥ २॥
कोकिळप्रभुसी ध्यातां। सहजचि निजपद आले हाता॥ ३॥

## 24.14 अमृतराय

- १ -

स्मरतां नित्य हरी। मग ते माया काय करी॥ धृ॥
श्रवणें मननें अद्वयवचने। पळतो काळ दुरी॥ १॥
करुणाकर वरदायक हरि जो। ठेवित हात शिरी॥ २॥
तोचि निरंतर उद्धवचरणीं। अमृतपान करी॥ ३॥

- २ -

हरि मज कसा करिल भवपार॥ धृ॥
तन मन धन विषयांवरि वळतें। भजनीं आळस फार॥ १॥
स्वात्मबुद्धि विचारुनि पाहीं। कोणि न करि उपकार॥ २॥
अमृत म्हणे तुम्हि भजा निरंतर। श्रीधरगुरुचे पाय॥ ३॥

## 24.15 सोहिरोबा

- १ -

हरिस्मरणविस्मरण तरि तुझे काय जिणे रे असून॥ धृ॥
स्वार्थचि साधिसि सार्थक नेणसि कोणासि पहा तरि पुसून।
पुढे नाहि गति मळिण जालि मति साधुचि संगति नसून॥ १॥
रतीविलासी लंपट होसी मानस गेले डंसून।
लवकर सरकीं पडशिल नरकीं फुकट मरशिल कुसून॥ २॥
आळशि कामा उगा रिकामा थट्टाचि[158] करिसी बसून।
कुकर्मांच्या कांहि वर्माच्या[159] गोष्टि सांगसी किसून॥ ३॥
शरीर फिरवी तुजला मिरवी देव असे रे रुसून।
जवळि असून तुझे ह्रदयीं वसून भगवंत न ये रे दिसून॥ ४॥
म्हणे सोहिरा गैवनाथा हा माझ्या ह्रदयीं घुसून।
जनांसि उद्धरावयाकारणे वचन सांगतो ठसून॥ ५॥

- २ -

हरिभजनावीण काळ घालवूं नको रे॥ धृ॥
दोरिच्या सापा भिउनि भवा। भेटि नाहि जिवा शिवा।
अंतरिचा ज्ञानदिवा। मालवूं नको रे॥ १॥
विवेकाची ठरेल ओल। ऐसे बोलावे किं बोल।
आपुले मतें उगिच चिखल। कालवूं नको रे॥ २॥
संत संगतीनें उमज। आणुनि मनीं पुरतें समज।
अनुभवावीण मान। डोलवूं नको रे॥ ३॥
सोहिरा म्हणे ज्ञानज्योती। तेथें कैंचि दिवस-राती।
तयाविणें नेत्रपातीं। हालवूं नको रे॥ ४॥

## 24.16 गिरिधर

भक्तीं आकळिला। दयाघन भक्तीं आकळिला॥ धृ॥
पार्थरथीं सारथ्य करी जो। निजपद दे बळिला॥ १॥
प्रल्हादास्तव प्रकटुनि स्तंभीं। दानव निर्दळिला॥ २॥
रुक्मिणिनें एक्या तुळसिदळानें। गिरिधर प्रभु तुळिला॥ ३॥

## 24.17 अनामी

धांव पाव सांवळे विठाबाई कां मनिं धरली अढी[160]।
अनाथ मी अपराधी स्मरतो, उतरा पैलथडी॥ धृ॥

एकनाथाघरी पाणि वाहिले गंगेच्या कावडी।
कबीराचे ते शेले विणुनी त्यांची घालिसि घडी॥ १॥

सांवत्यामाळ्याची भाजी खुडुनी त्याची बांधिसि जुडी।
नरसीमेहत्याची हुंडी पटवुनि त्याचा झालासि गडी॥ २॥

जनाबाईची लुगडी धुतली चंद्रभागेच्या थडी।
सजन कसाई मांस विकितो त्याची लाविसी धडी॥ ३॥

[158] फाजिलपणाच्या गोष्टी.
[159] दुसऱ्यांच्या पापकर्मांच्या व धर्माच्या गोष्टी मात्र उत्साहाने सांगतोस आणि हरिस्मरणाचे तुला विस्मरण पडते.
[160] राग, अबोला.

दामाजी पंताचे वेळी झाला महार तातडी।
पायीं वहाणा हातीं काठी खांद्यावर घोंगडी॥ ४॥

चोखामेळ्याचे घरी येउनी ओढिसी ढोरें तांतडी।
त्याची स्त्री बहु हांका मारी कोठे दिधली दडी॥ ५॥

गजेंद्राचा धावा ऐकुनि वेगें घालिसि उडी।
अर्जुनरथि सारथ्य करूनी फेडिसी त्याची साकडी[161]॥ ६॥

## 24.18 अमृतराय

भक्तांचीया काजासाठी। साधूंचीया प्रेमासाठी।
सोडिली मी लाज रे॥ धृ॥
दुर्योधन सदनी गेलो। विदुराच्या गृहा आलो।
आवडीने कण्या प्यालो। जोंधळ्याची पेज रे॥ १॥
धुतो अर्जुनाचे घोडे। सदा राहे मागे पुढे।
घाली अंगणात सडे। बांधूनिया माज[162] रे॥ २॥
वेडी गौळियांची पोरे। त्यांचे ताक प्यालो बा रे।
खातां भिल्लिणीची बोरे। उच्छिष्टाची चोज रे॥ ३॥
पूर्णब्रह्म म्हणती माते। सर्व ब्रह्म मीच त्यातें।
ऐसियासी जाणीव ते। धरी अमृतराय रे॥ ४॥

## 24.19 देवनाथ

पार्था ते तरले ते तरले। जे नामी अनुसरले॥ धृ॥
वैराग्यें गरगरले। जे चित्सुखांत कीं तरतरले॥ १॥
शांतिसुखें आभरले। जैसें लवण जळी कीं विरले॥ २॥
देवनाथि मन मुरले। स्वरूपब्रह्म दिठीं जग भरले॥ ३॥

## 24.20 महादेवसुत

जयजय दत्तराज योगी। जयजय महाराज योगी॥ धृ॥
शैली शृंगी कंथा झोली, विभूत लगाया तनमो।
कोटिचंद्रमातेज झुलत है, चले आपने गतमो॥ १॥
शंख चक्र और त्रिशुल विराजे, गले बडी बनमाला।
जोगदंड अवधूत दिगंबर, बनारस रहनेवाला॥ २॥
कृपा करो हम दीन रंक है, ले जाव अपनी माया।
महादेवसुत ध्यान धरत है, तबही दर्शन पाया॥ ३॥

[161] सांकडी मणजे संकटे. भावाचा भुकेला भगवान भक्तांच्या घरी सेवकासारखा राबतो, त्यांच्या नित्याच्या कामातहि त्याना जातीने साह्य करतो, हे तत्त्व उदाहरणासह ह्या प्रेमळ पदात सांगितले आहे.
[162] कंबर बांधून, कांचा घालून

## 24.21 नारायणबुवा

हा परम सनातन विश्व भरुनि उरला।
गुरुदत्तराज ऋषिकुळात अवतरला॥ धृ॥
स्मितरम्यवदन काषायवसनधारी।
पीयूषयुक्त करि रत्नजडित झारी।
निज भक्तत्राणकारणी शूल धरिला॥ १॥ गुरुदत्त...
बांधिला टोप मुरडून जटामुकुटी।
घातली दयावनमाला दिव्यकंठी।
करधृतडमरूंतुनि उपजति ज्ञानकला॥ २॥ गुरुदत्त...
मृगचर्म पांघरी शंखचक्र हाती।
श्रुति श्वानरूप होऊनि पुढे पळती।
भूधेनु कलिभये चाटित चरणाला॥ ३॥ गुरुदत्त...
करि स्वजनउपाधी भस्मलेप अंगा।
झोळीत भरी तज्जन्ममरणपिंगा।
नारायण हृदयी रंग भरुनि गेला॥ ४॥ गुरुदत्त...

## 24.22 रामजोशी

भज भज भव जलधिमाजि मनुजा शिवाला॥ धृ॥
धरिशिल दृढ चरणकमल। घडिभरि मन करुनि विमल।
तरिच सकल पाप शमेल। त्यज रे भवाला॥ १॥
सांडुनियां विषयवमन। झडकरि करि षडरिदमन।
पूजि मन हें करुनि सुमन। गिरिजाधवाला॥ २॥
सावध हो करिसि काय। शंकर गुरु बाप माय।
चिंतुनि कवि राम पाय। हृदयीं निवाला॥ ३॥

## 24.23 गोविन्दबुवा

असा धरि छंद। जाय तुटोनिया भवबंध॥ धृ॥
छंद लागला टिटवीला। तिनें समुद्रही शोषिला।
मैनावतिनें कृतार्थ केला। गोपीचंद॥ १॥ जाय...
दुधाचा सागर उपमन्यूला। अढळ पदावरि तो ध्रुव बसला।
मार्कंडेयें यम हटवीला। झाला मंद॥ २॥ जाय...
झाले तीन देह भरताला। रावण रामरूप तो झाला।
गोपी चढल्या गोलोकाला। यशोदानंद॥ ३॥ जाय...
आळीस भ्रमराचा अध्यास। होतां भ्रमरपणा ये तीस।
तैसा सांडूनि जीवपणास। भोगि आनंद॥ ४॥ जाय...
छंदे असाध्यही साधिती। नर ते नारायणही होती।
दीनजन हरि आपुला करिती। जो सुखकंद॥ ५॥ जाय...

## 24.24 विठोबाअण्णा कऱ्हाडकर

- १ -

रत रे रत सखया! राघवनामीं।
किति रमशील कामी? ।
रामनाम सुखधाम निरंतर सेवुनियां
त्यज कुमति रिकामी॥ धृ॥
नानाजन्मार्जित दुरितें जळली। कृतपुष्पे फळली।
तइं या नरतनुची प्राप्ती कळली। मग मति का चळली?
लाज, लाज, करि काज स्मरुनि रघुराजपद,
विरम[163] धनसुतधामी॥ १॥
दारादि विषयांचा भ्रमकृतवारा। समजुनि मनि थारा।
सारा मयिकचि मोहपसारा। सारा निःसारा।
इष्टमित्र कुळगोत्र पुत्र सर्वथा वृथा भ्रम काकी मामी॥ २॥
करणे[164] सत्संग गतमल[165] करणे। शुद्धांतःकरणे।
स्मरणे हित वरणे संसृति तरणे। सत्कर्माचरणे।
समज करुनि हित समज उमज मनि
देशिकवचने[166] कवण कसा मी॥ ३॥
ऐशा साधनेचि बहुजन तरले। शांतीने वरले।
सहज देहत्वापासुनि सरले। निजपदि अनुसरले।
करिसि भजन तरि तरसि पितरसह
येविषयी तुज विठ्ठल हामी॥ ४॥

- २ -

श्रीरंगा, दे मज सत्संगा, आलो शरण तुला॥ १॥
रघुनाथा, आवडो तव गुणगाथा। आलो शरण तुला॥ २॥
गोविंदा, सोडवि विषयच्छंदा। आलो शरण तुला॥ ३॥
स्वानंदा, विसरवि विषयच्छंदा। आलो शरण तुला॥ ४॥
श्रीकृष्णा, दूर करि धनतृष्णा। आलो शरण तुला॥ ५॥
रघुराया, आवरि अपुली माया। आलो शरण तुला॥ ६॥
गोपाळा उघडी चिन्मय डोळा। आलो शरण तुला॥ ७॥
श्रीरामा, दे मज भजनप्रेमा। आलो शरण तुला॥ ८॥
घनश्यामा, नेई मज निजधामा। आलो शरण तुला॥ ९॥
भगवंता, तारी विठ्ठलपंता। आलो शरण तुला॥ १०॥

- ३ -

रामकृष्ण नरहरे स्वामिन् रामकृष्ण नरहरे।
कधि करशिल बा दया दयाळा, गर्भवास हा पुरे॥ धृ॥
काय करूं मी बरे। सांगें। काय करूं मी बरे॥
कळो येति मज माझे दोष गुण चित्त परी नावरे॥ १॥
विषयीं मन नावरे। सदोदित। विषयीं मन नावरे॥
कामक्रोध हें चोर लुटिति मज प्राण होति घाबरे॥ २॥
धांव धांव धांव रे। सत्वर। धांव धांव धांव रे॥
बुडतो भवसागरी दीन हा उद्धरि अपुल्या करें॥ ३॥
विचार मज ना स्फुरे। कांही। विचार मज ना स्फुरे॥
केवि गति होईल म्हणूनिया जीव अंतरी झुरे॥ ४॥
प्रार्थितसे आदरे। आतां एक। प्रार्थितसे आदरे॥
असे करी तव नाम निरंतर पंतविठ्ठल स्मरे॥ ५॥

- ४ -

उत्तम जन्मा येउनि रामा, गेलो मी वायां।
दुष्ट पातकी शरण मी आलो सत्वर तव पायां॥ धृ॥
आधी चुकलो मुकलो मी निज वेदस्वाध्याया।
कर्मे श्रौत स्मार्त न घडली सद्गति साधाया।
पुराण परिसुनि सादर झालो यशहि न तव गाया।
स्वस्थपणे कधि नाहि फावले तुजला पूजाया॥ १॥
आर्जविले बहु लवणभंजने व्याह्या जावया।
क्षुधित अतिथि कधि नाहि घेतला प्रेमे जेवाया।
उदार कर कधि केला नाही पैसा एक द्याया।
नाम फुकटचे तेंहि न आले स्वामी, वदना या॥ २॥
कपट करुनियां निपट भोंदिल्या बहुत आया-बाया।
केली धनगृहक्षेत्रस्त्रीपशुशिशुवरि बहु माया।
नित्य सजविली वसनभूषणे निंद्या ही काया।
सिद्ध ठेविली सदाहि रसना सज्जन निंदाया॥ ३॥
वटवटनिशिदिनि केलि चहुंकडे मन हे रमवाया।
केले स्नान न संध्या जपतप दुष्कृत शमवाया।
क्षणहि न केला साधुसमागम भवदेव निववाया।
सद्यः कामुक झालो पाहुनि परधन परजाया॥ ४॥
नाहीं विद्या कला कुशलता तुजला निववाया।
शुद्ध मधुर वाणीही नाही तुजला विनवाया।
बुद्धिहि नाहीं नकळे कांहीं शरणागत व्हाया।
थकलि मजल सर्वथा दयाळा स्वहित आचराया॥ ५॥
हरि कनवाळू करि दीनावरि करुणेची छाया।
निगमनगारा गर्जे ऐसा निखिलां कळवाया।
त्यावरि विश्वासुनियां आलो जवळ तुझ्या पाया।
शुद्ध दगड हा पंत विठ्ठल स्वामी रघुराया।
उत्तम जन्मा येउनि रामा, गेलो मी वायां॥ ६॥

---
163 धन, पुत्र व गृह ह्यांच्या ठायीं रमूं नकोस, आसक्त होऊ नकोस.
164 इंद्रिये
165 पापरहित
166 गुरूचा उपदेश ध्यानी धरून

## 24.25 कृष्णभट बांदकर

विश्वाचा विश्राम रे। स्वामी माझा राम रे।
आनंदाचे धाम त्याचे गाऊं वाचे नाम रे॥ धृ॥
चिद्रत्नांची खाण रे। एकाएकी जाण रे।
प्राणांचाही प्राण माझा सखया तूझी आण रे॥ १॥

देवाचा जो देव रे। तो हा स्वयमेव रे।
अलक्ष लक्षुनी साक्षी घेऊं अंगें खेंव रे॥ २॥
शिवाचा आराम रे। भक्तपूर्णकाम रे।
मुक्त योगीजन गाती जयासी निष्काम रे॥ ३॥
मिथ्या हे अनेक रे। सत्य राम एक रे।
विष्णु कृष्ण जगन्नाथ करी हा विवेक रे॥ ४॥

# 25 हिंदुस्थानी पदें

## 25.1 कबीर

- १ -

रामभजनकू दिया कमलमुख। रामभजनकू दिया॥ धृ॥
लख चौऱ्यायशी फेरे फिरकर। सुंदर नरतनु पाया॥ १॥
खाया पीया सुखसे सोया। इनोने क्यारे कमाया॥ २॥
ज्या मुख निशिदिनि रामनाम नहि।
वहा तुम कछु नहि किया॥ ३॥
कहत कबीरा सुन भाई साधु। आया वैसा गया॥ ४॥

- २ -

भजो रे भैय्या राम गोविंद हरि॥ धृ॥
जप तप साधन कछु नहि लागत। खरचत नहि गठरी॥ १॥
संपत संपत सुखके कारन। ज्यासे भूल परी॥ २॥
कहत कबीरा ज्या मुख राम नहि। वो मुख धुल भरी॥ ३॥

- ३ -

तूं तो राम सुमर जग लरवा दे॥ धृ॥
कोरा कागद काली शाई लिखत पढत वाकु पढवा दे॥ १॥
चंडी भैरव शितला देवी फतर पुजत वाकु पुजवा दे॥ २॥
हाती चाल चलत गति अपनी कुतर भुकत वाकु भुकवा दे॥ ३॥
कहत कबीरा सुन भाई साधु नरक पचत वाकु पचवा दे॥ ४॥

- ४ -

गुरुकृपा अंजन पायो मेरे भाई। रामविना कछु देखत नाही॥ धृ॥
अंदर राम बाहिर राम। जहां देखे वहां पूरन काम॥ १॥
जागत राम सोवत राम। सपनोमे देखत राजाहि राम॥ २॥
कहत कबीरा अनुभव निका। जहां देखे वहां राम सरिखा॥ ३॥

## 25.2 मीराबाई

- १ -

पग घुंगरू रे पग घुंगरू रे बांधकर नाची रे॥ धृ॥
मै अपने तो नारायनकी। होगई आपहि दासी रे॥ १॥
विषका प्याला राजाजिने भेजा। पीवत मीरा हांसी रे॥ २॥
लोक कहे मीरा भइ रे बावरी। बाप कहे कुल नासी रे॥ ३॥
मीराके प्रभु गिरिधर नागर। हरिचरनकी दासी रे॥ ४॥

- २ -

मोरी लागी लटक गुरुचरननकी॥ धृ॥
चरनबिना मुझे कछु नहि भावे।
झूट माया सब सपननकी॥ १॥
भवसागर सब सूख गयी है।
फिकर नही मुझ तरननकी॥ २॥
मीरा कहे प्रभु गिरिधर नागर।
उलट भयी मोरे नयननकी॥ ३॥

## 25.3 सुंदरदास

- १ -

यहि तो एक अचंबो भारी।
करहु आप मिर देहु औरके। कैसी रीत तुम्हारी॥ धृ॥
पंचतत्त्व गुन तीन आनिके। जुक्ति मिलाई सारी॥
अपुन निर्विकार हुइं बैठे। हमको किये भिकारी॥ १॥
जडका सक्ति कहाकी स्वामी। देखहु सृष्टि निहारी।
हलत चलत चुंबक तइं दीसे। सूई न चलत बिचारी॥ २॥
माया मोह लगाई सबनको। मोरे नर अरु नारी।
ममता मत्सर अहंकारकी। फांसि गरेमे डारी॥ ३॥
ठगविद्या नीकी जानत हो। बडे चतुर बेपारी।
हमको दास न देहु गुसाइ।
सुंदर कहत उधारी॥ ४॥

## 25.4 श्रीशंकराचार्य

- १ -

अविनयमपनय विष्णो दमय मनः
शमय विषयमृगतृष्णाम्।
भूतदया विस्तारय तारय संसारसागरतः॥ १॥
सत्यपि भेदापगमे नाथ। तवाहं न मामकीनस्त्वम्।
सामुद्रो हि तरङ्गः क्वचन समुद्रो न तारङ्गः॥ २॥
दामोदर गुणमन्दिर सुन्दरवदनारविन्द गोविन्द।
भवजलधिमथनमन्दर परमं दरमपनय त्वं मे॥ ३॥

# 26 श्रीसद्गुरुस्तव

ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम्
द्वन्द्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम्।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतम्।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि॥

# 27 अभंग

- १ -

श्रीगुरुसारिखा असतां पाठिराखा।
इतरांचा लेखा कोण करी॥ १॥
राजयाची कांता काय भीक मागे।
मनाचिया जोगे सिद्धि पावे॥ धृ॥
कल्पतरुतळवटी जो कोणी बैसला।
काय वाणी त्याला सांगिजो जी॥ २॥
ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो।
साच उद्धरलो गुरुकृपे॥ ३॥

- २ -

सद्गुरुनायके पूर्ण कृपा केली।
निजवस्तु[167] दाविली माझी मज॥ १॥
माझे सुख मज दावियेले डोळां।
दिधली प्रेमकळा ज्ञानमुद्रा॥ धृ॥
तया उतराई व्हावे कवण्या गुणे।
जन्मा नाही येणे ऐसे केले॥ २॥
डोळियाचा डोळा उघडिला जेणे।
लेवविले लेणे आनंदाचे॥ ३॥
नामा म्हणे निकी सांपडली सोय।
न विसंबे पाय खेचराचे॥ ४॥

- ३ -

सद्गुरुचे पाय जीवे न विसंबावे।
मन वळवावे वृत्तिसहित॥ १॥
डोळियाचे डोळे उघडिले जेणे।
आनंदाचे लेणे लेवविले॥ धृ॥
जन्ममरणाचे फेडिले सांगडे।
कैवल्यचि फुडे[168] दाखविले॥ २॥
मोहरले तरु पुष्प फळभारे।
तेचि निर्विकार सनकादिक॥ ३॥
नामा म्हणे स्वामी खेचर माउली।
कृपेची साउली केली मज॥ ४॥

- ४ -

ॐकारस्वरूपा सद्गुरु समर्था।
अनाथाच्या नाथा तुज नमो॥ १॥
गुरुराव स्वामी आतां स्वप्रकाश।
ज्यापुढे उदास चंद्र रवि॥ २॥
वेदां पडले मौन शास्त्रे वेडावली।
वाचा हे निमाली ते श्रीगुरु॥ ३॥
श्रीगुरु जयासी पाहे कृपादृष्टी।
तयासी हे सृष्टी पांडुरंग॥ ४॥
प्रभुराज माझा स्वामी गुरुराव।
देतो मज भाव शुद्ध भूमि॥ ५॥
भूमि शुद्ध करी ज्ञानबीज पेरी।
अद्वैत हे धरी मी तूं नेणे॥ ६॥
मजलागीं माझी सद्गुरु माउली।
कृपा करी साउली वर्णूं काय॥ ७॥
एका जनार्दनी गुरु परब्रह्म।
तयाचे पैं नाम सदा मुखीं॥ ८॥

# 28 गुरुपादुकाष्टक

ज्या संगतीनेच विराग जाला।
मनोदरीचा जडभास गेला।
साक्षात् परात्मा मज भेटवीला।
विसरूं कसा मी गुरुपादुकांला॥ १॥
सद्योगपंथे घरि आणियेले।
अंगेचि माते परब्रह्म केले।

[167] आत्मस्वरूप (तुझे आहे तुजपाशी)

[168] स्फुट, स्पष्ट

प्रचंड तो बोधरवी उदेला।
विसरूं कसा मी गुरुपादुकांला॥ २॥
चराचरी व्यापकता जयाची।
अखंड भेटी मजला तयाची।
परंपदी संगम पूर्ण जाला।
विसरूं कसा मी गुरुपादुकांला॥ ३॥
जो सर्वदा गुप्त जनांत वागे।
प्रपन्न भक्ता निजबोध सांगे।
सद्भक्तिभावाकरितां भुकेला।
विसरूं कसा मी गुरुपादुकांला॥ ४॥
अनंत माझ्या अपराधकोटी।
नाणी मनी घालुनि सर्व पोटी।
प्रबोध करितां श्रम फार जाला।
विसरूं कसा मी गुरुपादुकांला॥ ५॥
कांहीं मला सेवनही न जाले।
तथापि तेणें मज उद्धरीले।
आतां तरी अर्पिन प्राण त्याला।
विसरूं कसा मी गुरुपादुकांला॥ ६॥
माझा अहंभाव वसे शरीरी।
तथापि तो सद्गुरु अंगिकारी।
नाही मनी अल्पविकार ज्याला।
विसरूं कसा मी गुरुपादुकांला॥ ७॥
आतां कसा हा उपकार फेडूं।
हा देह ओवाळुनि दूर सांडूं।
म्यां एकभावे प्रणिपात केला।
विसरूं कसा मी गुरुपादुकांला॥ ८॥
जया वानितां वानितां वेदवाणी।
म्हणे नेति नेति ति लाजे दुरूनी।
नव्हे अंत ना पार ज्याच्या रुपाला।
विसरूं कसा मी गुरुपादुकांला॥ ९॥
जो साधुचा अंकित जीव जाला।
त्याचा असे भार निरंजनाला।
नारायणाचा भ्रम दूर केला
विसरूं कसा मी गुरुपादुकांला॥ १०॥

## 29 सद्गुरुस्तोत्र

गुरु, गुणालया, परापराधिनाथ[169] सुंदरा।
शिवादिकाहुनी वरिष्ठ तूंचि एक साजिरा।
गुणावतार तूं धरोनिया जगासि तारिसी।
सुरां मुनिवरा अलभ्य त्या गतीस दाविसी॥ १॥
जया गुरुत्व बोधिले तयासि कार्य साधिले।
भवार्णवासि लंघिले सुविघ्नदुर्ग भंगिले।
सहा रिपूंसि जिंतिले निजात्मतत्त्व चिंतिले।
परात्परांसि[170] पाहिले प्रकृष्टदुःख साहिले॥ २॥
गुरु उदार माउली प्रशांतिसौख्यसाउली।
जया नरासि फावली तयास सिद्धि गावली[171]।
गुरूगुरूगुरूगुरू म्हणोनि जो स्मरे नरू
तरोनि मोहसागरू सुखी घडे निरंतरू॥ ३॥
गुरू चिदब्धिचंद्र[172] हा महत्पदी महेंद्र हा।
गुरू प्रतापरुद्र हा गुरू कृपासमुद्र हा।
गुरू स्वरूप दे स्वतां गुरूचि ब्रह्म सर्वथा
गुरूविना महाव्यथा नसे जनीं निवारिता॥ ४॥
शिवाहुनी गुरू असे अधीक हे मला दिसे
नरांसि मोक्ष द्यावया गुरुस्वरूप[173] घेतसे।
शिवें स्वरूप आपुले न मोक्षदक्ष देखिले,
गुरुत्व पूर्ण घेतले, म्हणोनि कृत्य साधिले॥ ५॥
गुरूचि बाप माउली गुरूचि दीन साउली
गुरूचि शिष्यवासुरांसि कामधेनु गावली।
गुरूचि चिंतितार्थ[174] दे गुरूचि तत्त्व तो वदे
अलभ्य मोक्षलाभ आपुल्या कृपें गुरूचि दे॥ ६॥
गुरूचि भेद नाशितो जडांधकार शोषितो
गुरूचि मोह वारितो अविद्यभाव[175] सारितो।
गुरूचि ब्रह्म दावितो गुरूचि ध्यान लावितो
गुरूचि विश्व सर्व आत्मरूप हें बुझावितो॥ ७॥
गुरूचि मूळ रूप रे जगत्[176] गुरुस्वरूप रे
समस्त देवही तदंश दीसताति साजिरे।
गुरूचि पूर्णसिंधु रे तयांत देव बिंदु रे
गुरु स्वयंभु सूर्य अन्य[177] सर्वही मयूख रे॥ ८॥
गुरूचि दिव्य दृष्टि रे गुरूचि सर्व सृष्टि रे
गुरूचि ज्ञानबोध रे गुरूचि सर्व शोध रे।
गुणांत तोचि विस्तरे मनांत तोचि संचरे
समस्त भूतमात्र चेष्टवोनि एकला उरे॥ ९॥
गुरू विराटरूप[178] रे गुरू हिरण्यगर्भ रे
गुरूचि ॐ त्रिवर्ण[179] पंचवर्ण मुख्य तार[180] रे।
गुरूचि विश्व[181] तैजसू गुरूचि प्राज्ञ पूरुषू
गुरूविना दुजा नसे श्रुतीस घोष सर्वसु॥ १०॥

[169] परविद्या व अपराविद्या ह्यांचा स्वामी

[170] परावाचेच्या पलीकडचे जे स्वरूप ते.

[171] सापडली, लाभली.

[172] ज्ञानसागराला भरती आणणारा पूर्णचंद्र

[173] मुमूक्षूस मोक्ष देण्यासाठी गुरूचेच रूप ईश्वराला घ्यावे लागते. म्हणून ईश्वराहून गुरूच श्रेष्ठ आहे असे गुरुभक्त भावतो. वस्तुतः गुरु व देव भिन्न नाहीत.

[174] म्हणून त्याला कल्पतरु म्हणतात.

[175] तो कल्पनेचे बंड मोडून निर्विकल्प सुख देतो.

[176] सारे जगच गुरुस्वरूप आहे.

[177] इतर सर्व देव हे गुरुरूप सूर्याची किरणे आहेत.

[178] विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत व मूळप्रकृति हे ब्रह्मांडाचे चार देह आहेत.

[179] प्रणव हा अ, उ, म् असा त्रिवर्णात्मक आहे, असे कोणी म्हणतात. व अ, उ, म् आणि अर्धमात्र आणि बिंदु असा पंच वर्णात्मक आहे, असेहि कोणी म्हणतात.

[180] तार म्हणजे तारणारा प्रणव

[181] विश्व, तैजस, प्राज्ञ व प्रत्यगात्मा हे चार देहांचे चार अभिमानी पुरुष आहेत.

गुरूचि ध्येय ध्यान रे गुरूचि सर्व मान रे
नसे गुरूसमान रे जनीं गुरूस मान रे।
गुरूचि थोर सान रे महासुखा निधान रे
गुरू गुरू गुरू गुरू करी म्हणोनि गान रे॥ ११॥
गुरुस्वरूप चिंतिजे समाधि हेंचि बोलिजे
समस्त वेदपाठनाम-मंत्रजाप्य जाणिजे।
यतार्थ सर्व तीर्थ सद्गुरूपदाब्जतोय हे।
गुरूचि सेवणे अनेक अश्वमेध यज्ञ हे॥ १२॥
नमो गुरू कृपाकरा नमो गुरू गुणाकरा
नमो गुरू परात्परा नमो गुरू महत्तरा।
नमो गुरू सनातना नमो गुरू मनोन्मना
नमो गुरू घनाघना नमो गुरू निरंजना॥ १३

... निरंजनमाधव

## 30 पदे

- १ -

माझी देवपुजा देवपुजा। पाय तुझे गुरुराजा॥ धृ॥
गुरुचरणाची माती। तेचि माझी भागीरथी॥ १॥
गुरुचरणाचा बिंदु। तोचि माझा क्षीरसिंधु॥ २॥
गुरुचरणाचे ध्यान। तेंचि माझे संध्यास्नान॥ ३॥
शिवदिन केसरिपायीं। सद्गुरुवांचुनि दैवत नाही॥ ४॥

- २ -

श्रीगुरुचे चरणकुंज हृदयीं स्मरावे॥ धृ॥
निगमनिखिलसाधारण सुलभाहुनि सुलभ बहू।
इतर योगयागविषमपंथि का शिरावे? ॥ १ ॥
नरतनुदृढनावेसि बुडवुनि अतिमूढपणे।
दुष्ट नष्ट कुकर सुकरतनु कां फिरावे? ॥ २॥
रामदास विनवि तुज अजुनि तरी समज उमज।
विषयवीष पिउनियां फुकट कां मरावें? ॥ ३॥

- ३ -

गुरुमहाराज गुरु जय जय परब्रह्म सद्गुरु॥ धृ॥
चारी मुक्तीदायक दाता उदार कल्पतरु॥ १॥ जय...
रूप जयाचे मनबुद्धीपर वाचे अगोचरू॥ २॥ जय...
अलक्ष्य अनाम अरूप अद्वय अक्षय परात्परू॥ ३॥ जय...
बद्ध मुमुक्षू साधक शरणगता वज्रपंजरु॥ ४॥ जय...
आत्मा रामी रामदास गोपाल करुणाकरु॥ ५॥ जय...

- ४ -

झाल्यें बाई वेडी। दरबार गुरूचा झाडी॥ धृ॥
देहपितांबर फाडिला। नवरत्नांचा हार काढिला।
सद्गुरूचे गळां घातला। वासना सोडी॥ १॥
कल्पनाकांचोळी काढिली। त्रिगुणांची वेणी सोडिली।
चारि देहांची मुक्ति साधिली। परी ती थोडी॥ २॥
वेडी झाल्यें सद्गुरुघरची। चिंता हरपली मनाची।
सोय दाखविलि स्वस्वरुपाची। लागली गोडी॥ ३॥
चिन्मय स्वरूप दाखवीले। आपणामध्ये मेळवीले।
पूर्णानंद गुरूने केले। पाय न सोडी॥ ४॥

- ५ -

तो मज आठवतो। गुरुराजा। प्राणविसांवा माझा॥ धृ॥
श्रवणीं पाजुनियां। अमृत। मस्तकिं ठेवुनि हस्त॥ १॥
विवेक सिंधूची। चिद्रत्नें। लेवविली मज यत्नें॥ २॥
अखंड देउनियां। स्मरणासी। द्वैतभयातें नासी॥ ३॥
अक्षयप्राप्तीचा। सुखदाता। केशवकवि म्हणे आतां॥ ४॥

- ६ -

आया था इक आया था।
जिनि दरसन प्रगट दिखाया था॥ धृ॥
श्रवणहु सब्द सुनाया था।
तिन सत्यस्वरूप बताया था॥ १॥
तिन संसार दूरि बहाया था।
अखिल खजीना ल्याया था॥ २॥
तिन बांटि सबनिसौ खाया था।
ऐसा दादू राया था।
सो सुंदरके मन भाया था।
आया था इक आया था॥ ४॥

## 31 श्रीदत्तगुरुकरुणाष्टकम्

दत्तात्रेया तव शरणं। दत्तनाथा तव शरणम्॥
त्रिगुणात्मका त्रिगुणातीता। त्रिभुवनपालक तव शरणम्॥ १॥
शाश्वतमूर्ते तव शरणम्। श्यामसुंदरा तव शरणम्।
शेषाभरणा शेषभूषणा शेषशायि गुरु तव शरणम्॥ २॥
षड्भुजमूर्ते तव शरणम्। षड्भुजयतिवर तव शरणम्।
दण्डकमण्डलु गदापद्मकर शङ्खचक्रधर तव शरणम्॥। ३॥
करुणानिधे तव शरणम्। करुणासागर तव शरणम्।
श्रीपादश्रीवल्लभ गुरुवर नृसिंहसरस्वति तव शरणम्॥ ४॥
श्रीगुरुनाथा तव शरणम्। सद्गुरुनाथा तव शरणम्।
कृष्णासङ्गमतरुवरवासी भक्तवत्सला तव शरणम्॥ ५॥

कृपामूर्ते तव शरणम्। कृपासागरा तव शरणम्।
कृपाकटाक्षा कृपावलोकना कृपानिधे प्रभु तव शरणम्॥ ६॥
कालान्तका तव शरणम्। कालनाशका तव शरणम्।
पूर्णानन्दा पूर्णपरेशा पुराणपुरुषा तव शरणम्॥ ७॥
जगदीशा तव शरणम्। जगन्नाथा तव शरणम्।
जगत्पालका जगदाधीशा जगदुद्धारा तव शरणम्॥ ८॥
अखिलान्तरा तव शरणम्। अखिलेश्वरा तव शरणम्।
भक्तप्रिया वज्रपञ्जरा प्रसन्नवक्त्रा तव शरणम्॥ ९॥
दिगम्बरा तव शरणम्। दीनदयाघन तव शरणम्।
दीनानाथा दीनदयाळा दीनोद्धारा तव शरणम्॥ १०॥
तपोमूर्ते तव शरणम्। तेजोराशी तव शरणम्।
ब्रह्मानन्दा ब्रह्मसनातन ब्रह्ममोहना तव शरणम्॥ ११॥
विश्वात्मका तव शरणम्। विश्वरक्षका तव शरणम्।
विश्वम्भरा विश्वजीवना विश्वपरात्पर तव शरणम्॥ १२॥
विघ्नान्तका तव शरणम्। विघ्ननाशका तव शरणम्।
प्रणवातीता प्रेमवर्धना प्रकाशमूर्ते तव शरणम्॥ १३॥
निजानन्दा तव शरणम्। निजपददायका तव शरणम्।
नित्यनिरञ्जन निराकारा। निराधारा तव शरणम्॥ १४॥
चिद्घनमूर्ते तव शरणम्। चिदाकारा तव शरणम्।
चिदात्मरूपा चिदानन्दा चित्सुखकन्दा तव शरणम्॥ १५॥
अनादिमूर्ते तव शरणम्। अखिलावतारा तव शरणम्।
अनन्तकोटिब्रह्माण्डनायका अघटितघटना तव शरणम्॥ १६॥
भक्तोद्धारा तव शरणम्। भक्तरक्षका तव शरणम्।
भक्तानुग्रहभक्तिप्रिया। पतितोद्धारा तव शरणम्॥ १७॥

## 32 श्रीगुरुचरित्रकार सरस्वती गंगाधरकृत दोन पदे

देखियला हो, आम्ही पाहियला हो।
पूर्णानंदकंद विवुधवंद्य गुरु हो॥ धृ॥
सदयहृदय अत्रितनय। कलिकृत बहु पाहुन अनय।
सुजनअवनि अवनि सदय। यतिरूपें प्रगटला हो॥ १॥
कोटिमदनविहित वदन। मंदहसित कुंदरदन।
अमल-कमलदल-सुनयन। लसित सतत माळ गळा हो॥ २॥
भस्मभुषित सकल अंग। दुकुल अरुणसम सुरंग।
पदनत-अघ करुनि भंग। अर्पि सुखद आत्मकला हो॥ ३॥
श्रीनृसिंहसरस्वती। स्तवनि चकित वेदमति।
गंगाधरतनय प्रीति। हृत्कमली पूजियला हो॥ ४॥

- २ -

श्रीगुरु औदुंबरी। पाहिले, नरहरि औदुंबरी॥ धृ॥
दंड-कमंडलु करी विराजित। मुख इंदूचे परी॥ १॥
पाहिले, नरहरि औदुंबरी॥
धर्मरक्षण करावयास्तव। मानववपु आदरी॥ २॥
पाहिले, नरहरि औदुंबरी॥
गंगाधरात्मज तत्पदकमली। लागला भ्रमरापरी॥ ३॥
पाहिले, नरहरि औदुंबरी॥

## 33 संतमहात्म्य

सर्व भूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः।
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः॥ २-४५
निरपेक्षं मुनिं शान्तं निर्वैरं समदर्शनम्।
अनुव्रजाम्यहं नित्यं पूयेयेत्यङ्घ्रिरेणुभिः॥ १४-१६
... श्रीमद्भागवत, स्कंध ११

### 33.1 अभंग

- १ -

भक्तामाजी अग्रगणी। पुंडलीक महामुनी॥ १॥
त्याचे प्रसादें तरले। साधुसंत उद्धरले॥ २॥
तोचि प्रसाद आम्हांसी। विटेवरी हृषीकेशी॥ ३॥
पुंडलीक बाप माय। दासी जनी वंदी पाय॥ ४॥

- २ -[182]

माझे भक्त मज अनुसरले चित्ते।
त्याहूनी पढियंते[183] मज आणिक नाही॥ १॥
व्यक्ती येणें मज तयांचिये आवडी।
युगायुगीं प्रौढी हेचि मिरवी॥ २॥
त्यांचेनी कृतार्थ असे मी पूर्णकाम।
ते माझे परम प्राणसखे॥ ३॥
ते माझे आश्रमीं मी त्यांचा विश्राम।
जिंहीं रूप-नाम केले मज॥ ४॥
मी त्यांचा सोयरा ते माझे सांगाती।
करी त्यां एकांती सुखगोष्टी॥ ५॥
जिंही तनु मनु प्राण लाविला मजकडे।
मी तयां आवडे जीवाहूनी॥ ६॥
ते माझे भाग्याचे अधिकारी विभागी।
वैकुंठ त्यालागीं वसतें केले॥ ७॥
त्यांचे गुजगौप्य मीचि एक जाणे।
माझी प्रेमखूण कळली तयां॥ ८॥
मनाची साउली करूनियां मातें।
भोगिती आतां ते सर्व सुख॥ ९॥

[182] हे पांडुरंगाचे नामदेवाशी भाषण आहे. (तीर्थावळी पहा)
[183] प्रिय, आवडते

आपुलियां किरणे विराजे गभस्ती।
परी किरण न होती आन जेवीं।१०॥
तैसें माझे दास मजमाजी उदास
असती समरस दुजेनवीण[184]॥११॥
मी तो भक्तरूप भक्त माझे स्वरूप।
प्रभा आणि दीप जयापरी॥१२॥
हे खूण अनुभवीं जाणती ते ज्ञानी।
ज्या नाहीं आयणी[185] कासयाची॥१३॥
त्यांचिया चरणींचे रज माझें नामे।
जे सांडिले रज-तमें सत्त्वशीळ॥१४॥
त्याचे भेटी लागी हृदय कळवळे।
कैं देखोन डोळे निवती माझे॥१५॥

- ३ -

ब्रह्ममूर्ति संत जगीं अवतरले।
उद्धरावया आले दीनजना॥१॥
ब्रह्मादिकादि त्यांचे वदती पायवणी[186]।
नाम घेतां वदनी दोष जाती॥२॥
हो कां दुराचारी विषयीं आसक्त।
संतकृपें त्वरित उद्धरतो॥३॥

अखंडित नामा त्याची वाट पाहे।
निशिदिनी ध्याये सत्संगती॥४॥

- ४ -

संतचरणरज लागतां सहज।
वासनेचे बीज जळोन जाय॥१॥
मग रामनामी उपजे आवडी।
सुख घडोघडीं वाढो लागे॥२॥
कंठी प्रेम दाटे नयनी नीर लोटे।
हृदयीं प्रगटे रामरूप॥३॥
नामा म्हणे साधन सुलभ गोमटे।
परी उपतिष्ठे पूर्वपुण्ये॥४॥

- ५ -

उदार तुम्ही संत। मायबाप कृपावंत॥१॥
केवढा केला उपकार। काय वानूं मी पामर॥२॥
जडजीवा उद्धार केला। मार्ग दाविला सुपंथ॥३॥
सेना म्हणे उतराई। होतां कांहीं दिसेना॥४॥

- ६ -

तेचि एक संत जाणा। नारायणा आवडती॥१॥
पांडुरंगावांचुनि कांहीं। न जाणे पाही दुसरे॥धृ॥
मुखीं नाम अमृतावाणी। धाले मन डुल्लती॥२॥
सेना म्हणे पायी माथा। त्यांच्या आतां ठेविला॥३॥

- ७ -

संत जाती हरिकीर्तना। त्यांचे वाहिन मोचे वाहणा॥१॥
हेचि भवसिंधूचे तारूं। येणें उतरूं पैलपारू॥२॥
जन्मोजन्मीचे भेषज। तें हे संतचरणरज॥३॥
संतचरणींच्या पादुका। झाला जनार्दनी एका॥४॥

- ८ -

संतांचिया माथा चरणांवरी माझा।
देहीं भाव दुजा नाहीं नाहीं॥१॥
नामाचे चिंतन करिती सर्वकाळ।
ते माझे केवळ मायबाप॥२॥
मायबाप म्हणो तरी लाजिरवाणे।
चुकविले पेणे संतजनी॥३॥
ज्या ज्या जन्मा यावे मायबाप दोनी।
परी संत निर्वाणी मिळतीना॥४॥
येचि देहीं डोळा संतांसी देखिले।
एका जनार्दनीं वंदिले चरण त्यांचे॥५॥

- ९ -

विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म।
भेदाभेदभ्रम अमंगळ॥१॥
आइका जी तुम्ही भक्त भगवान।
कराल तें हित सत्य करा॥२॥
कोणाही जीवाचा न घडो मत्सर।
वर्म सर्वेश्वर पूजनाचे॥३॥
तुका म्हणे एका देहाचे अवयव।
सुख दुःख जीव भोग पावे॥४॥

- १० -

काय वानूं मी या संताचे उपकार।
मज निरंतर जागविती॥१॥
काय द्यावें यांसी व्हावे उतराई।
ठेवितां हा पायीं जीव थोडा॥२॥
सहज बोलणे हित उपदेश।
करूनी सायास शिकविती॥३॥
तुका म्हणे वत्स धेनुवेचे चित्तीं।
तैसे मज येती सांभाळीत॥४॥

[184] एकात्मतेच्या भावाने, अभिन्नपणाने मला भजतात.
[185] तत्त्व निर्णयेच्छा, ज्यांची जिज्ञासा पूर्ण झाली आहे.
[186] पायांचे तीर्थ

- ११ -

जाणे भक्तीचा जिव्हाळा। तोचि दैवाचा पुतळा॥ १॥
आणिक न ये माझ्या मना। हो कां पंडित शाहाणा॥ २॥
नामरूपीं जडले चित्त। त्याचा दास मी अंकित॥ ३॥
तुका म्हणे नवविध। भक्ति जाणे तोचि शुद्ध॥ ४॥

- १२ -

पुण्यवंत व्हावे। घेतां सज्जनांची नांवें॥ १॥
नेघे माझी वाचा तुटी। महालाभ फुकासाठी॥ २॥
विश्रांतीचा ठाव। पायी संताचिया भाव॥ ३॥
तुका म्हणे पापे। जाती संतांचिये जपे॥ ४॥

- १३ -

उजळले भाग्य आतां। अवघी चिंता वारली॥ १॥
संतदर्शनी हा लाभ। पद्मनाभ जोडला॥ २॥
संपुष्ट हे हृदयपेटी। करूनि पोटी सांठवूं॥ ३॥
तुका म्हणे होता ठेवा। तो या भावा सापडला॥ ४॥

- १४ -

वीर विठ्ठलाचे गाढे। कळिकाळ पायां पडे॥ १॥
करिती घोष जयजयकार। जळती दोषाचे डोंगर॥ २॥
दया क्षमा शांति। बाण अभंग हे हातीं॥ ३॥
तुका म्हणे बळी। तेचि एक भूमंडळी॥ ४॥

- १५ -

संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ।
नाहीं तळमळ दुःखलेश॥ १॥
तेथें मी राहीन होऊनि याचक।
घालतील भीक तेचि मज॥ २॥
संतांचिये गांवीं वरो[187] भांडवल।
अवघा विठ्ठल धन वित्त॥ ३॥
संतांचे भोजन अमृताचे पान।
करिती कीर्तन सर्वकाळ॥ ४॥
संतांचा उदीम उपदेशाची पेठ।
प्रेम सुससाटी[188] देती घेती॥ ५॥
तुका म्हणे तेथे आणिक नाही परी[189]।
म्हणोनि भिकारी झालो त्यांचा॥ ६॥

[187] श्रेष्ठ, मुख्य.
[188] सर्वदा.
[189] प्रकार.

- १६ -

काय वानूं आतां न पुरे ही वाणी।
मस्तक चरणी ठेवीतसे॥ १॥
थोरीव सांडिली आपुले परीसे[190]।
नेणे शिवो कैसें लोखंडासी॥ २॥
जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति।
देह कष्टवीती उपकारे॥ ३॥
भूतांची दया हें भांडवल संता।
आपुलिया ममता नाहीं देही॥ ४॥
तुका म्हणे सुख[191] पराविया सुखें।
अमृत हे मुखें स्रवतसे॥ ५॥

- १७ -

जे कां रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले॥ १॥
तोचि साधू ओळखावा। देव तेथेंचि जाणावा॥ २॥
मृदु सबाह्य नवनीत। तैसे सज्जनाचे चित्त॥ ३॥
ज्यासी अपंगिता[192] नाही। त्यासी धरी जो हृदयी॥ ४॥
दया करणे जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी॥ ५॥
तुका म्हणे सांगो किती। तोचि भगवंताची मूर्ति॥ ६॥

- १८ -

भक्त ऐसे जाणा जे देही उदास[193]।
गेले आशापाश निवारूनि॥ १॥
विषय तो त्यांचा जाला नारायण।
नावडे जन, धन, माता, पिता॥ २॥
निर्वाणी गोविंद असे मागे पुढे।
कांहीच सांकडे पडो नेदी॥ ३॥
तुका म्हणे सत्यकर्मा व्हावे साह्य।
घातलिया भय नरका जाणे॥ ४॥

- १९ -

आलिंगन घडे। मोक्ष सायुज्यता जोडे॥ १॥
ऐसा संतांचा महिमा। जाली बोलायाची सीमा॥ २॥
तीर्थें पर्वकाळ। अवघीं पायांपें सकळ॥ ३॥
तुका म्हणे देवा। त्यांची केली पावे सेवा॥ ४॥

[190] परीस आपला मोठेपणा विसरून लोहास शिवून त्याचे सोने करतो. तसे संत दयेने पतितांचेही सोने करतात.
[191] संत परसुखे सुखावतात व मुखे अमृत स्रवतात.
[192] रक्षिता, पोशिंदा
[193] कनककांता न ये चित्ता। तोचि परमार्थी पुरता॥ (रामदास)

- २० -

शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी॥ १॥
मुखी अमृताची वाणी। देह देवाचे कारणी॥ २॥
सर्वांग निर्मळ। चित्त जैसे गंगाजळ॥ ३॥
तुका म्हणे जाती। ताप, दर्शने विश्रांती॥ ४॥

- २१ -

हरि-गोपाळांसवें सकळां।
भेटे गळ्यां गळा मेळवूनी॥ १॥
भाविकें त्यांची आवडी मोठी।
सांगे गोष्टी जीवींचिया॥ २॥
योगियांच्या ध्याना जो न ये।
भाकरी त्यांच्या मागोनि खाये॥ ३॥
तुका म्हणे असे शाहाणीया दूरी।
बोबडियां दासां हांका मारी॥ ४॥

- २२ -

तुम्ही संत माय-बाप कृपावंत।
काय मी पतित कीर्ति वानूं॥ १॥
अवतार तुम्हां धराया कारण।
उद्धराया जन जड जीव॥ २॥
वाढावया सुख भक्तिभावधर्म।
कुळाचार नाम विठोबाचे॥ ३॥
तुका म्हणे गुण चंदनाचे अंगीं। तैसे तुम्ही जगीं संतजन॥ ४॥

- २३ -

माझिया जातीचे मज भेटो कोणी।
आवडीची धणी फेडावया॥ १॥
आवडे ज्या हरी अंतरापासूनी।
ऐसियाचे मनीं आर्त माझे॥ २॥
तयालागी जीव होतो कासावीस।
पाहतील वास नयन हे॥ ३॥
सफळ हा जन्म होईल येथून।
देतां आलिंगन वैष्णवांसी॥ ४॥
तुका म्हणे तोचि सुदिन सोहळा।
गाऊं या गोपाळा धणीवरी॥ ५॥

- २४ -

ब्रह्मरसगोडी तयांसी फावली।
वासना निमाली सकळ ज्यांची॥ १॥
नाहीं त्यां विटाळ अखंड सोवळीं।
उपाधीवेगळी जाणिवेच्या॥ २॥
मन हे निश्चळ झाले एके ठायीं।
तयां उणे काई निजसुखा॥ ३॥
पुण्यवंत तेचि परउपकारी।
प्रबोधी त्या नारी-नरलोकां॥ ४॥
तुका म्हणे त्याचे पायीं पायपोस।
होऊनियां वास करीन तेथे॥ ५॥

- २५ -

काम-क्रोध आम्ही वाहिले विठ्ठलीं।
आवडी धरली पायांसवें॥ १॥
आतां कोण पाहे मागे परतोनी।
गेला हारपोनी देहभाव॥ २॥
रिद्धि-सिद्धि सुखे हाणितल्या लाथा।
तेथे या प्राकृता कोण मानी॥ ३॥
तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास।
करूनि ठेलो ग्रास ब्रह्मांडाचा॥ ४॥

- २६ -

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म।
निर्धार हें वर्म चुको नये॥ १॥
निष्काम निश्चळ विठ्ठली विश्वास।
पाहो नये वास आणिकांची॥ २॥
तुका म्हणे ऐसा कोण उपेक्षिला।
नाही आयकिला ऐसा कोणी॥ ३॥

- २७ -

पवित्र तो देह वाणी पुण्यवंत।
जो वदे अच्युत सर्वकाळ॥ १॥
तयाच्या चिंतने तरतील दोषी।
जळतील राशी पातकांच्या॥ २॥
देव इच्छी रज चरणींची माती।
धांवत चालती मागे मागे॥ ३॥
काय उरले तया वेगळे आणिक।
वैकुंठनायक तया कंठी॥ ४॥
तुका म्हणे देव-भक्तांचा संगम।
तेथे ओघ नामत्रिवेणीचा॥ ५॥

- २८ (पृथ्वीमोलाचा अभंग) -

सोन्याचे पर्वत करवती पाषाण।
अवघे रानोरान कल्पतरु॥ १॥
परि या दुर्लभ विठोबाचे पाय।
तेथे हे उपाय न सरती॥ धृ॥

अमृतें सागर भरवती गंगा।
म्हणवेल उगा राहे काळा॥ २॥
भूत भविष्य कळो येईल वर्तमान।
करवती प्रसन्न रिद्धि-सिद्धी॥ ३॥
स्थान मान कळो येती योगमुद्रा।
नेववेल वारा ब्रह्मांडासी॥ ४॥
तुका म्हणे मोक्ष राहे ऐलीकडे।
इतर बापुडे काय तेथे॥ ५॥

- २९ -

तेचि संत तेचि संत। ज्यांचा हेत विठ्ठली॥ १॥
नेणती कांहीं टाणे टोणे। नामस्मरणे वांचूनी॥ २॥
काया वाचा आणि मनें। धाले चिंतने डुल्लती॥ ३॥
निळा म्हणे विरक्त देहीं। आठवचि नाहीं विषयांचा॥ ४॥

## 33.2 पदे

- १ -

धन्य तोचि जगीं एक हरिरंगीं नाचे।
रामकृष्ण वासुदेव सदा स्मरे वाचे॥ धृ॥
सुख दुःख समाधान सकळ जीवांचा कृपाळ।
ज्ञानाचा उद्बोध भक्तिप्रेमाचा कल्लोळ॥ १॥
विषयीं विरक्त जया नाही आप-पर।
संतुष्ट सर्वदा स्वयें व्यापक निर्धार॥ २॥
जाणीव शाहणीव ओझें सांडुनियां दूरी।
आपण वस्तीकर वर्ततसे संसारी॥ ३॥
एका जनार्दनीं नित्य हरीचे कीर्तन।
आसनी शयनी सदा हरीचे चिंतन॥ ४॥

- २ -

संतपदाची जोडी दे रे हरी॥ धृ॥
संतसमागमि आत्मत्वाचा।
सुंदर उगवे मोड॥ १॥
सुफलित करुनी पूर्ण मनोरथ।
पुरविति जिविंचे कोड॥ २॥
अमृत म्हणे रे हरि! भक्तांचा।
शेवट करीसी गोड॥ ३॥

- ३ -

ते धन्य जगदुद्धारी विद्वज्जनविजनविहारी॥ धृ॥
भक्तांसी भगवद्भजने भवसागर मृगजलवत् रे।
चिद्विलास जगनग हेमीं वस्तुत्वें भेदातित रे।
अस्तिभातिप्रियरूप आत्मा तो नामरूपविरहित रे।
होउनियां अनुभव ऐसा हरिभजनी अत्यद्भुत रे॥ १॥
जाळिले संचित समुळीं ज्ञानाग्नीमाजी निगुती।
क्रियमाण पूर्वप्रवाहें विधिपूर्वक कर्मे घडती।
निर्हेतुक निरहंकारे ब्रह्मार्पण सहजचि होती।
प्रारब्ध कलेवर भोगी साक्षी हा ईश्वरमूर्ती॥ २॥
अहिकुंडलवत् तनु पाहतां संतोषविस्मय न वसे।
तैसे या विद्वद्वर्या स्वरूपाहुनि आन न भासे।
मृत्तिकेवरी कुल्लाळें घट कोठुनि आणविलासे।
रंगला वा निजरंगी निरतिशय सदनी विलासे॥ ३॥

## 34 नामसंकीर्तन

कल्याणानां निधानं कलिमलमथनं पावनं पावनानाम्
पाथेयं यन्मुमुक्षोः सपदि परपदप्राप्तये प्रस्थितस्य।
विश्रामस्थानमेकं कविवरवचसां जीवनं सज्जनानाम्
बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवतां भूतये रामनाम॥ १॥

बुद्धि बडी चतुराई बडी
सुंदराई बडी तनमे लपटी है।
धन बडो धाम बडो
ज्याके कीरत हूं जगमा प्रगटी है॥
द्वारे मनुष्य हजार ठाडे
ज्याके इंद्र कुही एक घटी है।
कहे तुलसी एक रामके नामबिना
सुंदर नारकि नाक कटी है॥ २॥

## 34.1 हरिपाठाचे अभंग

- १ -

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी।
तेणें मुक्ति चारी साधियेल्या॥ १॥
हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा।
पुण्याची गणना कोण करी ? ॥ २॥
असोनि संसारी जिव्हे वेगु करी।
वेदशास्त्र उभारी बाह्या सदा॥ ३॥
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणे।
द्वारकेचे राणे पांडवाघरी॥ ४॥

- २ -

संतांचे संगती मनोमार्गे गती।
आकळावा श्रीपती येणे पंथे॥ १॥

रामकृष्ण वाचा भाव[194] हा जीवाचा[195]।
आत्मा[196] जो शिवाचा राम जप॥ २॥
एकतत्त्वनाम साधिती[197] साधन।
द्वैताचे बंधन न बांधिजे॥ ३॥
नामामृतगोडी वैष्णवां साधली।
योगियां लाधली जीवनकळा[198]॥ ४॥
सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला।
उद्धवा लाभला कृष्ण दाता॥ ५॥
ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ।
सर्वत्र दुर्लभ[199] विरळा जाणे॥ ६॥

- ३ -

जप-तप-धर्म क्रिया-नेम-धर्म।
सर्वांघटी राम भावशुद्ध[200]॥ १॥
न सोडी रे भावो टाकी रे संदेहो।
रामकृष्णी टाहो नित्य फोडी॥ २॥
जाती-वित्त-गोत[201] कुळ-शीळ-मात।
भजे कां त्वरित भावनायुक्त॥ ३॥
ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी।
तेणें वैकुंठभुवनी घर केले॥ ४॥

- ४ -

काळवेळ नाम उच्चारितां नाही।
दोन्ही पक्ष[202] पाही उद्धरती॥ १॥
रामकृष्ण नाम सर्वा दोषां हरण।
जडजीवां तारण हरि एक॥ २॥
हरि नाम सार, जिव्हा[203] या नामाची।
उपमा त्या दैवाची कोण वाणी॥ ३॥
ज्ञानदेवा सांग झाला नामपाठ।
पूर्वजां वैकुंठमार्ग सोपा॥ ४॥

- ५ -

हरिचिया दासा हरि दाही दिशा।
भावे जैसा तैसा हरि एक॥ १॥
हरि मुखीं गातां हरपली चिंता।
त्या नाहीं मागुता जन्म घेणे॥ २॥
जन्म घेणे लागे वासनेच्या संगे।
तेचि झाली अंगे हरिरूप॥ ३॥
हरिरूप झाले जाणणे हरपले।
नेणणे तें गेले हरिचे ठायी॥ ४॥
हरिरूप ध्यानीं हरिरूप मनीं।
एका जनार्दनी हरि बोला॥ ५॥

- ६ -

हरि बोला देतां हरि बोला घेतां।
हांसतां खेळतां हरि बोला॥ १॥
हरि बोला गातां हरि बोला खातां।
सर्व कार्य करितां हरि बोला॥ २॥
हरि बोला एकांती हरि बोला लोकांती।
देह त्यागितां अंती हरि बोला॥ ३॥
हरि बोला भांडता हरि बोला कांडतां।
उठतां बैसतां हरि बोला॥ ४॥
हरि बोला जनीं हरि बोला विजनीं।
एका जनार्दनीं हरि बोला॥ ५॥

- ७ -

पिंडी देहस्थिति ब्रह्मांडी पसारा।
हरीविण सारा व्यर्थ भ्रम॥ १॥
शुक याज्ञवल्क्य दत्त कपिलमुनी
हरीसी जाणोनि हरिच झाले॥ २॥

या रे या रे धरूं हरिनामतारूं।
भवाचा सागरू भय नाहीं॥ ३॥
साधु-संत गेले आनंदी राहिले।
हरिनामे झाले कृतकृत्य॥ ४॥
एका जनार्दनी मांडिले दुकान।
देतो मोलेविण सर्व वस्तु॥ ५॥

- ८ -

आवडीने जरी हरिनाम घेसी।
तुझी चिंता त्यासि सर्व आहे॥ १॥
नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा।
पति लक्ष्मीचा जाणतसे॥ २॥
सकळ जीवांचा करितो सांभाळ
तुज मोकलील ऐसे नाहीं॥ ३॥
जैसी स्थिति आहे तैशापरी राहे।
कौतुक तूं पाहे संचिताचे॥ ४॥
एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा।
हरिकृपें त्याचा नाश आहे॥ ५॥

194 धर्म
195 मनुष्यमात्राचा
196 शिवाचा आत्मा जो राम तो जप
197 अद्वितीय असा जो एक परमात्मा त्याचे नामस्मरण हेच परम साधन साधितात.
198 सतरावी जीवनकळा.
199 हरिनाम सोपे असून कोणी घेत नाही म्हणून दुर्लभ झाले आहे.
200 जपतपादि सर्व साधनात सर्वांभूती भगवंत पाहणे हे मुख्य आहे.
201 जाति, वित्तादि गोष्टी गौण आहेत, श्रद्धेने हरीभजन हे मुख्य पाहिजे आहे.
202 आईचा किंवा बापाचा पक्ष, नाम घेणाऱ्याचा किंवा ऐकणाऱ्याचा पक्ष
203 ज्याने आपली जिव्हा नामाकडे योजिली त्याचे भाग्य कोण वाखाणील.

- ९ -

यमुना कावेरी गंगा भागीरथी।
कृष्णा सरस्वती तुंगभद्रा॥ १॥
नर्मदा आठवी वेळोवेळां वाचे।
नाहीं भय साचें प्राणियासी॥ २॥
तयांचे संगती पापी उद्धरती।
दर्शनेचि होती मुक्ति प्राप्त॥ ३॥
तुका म्हणे नामीं एकनिष्ठ भाव।
तेथें वासुदेव सर्वकाळ॥ ४॥

- १० -

प्रातःकाळी नाम पवित्राचे घ्यावे। तेणे विसरावे जन्ममृत्यु॥ १॥
नळ युधिष्ठिर जनक जनार्दन[204]।
स्मरणेचि धन्य होती प्राणी॥ २॥
न करा आळस नाम घेतां वाचे। नाहीं भय साचें प्राणियांसी॥ ३॥
तुका म्हणे वाचे गाईल गोविंद।
होय परमानंद नामें एका॥ ४॥

- ११ -

आवडे हें रूप साजिरे सगुण।
पाहतां लोचन सुखावले॥ १॥
आतां दृष्टीपुढे ऐसाचि तूं राहे।
जो मी तुज पाहे नारायणा॥ २॥
लांचावले मन लागलीसे गोडी।
ते जीवें न सोडी ऐसे झाले॥ ३॥
तुका म्हणे आम्ही केली जे लडिवाळी।
पुरवावी आळी माय-बापे॥ ४॥

- १२ -

समाधान चित्ताचे चरण आलिंगन।
पायांवरी मन स्थिरावले॥ १॥
जैसे केले तैसे घालूं लोटांगणा।
करूं प्रदक्षिणा नमस्कार॥ २॥
प्रार्थितो मी तुज राहें माझ्या पोटी।
हृदयसंपुटी देवराया॥ ३॥
क्षेम आलिंगन दिली पायीं मिठी।
सांडलीसे लुटी अमूप हो॥ ४॥
तुका म्हणे आतां आनंदीआनंद।
गाऊं परमानंद मनासंगे॥ ५॥

## 34.2 स्फुट अभंग

ज्ञानेश्वर

- १ -

गोपाळा रे तुझे ध्यान लागो मना।
अणु[205] न विसंबे हरि जगत्रैजीवना॥ धृ॥
सोनियाचा दिवस आणि अमृतें पाहाला[206]।
नाम आठवितां रूपीं प्रगट पैं झाला॥ १॥
तनु मनु शरण विनटलो तुझ्या पायीं।
बाप रखुमादेवीवरावांचूनि आनु नेणें कांहीं॥ २॥

- २ -

हरि आला रे हरि आला रे। संतसंगे ब्रह्मानंदु झाला रे॥ धृ॥
हरि येथे रे हरि तेथे रे। हरिवांचुनि न दिसे रितें रे॥ १॥
हरि पाहीं रे हरि ध्याई रे। हरिवांचुनि दुजें नाहीं रे॥ २॥
हरि वाचे रे हरि नाचे रे। हरि पाहतां आनंदु सांचे रे॥ ३॥
हरि आदीं रे हरि अंती रे। हरि व्यापक सर्वांभूतीं रे॥ ४॥
हरि जाणा रे हरि वाना रे। बाप रखुमादेवीवरु राणा रे॥ ५॥

मुक्ताबाई

मुक्तामुक्त दोन्ही नाइकतो कर्णीं।
हरिनामपर्वणी सदाकाळ॥ १॥
नाहीं काळ तेथें आम्हां वेळ कैंची।
हरिनामछंदाची गोडी थोरी॥ २॥
विना विघ्नबाधा नायकों आम्ही कदा।
निरंतर धंदा रामकृष्ण॥ ३॥
मुक्तपणे मुक्त मुक्ताई पैं रत।
हरिनाम स्मरत सर्वकाळ॥ ४॥

निवृत्तिनाथ

नाम मुखीं सदा तोचि पैं भाग्याचा।
तयासी यमाचा धाक नाहीं॥ १॥
रामकृष्णहरि सर्वकाळ वसे।
तेथेंचि विलासे हरिराज॥ २॥

[204] पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः।
पुण्यश्लोको विदेहश्च पुण्यश्लोको जनार्दनः॥ असा शुद्ध श्लोक आहे. पुण्यश्लोका च वैदेही असापण पाठ प्रचलित आहे. पण तुकोबांचा पाठ तरी सीतावाचक नसून जनकवाचकच होता असे येथे स्पष्ट दिसते.त्याच प्रमाणे अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा। पंचकं ना स्मरेन्नित्यं महापातक नाशनम्॥ हे शुद्ध असून पंचकन्याः स्मरेन्नित्यं असे म्हणतात, तीहि चूक आहे. महापातकनाशनम् ह्या विशेषणाचे विशेष्य पंचकं हेंच शोभते हें सहज कळण्या सारखे आहे.ना याच अर्थ नरः असा आहे. (पान १ श्लोक १८ पहा)

[205] किंचित्हि

[206] उजेडला. (देखें भूतजात निदेले। तेथेचि जया पाहाले। आणि जीव जेथे चेइले। तेथ निद्रित जो॥ ज्ञानेश्वरी अ. २। ३५५)

हरिध्यानीं वसे अखंड पैं सर्वदा।
न पवे तो आपदा इये जनीं॥ ३॥
निवृत्ति समता हरिभजन करी।
सर्वत्र कामारी ऋद्धि सिद्धि॥ ४॥

सोपानदेव

मनाचे मवाळ[207] हरिरूप चिंतिती।
रामकृष्णमूर्ती नित्यकथा॥ १॥
रामकृष्ण ध्यान सदा पैं सर्वदा।
न पवेल[208] आपदा नाना योनी॥ २॥
हरिध्यानजपें मुक्त पैं अनंत।
जीव शिवीं रत सर्वकाळ॥ ३॥
सोपान प्रेमाचा आनंद हरीचा।
तुटला मोहाचा मोहपाश॥ ४॥

नामदेव

काळवेळ नसे नामसंकीर्तनीं।
उंच नीच योनी हेंही नसे॥ १॥
धरा नाम कंठी सदासर्वकाळ।
मग तो गोपाळ सांभाळील॥ २॥
कृपाळु कोंवसा[209] सुखाचा सागर।
करील उद्धार भाविकांसी॥ ३॥
नामा म्हणे फार सोपे हें साधन।
वाचे नाम घेणे इतुकेंचि॥ ४॥

जनाबाई

नाम फुकट चोखट। नाम घेतां न ये वीट॥ १॥
जड शिळा ज्या सागरीं। आत्माराम[210] नामें तारी॥ २॥
पुत्रभावें[211] स्मरण केले। तया वैकुंठासी नेले॥ ३॥
नाममहिमा जनी जाणे। ध्यातां विठ्ठलचि होणे॥ ४॥

कान्होपात्रा

नामें दोष जळती। नामें पापी उद्धरती॥ १॥
हें तो आले अनुभवा। सत्य जीवा प्रत्यया॥ २॥
नामें अपार तारिले। नामें जीवन्मुक्त केले॥ ३॥
कान्हूपात्रा नाम घेतां। पायीं जडली तत्त्वतां॥ ४॥

[207] कोमल
[208] पावेल
[209] आधार
[210] श्रीराम
[211] अजामिळाने

सांवतामाळी

नामाचिया बळें न भीऊं सर्वथा।
कळिकाळाच्या माथा सोटे मारूं॥ १॥
वैकुंठीचा देव आणूं या कीर्तनीं।
विठ्ठल गाऊनी नाचो रंगी॥ २॥
सुखाचा सोहळा करूनि दिवाळी।
प्रेमें वनमाळी चित्तीं धरूं॥ ३॥
सांवता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा।
तेणें मुक्ति द्वारा वोळंगती॥ ४॥

सेना न्हावी

असाल तेथे करा नामाचे चिंतन।
याहुनि साधन आणिक नाही॥ १॥
सोडवील माझा भक्तांचा कैवारी।
प्रतिज्ञा निर्धारी केली आम्हीं॥ २॥
गुणदोष याती न विचारी कांहीं।
धांवे लवलाहीं भक्तकाजा॥ ३॥
अवघे काळी वाचे म्हणा नारायण।
सेना म्हणे क्षण जाऊं न द्या॥ ४॥

नरहरि सोनार

नाम फुकाचे फुकाचे। देवा पंढरीरायाचे॥ १॥
नाम अमृत हें सार। हृदयीं जपा निरंतर॥ २॥
नाम संतांचें माहेर। प्रेमसुखाचें आगर॥ ३॥
नाम सर्वांमधे सार। जपे नरहरि सोनार॥ ४॥

श्री एकनाथ

- १ -

नाम वदतां हें वैखरी। चित्त धावे विषयांवरी॥ १॥
कैसे होताहे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण॥ २॥
नामरूपा नाही मेळ[212]। नुसता वाचेचा गोंधळ॥ ३॥
एका जनार्दनीं नाम। नामीं प्रगटे आत्माराम[213]॥ ४॥

- २ -

नाम मुखीं गातां विषयाची वार्ता।
नोहेचि सर्वथा गातयासी॥ १॥
नाम तें पावन नाम तें पावन।
नामावांचून जाण श्रेष्ठ कोण ? ॥ २॥
एका जनार्दनीं नाम तें पावन।
त्रिभुवनीं मंडन नाम सत्य॥ ३॥

[212] ज्याचे ध्यान करावयाचे त्याच्याशी एकरूप किंवा तदाकार चित्तवृत्ति झाली पाहिजे.
[213] नाथ म्हणतात, मी नामस्मरण करितो तेव्हां साक्षात् परमात्मा प्रगटतो.

- ३ -

नामधारक हो कां भलता। त्याचे चरणीं ठेविन माथा॥ १॥
न म्हणे उत्तम अधम। मुखीं जपतां रामनाम॥ धृ॥
याति-कुळाचे कारण। नाहीं नाहीं नामाविण॥ २॥
नाम जपे तोचि श्रेष्ठ। एका जनार्दनीं वरिष्ठ॥ ३॥

- ४ -

वाचे विठ्ठल बोलावें। पुढे पाऊल टाकावें॥ धृ॥
ऐसा ज्याचा नेमधर्म। मुखीं विठ्ठलाचे नाम॥ १॥
सर्वकाळ वाचे। विठ्ठलनाम वदती साचे॥ २॥
कुळधर्म आमुचा। म्हणे एका जनार्दनाचा॥ ३॥

## श्रीरामदास

- १ -

रामनाम कथा गंगा। स्मरणें पावन करी जगा॥ १॥
तिशीं प्रेमपूर आला। शंकरहृदयीं सामावला॥ धृ॥
रामदासाची माउली। आळशावरी गंगा आली॥ २॥

- २ -

धन्य धन्य तें नगर। जेथे कथा निरंतर॥ १॥
गुण गाती भगवंताचे। तेचि मानावे दैवाचे॥ धृ॥
स्वयें बोले जगज्जीवन। थोर कलियुगीं कीर्तन॥ २॥
रामदास म्हणे भले। हरिभक्ति उद्धरले॥ ३॥

## श्रीतुकाराम

- १ -

ब्रह्मरस घेई काढा। तेणे पीडा वारेल॥ १॥
पथ्य नाम विठोबाचे। आणिक वाचे न सेवी॥ धृ॥
भवरोगाऐसे जाय। आणिक काय क्षुल्लकें ? ॥ २॥
तुका म्हणे नव्हे बाधा। आणिक कदा भूतांची॥ ३॥

- २ -

सोपें वर्म आम्हां सांगितले संतीं।
टाळ दिंडी हातीं घेऊनि नाचा॥ १॥
समाधीचे सुख सांडा ओवाळूनी।
ऐसा या कीर्तनीं ब्रह्मरस॥ धृ॥
　　पुढती घडे चढतें सेवन आगळे।
　　भक्तिभाग्यबळें निर्भरता॥ २॥
उपजोंचि नये संदेह चित्तासी।
मुक्ति चारी दासी हरिदासांच्या॥ ३॥
　　तुका म्हणे मन पावोनी विश्रांती।
　　त्रिविध नासती ताप क्षणें॥ ४॥

- ३ -

नाम घेतां नलगे मोल। नाममंत्र नाही खोल॥ १॥
दोंचि अक्षरांचे काम। उच्चारावें राम राम॥ धृ॥
नाहीं वर्ण धर्म याती। नामीं अवघीच सरती॥ २॥
तुका म्हणे नाम। चैतन्यनिजधाम[214]॥ ३॥

- ४ -

राम म्हणे वाटचाली। यज्ञ पाउलापाउली॥ १॥
धन्य धन्य तें शरीर। तीर्थव्रताचे माहेर॥ धृ॥
राम म्हणे करितां धंदा। सुखसमाधी त्या सदा॥ २॥
राम म्हणे ग्रासोग्रासीं। तोचि जेविला उपवासी[215]॥ ३॥
राम म्हणे भोगीं त्यागीं। कर्म न लिंपे त्या अंगीं॥ ४॥
ऐसा राम जप नित्य। तुका म्हणे तो जीवनमुक्त॥ ५॥

- ५ -

नामसंकीर्तन साधन पैं सोपें।
जळतील पापें जन्मांतरिंची॥ १॥
　　न लगे सायास जावें वनांतरा।
　　सुखें येतो घरा नारायण॥ धृ॥
ठायींच बैसोनि करा एकचित्त।
आवडी अनंत आळवावा॥ २॥
　　राम कृष्ण हरि विठ्ठल केशवा।
　　मंत्र हा जपावा सर्वकाळ॥ ३॥
यावीक आणीक नाहीं पैं साधन।
वाहातसे आण विठोबाची॥ ४॥
　　तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनी।
　　शहाणा तो धनी घेतो तेथे॥ ५॥

- ६ -

आतां सर्वभावें हा माझा निर्धार।
न करी विचार आणिकांसी॥ १॥
　　सर्वभावे नाम गाईन आवडी।
　　सर्व माझी जोडी पाय तुझे॥ धृ॥
लोटांगण तुझ्या घालीन अंगणी।
पाहीन भरोन डोळे मुख॥ २॥
　　निर्लज्ज होऊनि नाचेन रंगणीं।
　　येऊं नेदी मनीं शंका कांहीं॥ ३॥
अंकित अंकिला दास तुझा देवा।
संकल्प हा जीवा तुका म्हणे॥ ४॥

[214] देवाचे राहते घर.
[215] हरिचिंतनी अन्न सेवीत जावे। (रामदास)

- ७ -

बैसोनी निवांत शुद्ध करी चित्त।
तया सुखा अंत पार नाही॥ १॥
येऊनि अंतरी राहील गोपाळ।
सायासाचे फळ बैसलीया॥ धृ॥
राम कृष्ण हरि मुकुंद मुरारि।
मंत्र हा उच्चारी वेळोवेळां॥ २॥
तुका म्हणे ऐसें देईन मी दिव्य।
जरी होईल भाव एकविध॥ ३॥

- ८ -

रामनामाचे पोवाडे। अखंड ज्याची वाचा पढे॥ १॥
धन्य तो एक संसारीं। रामनाम जो उच्चारी॥ धृ॥
रामनाम गर्जे वाचा। काळ आज्ञाधारक त्याचा॥ २॥
तुका म्हणे रामनामीं। कृतकृत्य झालो आम्ही॥ ३॥

- ९ -

वद अनंत बोलिला। अर्थ इतुकाचि साधिला॥ १॥
विठोबासी शरण जावें। निजनिष्ठा नाम गावें॥ धृ॥
सकळ शास्त्रांचा विचार। अंतीं इतुकाचि निर्धार॥ २॥
अठरा पुराणी सिद्धांत। तुका म्हणे हाचि हेत॥ ३॥

- १० -

नाम घेतां मन निवे। जिव्हे अमृतचि स्रवे।
होताती बरवे। ऐसे शकुन लाभावे॥ १॥
मन रंगले रंगले। तुझिया चरणी विसावले।
केलिया विठ्ठलें। ऐसी कृपा जाणावी॥ धृ॥
जाले भोजनसें दिसे। चिरा पडोनि ठेला इच्छे।
घालियाच्या ऐसे। अंगा येती उद्गार॥ २॥
सुख भेटों आले सुखा। निध सापडला मुखा।
तुका म्हणे लेखा। आतां नाही आनंदा॥ ३॥

- ११ -

आनंदाच्या कोटी। साठविल्या आम्हां पोटीं॥ १॥
प्रेम चालिला प्रवाहो। नामओघ लवलाहो॥ धृ॥
अखंड खंडेना जीवन। राम कृष्ण नारायण॥ २॥
थडी ऐहिक्य परत्र। तुका म्हणे समतीर॥ ३॥

## 34.3 वामनी श्लोक

अहो येतां जातां, उठत बसतां कार्य करितां
सदा देतां घेतां, वदनिं वदतां ग्रास गिळितां।
घरीं दारीं शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं।
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करीं॥ १॥

हरिचरणसरोजीं चित्सुधासारपानें[216]।
भ्रमर परमयोगी गुंजती नामगानें
हरति सकळ दुःखें, ही सुखाची निधानें[217]
वद वद वद जिव्हे, वासुदेवाभिधानें॥ २॥

न कळतां पद अग्निवरि पडे।
न करि दाह असें न कधीं घडे॥
अजितनाम वदो भलत्या मिसें[218]।
सकळ पातक भस्म करीतसे॥ ३॥

न जाणतहि ये मुखा हरि तथापि पापें हरी
स्मरोनि महिमा स्मरे वदनिं तींच नामें जरी।
प्रवृत्तिविषयीं जरी असति त्यां जनांची मनें
विरक्त करितो हरि स्वगुणनामसंकीर्तनें॥ ४॥

नका याग मांडूं नका प्राण कोंडूं।
नका द्रव्य दारा घरें भोग सोडूं।
नको कष्टुनी पर्वताग्रीं तपाला।
मुखीं रामचंद्र स्मरा वेळवेळां॥ ५॥

दास्य दे हरि तुझ्या चरणांचे।
कीर्तन-श्रवण आचरणाचे।
दे अनन्य हृदयीं स्मरणातें।
हें न देशि तरि दे मरणातें॥ ६॥

निगमचिद्रस साधुमुखें मिळो।
नवविधा भजनें ममता गळो।
मरण जन्म समूळ मृषा टळो।
स्वपद चिन्मय केवळ आतळो॥ ७॥

तो मोक्षही मज नसो श्रुतिसार साचा।
जेथे नसे रस तुझ्या पदसारसाचा॥
तुझे सदुक्त चरितामृत देवराया।
ऐकेन मी अयुतकर्ण दिजे वरा या॥ ८॥

[216] ज्ञानामृतपानाने.
[217] घरे, आगरे.
[218] कोणत्याहि निमित्ताने

### 34.4 दोहरे

माला तो करमे फिरे, जिभ्या फिरे मुखमाहे।
मन तो दाही दिस फिरे इह तो सुमिरन नाहे॥ १॥

ओठ कंठ हाले नही, जिभ्या स्मरे न नाम।
राम हमारा जप करे, हम बैठे आराम॥ २॥

रामनाम सब कुहि कहे, ठक ठाकुर और चोर।
जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे, वो नाम कुछ और॥ ३॥
... कबीर

रामनाम मणिदीप धरूं जीह देहलीदार।
तुलसी भीतरबाहिरौ जो च्याहसि उजियार॥
... तुलसीदास

मुये मढेसे हेत क्या जो जीवकु जाने नाहे।
हेत हरीसो कीजिये रहे जो अंतरमाहे॥
... दादु पिंजारी

## 35 परमार्थ विचारणा

काळचोर घिरट्या बहु घाली।
पामरा तुज कशी नीज आली।
जाग जाग स्वरूपीं लवलाह्या।
जातसे वय अमोलिक वायां॥

### 35.1 प्रपंचातील वागणूक

देनेकू अन्नपान लेनेकू हरिनाम।
तरनेकू लीनता डुबनेकू अभिमान॥
... कबीर

- १ -

काळ जातो क्षणाक्षणा। मूळ येईल मरणा॥ १॥
कांहीं धांवाधांव करीं। जंव तो काळ आहे दूरी॥ २॥
देह आहे जाईजणें। भुललासि कवण्या गुणें॥ ३॥
मायाजाळीं गुंतले मन। परि हें दुःखासी कारण॥ ४॥
सत्य वाटतें सकळ। परि जातां नाहीं वेळ॥ ५॥
रामीरामदास म्हणे। आतां सावधान होणें॥ ६॥

- २ -

ऐसें असावें संसारीं। जोवरि प्राचीनाची दोरी॥ १॥
पक्षी अंगणासी आले। आपुला चारा चरोनि गेले॥ २॥
मुलीं घरचार मांडिला। खेळ मोडोनि टाकिला॥ ३॥
वाटसरू वाटा आले। प्रातःकाळीं उठोनि गेले॥ ४॥
मार्गीं बहुसाल भेटले। तेथें मन नाहीं गुंतले॥ ५॥
एका विनवी जनार्दना। ऐसें असतां भय कोणा॥ ६॥

- ३ -

देह तंव असे भोगाचे आधीन।
याचे सुख शीण क्षणभंगुर॥ १॥
अविनाश जोडी देवापायीं भाव।
कल्याणाचा ठाव सकळही॥ धृ॥
क्षणभंगुर हा येथील पसारा।
आलिया आकारा अवघें नासे॥ २॥
तुका म्हणे येथे सकळ विश्रांती।
आठवावा चित्तीं नारायण॥ ३॥

- ४ -

हेचि थोर भक्ती आवडते देवा।
संकल्पावी माया संसाराची[219]॥ १॥
ठेविले अनंते तैसेचि राहावे।
चित्तीं असो द्यावे समाधान॥ धृ॥
वाहिल्या उद्वेग दुःखाची कवळ।
भोगणे तें फळ संचिताचे॥ २॥
तुका म्हणे घालूं तयावरीं भार।
वाहूं हा संसार देवापायीं॥ ३॥

- ५ -

जोडोनिया धन उत्तम वेव्हारें।
उदास विचारें वेंच करी॥ १॥
उत्तमचि गती तो एक पावेल।
उत्तम भोगील जीव खाणी॥ धृ॥
परउपकारी नेणे परनिंदा।
परस्त्रिया सदा बहिणी-मायी॥ २॥
भूतदया गायी-पशूंचे पाळण।
तान्हेल्या जीवन वनामाजी॥ ३॥
शांतिरूपें नव्हे कोणाशी वाईट।
वाढवी महत्त्व वडिलांचे॥ ४॥
तुका म्हणे हेंचि आश्रमाचे फळ।
परमपद बळ वैराग्याचे॥ ५॥

[219] संसाराचे ममत्व सोडून तो हरीचा आहे असा निश्चय करावा.

- ६ -

बहुता छंदाचे बहु वसे जन।
नये वाटूं मन त्यांच्या संगे॥ १॥
करावा जतन आपुला विश्वास।
अंगा आला रस आवडीचा॥ धृ॥
सुखाची समाधी हरिकथामाउली।
विश्रांति साउली शिणलियाची॥ २॥
तुका म्हणे बुडे बांधोनि दगड।
तेथे काय कोड धांवायाचे॥ ३॥

- ७ -

पराविया नारी माउलीसमान।
मानिलीया धन काय वेचे? ॥ १॥
न करितां परनिंदा परद्रव्य अभिलाष।
काय तुमचे यास वेचे सांगा॥ २॥
बैसलिये ठायीं म्हणता राम राम।
काय होय श्रम ऐसे सांगा॥ ३॥
संतांच्या वचनीं मानितां विश्वास।
काय तुमचे यास वेचे सांगा॥ ४॥
खरें बोलतां कोण लागती सायास।
काय वेचे यास ऐसें सांगा॥ ५॥

तुका म्हणे देव जोडे याजसाठीं।
आकिण ते आटी नलगे कांहीं॥ ६॥

- ८ -

भावे गावे गीत। शुद्ध करोनियां चित्त॥ १॥
जरि व्हावा तुज देव। तरि हा सुलभ उपाव॥ धृ॥
आणिकांचे कानीं। गुण-दोष मना नाणीं॥ २॥
मस्तक ठेंगणा। करी संतांच्या चरणां॥ ३॥
वेंची तें वचन। जेणे राहे समाधान॥ ४॥
तुका म्हणे फार। थोडा करी परउपकार॥ ५॥

- ९ -

एक शेर अन्ना चाड। येर वाउगी बडबड॥ १॥
कां रे तृष्णा वाढविसी। बांधवूनी मोहपाशी॥ धृ॥
औट हात तुझा जागा। येर शिणसी वाउगा॥ २॥
तुका म्हणे श्रम। एक विसरतां राम॥ ३॥

- १० -

क्षणाक्षणा हाचि करावा विचार।
तरावया पार भवसिंधु॥ १॥
नाशिवंत देह जाणा रे सकळ।
आयुष्य खातो काळ सावधान॥ धृ॥
संतसमागमीं धरूनी आवडी।
करावी तांतडी परमार्थी॥ २॥
तुका म्हणे इहलोकींच्या वेव्हारें।
नये डोळे धुरें भरोनि राहो[220]॥ ३॥

## 35.2 आचार्यांचा उपदेश

सङ्गः सत्सु विधीयतां भगवतो भक्तिर्दृढा धीयताम्
शान्त्यादिः परिचीयतां दृढतरं कर्माशु सन्त्यज्यताम्।
सद्विद्वानुपसर्प्यतां प्रतिदिनं तत्पादुके सेव्यताम्
ब्रह्मैकाक्षरमर्थ्यतां श्रुतिशिरोवाक्यं समाकर्ण्यताम्॥ १॥

## 35.3 सुविचारमाला

प्रापंची ममता[221] कधी धरूं नको, लोभात[222] गुंतूं नको।
लोकीं तूं खळ दुष्ट नष्ट भलत्या संगात बैसू नको।
कांहीं कर्म करूं नको[223], गुरुमहापंथासि मोडू नको
जो कोणी भवदुःख सर्व निरसी तो देव सोडू नको॥ १॥

संसारी असतां प्रवाहपतितद्वंद्वासि त्रासू नको
खेदाखेद मनांत आणुनि वनीं जाणे विचारू नको।
कर्णी दुष्ट कठोर शब्द पडती तें दुःख मानू नको
भोगे दुःखसुखादि सारुनि[224] निजानंदास भंगू नको॥ २॥

लाभीं हर्ष नको, विषादहि नको, निंदा प्रशंसा नको
हानीचा मनि शोक तूं धरु नको, देहीं अहंता नको।
कोणाचे इतिकृत्य तें स्मरु नको, माझे तुझे हे नको
आप्तांसी ममता[225] नको, गुरुपरब्रह्मासि सोडू नको॥ ३॥

प्रारब्धी सुखभोगयोग नसतां तें दैन्य मानू नको
इंद्राची बहु संपदा गणु नको, क्षुद्रार्थ वांछू नको।
देहाचे कृतकर्मदुःख अपुले कोणास सांगू नको
भूलोकात महाप्रसंग पडता तूं तत्त्व सोडू नको॥ ४॥

---

220 राजस व तामस प्रपंचवृत्तीनी डोळ्यावर झापड येऊ देऊ नका.
221 मृगाच्या आवडीने जडभरत कसा गुंतला ते भागवतात सांगितले आहे. ममतेपाशी असे मरण.(एकनाथ)
222 लोभमूलानि पापानि।
223 सकाम कर्म करू नको. कर्तेपणाचा अभिमान अंगी वाढू देऊ नकोस.
224 सुखदुःखे भोगून संपव. समर्थांनी हीव घोंगडीत भरून ठेवले व रंगनाथस्वामी गेल्यावर ते कडकडू लागले, ह्याचे बीज हेच आहे. कर्मफळ भोगल्याशिवाय सुटत नाही. भोगल्यानंतरच त्याग होतो.
225 संसारात जास्त अडकवतात म्हणून.

मायामोह नको, सुसंग असतां सोडूनि जाऊ नको
चिंता शोक नको, परार्थ करितां लोकास लाजू नको।
वर्मोच्चार नको, जनात बसतां गोष्टी भवाच्या नको
चित्ती राग नसो अनावर, खरे वैराग्य सोडू नको॥५॥

नानाचार नको, कुकर्म करणे हे क्षुद्रबुद्धी नको
मायाकल्पित वित्तवाजिकरि हे भोगार्थ वांच्छू नको।
कायाक्लेश नको, जनी मुढ अशा संगात बैसू नको
जेथे जाउन येत ना[226] मुनि कदा तें धाम सोडू नको॥६॥

... नारायणबुवा जालवणकर

## 35.4 श्रीसमर्थकृत मनाचे बोध

गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमू पंथ आनंत या राघवाचा ॥१ ॥
मना सज्जना भक्तिपंथेची जावे ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ॥
जनीं[227] निंद्य ते सर्व सोडूनी द्यावे ।
जनीं वंद्य ते सर्व भावे करावे ॥२ ॥
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।
पुढे वैखरी राम आधी वदावा ॥
सदाचार हा थोर सोडू नये तो ।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो ॥३ ॥
मना वासना दुष्ट कामा न ये रे ।
मना सर्वथा[228] पापबुद्धी नको रे ॥
मना धर्मता[229] नीति सोडू नको हो ।
मना अंतरी सार वीचार[230] राहो ॥४ ॥
मना पापसंकल्प सोडूनि द्यावा ।
मना सत्य संकल्प जीवी धरावा ॥
मना कल्पना ते नको वीषयांची ।
विकारे घडे हो जनीं सर्व ची ची ॥५ ॥
नको रे मना क्रोध हा खेदकारी ।
नको रे मना काम नाना विकारी ॥
नको रे मना लोभ हा अंगिकारू ।
नको रे मना मत्सरू दंभ भारू ॥६ ॥

226 यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम।
227 जन म्हणजे सामान्य जन नसून सज्जन, महाजन. निंद्य कोणते व वंद्य कोणते हे संत साधूंनी ठरविल्याप्रमाणे समजावे.
महाजनो येन गतः स पन्थाः अशी व्यासोक्ति आहे.
सदाचार म्हणजे संतांचा आचार. त्यांचा मार्ग धरावा.
228 मुळीच
229 धर्मनिष्ठा
230 माया असार, व ब्रह्म सार त्या ब्रह्माचे चिंतन.

मना श्रेष्ठ धारिष्ट[231] जीवी धरावे ।
मना बोलणे नीच सोशीत जावे[232] ॥
स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे ।
मना सर्व लोकांसि रे नीववावे ॥७ ॥
देहे त्यागिता कीर्ति मागे उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावे ।
परी अंतरी सज्जना नीववावे ॥८ ॥
नको रे मना द्रव्य ते पूढिलांचे ।
अति स्वार्थबुद्धी नुरे पाप सांचे ॥
घडे भोगणे पाप ते कर्म खोटे ।
न होता मनासारिखे दुःख मोठे ॥९ ॥
सदा सर्वदा प्रीति रामी धरावी ।
सुखाची स्वये सांडि जीवी करावी ॥
देहेदुःख ते सूख मानीत जावे ।
विवेके सदा स्वस्वरूपी भरावे ॥१० ॥
जनीं सर्वसूखी असा कोण आहे ।
विचारे मना तूचि शोधूनि पाहे ॥
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केले ।
तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ॥११ ॥
मना मानसी दुःख आणू नको रे ।
मना सर्वथा शोक चिंता नको रे ॥
विवेके देहेबुद्धि सोडूनि द्यावी ।
विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी ॥१२ ॥
मना सांग पां रावणा काय जाले ।
अकस्मात ते राज्य सर्वै बुडाले ॥
म्हणोनी कुडी वासना सांडि वेगी ।
बळे लागला काळ हा पाठिलागी ॥१३ ॥
जिवा कर्मयोगे जनीं जन्म जाला ।
परी शेवटी काळमूखी निमाला ॥
महाथोर ते मृत्युपंथेचि गेले ।
कितीएक ते जन्मले आणि मेले ॥१४ ॥
मना पाहता सत्य हे मृत्युभूमी ।
जितां बोलती सर्वही जीव मी मी ॥
चिरंजीव हे सर्वही मानिताती ।
अकस्मात सांडूनिया सर्व जाती ॥१५ ॥
मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तोही पुढे जात आहे ॥
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्याते ।
म्हणोनी जनीं मागुता जन्म घेते ॥१६ ॥
मनी मानवा व्यर्थ चिंता वहाते ।
अकस्मात होणार होऊन जाते ॥
घडे भोगणे सर्वही कर्मयोगे।मतीमंद ते खेद मानी वियोगे॥१७॥

231 आघाताला टिकणारे.
232 म्हणोनि दुर्वाक्य न बोलावे। आपण साहीत जावे।
याहूनि श्रेष्ठ साधन बरवे। भुवनत्रयी असेना॥ (मुक्तेश्वर)

मना राघवेवीण आशा नको रे ।
मना मानवाची नको कीर्ति तू रे ॥
जया वर्णिती वेद शास्त्रे पुराणे ।
तया वर्णिता सर्वही श्लाघ्यवाणे ॥ १८ ॥
मना सर्वथा सत्य सांडू नको रे ।
मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ॥
मना सत्य ते सत्य वाचे वदावे ।
मना मिथ्य ते मिथ्य सोडूनि द्यावे ॥ १९ ॥
बहू हिंपुटी होईजे मायपोटी ।
नको रे मना यातना तेचि मोठी ॥
निरोधे पचे कोंडिले गर्भवासी ।
अधोमूख रे दुःख त्या बाळकासी ॥ २० ॥
मना वासना चूकवी येरझारा ।
मना कामना सोडि रे द्रव्यदारा ॥
मना यातना थोर हे गर्भवासी ।
मना सज्जना भेटवी राघवासी ॥ २१ ॥
मना सज्जना हीत माझे करावे ।
रघूनायका दृढ चित्ती धरावे ॥
महाराज तो स्वामि वायुसुताचा ।
जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ॥ २२ ॥
न बोले मना राघवेवीण काही ।
मनी वाउगे बोलता सूख नाही ॥
घडीने घडी काळ आयुष्य नेतो ।
देहांती तुला कोण सोडू पहातो ॥ २३ ॥
रघूनायकावीण वाया शिणावे ।
जनासारिखे व्यर्थ का वोसणावे ॥
सदा सर्वदा नाम वाचे वसो दे ।
अहंता मनी पापिणी ते नसो दे ॥ २४ ॥
मना वीट मानू नको बोलण्याचा ।
पुढे मागुता राम जोडेल कैचा ॥
सुखाची घडी लोटता सूख आहे ।
पुढे सर्व जाईल काही न राहे ॥ २५ ॥
देहेरक्षणाकारणे यत्न केला ।
परी शेवटी काळ घेऊन गेला ।
करी रे मना भक्ति या राघवाची ।
पुढे अंतरी सोडि चिंता भवाची ॥ २६ ॥
भवाच्या भये काय भीतोस लंडी ।
धरी रे मना धीर धाकासि सांडी ॥
रघूनायकासारिखा स्वामि शीरी ।
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥ २७ ॥
दिनानाथ हा राम कोदंडधारी ।
पुढे देखता काळ पोटी थरारी ॥
मना वाक्य नेमस्त हे सत्य मानी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ २८ ॥
पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे ।
बळे भक्तरीपूशिरी कांबि वाजे ॥
पुरी वाहिली सर्व जेणें विमानी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ २९ ॥
समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळी कोण आहे ॥
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३० ॥
महासंकटी सोडिले देव जेणे ।
प्रतापे बळे आगळा सर्वगूणे ॥
जयाते स्मरे शैलजा शूलपाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३१ ॥
अहल्या शिळा राघवे मुक्त केली ।
पदी लागता दिव्य होऊनि गेली ॥
जया वर्णिता शीणली वेदवाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३२ ॥
वसे मेरुमांदार हे सृष्टिलीला ।
शशी सूर्य तारांगणे मेघमाला ॥
चिरंजीव केले जनीं दास दोन्ही ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३३ ॥
उपेक्षी कदा रामरूपी असेना ।
जिवा मानवा निश्चयो तो वसेना ॥
शिरी भार वाहेन बोले पुराणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३४ ॥
असे हो जया अंतरी भाव जैसा ।
वसे हो तया अंतरी देव तैसा ॥
अनन्यासि रक्षीतसे चापपाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३५ ॥
सदा सर्वदा देव सन्नीध आहे ।
कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ॥
सुखानंद आनंद कैवल्यदानी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३६ ॥
सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा ।
उडी घालितो संकटी स्वामि तैसा ॥
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥ ३७ ॥
मना प्रार्थना तूजला एक आहे ।
रघूराज थक्कीत होऊनि पाहे ॥
अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे ।
मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥ ३८ ॥
जया वर्णिती वेद शास्त्रे पुराणे ।
जयाचेनि योगे समाधान बाणे ॥
तयालागि हे सर्व चांचल्य दीजे ।
मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥ ३९ ॥
मना पाविजे सर्वही सूख जेथे ।
अती आदरे ठेविजे लक्ष तेथे ॥
विविके कुडी कल्पना पालटीजे ।
मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥ ४० ॥

बहू हिंडता सौख्य होणार नाही ।
शिणावे परी नातुडे हीत काही ॥
विचारे बरे अंतरा बोधवीजे ।
मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥ ४१ ॥

बहुतांपरी हेचि आता धरावे ।
रघूनायका आपुलेसे करावे ॥
दिनानाथ हे तोडरी ब्रीद गाजे ।
मना सज्जना राघवी वस्ति कीजे ॥ ४२ ॥

मना सज्जना एक जीवी धरावे ।
जनीं आपुले हीत तुवां करावे ॥
रघूनायकावीण बोलो नको हो ।
सदा मानसी तो निजध्यास राहो ॥ ४३ ॥

मना रे जनीं मौनमुद्रा धरावी ।
कथा आदरे राघवाची करावी ॥
नसे रामे ते धाम सोडूनि द्यावे ।
सुखालागि आरण्य सेवीत जावे ॥ ४४ ॥

जयाचेनि संगे समाधान भंगे ।
अहंता अकस्मात येऊनि लागे ॥
तये संगतीची जनीं कोण गोडी ।
जिये संगतीने मती राम सोडी ॥ ४५ ॥

मना जे घडी राघवेवीण गेली ।
जनीं आपुली ते तुवा हानि केली ॥
रघूनायकावीण तो शीण आहे ।
जनीं दक्ष तो लक्ष लावूनि पाहे ॥ ४६ ॥

मनीं लोचनी श्रीहरी तोचि पाहे ।
जनीं जाणता मुक्त होऊनि राहे ॥
गुणी प्रीति राखे क्रमूं साधनाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४७ ॥

सदा देवकाजी झिजे देह ज्याचा ।
सदा रामनामे वदे नित्य वाचा ॥
स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४८ ॥

सदा बोलण्यासारिखे चालताहे ।
अनेकी सदा एक देवासि पाहे ॥
सगूणी भजे लेश नाही भ्रमाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४९ ॥

नसे अंतरी काम नानाविकारी ।
उदासीन जो तापसी ब्रह्मचारी ॥
निवाला मनीं लेश नाही तमाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५० ॥

मदे मत्सरे सांडिली स्वार्थबुद्धी ।
प्रपंचीक नाही जयाते उपाधी ॥
सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५१ ॥

क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादे ।
न लिंपे कदा दंभ वादे[233] विवादे ॥
करी सूखसंवाद जो ऊगमाचा[234] ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५२ ॥

सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकी ।
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ॥
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५३ ॥

सदा सेवि आरण्य तारुण्यकाळी ।
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळी ॥
चळेना मनी निश्चयो दृढ ज्याचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५४ ॥

नसे मानसी नष्ट आशा दुराशा ।
वसे अंतरी प्रेमपाशा पिपाशा ॥
ऋणी देव हा भक्तिभावे जयाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५५ ॥

दिनाचा दयाळू मनाचा मवाळू ।
स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू ॥
तया अंतरी क्रोध संताप कैचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५६ ॥

जगी होइजे धन्य या रामनामे ।
क्रिया भक्ति ऊपासना नित्य नेमें ॥
उदासीनता तत्त्वता सार आहे ।
सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ॥ ५७ ॥

नको वासना वीषयी वृत्तिरूपे ।
पदार्थी जडे कामना पूर्वपापे ॥
सदा राम निष्काम चिंतीत जावा ।
मना कल्पनालेश तोहि नसावा ॥ ५८ ॥

मना कल्पना कल्पिता कल्पकोटी ।
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ॥
मनी कामना राम नही जयाला ।
अती आदरे प्रीति नाहि तयाला ॥ ५९ ॥

मना राम कल्पतरू कामधेनू ।
निधी सार चिंतामणी काय वानू ॥
जयाचेनि योगे घडे सर्व सत्ता ।
तया साम्यता कायसी कोण आता ॥ ६० ॥

उभा कल्पवृक्षातळी दुःख वाहे ।
तया अंतरी सर्वदा तेचि आहे ॥
जनीं सज्जनीं वाद हा वाढवा ।
पुढे मागता शोक जीवी धरावा ॥ ६१ ॥

निजध्यास तो सर्व तूटोनी गेला ।
बळे अंतरी शोक संताप ठेला ॥
सुखानंद आनंद भेदे बुडाला ।
मना निश्चयो सर्व खेदे उडाला ॥ ६२ ॥

---
[233] आपुला आपण स्वानंद। कोणावरी करावा मद। याकारणे वादवेवाद। तुटोनि गेला॥ (दासबोध ८.९.२८)
[234] आत्मस्वरूपाचा, आदितत्त्वाचा.

घरी कामधेनू पुढे ताक मागे ।
हरीबोध सांडोनि वेवाद लागे ॥
करी सार चिंतामणी काचखंडे ।
तया मागता देत आहे उदंडे ॥ ६३ ॥

अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना ।
अती काम त्या राम चित्ती वसेना ॥
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा ।
अती वीषयी सर्वदा दैन्यवाणा ॥ ६४ ॥

नको दैन्यवाणे जिणे भक्तिऊणे ।
अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणे ॥
धरी रे मना आदरे प्रीति रामी ।
नको वासना हेमधामी विरामी ॥ ६५ ॥

नव्हे सार संसार हा घोर आहे ।
मना सज्जना सत्य शोधूनि पाहे ॥
जनीं वीष खाता पुढे सूख कैचे ।
करी रे मना ध्यान या राघवाचे ॥ ६६ ॥

घनश्याम हा राम लावण्यरूपी ।
महाधीर गंभीर पूर्णप्रतापी ॥
करी संकटी सेवकांचा कुढावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ६७ ॥

बळे आगळा राम कोदंडधारी ।
महाकाळ विक्राळ तोही थरारी ॥
पुढे मानवा किंकरा कोण केवा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ६८ ॥

सुखानंदकारी निवारी भयाते ।
जनीं भक्तिभावे भजावे तयाते ॥
विवेके त्यजावा अनाचार हेवा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ६९ ॥

सदा रामनामे वदा पूर्णकामे ।
कदा बाधिजेना पदा नित्य नेमे ॥
मदालस्य हा सर्व सोडोनि द्यावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७० ॥

जयाचेनि नामे महादोष जाती ।
जयाचेनि नामे गती पाविजेती ॥
जयाचेनि नावे घडे पुण्यठेवा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७१ ॥

न वेचे कदा ग्रंथिचा[235] अर्थ काही ।
मुखे नाम उच्चारिता कष्ट नाही ॥
महाघोर संसारशत्रू जिणावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७२ ॥

देहेदंडणेचे महादुःख आहे ।
महादुःख ते नाम घेता न राहे ॥
सदाशीव चिंतीतसे देवदेवा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७३ ॥

[235] गांठीचा पैसा. (नाम घेतां नलगे मोल . . . तुकाराम.)

बहुतांपरी संकटे साधनांची ।
व्रते दान उद्यापने ती धनाची ॥
दिनाचा दयाळू मनी आठवावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७४ ॥

समस्तांमधे सार साचार आहे ।
कळेना तरी सर्व शोधून पाहे ॥
जिवा असंशयो वाऊगा तो त्यजावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७५ ॥

नव्हे कर्म ना धर्म ना योग काही ।
नव्हे भोग ना त्याग ना सांग[236] पाही ॥
म्हणे दास विश्वास नामी धरावा ।
प्रभाते मनी राम चिंतीत जावा ॥ ७६ ॥

करी काम निष्काम या राघवाचे ।
करी रूप स्वरूप सर्वां जिवांचे ॥
करी छंद निर्द्वंद्व हे गूण गाता ।
हरीकीर्तनी वृत्तिविश्वास होता ॥ ७७ ॥

अहो ज्या नरा रामविश्वास नाही ।
तया पामरा बाधिजे सर्व काही ॥
महारज तो स्वामि कैवल्यदाता ।
वृथा वाहणे देहसंसारचिंता ॥ ७८ ॥

मना पावना भावना राघवाची ।
धरी अंतरी सोडि चिंता भवाची ॥
भवाची जिवा मानवा भूलि ठेली ।
नसे वस्तुची धारणा व्यर्थ गेली ॥ ७९ ॥

धरा श्रीवरा त्या हरा अंतराते ।
तरा दुस्तरा त्या परा सागराते ॥
सरा वीसरा त्या भरा दुर्भराते ।
करा नीकरा त्या खरा मत्सराते ॥ ८० ॥

मना मत्सरे नाम सांडू नको हो ।
अती आदरे हा निजध्यास राहो ॥
समस्तांमधे नाम हे सार आहे ।
दुजी तूळणा तूळिताही न साहे ॥ ८१ ॥

बहू नाम या रामनामी तुळेना ।
अभाग्या नरा पामरा हे कळेना ॥
विषा औषधा घेतले पार्वतीशे ।
जिवा मानवा किंकरा कोण पूसे ॥ ८२ ॥

जेणे जाळिला काम तो राम ध्यातो ।
उमेसी अती आदरे गूण गातो ॥
बहु ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथे ।
परी अंतरी नामविश्वास तेथे ॥ ८३ ॥

विठोने शिरी वाहिला देवराणा ।
तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा ॥
निवाला स्वये तापसी चंद्रमौळी ।
जिवा सोडवी राम हा अंतकाळी ॥ ८४ ॥

[236] यथासांग, विधिपूर्वक.

भजा राम विश्राम योगेश्वरांचा ।
जपू नेमिला नेम गौरीहराचा ॥
स्वये नीववी तापसी चंद्रमौळी ।
तुम्हां सोडवी राम हा अंतकाळी ॥ ८५ ॥

मुखी राम विश्राम तेथेचि आहे ।
सदानंद आनंद सेवोनि आहे ॥
तयावीण तो शीण संदेहकारी ।
निजधाम हे नाम शोकापहारी ॥ ८६ ॥

मुखी राम त्या काम बाधू शकेना ।
गुणे इष्ट धारिष्ट त्याचे चुकेना ॥
हरीभक्त तो शक्त कामास भारी ।
जगी धन्य तो मारुती ब्रह्मचारी ॥ ८७ ॥

बहू चांगले नाम या राघवाचे ।
अती साजिरे स्वल्प सोपे फुकाचे ॥
करी मूळ निर्मूळ घेता भवाचे ।
जिवा मानवा हेचि कैवल्य[237] साचे ॥ ८८ ॥

जनीं भोजनीं नाम वाचे वदावे ।
अती आदरे गद्यघोषे म्हणावे ॥
हरीचिंतने अन्न सेवीत जावे ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ॥ ८९ ॥

न ये राम वाणी तया थोर हाणी ।
जनीं व्यर्थ प्राणी तया नाम कोणी ॥
हरीनाम हे वेदशास्त्री पुराणी ।
बहू आगळे बोलिली व्यासवाणी ॥ ९० ॥

नको वीट मानू रघूनायकाचा ।
अती आदरे बोलिजे राम वाचा ॥
न वेचे मुखी सापडे रे फुकाचा ।
करी घोष त्या जानकीवल्लभाचा ॥ ९१ ॥

अती आदरे सर्वही नामघोषे ।
गिरीकंदरी जाईजे दूरि दोषे ॥
हरी तिष्ठतू तोषला नामघोषे ।
विशेषे हरामानसी रामपीसे ॥ ९२ ॥

जगी पाहता देव हा अन्नदाता ।
तया लागली तत्त्वता सार चिंता ॥
तयाचे मुखी नाम घेता फुकाचे ।
मना सांग पा रे तुझे काय वेचे ॥ ९३ ॥

तिन्ही कोप जाळू शके कोप येता ।
निवाला हरू तो मुखे नाम घेता ॥
जपे आदरे पार्वती विश्वमाता ।
म्हणोनी म्हणा तेचि हे नाम आता ॥ ९४ ॥

अजामेळ पापी वदे पुत्रकामे ।
तया मुक्ति नारायणाचेनि नामे ॥
शुकाकारणे कुंटणी राम वाणी ।
मुखे बोलिता ख्याति जाली पुराणी ॥ ९५ ॥

महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकूळी ।
जपे रामनामावळी नित्यकाळी ॥
पिता पापरूपी तया देखवेना ।
जनीं दैत्य तो नाम मूखे म्हणेना ॥ ९६ ॥

मुखी नाम नाही तया मुक्ति कैची ।
अहंतागुणे यातना ते फुकाची ॥
पुढे अंत येईल तो दैन्यवाणा ।
म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा ॥ ९७ ॥

हरीनाम नेमस्त पाषाण तारी ।
बहू तारिले मानवी देहधारी ॥
तया रामनामी सदा जो विकल्पी ।
वदेना कदा जीव तो पापरूपी ॥ ९८ ॥

जगी धन्य वाराणसी पुण्यराशी ।
तयेमाजि आता गती पूर्वजांसी ॥
मुखे रामनामावळी नित्यकाळी ।
जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी ॥ ९९ ॥

यथासांग रे कर्म तेही घडेना ।
घडे धर्म ते पुण्यगाठी पडेना ॥
दया पाहता सर्व भूती असेना ।
फुकाचे मुखी नाम तेही वसेना ॥ १०० ॥

जया नावडे नाम त्या यम जाची ।
विकल्पे उठे तर्क त्या नर्क ची ची ॥
म्हणोनी अती आदरे नाम घ्यावे ।
मुखे बोलता दोष जाती स्वभावे ॥ १०१ ॥

अती लीनता सर्वभावे स्वभावे ।
जना सज्जनालागि संतोषवावे ॥
देहे कारणी सर्व लावीत जावे ।
सगूणी अती आदरेसी भजावे ॥ १०२ ॥

हरीकीर्तनी प्रीति रामी धरावी ।
देहेबुद्धि नीरूपणी वीसरावी ॥
परद्रव्य आणीक कांता परावी ।
यदर्थी मना सांडि जीवी करावी ॥ १०३ ॥

क्रियेवीण नानापरी बोलिजेते ।
परी चित्त दुश्चित्त ते लाजवीते ॥
मना कल्पना धीट सैराट धावे ।
तया मानवा देव कैसेनि पावे ॥ १०४ ॥

विवेके क्रिया आपुली पालटावी ।
अती आदरे शुद्ध क्रीया धरावी ॥
जनीं बोलण्यासारिखे चाल बापा ।
मना कल्पना सोडि संसारतापा ॥ १०५ ॥

बरी स्नानसंध्या करी एकनिष्ठा ।
विवेके मना आवरी स्थानभ्रष्टा ॥
दया सर्वभूती जया मानवाला ।
सदा प्रेमळू भक्तिभावे निवाला ॥ १०६ ॥

मना कोप आरोपणा ते नसावी ।
मना बुद्धि हे साधुसंगी वसावी ॥

237 मोक्ष, ज्ञान.

मना नष्ट चांडाळ तो संग त्यागी ।
मना होइ रे मोक्षभागी विभागी ॥ १०७ ॥
मना सर्वदा सज्जनाचेनि योगे ।
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ॥
क्रियेवीण वाचाळता ते निवारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १०८ ॥
जनीं वादवेवाद सोडूनि द्यावा ।
जनीं सूखसंवाद सूखे करावा ॥
जगी तोचि तो शोकसंतापहारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १०९ ॥
तुटे वाद संवाद त्याते म्हणावे ।
विवेके अहंभाव याते जिणावे ॥
अहंतागुणे वाद नाना विकारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ ११० ॥
हिताकारणे बोलणे सत्य आहे ।
हिताकारणे सर्व शोधूनि पाहे ॥
हिताकारणे बंड पाखांड वारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १११ ॥
जनीं सांगता ऐकता जन्म गेला ।
परी वादवेवाद तैसाचि ठेला ॥
उठे संशयो वाद हा दंभधारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ ११२ ॥
जनीं हीत पंडीत सांडीत गेले ।
अहंतागुणे ब्रह्मराक्षस जाले ॥
तयाहून व्युत्पन्न तो कोण आहे ।
मना सर्व जाणीव सांडूनि राहे ॥ ११३ ॥
फुकाचे मुखी बोलता काय वेचे ।
दिसंदीस अभ्यंतरी गर्व सांचे ॥
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।
विचारे तुझा तूचि शोधूनि पाहे ॥ ११४ ॥
तुटे वाद संवाद तेथे करावा ।
विवेके अहंभाव हा पालटावा ॥
जनीं बोलण्यासारखे आचरावे ।
क्रियापालटे भक्तिपंथेचि जावे ॥ ११५ ॥
बहू शापिता कष्टला अंबऋषी ।
तयाचे स्वये श्रीहरी जन्म सोशी ॥
दिला क्षीरसिंधु तया ऊपमानी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ११६ ॥
धुरू लेंकरु बापुडे दैन्यवाणे ।
कृपा भाकिता दीधली भेटि जेणे ॥
चिरंजीव तारांगणी प्रेमखाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ११७ ॥
गजेंद्रू महासंकटी वास पाहे ।
तयाकारणे श्रीहरी धावताहे ॥
उडी घातली जाहला जीवदानी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ११८ ॥
अजामेळ पापी तया अंत आला ।
कृपाळूपणे तो जनीं मुक्त केला ॥
अनाथासि आधार हा चक्रपाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ ११९ ॥
विधीकारणे जाहला मत्स्य वेगी ।
धरी कूर्मरूपे धरा पृष्ठभागी ॥
जना रक्षणाकारणे नीच योनी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२० ॥
महाभक्त प्रल्हाद हा कष्टवीला ।
म्हणोनी तयाकारणे सिंह जाला ॥
न ये ज्वाळ वीशाळ सन्नीध कोणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२१ ॥
कृपा भाकिता जाहला वज्रपाणी ।
तया कारणे वामनू चक्रपाणी ॥
द्विजांकारणे भार्गवू चापपाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२२ ॥
अहल्येसतीलागी आरण्यपंथे ।
कुडावा पुढे देव बंदी तयाते ॥
बळे सोडिता घाव घाली निशाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२३ ॥
तये द्रौपदीकारणे लागवेगे ।
त्वरे धावतो सर्व सांडूनि मागे ॥
कळीलागि जाला असे बौद्ध मौनी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२४ ॥
अनाथां दिनांकारणे जन्मताहे ।
कलंकी पुढे देव होणार आहे ॥
तया वर्णिता शीणली वेदवाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥ १२५ ॥
जनांकारणे देव लीलावतारी ।
बहुतांपरी आदरे वेषधारी ॥
तया नेणती ते जन पापरूपी ।
दुरात्मे महानष्ट चांडाळ पापी ॥ १२६ ॥
जगी धन्य तो राममूखे निवाला ।
कथा ऐकता सर्व तल्लीन जाला ॥
देहेभावना रामबोधे उडाली ।
मनोवासना रामरूपी विराली[238] ॥ १२७ ॥
मना वासना वासुदेवी वसो दे ।
मना वासना कामसंगी नसो दे ॥
मना कल्पना वाउगी ते न कीजे ।
मना सज्जनीं वस्ति कीजे ॥ १२८ ॥
गतीकारणे संगती सज्जनाची ।
मती पालटे सूमती दुर्जनाची ॥
रतीनायिकेचा पती नष्ट आहे ।
म्हणोनी मनातीत होवोनी राहे ॥ १२९ ॥

[238] पाण्यात मीठ विरघळते तशी विराली.

मना अल्प संकल्प तोही नसावा ।
सदा सत्यसंकल्प चित्ती वसावा ॥
जनीं जल्प वीकल्प तोही त्यजावा ।
रमाकांत एकांतकाळी भजावा ॥१३०॥
भजावा जनीं पाहता राम एकू ।
करी बाण एकू मुखी शब्द एकू ॥
क्रिया पाहता उद्धरे सर्व लोकू ।
धरा जानकीनायकाचा विवेकू ॥१३१॥
विचारूनि बोले विवंचूनि चाले ।
तयाचेनि संतप्त तेही निवाले ॥
बरे शोधल्यावीण बोलो नको हो ।
जनीं चालणे शुद्ध नेमस्त राहो ॥१३२॥
हरीभक्त वीरक्त विज्ञान राशी ।
जेणे मानसी स्थापिले निश्चयासी ॥
तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे ।
तया भाषणे नष्ट संदेह मोडे ॥१३३॥
नसे गर्व आंगी सदा वीतरागी ।
क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी ॥
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।
इही लक्षणी जाणिजे योगिराणा ॥१३४॥
धरी रे मना संगती सज्जनाची ।
जेणे वृत्ति हे पालटे दुर्जनाची ॥
बळे भाव सद्बुद्धि सन्मार्ग लागे ।
महाक्रूर तो काळ विक्राळ भंगे ॥१३५॥
भये व्यापिले सर्व ब्रह्मांड आहे ।
भयातीत ते संत आनंत पाहे ॥
जया पाहता द्वैत काही दिसेना ।
भयो मानसी सर्वथाही असेना ॥१३६॥
जिवा श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले ।
परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ॥
देहेबुद्धिचे कर्म खोटे टळेना ।
जुने ठेवणे मीपणे आकळेना ॥१३७॥
भ्रमे नाढळे वित्त ते गुप्त जाले ।
जिवा जन्मदारिद्र्य ठाकूनि आले ॥
देहेबुद्धिचा निश्चयो ज्या टळेना ।
जुने ठेवणे मीपणे आकळेना ॥१३८॥
पुढे पाहता सर्वही कोंदलेसे ।
अभाग्यास हे दृश्य पाषाण भासे ॥
अभावे कदा पुण्य गाठी पडेना ।
जुने ठेवणे मीपणे आकळेना ॥१३९॥
जयाचे तया चूकले प्राप्त नाही ।
गुणे गोविले जाहले दुःख देही ॥
गुणावेगळी वृत्ति तेही वळेना ।
जुने ठेवणे मीपणे आकळेना ॥१४०॥
म्हणे दास सायास त्याचे करावे ।
जनीं जाणता पाय त्याचे धरावे ॥
गुरू अंजनेवीण ते आकळेना ।
जुने ठेवणे मीपणे ते कळेना ॥१४१॥
कळेना कळेना कळेना ढळेना ।
ढळे नाढळे संशयोही ढळेना ॥
गळेना गळेना अहंता गळेना ।
बळे आकळेना मिळेना मिळेना ॥१४२॥
अविद्यागुणे मानवा ऊमजेना ।
भ्रमे चूकले हीत ते आकळेना ॥
परीक्षेविणे बांधले दृढ नाणे ।
परी सत्य मिथ्या असे कोण जाण ॥१४३॥
जगी पाहता साच ते काय आहे ।
अती आदरे सत्य शोधून पाहे ॥
पुढे पाहता पाहता देव जोडे ।
भ्रम भ्रांति अज्ञान हे सर्व मोडे ॥१४४॥
सदा वीषयो चिंतिता जीव जाला ।
अहंभाव अज्ञान जन्मास आला ॥
विवेके सदा स्वस्वरूपी भरावे ।
जिवा ऊगमी जन्म नाही स्वभावे ॥१४५॥
दिसे लोचनी ते नसे कल्पकोडी ।
अकस्मात आकारले काळ मोडी ॥
पुढे सर्व जाईल काही न राहे ।
मना संत आनंत शोधूनि पाहे ॥१४६॥
फुटेना तुटेना चळेना ढळेना ।
सदा संचले मीपणे ते कळेना ॥
तया एकरूपासि दूजे न साहे ।
मना संत आनंत शोधूनि पाहे ॥१४७॥
निराकार आधार ब्रह्मादिकांचा ।
जया सांगता शीणली वेदवाचा ॥
विवेके तदाकार होऊनि राहे ।
मना संत आनंत शोधूनि पाहे ॥१४८॥
जगी पाहता चर्मचक्षी न लक्षे ।
जगी पाहता ज्ञानचक्षी निरक्षे ॥
जनीं पाहता पाहणे जात आहे ।
मना संत आनंत शोधूनि पाहे ॥१४९॥
नसे पीत ना श्वेत ना श्याम काही ।
नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाही ॥
म्हणे दास विश्वासता मुक्ति लाहे ।
मना संत आनंत शोधूनि पाहे ॥१५०॥
खरे शोधिता शोधिता शोधिताहे ।
मना बोधिता बोधिता बोधिताहे ॥
परी सर्वही सज्जनाचेनि योगे ।
बरा निश्चयो पाविजे सानुरागे ॥१५१॥
बहूतांपरी कूसरी तत्त्वझाडा ।
परी अंतरी पाहिजे तो निवाडा ॥
मना सार साचार ते वेगळे रे ।
समस्तांमधे एक ते आगळे रे ॥१५२॥

नव्हे पिंडज्ञाने नव्हे तत्त्वज्ञाने ।
समाधान काही नव्हे तानमाने ॥
नव्हे योगयागे नव्हे भोगत्यागे ।
समाधान ते सज्जनाचेनि योगे ॥१५३॥
महावाक्य तत्त्वादिके पंचकर्णे ।
खुणे पाविजे संतसंगे विवर्णे ॥
द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो ।
तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो ॥१५४॥
दिसेना जनीं तेची शोधूनि पाहे ।
बरे पाहता गूज तेथेचि आहे ॥
करी घेऊ जाता कदा आढळेना ।
जनीं सर्व कोंदाटले ते कळेना ॥१५५॥
म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहे ।
अतर्कासि तर्की असा कोण आहे ॥
जनीं मीपणे पाहता पाहवेना ।
तया लक्षिता वेगळे राहवेना ॥१५६॥
बहू शास्त्र धुंडाळिता वाड आहे ।
जया निश्चयो येक तोही न साहे ॥
मती भांडती शास्त्रबोधे विरोधे ।
गती खुंटती ज्ञानबोधे प्रबोधे ॥१५७॥
श्रुती न्याय मीमांसके तर्कशास्त्रे ।
स्मृती वेद वेदांतवाक्ये विचित्रे ॥
स्वये शेष मौनावला स्थीर पाहे ।
मना सर्व जाणीव सांडून राहे ॥१५८॥
जेणे मक्षिका भक्षिली जाणिवेची ।
तया भोजनाची रुची प्राप्त कैची ॥
अहंभाव ज्या मानसीचा विरेना ।
तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना ॥१५९॥
नको रे मना वाद हा खेदकारी ।
नको रे मना भेद नाना विकारी ॥
नको रे मना शीकवू पूढिलांसी ।
अहंभाव जो राहिला तूजपासी ॥१६०।
अहंतागुणे सर्वही दुःख होते ।
मुखे बोलिले ज्ञान ते व्यर्थ जाते ॥
सुखी राहता सर्वही सूख आहे ।
अहंता तुझी तुंची शोधून पाहे ॥१६१॥
अहंतागुणे नीति सांडी विवेकी ।
अनीतीबळे श्लाघ्यता सर्व लोकी ॥
परी अंतरी सर्वही साक्ष येते ।
प्रमाणांतरे बुद्धि सांडूनि जाते ॥१६२॥
देहेबुद्धिचा निश्चयो दृढ जाला ।
देहातीत ते हीत सांडीत गेला ॥
देहेबुद्धि ते आत्मबुद्धि करावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥१६३॥
मने कल्पिला वीषयो सोडवावा ।
मने देव निर्गूण तो ओळखावा ॥
मने कल्पिता कल्पना ते सरावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥१६४॥
देहादीक प्रपंच हा चिंतियेला ।
परी अंतरी लोभ निश्चित ठेला ॥
हरीचिंतने मुक्तिकांता करावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥१६५॥
अहंकार विस्तारला या देहाचा ।
स्त्रियापुत्रमित्रादिके मोह त्यांचा ॥
बळे भ्रांति हे जन्मचिंता हरावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥१६६॥
बरा निश्चयो शाश्वताचा करावा ।
म्हणे दास संदेह तो वीसरावा ॥
घडीने घडी सार्थकाची धरावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥१६७॥
करी वृत्ती जो संत तो संत जाणा ।
दुराशागुणे जो नव्हे दैन्यवाणा ॥
उपाधी देहेबुद्धीते वाढवीते ।
परी सज्जना केवि बाधू शके ते ॥१६८॥
नसे अंत आनंत संता पुसावा ।
अहंकारविस्तार हा नीरसावा ॥
गुणेवीण निर्गूण तो आठवावा ।
देहेबुद्धिचा आठवू नाठवावा ॥१६९॥
देहेबुद्धि हे ज्ञानबोधे त्यजावी ।
विवेके तये वस्तुची भेटी घ्यावी ॥
तदाकार हे वृत्ति नाही स्वभावे ।
म्हणोनि सदा तेचि शोधीत जावे ॥१७०॥
असे सार साचार ते चोरलेसे ।
इही लोचनी पाहता दृश्य भासे ॥
निराभास निर्गूण ते आकळेना ।
अहंतागुणे कल्पिताही कळेना ॥१७१॥
स्फुरे वीषयी कल्पना ते अविद्या ।
स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या ॥
मुळी कल्पना दो रुपे तेचि जाली ।
विवेके तरी स्वस्वरूपी मिळली ॥१७२॥
स्वरूपी उदेला अहंकार राहो ।
तेणे सर्व आच्छादिले व्योम पाहो ॥
दिशा पाहता ते निशा वाढताहे ।
विवेके विचारे विवंचूनि पाहे ॥१७३॥
जया चक्षुने लक्षिता लक्षवेना ।
भवा भक्षिता रक्षिता रक्षवेना ॥
क्षयातीत तो अक्षयी मोक्ष देतो ।
दयादक्ष तो साक्षिने पक्ष घेतो ॥१७४॥
विधी निर्मिती लीहितो सर्व भाळी ।
परी लीहिता कोण त्याचे कपाळी ॥
हरू जाळितो लोक संहारकाळी ।
परी शेवटी शंकरा कोण जाळी ॥१७५॥

जगी द्वादशादित्य हे रुद्र अक्रा ।
असंख्यात संख्या करी कोण शक्रा ॥
जगी देव धुंडाळिता आढळेना ।
जगी मुख्य तो कोण कैसा कळेना ॥१७६॥
तुटेना फुटेना कदा देवराणा ।
चळेना ढळेना कदा दैन्यवाणा ॥
कळेना कळेना कदा लोचनासी ।
वसेना दिसेना जगी मीपणासी ॥१७७॥
जया मानला देव तो पूजिताहे ।
परी देव शोधूनि कोणी न पाहे ॥
जगी पाहता देव कोट्यानुकोटी ।
जया मानली भक्ति जे तेचि मोठी ॥१७८॥
तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले ।
तया देवरायासि कोणी न बोले ॥
जगी थोरला देव तो चोरलासे ।
गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ॥१७९॥
गुरु पाहता पाहता लक्ष कोटी ।
बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी ॥
मनी कामना चेटके धातमाता ।
जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ॥१८०॥
नव्हे चेटकी चाळकू द्रव्यभोंदू ।
नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू ॥
नव्हे उन्मतू वेसनी संगबाधू ।
जनीं ज्ञानिया तोचि साधू अगाधू ॥१८१॥
नव्हे वाउगी चाहुटी काम पोटी ।
क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ॥
मुखे बोलिल्यासारखे चालताहे ।
मना सद्‌गुरू तोचि शोधूनि पाहे ॥१८२॥
जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी ।
कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी ॥
प्रभू दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे ।
तयाचेनि योगे समाधान बाणे ॥१८३॥
नव्हे तोचि जाले नसे तेचि आले ।
कळो लागले सज्जनाचेनि बोले ॥
अनिर्वाच्य ते वाच्य वाचे वदावे ।
मना संत आनंत शोधीत जावे ॥१८४॥
लपावे अती आदरे रामरूपी ।
भयातीत निश्चीत ये स्वस्वरूपी ॥
कदा तो जनीं पाहताही दिसेना ।
सदा ऐक्य तो भिन्नभावे वसेना ॥१८५॥
सदा सर्वदा राम सन्नीध आहे ।
मना सज्जना सत्य शोधून पाहे ॥
अखंडीत भेटी रघूराजयोगू ।
मना सांडि रे मीपणाचा वियोगू ॥१८६॥
भुते पिंड ब्रह्मांड हे ऐक्य आहे ।
परी सर्वही स्वस्वरूपी न साहे ॥
मना भासले सर्व काही पहावे ।
परी संग सोडूनि सूखी रहावे ॥१८७॥
देहेभान हे ज्ञानशस्त्रे खुडावे ।
विदेहीपणे भक्तिमार्गेचि जावे ॥
विरक्तीबळे निंद्य सर्वै त्यजावे ।
परी संग सोडूनि सूखे रहावे ॥१८८॥
मही निर्मिली देव तो ओळखावा ।
जया पाहता मोक्ष तत्काळ जीवा ॥
तया निर्गुणालागी गूणी पहावे ।
परी संग सोडूनि सूखी रहावे ॥१८९॥
नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता ।
पुरेहून पर्ता न लिंपे विवर्ता ॥
तया निर्विकल्पासि कल्पीत जावे ।
परी संग सोडूनि सूखी रहावे ॥१९०॥
देहेबुद्धिचा निश्चयो जया ढळेना ।
तया ज्ञान-कल्पांतकाळी कळेना ॥
परब्रह्म ते मीपणे आकळेना ।
मनी शून्य अज्ञान हे मावळेना ॥१९१॥
मना ना कळे ना ढळे रूप ज्याचे ।
दुजेवीण ते ध्यान सर्वोत्तमाचे ॥
तया खूण ते हीन दृष्टांत पाहे ।
तेथे संग निःसंग दोन्ही न साहे ॥१९२॥
नव्हे जाणता नेणता देवराणा ।
न ये वर्णिता वेदशास्त्रा पुराणा ॥
नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा ।
श्रुती नेणती नेणती अंत त्याचा ॥१९३॥
वसे हृदयी देव तो कोण कैसा ।
पुसे आदरे साधकू प्रश्न ऐसा ॥
देहे टाकिता देव कोठे पहातो ।
परी मागुता ठाव कोठे रहातो ॥१९४॥
वसे हृदयी देव तो जाण ऐसा ।
नभाचेपरी व्यापकू जाण तैसा ॥
सदा संचला येत ना जात काही ।
तयावीण कोठे रिता ठाव नाही ॥१९५॥
नभी वावरे जा अणूरेणु काही ।
रिता ठाव या राघवेवीण नाही ॥
तया पाहता पाहता तोचि जाले ।
तेथे लक्ष आलक्ष सर्वे बुडाले ॥१९६॥
नभासारिखे रूप या राघवाचे ।
मनी चिंतिता मूळ तूटे भवाचे ॥
तया पाहता देहबुद्धि उरेना ।
सदा सर्वदा आर्त पोटी पुरेना ॥१९७॥
नभे व्यापिले सर्व सृष्टीस आहे ।
रघूनायका ऊपमा ते न साहे ॥
दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावे ।
तया व्यापकू व्यर्थ कैसे म्हणावे ॥१९८॥

अती जीर्ण विस्तीर्ण ते रूप आहे ।
तेथे तर्क संपर्क तोही न साहे ॥
अती गूढ ते दृश्य तत्काळ सोपे ।
दुजेवीण जे खूण स्वामिप्रतापे ॥१९९॥
कळे आकळे रूप ते ज्ञान होता ।
तेथे आटली सर्वसाक्षी अवस्था ॥
मना उन्मनी शब्द कुंठीत राहे ।
तो रे तोचि तो राम सर्वत्र पाहे ॥२००॥
कदा ओळखीमाजि दूजे दिसेना ।
मनी मानसी द्वैत काही वसेना ॥
बहूतां दिसां आपली भेटि जाली ।
विदेहीपणे सर्व काया निवाली ॥२०१॥
मना गूज रे तूज हे प्राप्त झाले ।
परी अंतरी पाहिजे यत्न केले ॥
सदा श्रवणे पाविजे निश्चयासी ।
धरी सज्जनीं संगती धन्य होसी ॥२०२॥
मना सर्वही संग सोडूनि द्यावा ।
अती आदरे सज्जनाचा धरावा ॥
जयाचेनि संगे महादुःख भंगे ।
जनीं साधनेवीण सन्मार्ग लागे ॥२०३॥
मना संग हा सर्वसंगास तोडी ।
मना संग हा मोक्ष तात्काळ जोडी ॥
मना संग हा साधका शीघ्र सोडी ।
मना संग हा द्वैत निःशेष मोडी ॥२०४॥
मनाची शते ऐकता दोष जाती ।
मतीमंद ते साधना योग्य होती ॥
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी ।
म्हणे दास विश्वासता मुक्ति भोगी ॥२०५॥

---

मनोबोधाची आरती

वेदांचें जें गुह्य शास्त्रांचें जें सार ।
प्राकृत शब्दांमाजी केला विस्तार ।
कर्म उपासना ज्ञान गंभीर ।
ज्याच्या मननमात्रें आत्मा गोचर ॥
जय देव जय देव जय मनोबोधा ।
पंचप्राणें आरति तुजस्यात्मशुद्धा ॥
जय देव जय देव ॥

दोन शतें पांच श्लोक हे जाण ।
श्रवणें अर्थें साधक पावति हे खूण ॥
परमार्थासी सुलभ मार्ग हा पूर्ण ।
यशवंत सद्गुरु दासाचा प्राण ॥
जय देव जय देव ॥

जय जय रघुवीर समर्थ॥

---

## 35.5 श्री एकनाथकृत चिरंजीवपद

चिरंजीवपद पावावयासी।
अधिकार कैसा साधकासी।
किंचित् बोलूं निश्चयेंसीं।
कळावयासी साधकां॥ १॥
येथें मुख्य पाहिजे अनुताप।
त्या अनुतापाचें कैसें रूप।
नित्य मरण जाणे समीप।
न मनीं अल्प देहसुख॥ २॥

म्हणे नरदेह किमर्थ निर्मिला।
तो मी विषयस्वार्थी लाविला।
थिता परमार्थ हातिचा गेला।
करी वहिला विचार हा॥ ३॥
ऐसा अनुताप नित्य वाहतां।
तंव वैराग्य ये तयाच्या हाता।
त्या वैराग्याची कथा।
ऐक आतां सांगेन॥ ४॥
तें वैराग्य बहुतां परी।
आहे गा हें अवधारीं।
सात्विक-राजस-तामस त्रिप्रकारीं।
योगीश्वरीं बोलिजे॥ ५॥
नाहीं वेदविधि आचार।
नेणे सत्कर्म साचार।
कर्मधर्मी भ्रष्टाकार।
तो अपवित्र तामस॥ ६॥
त्याग केला पूज्यतेकारणें।
सत्संग सोडूनि पूजा घेणें।
शिष्यममता धरोनि राहणें।
तें जाणणे राजस॥ ७॥
हें वैराग्य राजस तामस।
तें न मानेच संतांस।
तेणें न भेटे कृष्ण परेश।
अनर्थास मूळ तें॥ ८॥
आतां वैराग्य शुद्ध सात्त्विक।
जे मी जगद्वंद्य मानी यदुनायक।
तें तूं सविस्तर ऐक।
मनीं निष्टंक बैसावया॥ ९॥
भोगेच्छा विषयक।
ते तो सांडी सकळिक।
प्रारब्धें प्राप्त होतां देख।
तेथोनी निष्टंक अंग काढी॥ १०॥

कां जे विषय पांच आहेती।
ते अवश्य साधकां नाडिती।
म्हणोनि लागों नेदी प्रीती।
कवणे रीतीं ऐक पां॥ ११॥
जेणें धरिला शुद्ध परमार्थ।
त्यासी जनमान हा अनर्थ।
तेणें वाढे विषयस्वार्थ।
ऐक नेमस्त विचार हा॥ १२॥
वैराग्य पुरुष देखोनी।
त्याची स्तुति करिती जनीं।
एक सन्मानें करोनी।
पूजेलागोनि पैं नेती॥ १३॥
त्याचे वैराग्य कोमळ कंटक।
नेट न धरीच निष्टंक।
देखोनि मानस्तुति अलोकिक।
भुलला देख पैं तेथे॥ १४॥
जनस्तुति लागे मधुर।
म्हणती उद्धरावया हा हरीचा अवतार।
आम्हांलागीं जाहला स्थिर।
तेणें तो धरी फार शब्दगोडी॥ १५॥
हा पांच विषयांमाजीं प्रथम।
शब्द विषयसंभ्रम।
मग स्पर्श विषय सुगम।
उपक्रम तो ऐसा॥ १६॥
नाना मृदु आसनें घालिती।
विचित्र पर्यंक निद्रेप्रती।
नरनारी शुश्रूषा करिती।
तेणें धरी प्रीती स्पर्शाची॥ १७॥
रूपविषय कैंसा गोंवी।
वस्त्रें भूषणें देती बरवीं।
सौंदर्य करी जीवी।
देहीं भावी श्लाघ्यता॥ १८॥
रूप विषय ऐसा जडला।
रस विषय कैंसा झोंबला।
जे जे आवडे तयाला।
त्या त्या पदार्थाला अर्पिती॥ १९॥
ते रसगोडी करितां।
घडी न विसंबे धरी ममता।
मग गंध विषय ओढिता।
होय तत्त्वतां त्या कैसा॥ २०॥
आवडे सुमन चंदन।
बुका केशर विलेपन।
ऐसे पांचही विषय जाण।
जडले संपूर्ण सन्मानें॥ २१॥
मग जे जे जन वंदिती।
तेचि त्याची निंदा करिती।
परि अनुताप नुपजे चित्तीं।
ममता निश्चितीं पूजकांची॥ २२
म्हणाल विवेकी जो आहे।
त्यासी जनमान करील काये।
हें बोलणें मूर्खाचें पाहें।
जया चाड आहे मानाची॥ २३॥
ज्ञात्यांसी प्रारब्धगतीं।
मान झाला तरीं नेघों न म्हणती।
परी तेथेंच गुंतोनि न राहती।
उदास होती तत्काळ॥ २४॥
यापरी साधकाच्या चित्ता।
मानगोडी न संडे सर्वथा।
जरी कृपा उपजेल भगवंता।
तरी होय मागुता विरक्त॥ २५॥
तो विरक्त कैसा म्हणाल।
जो मानलें सांडी स्थळ।
सत्संगी राहे निश्चळ।
न करी तळमळ मानाची॥ २६॥
मांडीना स्वतंत्र फड।
म्हणे अंगा येईल अहंता वाड।
धरूनि जीविकेची चाड।
न बोले गोड मनधरणीं॥ २७॥
नावडे प्रपंच-जनीं बैसणे।
नावडे कोणासी बोलणे।
नावडे योग्यता मिरवणे।
बरवें खाणे नावडे॥ २८॥
नावडे लौकीक परवडी।
नावडती लेणीं लुगडीं।
नावडे परान्नगोडी।
द्रव्यजोडी नावडे॥ २९॥
नावडे स्त्रियांत बैसणे।
नावडे स्त्रियांतें पाहणे।
नावडे स्त्रियांचे रगडणे।
त्यांचे बोलणे नावडे॥ ३०॥
नको नको स्त्रियांचा सांगात।
नको नको स्त्रियांचा एकांत।
नको नको स्त्रियांचा परमार्थ।
करिती आघात पुरुषासी॥ ३१
म्हणाल गृहस्थ साधकें।
स्त्री सांडोन जावें कैं।
येच अर्थी उत्तर निकें।
ऐक आतां सांगेन॥ ३२॥
तरी स्वस्त्रियेवांचोनी।
नातळावी अन्य कामिनी।
कोणे स्त्रियेसी संनिधवाणी।
आश्रयो झणीं न द्यावा॥ ३३॥

स्वस्त्रीसही कार्यापुरतें।
बोलावें स्पर्शावें निरुतें।
परी आसक्त होऊनिया तेथें।
सर्वथा चित्तें नसावें॥ ३४॥
नरनारी शुश्रूषा करिती।
भक्ति ममता उपजविती।
परी शुद्ध जो परमार्थी।
तो स्त्रियांचे संगतीं न बैसे॥ ३५॥
अखंड एकांती बैसणे।
प्रमदासंगे न राहणे।
जो निःसंग निरभिमानें।
त्यापें बैसणे सर्वदा॥ ३६॥
कुटुंब-आहाराकारणें।
अकल्पित न मिळे तरी कोरान्न करणे।
ऐसे स्थिती जे वर्तणे।
तें जाणणे शुद्ध वैराग्य॥ ३७॥
ऐसी स्थिती नाहीं ज्यासी।
तंव कृष्णप्राप्ती कैंची त्यासी।
यालागी कृष्णभक्तांसी।
ऐसी स्थिती असावी॥ ३८॥
या स्थितीवेगळा जाण।
कृष्णीं मिळूं पाहे तो अज्ञान।
तो सकळ मूर्खांचे अधिष्ठान।
लटिकें तरी आण देवाची॥ ३९॥
हें बोलणे माझिये मतीचें।
नव्हे नव्हेचि गा साचें।
कृष्णें सांगितले उद्धवा हिताचे।
तें मी साचे बोलिलो॥ ४०॥
साच न मानी ज्याचे मन।
तो विकल्पें न पावे कृष्णचरण।
माझे काय जाईल जाण।
मी तो बोलोन उतराई॥ ४१॥
साधावया वैराग्य ज्ञान।
मनुष्यदेहीं करावा प्रयत्न।
सांगे एका जनार्दन।
आणीक यत्न असेना॥ ४२॥
ॐ तत्सत् श्रीगोपाळकृष्णार्पणमस्तु॥

# 36 अमृतबिंदुशतक

श्रीज्ञानदेव, श्रीएकनाथ, श्रीतुकाराम व श्रीरामदास
ह्यांच्या मुखगंगेतून स्रवलेले

## 36.1 श्रीज्ञानेश्वर

०१ देखा नवल तया प्रभूचे। अद्भुत प्रेम भक्ताचे
जे सारथ्यपण पार्थाचे। करीत असे॥
०२ हें उपजे आणि नाशे। तें मायावशे दिसे।
येरवीं तत्त्वता वस्तु[239] जे असे। ते अविनाशचि॥
०३ या उपाधिमाजी[240] गुप्त। चैतन्य असे सर्वगत।
तें तत्त्वज्ञ सतत। स्वीकारिती॥
०४ अर्जुना समत्व चित्ताचे। तेंचि सार जाण योगाचे।
जेथ मना आणि बुद्धीचे। ऐक्य आथी॥
०५ म्हणोनि जें जें उचित। आणि अवसरेंकरुनि प्राप्त।
तें कर्महेतु रहित। आचरें तूं॥
०६ एथ वडिल जें जें करिती। तया नाम धर्म ठेविती।
येर तेंचि अनुष्ठिती। सामान्य सकळ॥

०७ मार्गाधारें वर्तावें। विश्व हें मोहरे[241] लावावें।
अलौकिक नोहावें। लोकांप्रति॥
०८ हें मजचिस्तव जाहले। परी म्यां नाहीं केले।
ऐसें जेणें सांगितले। तो सुटला गा॥
०९ तैसा मनाचा मारु न करितां। आणि इंद्रियां दुःख न देतां।
एथ मोक्ष असे आयता। श्रवणाचिमाजि॥
१० तया स्वांतःकरणजिता। सकळकामोपशांता।
परमात्मा परौता। दूरी नाहीं॥
११ दैवास्तव देहाचें पाळण। ऐसा निश्चयो परिपूर्ण।
जो चिंतीना देहभरण। तो महायोगी जाण दैवयोगें॥
१२ शून्य जैसें गृह। कां चैतन्येंविण देह।
तैसें जीवित तें संमोह। ज्ञानहीना॥
१३ म्हणोनि कल्पना जैं सांडे। तैंचि गा संन्यास घडे।
याकारणें दोन्ही सांगडे। संन्यासयोगु॥
१४ जैसा किडाळाचा[242] दोषु जाये। तरी पंधरें तेचि होये।
तैसें जीवा ब्रह्मत्व आहे। अहंकारलोपीं॥
१५ जे ते विश्वाळंकाराचे विसुरे।जरी आहाती आनानें आकारें।
तरी घडले एकेंचि भांगारें। परब्रह्में॥

[239] परब्रह्म.
[240] दृश्य सृष्टी.
[241] मार्गास.
[242] हिणकस सोने.

१६ म्हणोनि आपणपां विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे।
ऐसें साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा॥
१७ यया मनाचें एक निकें। जें देखिले गोडीचिया ठाया सोके।
मणोनि अनुभवसुखचि कवतिकें। दावीत जाइजे॥
१८ तेविं सदभ्यासें निरंतर। चित्तासि परमपुरुषाची मोहर।
लावीं मग शरीर। राहो अथवा जावो॥
१९ यालागी सुमन आणि शुद्धमती। जो अनिंदक अनन्यगति।
पैं गा गौप्यही परी तयाप्रति। चावळिजे सुखें॥
२० तैसा हृदयामध्यें मी राम। असतां सर्वसुखाचा आराम।
कां भ्रांतासी काम। विषयावरी॥
२१ ऐसिया प्रतीतिबोधसागरीं। तूं आपणयातें कल्लोळ करीं।
मग जंव पाहसी चराचरीं। तंव तूंचि आहासी॥
२२ तैसा स्वरूपाचिया प्रसरा-। लागीं प्राणेंद्रियशरीरा।
आटणी करणें जे वीरा। तेंचि तप॥
२३ पैं आपुलेनि भेदेंविण। माझे जाणणे जे एकपण।
तयाचि नांव शरण। मज येणे गा॥
२४ सुवर्णमणि सोनया। ये कल्लोळ जैसा पाणिया।
तैसा मज धनंजया। शरण ये तूं॥
२५ म्हणोनि थोरपणा पऱ्हां[243] सांडिजे।
एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे।
जैं जगा धाकुटे होईजे। तैं जवळिक माझी॥
२६ तैसें उत्तमत्व तेंचि तरे। तैंचि सर्वज्ञता सरे।
जैं मनोबुद्धि भरे। माझेनि प्रेमें॥
२७ एऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें। परि इंद्रही सरीन लाहे उपरें।
म्हणोनि भक्ति गा एथ सरे। जाति अप्रमाण॥
२८ विषयविषाचा पडिपाडू[244]। गोड परमार्थ वाटे कडू।
कडू विषय तो गोडू। जीवासी जाहला॥
२९ नवल अहंकाराची गोठी। विशेष नलगे अज्ञानापाठीं।
सज्ञानाचे झोंबे कंठीं। नाना संकटीं नाचवी॥

## 36.2 श्रीएकनाथ

०१ दारा सुत गृह प्राण। करावें भगवंतासी अर्पण।
हे भगवतधर्म पूर्ण। मुख्यत्वें यजन या नांव॥
०२ हरिचरणीं अपरोक्षस्थिती। तेथील क्षणार्धाची जे प्राप्ती।
त्यापुढे त्रिभुवनविभवसंपत्ती। भक्त मानिती तृणप्राय॥
०३ सकळ योगांचे योगगव्हर। वेदांतनिजभांडार।
सकळसिद्धीचे परम सार। भक्ति साचार हरीची॥
०४ मजमाजी रंगली चित्तवृत्ती।
यालागी विसरला गृहासक्ती।
त्यासी गृहस्थाश्रमीच माझी प्राप्ती।
निश्चये जाण उद्धवा॥

[243] पलिकडे, दूर.
[244] पराक्रम.

०५ भरतखंडी नरदेहप्राप्ती। हे परम भाग्याची संपत्ती।
तेथेही विवेकू परमार्थी। त्याचा वंशवर्ती मी परमात्मा॥
०६ स्वकर्मधर्म वर्णाचार। करितांही निजव्यवहार।
ज्यासी सर्वभूतीं मदाकार। तो भक्त साचार माझा॥
०७ भक्ति म्हणजे सर्वांभूतीं। सप्रेम भजनयुक्ती।
प्राप्ती म्हणजे अपरोक्षस्थिती। भगवत्स्फूर्ती अनिवार॥
०८ प्रवाहरूपें अनिवार। जीवलाभ लागला थोर।
त्यातें जिंकी महावीर। तो परम शूर बोलिजे॥
०९ अन्नवस्त्र दानमान। पोटींच्या कळवळ्यानें जाण।
करावें भूतीं प्रियाचरण। हा स्वधर्म जाण सर्वांचा॥
१० जीव परमात्मा दोनी एक। ऐसे जाणणे तें ज्ञान देख।
ऐक्य भोगणे परमात्मसुख। विज्ञान सम्यक त्या नांव॥
११ मी कर्मा आदि-मध्य-अंतीं। मी कर्मकर्ता क्रियाशक्ती।
कर्मफळदाता मी श्रीपती।
हा इत्यर्थ निश्चितीं कर्मकांडींचा॥
१२ पिता स्वयमेव नारायण। माता प्रत्यक्ष लक्ष्मी आपण।
ऐसें भावे ज्याचे भजन। सुपुत्र जाण तो एक॥
१३ वैष्णवीं मानी जाति प्रमाण। शालिग्राम मानी पाषाण।
सद्गुरूसी मानी माणुसपण। तो पापिष्ठ जाण सर्वथा॥
१४ जेणें आपणासी होय दुःख। तें परांसी न करी निःशेख।
जेणें आपणिया होय सुख। तें करी आवश्यक प्राणिमात्रां॥
१५ अंतरशुद्धीचे कारण। मुख्यत्वें हरिकीर्तन।
नामापरतें साधन। सर्वथा आन असेना॥
१६ जागृती स्वप्न आणि सुषुप्ति।
तिन्ही व्यापूनि समाधिही परती।
ज्याची साक्षित्वें स्फुरे स्फूर्ति।
तो जाण निश्चितीं नारायण॥
१७ निःशेष सांडिजे मीपण। याचि नांव हृदयस्थ शरण।
तूं सहजें परब्रह्म परिपूर्ण। मिथ्या देहाभिमान धरूं नको॥

## 36.3 श्रीतुकाराम

०१ नलगे हा लौकिक सांडावा वेव्हार।
घ्यावें वनांतर भस्म दंड॥
०२ सुख पाहतां जवापाडें। दुःख पर्वताएवढें॥
०३ न फळे उत्तर। नाहीं स्वामी जो सादर[245]॥
०४ करावी ते पूजा मनेंचि उत्तम। लौकिकाचे काम काय असे॥
०५ चित्तीं नाहीं आस। त्याचा पांडुरंग दास॥
०६ वैष्णव[246] तो जया। अवघी देवावरी माया॥
०७ नम्र झाला भूतां। तेणें कोंडिले अनंता।
हेंचि शूरत्वाचें अंग। हारी आणिला श्रीरंग॥
०८ शुद्धचर्या[247] हेंचि संतांचें पूजन।

[245] परमात्मा जोंवर वोळला नाहीं तोंवर वाणीला अमोघत्व नाहीं.
[246] भक्त.
[247] विहित धर्माप्रमाणे वागणे.

लागतचि धन नाहीं वित्त॥
०९ तुझे आहे तुजपाशीं। परि तूं जागा चुकलासी।
चिवडूनियां नासी। तुझ्या घरच्यानी[248] केली॥
१० विश्वासाची धन्य जाती। तेथे वस्ती देवाची॥
तुका म्हणे भोळियाचा। देव साचा अंकित॥
११ देव सारावे परते। संत पूजावे आरते॥
१२ नलगे सांडावा आश्रम। उपजले कुळींचे धर्म।
आणिक न करावे श्रम। पुरे एक नाम विठोबाचे॥
१३ भेद नाहीं सर्वात्मना। नारायणा तुज-मज॥
१४ तुज वर्णी ऐसा तुजविण नाहीं।
दुजा कोणी तिहीं त्रिभुवनीं॥
१५ तुका म्हणे करुनी दावी। त्याचे पाय माझे जीवीं॥
१६ भाव तैसें फळ। न चले देवापाशीं बळ॥
१७ वर्णाश्रम करिसी चोख। तरि तूं पावसि उत्तम लोक॥
१८ द्रव्याचिया मागें कळिकाळाचा लाग।
म्हणोनिया संग खोटा त्याचा॥
१९ विटाळ तो परद्रव्य परनारी।
येथुनी जो दुरी तो सोंवळा॥
२० साधुसंत येती घरा। तोचि दिवाळी दसरा॥
२१ तुका म्हणे भाव असतां नसतां।
सायास करितां वायां न वजे॥
२२ देव जोडावे ते करावे अधर्म।
अंतरे ते कर्म नाचरावे॥
२३ पोटापुरते काम। परी अगत्य तो राम॥
२४ आला भागासी तो करीं वेवसाव।
परी राहो भाव तुझ्या पायीं॥
२५ दया क्षमा शांती। तेथें देवाची वसती॥
२६ तुका म्हणे कांहीं नाहीं नेमावीण।
मोकळा[249] तो सीण दुःख पावे॥
२७ आशाबद्ध तो जगाचा दास।
पूज्य तो उदास सर्व जनां॥
२८ सत्यसंकल्पाचा दाता नारायण।
सर्व करी पूर्ण मनोरथ॥
२९ तुका म्हणे हरिच्या दासा। शुभकाळ दाही दिशा॥
३० वृक्ष-वल्ली आम्हां सोयरीं वनचरें।
पक्षीही सुस्वरें आळवीती॥
येणें सुखें रुचे एकांताचा वास।
नाहीं गुण-दोष अंगा येत॥
३१ निष्ठुर तो दिसे निराकारपणें।
कोंवळा सगुण प्रतिपाळी॥
३२ मन हें निश्चळ झाले एके ठायी।
तयां उणे काई निजसुख।
३३ ब्रह्मरस करूं भोजन पंगती।
संतांचे संगती सर्व काळ॥

248 नियमहीन, स्वच्छंदी.
249 नियमहीन, स्वच्छंदी.

३४ भक्तीची ते जाती ऐसी। सर्वस्वासी मुकावे॥
३५ चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती।
व्याघ्र हे न खाती सर्प तया॥
३६ कासया गुण-दोष वानूं आणिकांचे।
मज काय त्यांचे उणें असे॥
३७ पवित्र तो देह वाणी पुण्यवंत।
जो वदे अच्युत सर्वकाळ॥
३८ प्रेम अमृताची धार। वाहे देवासी समोर॥
३९ भक्तीच्या उत्कर्षे। नाहीं मुक्तीचे तें पिसे॥
४० वासनेची बुंथी[250]। तेथे कैंची ब्रह्मस्थिति॥
४१ निश्चयाचे बळ। तुका म्हणे तेचि फळ॥
४२ तरिच जन्मा यावें। दास विठ्ठलाचे व्हावें॥
४३ तुका म्हणे थोडे आहे। आली उर्मी साहुन राहें॥
४४ दुजें खंडे तरी। उरला तो अवघा हरी।
आपणाबाहेरी। नलगे ठाव धुंडावा॥

## 36.4 श्रीरामदास

०१ नरदेहाचे उचित। कांहीं करावे आत्महित।
यथानुशक्त्या चित्तवित्त। सर्वोत्तमीं लावावे॥
०२ संसारदुःख विसरवी। भक्त्मार्ग विमल दावी।
भजनक्रिया जो उपजवी। तो सत्त्वगुण॥
०३ मूर्खामाजी परम मूर्ख। जो संसारीं मानी सुख।
या संसारदुःखाएवढे दुःख। आणीक नाहीं॥

०४ जो अन्न देतो उदरासी। शरीर विकावे लागे त्यासी।
मा जेणे घातले जन्मासी। त्यासी कैसें विसरावें? ॥
०५ जो संसारदुःखें दुखवला। जो त्रिविधतापें पोळला।
तोचि एक अधिकारी जाला। परमार्थासी॥
०६ सद्गुरुहूनि देव मोठा। जयास वाटे तो शिष्य करंटा॥
०७ संसारसंगे सुख जाहले। ऐसें देखिले ना ऐकिले॥
०८ जो जाणेल भगवंत। तया नांव बोलिजे संत।
जो शाश्वत आणि अशाश्वत। निवाडा करी॥
०९ पोट भरावयाची विद्या। तियेसि म्हणों नये सद्विद्या।
सर्वव्यापक वस्तु सद्या[251]। पाहिजे तें ज्ञान॥
१० संसार त्याग न करितां। प्रपंचउपाधि न सांडतां।
जनांमध्ये सार्थकता। विचारेंचि होय॥
११ गुप्त तेचि प्रगटवावे। असाध्य तेचि साधावे।
कानडेचि[252] अभ्यासावे। निरंतर॥
१२ देहबुद्धीच्या अंती। सकळांसि एकचि प्राप्ती॥
१३ परी परत्रसाधनेंवीण। म्हणो नये तें श्रवण।
जेथे नाहीं आत्मज्ञान। तया नांव कर्मणा[253]॥

250 घुंगट, वेष्टन.
251 तत्काळ परमात्म्याची जी भेट करिते ती सद्विद्या व तेंच ज्ञान.
252 कठीण, असाध्य.
253 कालक्रमण किंवा करमणूक.

१४ समूळ ग्रंथ पाहिल्यावीण। उगाच ठेवि जो दूषण।
गुण सांगतां अवगुण। पाहे तो एक पढत मूर्ख॥
१५ अक्षरें गाळून वाची। कां ते घाली पदरींचीं।
निगा न करी पुस्तकाची। तो एक मूर्ख॥
१६ गुरुभजनाचेनि आधारें। निरूपणाचेनि विचारें।
क्रियाशुद्ध निर्धारें। पाविजे पद॥

# 37 लोकप्रिय भारुडे

## 37.1 ज्ञानेश्वरांचा आंधळा

ज्यांची ज्ञानदृष्टि गेली आहे ते आंधळे. दोन्ही डोळे गेल्यामुळे प्रपंच कळत नाही व परमार्थहि कळत नाही. आंधळ्याला दृष्टी देणारे भाग्यवंत व परोपकारी पुरुष म्हणजे संत सद्गुरुच होत. दुसऱ्या व तिसऱ्या कडव्यांत मुमुक्षूची स्थिती वर्णिली आहे. चौथ्यांत साधनमार्ग दाखवला आहे आणि पांचव्यांत कृतार्थता सांगितली आहे.

पूर्वजन्मी पाप केले तें हें बहुत विस्तारले।
विषयसुख नाशिवंत सेवितां तिमिर[254] कोंदले।
चौऱ्यांशी लक्ष योनी फिरतां दुःख भोगिले।
ज्ञानदृष्टि हारपली दोन्ही नेत्र आंधळे॥ १॥
धर्म जागो सदैवांचा जे बा परउपकारी।
आंधळ्या दृष्टिदाते त्यांचे नाम मी उच्चारीं॥ धृ॥
संसार दुःखमूळ चहूंकडे इंगळ[255]।
विश्रांति नाहीं कोठे रात्रंदिवस तळमळ।
काम-क्रोध-लोभशुनीं पाठीं लागली वोढाळ।
कवणा आतां शरण जाऊं दृष्टि देईल निर्मळ॥ २॥
माता-पिता बंधु-बहिणी कोण न पवती निर्वाणी।
इष्टमित्र सज्जनसखे हे तों सुखाची मांडणी।
एकला मी दुःख भोगीं कुंभपाक जाचणी।
तेथें कोणी सोडवीना एका सद्गुरुवांचुनी॥ ३॥
साधु-संत माय-बाप तिंही दिले कृपादान।
पंढरिये यात्रे नेले घडले चंद्रभागे स्नान।
पुंडलीक वैजराजे पूर्वी साधिले साधन।
वैकुंठींचे मूळपीठ डोळां ल्याला तें अंजन॥ ४॥
कृष्णांजन[256] एक वेळां  डोळां घालितां अढळ।
तिमिर दुःख गेले सारे फिटले भ्रांतीचे पडळ।
श्रीगुरु निवृत्तिराजे मार्ग दाविला सोज्वळ[257]।
बापरखुमादेविवर विठ्ठल दीनाचा दयाळ॥ ५॥

[254] नेत्ररोगाला वैद्यकशास्त्रातही तिमिर हेच नांव आहे. अज्ञानाचा अंधःकार भरला आहे.
[255] रखरखीत अग्नि.
[256] कृष्णरूप अंजन. सांवळे रूप डोळां भरले.
[257] विठ्ठल दीनदयाळ आहे, त्याला शरण जा. हा सोज्वळ मार्ग.

## 37.2 नामदेवांचा बोबडा

[258]कुत्ना, थमाल रे थमाल आपल्या गाई[259]।
आम्ही आपुल्या घलासि जातो भाई॥ धृ॥
तुम्ही थोलल्या पातलाचे लेक।
तुम्हांमधीं ले मी गलीब आहे येक।
मदला म्हनतां ले जाई गायी लाख।
किती मी धांवूं ले कांता लागळा पाई॥ १॥
काली[260] पिवली ले गाय आहे तान्हेली[261]।
या या गवल्याची धवली गाय पलाली।
मदला देखुनि तो गवली[262] हांका माली।
काली कांबली हिलुनि घेतली थाली॥ २॥
काल बलाचि ले बलाचि खलवस[263] केला।
तुम्हि सल्वांनीं फाल फाल घेतला।
मी गलीब ले म्हनुनि थोलका दिला।
तूं म्हनसिल ले याला कलतचि नाहीं॥ ३॥
कृष्ण म्हणे रे उगा राहि बोबड्या।
तुझ्या गायी रे मीच वळवितो गड्या।
नाहितर धाडिन रे गोपाळाच्या[264] जोड्या
नामा म्हणे रे गोष्ट रोकडि पाही॥ ४॥

## 37.3 तुकोबांचा आंधळा

सहज मी आंधळा गा। निज निराकार पंथें।
वृत्ति हे निवृत्ति झाली। जन न दिसे तेथे।
मी माझे हारपले। ठायीं जेथिच्या तेथे।
अदृश्य तेंचि जाले। कांहीं दृष्य जे होते॥ १॥
सहज मी निजलो गा। शून्य सारोनि तेथे।
त्रिकुट शिखरी गा। दान मिळे आईते॥ धृ॥
टाकिली पात्र झोळी। धर्म अधर्म आशा।
कोल्हाळ चुकवीला। त्रिगुणांचा वोळसा।
न मागे मी भीक आतां। हाचि झाला भरंवसा।

[258] ह्या पदाचा सरळ कथापर अर्थ आहे तो उघडच आहे. रहस्यार्थ पाहावा.
[259] गायी, पक्षी इंद्रिय व इंद्रियवृत्ति.
[260] काळी गाय (तामसवृत्ति). पिवळी किंवा तांबडी गाय (राजसवृत्ति) व ढवळी गाय (सात्त्विकवृत्ति). आपण देवाला दुर्वांचे किंवा बेलाचे त्रिदळ वाहतो ह्यात देवाला त्रिविध वृत्ति अर्पण करून गुणातीत होण्याचाच हेतु असतो. गळ्यांत तीन पदरी जानवे घालतो तें त्रिगुणानी आपण बांधले आहोत व तीनही गुणांचा आदि अंत ब्रह्मगांठीत असतो ह्याच्या स्मरणा साठीच होय.थमाल आपुल्या गाई म्हणून इंद्रिये व इंद्रियवृत्ति देवाच्या स्वाधीन करणे हीच शरणागति होय.
[261] विषयाकडे सतत धांव घेणारी.
[262] ढवळ्या गायीचा मालक विष्णु.
[263] आत्मसुखाचा किंवा भक्तिसुखाचा आनंद.
[264] संतांच्या संगतीत तुला ठेवीन.

वोळली सावित्री गा। तिणे पुरविली इच्छा॥ २॥
उर्ध्वमुखें आळविला। सोहं शब्दाचा नाद।
अरूप जागविला। दाता घेऊनि छंद।
घेऊनि आला दान। निजतत्त्व निजबोध।
स्वरूपीं मेळवीले। नांव ठेविला भेद॥ ३॥
शब्द हा बहुसार। उपकारांची राशी।
म्हणोनि चालवीला। मागे येतील त्यांसी।
मागोनि आली वाट। सिद्धवोळखीची तैसी।
तरल तरती गा। आणिकही विश्वासी॥ ४॥
वर्म तें एक आहे। दृढ धरावा भाव।
जाणीव नागवण। लाभो नेदी तो ठाव।
म्हणोनि संग टाकी। सेवीं अद्वैतभाव।
तुका म्हणे हाचि संतीं। मागें केला उपाव॥ ५॥

## 37.4 रामदासांचा पांगळा

पांगुळ म्हणजे पांगळा, पंगु, पाय मोडलेला. अयोध्यानामक धर्मनगरीत रामराव राज्य करीत आहे. त्याच्या उत्तम धर्माचा जयजयकार असो. सत्य रामराज्य नांदो. मीपणाचे पाय मोडल्यामुळे मी पांगुळ झालो आहे. भजनभिंतीवर प्रेमफडके पसरून बसलेला हा पांगळा कृपादान मागत आहे. पण हा याचक जबरदस्त आहे. मागणे निरसे जेणे। किंबहुना घेणेचि निरसे जेणे। असे दान हा मागत आहे. रामराय समर्थ आहे. त्याने देणे घेणे निरसोनिया पूर्ण केले परिपूर्ण।
भरत गा खंडामाजी। शरयूतीर बा गांव।
धर्माचें नगर तेथे। राज्य करी रामराव।
पांगुळा पाय देतो। देव जानकीनाथ।
जाईन मी तया गांवा। देवा उत्तम तो ठाव॥ १॥
राघवाचा[265] धर्म जागो। सर्व अधर्म भागो।
अज्ञान निरसोनियां। विज्ञानीं लक्ष लागो॥ धृ॥
मीपणाचे मोडले पाय। म्हणऊनि पांगुळ जालो।
तूंपणाची कीर्ति देई। ऐकूनियां शरण आलो।
मी-तूंपण निरसीं माझे। भजनभिंतीवरि बैसलो।
प्रेमफडके पसरोनियां। कृपादान मागो आलो॥ २॥
जनी तूंचि एक दाता। म्हणुनी आलो मागावया।
मागणेचि निरसे जेणे। ऐसें दे गा रामराया।
नवविधा दुभतें देई। भाव हलगा[266] बैसावया।
ज्ञानकाठी देई करी। वैराग्य वोल[267] पांघराया॥ ३॥
दासीहातीं देववीसी। तें मी नेघे सर्वथा।
द्वैतदान नेघें जाण। दोन वेळे आणीता।
अपूर्णता देऊं नको। पूर्ण करी निःकामता।

[265] राघवाचा धर्म म्हणजे अज्ञान निरसून विज्ञानी लक्ष लागणे. अज्ञान, ज्ञान विपरीत ज्ञान व विज्ञान ह्या चारी पदांचा अर्थ दासबोधात (द. २०, स. १) पहावा.
[266] झोपाळा.
[267] फाटके रकटे. मायेतले कांहींएक नको.

आपणाऐसे[268] दान देई। तूं तरी इच्छेचा दाता॥ ४॥
तुझे कृपेचा कांबळा देई। मज पांगुळाकारणें।
मायामोहो हींववातें। तें हें निवारे जेणे।
निःकामता भाकर देई। कामक्षुधा हरे जेणे।
बोधाचे ताक पाजी। शब्द खुंटे धालेपणे॥ ५॥
रामदास-पांगुळासी। रामें दिधलिया दान।
घेणेंचि निरसले। कैंचीं मागण्याची खूण।
देणें घेणें निरसोनियां। पूर्ण केले परिपूर्ण।
दाता ना याचक तेथे। सहजी सहज संपूर्ण॥ ६॥

## 37.5 ज्ञानोबांचा घोंगडी

घोंगडी म्हणजे तनु. कृष्णा, तुझी तनु किती चांगली व आमची किती वोंगळ! तुझी घोंगडी आत्मस्वरूपाकार व सच्चिदानंद ह्यानी युक्त असून शुद्ध सत्त्वगुणानीं विणलेली आहे. तिला षड्गुणांचे गोंडे लाविले आहेत.

कानोबा तुझी घोंगडी चांगली।
आम्हांसी कां दिली वागली॥ धृ॥

स्वगत सच्चिदानंदे मिळोनि शुद्धसत्त्वगुणे विणली रे।
षड्गुण गोंडे रत्नजडित तुज श्यामसुंदरा शोभली रे॥ १॥

काम-कर्म-अविद्या-त्रिगुण पंचभूतानीं विणली रे।
रक्त-रेत-दुर्गंधी-जंतू-नरक-मुतानें भरली रे॥ २॥

षड्विकारषड्वैरी मिळोनि तापत्रयानें विणली रे।
नवाठायीं फाटुनी गेली ती त्वां आम्हांसी दिधली रे॥ ३॥

ऋषि मुनि ध्यातां मुखि नाम गातां संदेहवृत्ती विरली रे।
बापरखुमादेवीवर विठ्ठले, त्वत्पदी वृत्ति मुरली रे[269]॥ ४॥

## 37.6 नाथांचा जोशी

मी आलो रायाचा जोशी। होरा सांगतो लोकांसी॥ धृ॥
येथुन पुढें बरं व्हइल। भक्तिसुखें दोंद वाढेल।
फेरा चौऱ्यायशीचा चुकेल। धन्य मोकाशी॥ १॥
मनजी पाटिल देहगांविचा। विश्वास धरूं नका त्याचा।
हा घात करिल नेमाचा। पाडिल फशीं॥ २॥
वासना बायको शेजारिण। झगडा घालिल मोठि दारुण।
तिच्या पायीं नागवण। घर बुडवीशी॥ ३॥

[268] तुझ्या विमल स्वरूपाचे दान दे.
[269] ह्या घोंगडीचा संपूर्ण अर्थ ल. रा. पांगारकरांनी आपल्या मराठी वाङ्मयाचा इतिहास ह्या ग्रंथात (खंड १, पृ. ६२५, २६) दिला आहे तो पहावा.

एका जनार्दन कंगाल जोशी। होरा सांगे सकळ लोकांसी।
जा शरण सद्गुरूसीं। चुकवा फेरा चौऱ्यायशीं॥ ४॥

## 37.7 नाथांची मुरळी

पुढील मुरळी नाथांच्या गाथ्यांत छापलेली नाहीं. ती ल. रा. पांगारकरांना पैठण व माहूर येथे ऐकावयास मिळाली होती. खंडोबाचे भक्त भंडार उधळतात, गळ्यांत भांडारी (पिवळे वज्र, भंडार म्हणजे हळद), व हातीं कोटंबा म्हणजे वाडगा, भिक्षापात्र घेतात आणि देवाला भरित-रोडग्याचा नैवेद्य करितात, पोत उजळतात, येळकोट करतात आणि खंजिरी-मंजिरी घेऊन त्यावर पोवाडे गातात.

निसंग मुरळी झाले। या मालूचे घर रिघाले॥ धृ॥
गळां भक्तीची भांडारी। भावाचा कोटंबा करीं।
विवेकाची मागते मी वारी। या संतांच्या चौधा[270] आले॥१॥
चौ हात घांट[271] वाजती। सोहं शब्दघोळ गर्जती।
वाघ्या मुरळ्या या नाचती। गुरुकृपेचे अंजन ल्याले॥ २॥
वाजे वैराग्य तुणतुणं। तें कदा नव्हे बा सुनं[272]।
मन घुंगरूं वाजे छुनछुन। नाचत जेजुरी गेले॥ ३॥
गड देखिला जेजुरी। आत्मा नांदतो मल्हारी।
जाउनि बसले मांडीवरी। एका जनार्दन बोले॥ ४॥

## 37.8 नाथांचे भूत

मूळ भागवतात प्रल्हादाच्या वर्णनात कृष्णग्रहगृहीतात्मा असे एक पद आले आहे. त्याचा अर्थ कृष्णग्रहाने पछाडलेला असा आहे. ह्यावरून नाथ, समर्थ, तुकोबा ह्यानी परमात्म्याला भूत म्हणून गमतीने म्हटले आहे. त्यांना एको विष्णुर्महद्भूतम् असा आधारहि मिळाला आहे. महद्भूत म्हणजे पंचमहाभूतांना खाऊन टाकणारे परब्रह्म.

भूत जबर मोठं ग बाई।
झाली झडपण करूं गत काई।
भूत जबर भूत जबर॥ धृ॥
आंत दिसे बाहेरी वसे। या भुतानें लाविले पिसे॥ १॥
भूत लागले धृवबाळाला। उभा अरण्यांत ठेला॥ २॥
भूत बसले वाळुवंटी। या हो पुंडलिकाचेसाठीं॥ ३॥
भूत लागले बहुतांसी। गोरा कुंभार सांवत्यासी॥ ४॥
जनार्दन एकनाथासी। तें भूत लागले रे॥ ५॥

[270] चार रस्ते जेथे मिळतात तें ठिकाण. चौथारा, चव्हाटा. नाशिक येथे एक तिबंधा आहे. (तीन रस्ते जेथे मिळतात ते ठिकाण)
[271] घंटा, वदघोष.
[272] शून्य, स्तब्ध.

## 37.9 नाथांचा जागल्या

संत हे जगाला सावध रहा हुषार रहा म्हणून सांगतात. मायानिद्रेच्या आधीन झालेल्या जीवांना ते जागे करतात. मी जागूनि जागवितो लोकां असे सांगतात.

उठा जी कीं माय-बाप कशी लागली झोप।
हुजूर[273] जाउनियां एवढी चुकवा खेप[274]॥ धृ॥
तुमच्या नगरीची[275] नाहि नांदणुक बरी।
तुमच्या सेजेला दोन लोभिष्ट नारी[276]।
त्यांच्या योगे दुःख तुमच्या नगरीत भारी॥ १॥
हिंडतां जन्म-जन्मांतरिं चौऱ्यांयशि जग।
अजून सापडला नाहीं तुम्हां नीट मार्ग।
कोणते हित केले बापा, खरेंचि सांग॥ २॥
जुन्या ठेवण्याचा[277] तुम्हि पुर्जा[278] काढा।
एका जनार्दनीं धरा बळकट मेंढा[279]।
चाकर हुजूरचा देईन अवघा झाडा॥ ३॥

[273] मालक, परमात्मा.
[274] जन्म मरणाचा फेरा.
[275] देहाची.
[276] अहंता आणि ममता.
[277] जुने ठेवणे मीपणे तें कळेना। (समर्थ) निजरूप, पुरातन वस्तु, पुराणपुरुष.
[278] आच्छादन.
[279] खांब, आधार.